APR/ D/ KTG/ 10:00

**सभापतीस्थानी -तालिका सभापती (श्री.मोहन जोशी )**

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, आता अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात होईल आणि आपल्याला बरोबर सकाळी 11 वाजून 20 मिनिटांनी चर्चा संपवावयाची आहे. त्यानंतर माननीय मंत्री महोदयांचे उत्तराचे भाषण होईल आणि बरोबर दुपारी 12.00 वाजता सभागृहाचे नियमित कामकाज सुरु होईल. आता सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांनी अंतिम आठवडा प्रस्ताव मांडावा.

----

. . . .अे-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील बहुतांशी सहकारी बँकांमध्ये भ्रष्टाचाराची विविध प्रकरणे उघडकीस येणे

**मु.शी.**: राज्यातील बहुतांशी सहकारी बँकांमध्ये भ्रष्टाचाराची विविध प्रकरणे उघडकीस येणे या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, संजय केळकर, डॉ.नीलम गोऱ्हे श्रीमती शोभाताई फडणवीस, सर्वश्री धनंजय मुंडे, चंद्रकांत पाटील,केशवराव मानकर, रामनाथ मोते,वि.प.स. यांचा प्रस्ताव

श्री.चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 259 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"संपूर्ण भारतामध्ये महाराष्ट्राने सहकार चळवळीची मुहूर्तमेढ रोवून जन सामान्यांसाठी आशेचा किरण निर्माण करणे, परंतु मागील 10-12 वर्षापासून सहकाराचे स्वाहाकारामध्ये रुपांतर होणे, राज्यातील बहुतांशी सहकारी बँकांमध्ये भ्रष्टाचाराची विविध प्रकरणे उघडकीस येणे, कोल्हापूर, पुणे, नांदेड, उस्मानाबाद, जालना इत्यादी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या संचालकांनी करोडो रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचे उघडकीस येणे, भ्रष्टाचराची ही लागण जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेपुरती मर्यादित न रहाता शिखर बँकेपर्यंत पोहोचणे, राज्य सहकारी बँकेने बँकेसंबंधीच्या विविध कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन केल्याचे उघडकीस येणे, सहकारी बँकानी सहकारी साखर कारखाने, दूध संघ व सूत गिरण्या इत्यादींना मोठ्या प्रमाणात कर्जाचे वाटप करणे, परंतु या संस्थांमधील बोकाळलेल्या भ्रष्टाचारामुळे या संस्था मोडकळीस येणे, परिणामी त्यांना दिलेले कर्ज 75 टक्के थकीत असल्याचे उघडकीस येणे, पेण अर्बन व इतर नागरी सहकारी संस्थांनी ठेवीदारांना करोडो रुपयांना फसविल्याचे उघडकीस येणे, शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत असतांना खाजगी सावकारांना प्रतिबंध घालण्यासाठी आवश्यक असलेल्या सावकारी कायद्याचा केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात राज्य शासनाने जाणीवपूर्वक उदासीनतेचे धोरण स्वीकारणे, सहकारी बँका, नागरी सहकारी बँका, कारखाने, सूतगिरण्या इत्यादींमध्ये जनसामान्यांच्या अब्जावधी रुपयांच्या ठेवी असल्यामुळे त्यांचा सहकारी चळवळीवरील विश्वास डळमळीत होणे, बोकाळलेल्या भ्रष्टाचारामुळे या सर्व ठेवीदारांमध्ये तीव्र स्वरुपाचा असंतोष निर्माण होऊन सुध्दा शासनाने स्वीकारलेले उदासीनतेचे धोरण, जनसामान्यांचा विश्वास सहकार चळवळीवर परत दृढ होण्या....



APR/ D/ KTG/ 10:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करिता या सर्व प्रकरणांची सखोल चौकशी करण्याची गरज व याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, आज आम्ही एका अत्यंत महत्वाच्या विषयावर अंतिम आठवडा प्रस्तावाच्या माध्यमातून सभागृहाचे आणि सभागृहाच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रातील सर्वसामान्य माणसांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करणार आहोत. या प्रस्तावाला माननीय श्री.हर्षवर्धन पाटील हे उत्तर देणार आहेत आणि ते आमच्या कोल्हापूर जिल्ह्याचे पालक मंत्री देखील आहेत. आजच्या चर्चेकडे सामान्य माणसाचे लक्ष लागलेले असल्याने माननीय मंत्री महोदयांनी काही नेमकी उत्तरे द्यावीत. त्यामुळे मी चर्चेच्या सुरुवातीलाच माननीय मंत्री श्री.हर्षवर्धन पाटीलसाहेब यांना अशी विनंती करतो, आवाहन करतो की, राज्यातील लोक आपल्याकडून नेमक्या उत्तराची अपेक्षा करीत आहेत, त्याकडे लक्ष ठेऊन आहेत. साधारणतः चर्चेच्या शेवटी माननीय मंत्री महोदयांकडून "लवकरात लवकर," "शक्यतो लवकर" अशा प्रकारची उत्तरे दिली जातात. माननीय मंत्री महोदय श्री.हर्षवर्धन पाटील हे आमचे पालकमंत्री असल्यामुळे त्यांच्याशी जवळून परिचय आहे. त्यामुळे ते तशा प्रकारची उत्तरे देणार नाहीत अशी मी अपेक्षा बाळगतो. कारण मी माननीय मंत्री महोदयांचे ज्या एका विषयाकडे लक्ष वेधणार आहे, त्यामध्ये त्यांनी पुढाकार घेतल्यामुळेच महत्वाचा विषय मार्गी लागला आहे आणि तो म्हणजे कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा भ्रष्टाचार. परंतु एकंदरीतच सहकार क्षेत्रामध्ये भ्रष्टाचाराची कीड लागलेली आहे. राज्यातील सामान्य माणूस हा सहकारी चळवळीच्या माध्यमातून मोठा झाला. अशा या सहकारी चळवळीच्या विषयाकडे आपण अधिक लक्ष केंद्रीत करणार आहोत.

सभापती महोदय, प्रामुख्याने नागरी सहकारी पतसंस्था आणि नागरी सहकारी बँकांमुळे वर्षानुवर्षे सामान्य माणसाला अतिशय सहजपणे कर्ज उपलब्ध होत असते. पत संस्थेची व्याख्या करीत असताना नेहमी असे म्हटले जाते की, ज्याची पत नाही, ज्याच्याकडे गहाण ठेवण्यासाठी फार मोठी मालमत्ता नाही अशा लोकांना सहजपणे कर्ज पुरवठा करणारी पतसंस्था आहे. अशा प्रकारे लोकांना सहजपणे कर्ज पुरवठा होत असल्याने मग त्यात सामान्य शेतकरी असेल, सामान्य कामगार असेल त्याला त्याच्याशी संबंधित असलेल्या बऱ्याच गोष्टी मार्गी लावता आल्या. जर तो शेतकरी असेल तर त्याच्या मुलीचे लग्न असेल किंवा शेतीसाठी विविध कार्यकारी सोसायटीकडून होणारा पतपुरवठा कमी पडल्याने शेतीसाठी कर्ज घेत असतो. तसेच सामान्य कामगाराला छोटा -



APR/ D/ KTG/ 10:00

श्री.चंद्रकांत पाटील . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मोठा उद्योग करावयाचा असेल तर अशा वेळी त्याला या पतसंस्थांची खूप मदत झाली आहे. मला आठवते की, 1995-96 च्या आसपास भूदरगड नागरी पतसंस्था ही आमच्या कोल्हापूरमधील नव्हेतर संपूर्ण महाराष्ट्रातील खूप मोठी पतसंस्था मानली जात असे. योगायोगाने म्हणा किंवा मी त्याच गारगोटी गावातील असल्यामुळे ज्यावेळेला मी विद्यार्थी परिषदेचा अखिल भारतीय सरचिटणीस म्हणून माझे काम थांबवून एक सामान्य माणूस म्हणून जीवन जगण्यासाठी गारगोटी येथे शिफ्ट झालो. त्यावेळी आम्हाला भूदरगड नागरी पतसंस्थेच्या बाबतीत खूप मोठे अप्रुप होते. मग त्या गावातील लोक माझ्याकडे आल्यानंतर त्यांना मी या पतसंस्थेचे जे सर्वेसर्वा होते त्या श्री.भास्करराव ठाकूर यांच्याकडे घेऊन जात असे आणि मग त्यांना कर्ज देऊन टाक असे म्हणून लोकांना कर्ज देत असत. पण नंतर असे लक्षात आले की, सामान्य माणसाला ते 10-20 हजार रुपये सहजपणे देत असत. पण त्याच्या बदल्यामध्ये त्यांनी त्यांच्या पतसंस्थेशी संबंधित असलेल्या नेत्यांना विनाकारण करोडो रुपयांचे लोन दिले आहे आणि शेवटी एखाद्या बँकेपेक्षा मोठी असणारी पतसंस्था बुडली. जवळजवळ 1995 पासून 2011 पर्यंत म्हणजे जवळपास 15-16 वर्षे भूदरगड नागरी पतसंस्थेमध्ये पैसे ठेवणारा अतिशय सामान्य माणूस असेल. मग तो प्रामुख्याने एखादा रिटायर झालेला सेवा निवृत्त शिक्षक असेल किंवा सामान्य शेतकरी असेल. ज्याला बरे पीक आल्यामुळे पैसे मिळाले असतील, त्यामुळे भूदरगड नागरी पतसंस्थेमध्ये पैसे ठेऊ या असे त्याला वाटले असेल, कारण 16 टक्के व्याजदराच्या आकर्षणामुळे सामान्य माणूसच नाही तर अनेक संस्थांनी देखील तेथे पैसे गुंतवले. मात्र त्या सर्वांचे पैसे बुडाले, याला 16 वर्षे झाली आहेत परंतु या लोकांना कोणत्या प्रकारचा न्याय मिळत नाही. दर दोन-तीन वर्षांनी सरकार कोणता तरी नवीन प्रस्ताव आणते की, भूदरगड पत संस्था टेक ओव्हर करण्यात येणार आहे.

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ D/ KTG/ प्रथम सौ. रणदिवे.... 10:05

श्री. चंद्रकांत पाटील.....

अमुक एक पतसंस्था, अमुक एक बँक, भूदरगड पतसंथा टेक ओव्हर करणार आहे. पण अद्याप ती पत संस्था कोणीही टेक ओव्हर करण्याचे घाडस केलले नाही. सामान्य माणसाचे पैसे त्यामध्ये बुडालेले आहेत. ज्या ज्या वेळी शासन घोषणा करते, त्या त्या वेळी लोक आपल्याला काही तरी पैसे मिळतील या आशेने त्या ठिकाणी रांगा लावतात.

सभापती महोदय, कोल्हापूर जिल्हयामध्ये 1200 पतसंस्था आहेत. बंद पडलेल्या पतसंस्था सोडल्या तरी 300 ते 400 पतसंस्था चालू आहेत. डबघाईस आलेल्या पतसंस्था पैकी 10 ते 20 पतसंस्था अजून चांगल्या आहेत. संपूर्ण महाराष्ट्रात किती पंतसंस्था आहेत यासंबंधीची आकडेवारी मी सांगू शकणार नाही पण मंत्री महोदय श्री. हर्षवर्धन पाटील त्यासंदर्भातील आकडेवारी सांगू शकतील. या सर्व पतसंस्थांमध्ये गैरव्यवहार झाला, लोकांचे डिपॉझिट्स बुडाले, त्यासाठी शासनाने 200 कोटी रुपयांचे पॅकेज घोषित केले. पण पतसंस्थांनी डिपॉझिटर्सची यादी दिली नाही इत्यादी अशा वेगवेगळया कारणांनी शासन 50 कोटी रुपये सुध्दा वितरित करु शकले नाही. 10 हजार रुपयापेक्षा ज्यांचे कमी डिपॉझिट आहे, त्यांना पैसे मिळणार असे सांगण्यात येते. असे असेल तर ज्यांचे 10 हजार रुपयापेक्षा कमी डिपॉझिट आहे त्या सर्वांचे पैसे देण्यात यावेत. त्यासाठी 600 ते 800 कोटी रुपये लागतील.

सभापती महोदय, भूदरगड पतसंस्थे सारखी किती तरी उदाहरणे सांगता येतील. कोल्हापूर जिल्हयामध्ये त्या त्या भागाचे भूषण म्हणून काही बँका होत्या, मग ती बलभीम बँक असेल, शाहू बँक असेल, मराठा बँक असेल अशा सर्व बँका, गेल्या आठ-दहा वर्षामध्ये त्या त्या बँकेमध्ये काम करणाऱ्या संचालकांनी विनाकरण अपुरे तारण घेऊन, आपल्या संबंधातील लोकांना कर्ज देऊन मोठया प्रमाणात बुडविल्या आहेत. त्यामुळे आज लोकांना कोणीच वाली उरलेला नाही. काही बँका टेक ओव्हर झाल्या. या बँका टेक ओव्हर झाल्यानंतर त्यांच्या अनेक समस्या तशाच प्रलंबित आहेत. बँक टेक ओव्हर झाल्यानंतर त्या बँकेतील कर्मचाऱ्यांचे काय, लोकांचे डिपॉझिट्स परत मिळाले काय? सभापती महोदय, जसा देश मोठा होत चालला आहे, लोकसंख्या वाढत चालली आहे त्याप्रमाणे आपण प्रत्येक प्रश्न फक्त दोन ते चार दिवसात विसरुन जातो. पण त्या प्रश्नाच्या खोलात जाऊन त्यांच्या सर्व समस्या सुटल्या आहेत काय, सगळया कर्मचाऱ्यांना दुसऱ्या ठिकाणी सामावून घेतले आहे काय, लोकांना त्यांचे डिपॉझिट्स परत मिळाले आहेत काय, हे न

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील...

बघता लगेच पुढच्या कामाला लागतो. त्यामुळे एकूणच महाराष्ट्रातील पतसंस्था आणि नागरी सहकारी बँकाचा प्रश्न गंभीर होत चालला आहे.

सभापती महोदय, यापेक्षा जास्त महत्वाच्या विषयाकडे म्हणजेच कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील भ्रष्टाचाराकडे मी माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छितो. महाराष्ट्रात अशा एकूण पाच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आहेत, ज्यांच्यावर प्रशासक नेमावा लागला आहे. त्या ठिकाणी कारवाई करण्यात येत आहे. त्यातीलच ही एक बँक आहे. साधारणत: 2006-2007 मध्ये लोकांनी मोठया प्रमाणावर चळवळ केली आणि त्या चळवळीचा परिणाम म्हणून दिनांक 22 जून, 2007 ला सहा महिन्याच्या आत कलम 88 अन्वये चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले. आपण आज सन 2011मध्ये या विषयावर बोलत आहोत. जवळ जवळ चार वर्षे झाली आहेत. सहा महिन्याच्या आत चौकशी पूर्ण करण्यात यावी असे कलम 88 अन्वये चौकशी करण्याचे आदेश दिले होते. 2002-2003,2003-2004, 2004-2005, 2005-2006 या चार वर्षाचा पहिला रिपोर्ट आला आणि एक धक्कादायक बातमी समोर आली. संचालकांनी आपल्या संबंधित संस्था, आपले नातेवाईक, आपले ओळखीचे लोक यांना प्रचंड मोठया प्रमाणात कर्ज, तारण न घेता किंवा अपुरे तारण घेऊन दिलेले आहे. त्यामुळे ते सगळे कर्ज बुडीत निघाले आहे, आपण ते वसूल करु शकत नाही. त्याचा परिणाम म्हणून कलम 88 अन्वये चौकशी करण्याचा निर्णय घेतला. सहा महिन्याच्या आत रिपोर्ट देण्यात यावा, असे सांगण्यात आले. दिनांक 19-11-2007 ला सहा महिने पूर्ण झाले. पण चौकशीच्या बाबतीत काहीच प्रगती झाली नाही.शासनाने एक स्टेप घेतली आणि अधिकारी बदलले. अधिकारी बदलल्यानंतर थोडी हालचाल सुरु झाली, तोपर्यंत सन 2006-2007 चे ऑडिट सुरु झाले. आणि त्यातून धक्कादायक बातमी पुढे आली. सन 2002 ते 2006 या कालावधीमध्ये खूप तोटा झालेला आहे तसाच सन 2006-2007 च्या ऑडिटमध्ये सुध्दा खूप मोठया प्रमाणात तोटा झाल्याचे समोर आले. त्यानंतर दिनांक 27-2-2009 ला सभापती महोदय, मी मुद्दाम या तारखा सभागृहासमोर मांडतो कारण मंत्री महोदय, श्री हर्षवर्धन पाटील असे म्हणतील की, आम्ही या सगळया संचालकांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी वेळ दिलेला आहे. पण त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी किती वेळ देणार? कलम 88 अन्वये चौकशी करण्याचा निर्णय चार वर्षा पूर्वी घेण्यात आला. त्यानंतर दिनांक 27-2-2009 ला म्हणजे 20 महिन्यानंतर कलम 72 (2) अन्वये नोटिस काढली.

...3...



SMT/ D/ KTG/ 10:05

श्री. चंद्रकांत पाटील.....

सभापती महोदय, एका अत्यंत महत्वाच्या तारखेकडे मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छितो. दिनांक 31-3-2010 ला चौकशी अधिकारी आले. दिनांक 31 मार्च, 2008 ला बँकेवर प्रशासकाची नियुक्ती झाली. या गोष्टीला आता तीन वर्षे झालेली आहेत. त्यामुळे दिनांक 31-3-2010 ला सगळी चौकशी पूर्ण करुन कलम 72(3) ची नोटिस निघाली आणि सगळयात महत्वाचे म्हणजे शासनाने

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील .....

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, 1961 च्या कलम 72(3) अन्वये 117 कोटी रुपयांचे आरोपपत्र दाखल केलेले आहे. मध्येच कोणी तरी म्हणतील की नावे वाचू नका पण मी नवीन असलो तरी सभागृहाचे नियम मला माहीत आहेत. हे आरोपपत्र सरकारचे आहे. या आरोपपत्रामध्ये जी नावे आहेत ती वाचल्यानंतर आपणा सगळ्यांना धक्का बसेल. यामध्ये दोषी संचालक व अधिकाऱ्यांची जी नावे आहेत त्यामध्ये महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील दोन विद्यमान मंत्री श्री. हसन मुश्रीफ तसेच श्री. सतेज उर्फ बंटी पाटील यांच्यावर आरोपपत्र दाखल झाले. आरोपपत्र दाखल होऊन 13 महिने् झाले तरी अजून एफआयआर दाखल करीत नाही. सतेज उर्फ बंटी पाटील हे आता मंत्री झाले तरी ते संचालक होते. सरकारने आरोप पत्र दाखल केले आहे. शासनाचा सही-शिक्का आहे. यामध्ये विद्यमान खासदार श्री. सदाशिवराव मंडलिक, विद्यमान आमदार व माजी मंत्री श्री. विनय कोरे, माजी मंत्री श्री. प्रकाश आवाडे, माजी खासदार श्रीमती निवेदिता माने, विधानसभेचे विद्यमान आमदार श्री. के. पी. पाटील, विधान परिषदेचे विद्यमान आमदार श्री. महादेवराव महाडिक यांची नावे आहेत. आम्ही सर्व महाराष्ट्राचे भले करावयास निघालो आहोत. यामध्ये विधानसभे्चे माजी आमदार श्री. नरसिंगराव पाटील, व श्री. पी.एन.पाटील, विधान परिषदेचे माजी आमदार श्री. अशोक जांभळे अशा अत्यंत मान्यवर लोकांवर सरकारने कलम 72(3) अन्वये आरोपपत्र दाखल केलेले आहे. 31 मार्च 2010 ला आरोपपत्र दाखल होऊन 13 महिने झाले तरी सुध्दा आपण त्यांच्यावर एफआयआर दखल करण्यास तयार नाही.

सभापती महोदय, मी दु:खाने दोन तीन गोष्टी नमूद करुन माझे भाषण संपविणार आहे. कारण ज्येष्ठ सन्माननीय सदस्य या ठिकाणी उपस्थित असून त्यांना बोलावयाचे आहे. पण या सभागृहाच्या कामकाजाच्या अनुषंगाने मी काही दु:ख व्यक्त करणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते तसेच सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील हे रोज ते व्यक्त करीत असतात. या सभागृहामध्ये प्रश्न मार्गी लागतात अशा प्रकारचा आमचा समज होता. मी 13 वर्षे विद्यार्थी परिषदेचे काम करीत होतो. नंतर अखिल भारतीय सरचिटणीस झाल्यावर अशा निष्कर्षाप्रत आलो की चळवळीतून वगैरे काही होत नाही त्यामुळे मी एका 1400 लोकसंख्या असलेल्या गावात सेटल झालो. पक्षाने आग्रह धरल्यामुळे आमदार झालो. आमदार होताना खूप अपेक्षेने या ठिकाणी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

श्री. चंद्रकांत पाटील ...

आलो. या ठिकाणी आल्यानंतर काही प्रश्न सुटतात या अपेक्षेने आलो परंतु माझा अनुभव असा आहे की, या ठिकाणी येऊन प्रश्नाला खोटी आश्वासने दिली जातात आणि तोंडाला पाने पुसली जातात.

मी याच अधिवेशनाचे उदाहरण देतो. या विषयावर मी या ठिकाणी 3 तारांकित प्रश्न दिले. हा इतका मोठा विषय आहे, 117 कोटीचे आरोपपत्र दाखल झालेले आहे आणि या आरोपपत्रामध्ये असलेल्या दोन विद्यमान मंत्र्यांपासून अनेक मोठ्या लोकांची नावे वाचून दाखविली असे असताना माझे प्रश्न अतारांकित केले गेले. मी कच्च्या गुरुचा चेला नसल्यामुळे शेवटी माननीय सचिवांना लेखी पत्र दिले की, इतके महत्वाचे प्रश्न अतारांकित कसे होतात, याचे मला लेखी उत्तर पाहिजे. त्या लेखी पत्रानंतर माझे प्रश्न तारांकित झाले. मधल्या काळात यांनी आपला दबाव निर्माण करुन प्रश्न अतारांकित केले हे लक्षात घेतल्यानंतर मी वेगवेगळ्या माध्यमाव्दारे दीड महिन्याच्या अधिवेशनामध्ये हा प्रश्न उपस्थित करण्याचा प्रयत्न केला. एकदा औचित्याचा मुद्दा दिला. शुक्रवारी औचित्या मुद्दा मांडण्याची परवानगी देण्यात आली. पण त्या दिवशी सभागृहामध्ये गोंधळ झाल्यामुळे असे ठरले की, ते मुद्दे सोमवारी वाचले जातील. पण सोमवारी माझा औचित्याचा मुद्दा गायब झाला. मी अधिकाऱ्यांना विचारल्यानंतर त्यांनी सांगितले की, तुम्ही माननीय सभापतींना भेटा. औचित्य गायब केला. प्रश्न अतारांकित केले. शेवटी परवा अतिशय मेहनतीने सातवा प्रश्न लागला. आता आपले जे सभापती महोदय आहेत त्यांच्याबद्दल मला खूप आदर आहे. सुरुवातीच्या काळात मी अनेक वेळा त्यांना भेटत असे. ते मंत्री असताना तसेच जिल्हा परिषदेमध्ये असताना त्यांच्याबद्दल खूप गोष्टी ऐकल्या होत्या आणि मला खूप बरे वाटावयाचे. आताही माझ्या मनात त्यांच्याबद्दल आदर आहे. परंतु ज्या माननीय सभापतींचा नेहमी आग्रह असतो की, या सभागृहामध्ये प्रश्नोत्तराचा तास महत्वाचा आहे आणि आपण पंधरा, सोळा प्रश्नापर्यंत गेलो पाहिजे, माझ्यावर काय कारवाई व्हावयाची ती होईल त्याची पर्वा न करता मी असे म्हणेन की, त्या दिवशी अतिशय प्रयत्नपूर्वक माझा सातवा प्रश्न लागू नये यासाठी सभागृहामध्ये प्रयत्न झाले. सहाव्या प्रश्नावर येऊन आपण गाडी थांबविली. त्या दिवशी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी मराठीच्या विषयावर मुद्दा उपस्थित केला होता.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती ( श्री.मोहन जोशी )** : सभागृहामध्ये सन्माननीय सभापतींबद्दल असे बोलणे बरोबर नाही. आपण असे म्हणालात की, त्यांनी असे जाणीवपूर्वक केले.

श्री.चंद्रकांत पाटील : मी असे म्हणालो की, त्या दिवशी या विषयाचा प्रश्न सातव्या क्रमांकावर होता. परंतु प्रश्नोत्तराचा तास सहाव्या प्रश्नानंतर संपला. (अडथळा) माननीय सभापतींबद्दल मला आदर आहे, प्रश्नोत्तराच्या तासामध्ये किमान 15-16 प्रश्न चर्चेला यावेत असा त्यांचा प्रयत्न असतो, असे मी सुरुवातीलाच सांगितले आहे. सन्माननीय सदस्य चुकीच्या गोष्टीला पाठीशी घालत असतील तर ते लोकप्रतिनिधी नाहीत. लोकप्रतिनिधी होण्यापूर्वी आपण पक्षाचे कार्यकर्ते असतो. लोकप्रतिनिधी झाल्यानंतर जनतेच्या प्रश्नासंबंधी कॉमन सहमती असावयास पाहिजे. त्या दिवशी प्रश्नोत्तराच्या तासात 6 प्रश्नांवर चर्चा झाली. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे मराठीसंबंधी बोलले. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी अशी विनंती केली होती की, प्रश्नोत्तराच्या तासाची वेळ 5 मिनिटे वाढवून द्यावी. परंतु वेळ वाढवून न मिळाल्यामुळे सहाव्या प्रश्नानंतर प्रश्नोत्तराचा तास संपला होता. म्हणून मी माझे दु:ख मांडताना सुरुवातीलाच सांगितले आहे. मी दिलेले प्रश्न अतारांकित का झाले, मी पत्र देऊन धमकी दिल्यानंतर तारांकित कसे झाले, औचित्याचा मुद्दा का उडविण्यात आला ?

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांना मी सांगू इच्छितो की, आपली या विषयावरील लक्षवेधी सूचना चर्चेसाठी आली नाही, तारांकित प्रश्न चर्चेला आला नाही, ही व्यथा लक्षात घेऊन विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना अंतिम आठवडा प्रस्ताव मांडण्याचा अधिकार असतो, त्याचा वापर करुन हा विषय आज चर्चेला घेण्यात आलेला आहे. तारांकित प्रश्न चर्चेला आला असता तर 1-2 उपप्रश्न विचारता आले असते, लक्षवेधी सूचनेवर एखादा प्रश्न विचारता आला असता. आता आपल्याला बोलण्याची संधी मिळालेली असल्यामुळे आपण अगदी मनमुरादपणे आपले म्हणणे मांडावे. आपण यापूर्वी जे काही झाले असेल ते सर्व विसरावे. भ्रष्टाचाराबद्दल बोलून आपले मन पूर्णपणे मोकळे करावे.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, आपण हे सर्व विसरावे आणि आपण मंत्री असल्यामुळे आज या चर्चेला उत्तर देताना आम्हाला ठोस आश्वासन

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

द्यावे. कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेची कलम 88 नुसार चौकशी होण्याचे श्रेय मी मंत्री महोदयांना देतो. त्यांच्यामुळेच त्या बँकेत प्रशासकाची नेमूणक झाली आहे. मंत्री महोदय, कोणालाच घाबरले नाहीत.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांनी मघाशी माननीय सभापतींचा उल्लेख करीत असताना "जाणीवपूर्वक" असा शब्दप्रयोग केला आहे, तो कामकाजातून काढून टाकण्यात येईल.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, माझ्या वक्तव्यातील जे जे आक्षेपार्ह शब्द आहेत ते कामकाजातून काढून टाकण्यात यावेत, त्याबद्दल माझे काही म्हणणे नाही. मी ते शब्द मागे घेतो, परंतु माझी भावना आपण लक्षात घ्यावी.

**तालिका सभापती** : ठीक आहे.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, त्या दिवशी माझा प्रश्न चर्चेला आला नाही. परंतु त्या प्रश्नाला मंत्री महोदयांनी दिलेले लेखी उत्तर माझ्याजवळ आहे. दिनांक 18.4.2011 रोजीच्या तारांकित प्रश्नांच्या यादीतील क्रमांक 7 वरील तारांकित प्रश्न क्रमांक 13397 मध्ये मी असे विचारले होते की, "कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1060 चे कलम 88 अन्वये चौकशी सुरु असून या चौकशी अंतर्गत महाराष्ट्र सहकारी संस्था नियम 1961 चा नियम 72/3 अन्वये आर्थिक नुकसानीच्या जबाबदारीचे आरोपपत्र दिनांक 31 मार्च, 2010 रोजी देण्यात आले आहे हे खरे आहे काय ?" या प्रश्नोला मंत्री महोदयांनी "होय" असे उत्तर दिलेले आहे. दुस-या प्रश्नात मी चौकशीबद्दल विचारले होते. त्याबाबत उत्तर देताना त्यांनी थोडासा वेळ देत आहोत असे म्हटले आहे. मंत्री महोदयांनी लेखी उत्तरात असे नमूद केले आहे की, "जिल्हा उपनिबंधक, कोल्हापूर यांचेकडून सद्य:स्थितीत नियम 72 (4) अनुसार संबंधितांकडून पुरावा घेण्याची कार्यवाही सुरु आहे." ही कार्यवाही किती दिवस सुरु आहे ? उत्तरात पुढे असे नमूद केले आहे की, "नियम 72 (4) नुसार कार्यवाही व सुनावणी कामकाज सुरु आहे. म्हणणे मांडण्यासाठी बँकेकडून कागदपत्रे मिळालेली नसल्याचे कारणास्तव माजी संचालकांनी त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी मागणी केलेल्या सातत्याच्या विनंतीनुसार

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील.......

मुदतवाढीच्या तारखा देण्यात आल्या आहेत. दिनांक 14.1.2011 रोजी माजी संचालकांनी त्यांचे लेखी म्हणणे सादर केले आहे." म्हणजे दिनांक 31 मार्च, 2010 रोजी शासनाने आरोपपत्र दाखल केलेले आहे. याच उत्तरात पुढे असे नमूद केले आहे की, "दि.29.1.2011 रोजी आणखी एका माजी संचालकाने लेखी म्हणणे सादर केले आहे. बँकेने सदरबाबत एकूण 41 कर्ज प्रकरणांची सद्य:स्थितीची माहिती दि.29.3.2011 रोजी झालेल्या सुनावणी वेळी सादर केली आहे. त्या बाबतची छाननी सुरु असून पुढील तारीख दि.19.4.2011 रोजी आहे." आता ही तारीख सुध्दा काल होऊन गेलेली आहे. म्हणून मी माननीय सहकार मंत्र्यांना विनंती करतो की, या पुढे तारीख वाढवून देऊ नये. दिनांक 31.3.2010 रोजी आरोपपत्र दाखल केल्याचे मंत्री महोदयांनी मान्य केलेले आहे. माजी संचालकांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी विलंब लागत आहे. आता दिनांक 19.4.2011 तारीख होऊन गेलेली आहे. त्यामुळे या माजी संचालकांविरुध्द शासन केव्हा कारवाई करणार आहे असा माझा प्रश्न आहे.

सभापती महोदय, त्याच दिवशी माझा याच विषयाचा प्रश्नोत्तराच्या यादीतील क्रमांक 43 वर प्रश्न होता. मी असा प्रश्न विचारला होता की,....

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील...

"महाराष्ट्र शासनाने दिनांक 14 जानेवारी, 2008 शासन परिपत्रक क्र.सीआयआय 0108/ प्र.क्र.क्र.11/पोलीस-12, मंत्रालय, मुंबई या परिपत्रकामध्ये क्र 1 नुसार" हे खूप महत्वाचे पत्रक आहे. त्यांनी पुढे उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, "त्यात बदल केलेला आहे." तो बदल काय आहे तो आपणास हवा आहे. या पत्रकान्वये मुंबई क्रमांक 1 नुसार नागरी बँका, पत संस्था यांची चाचणी, लेखा परीक्षणाअंती सदर संस्थेने कर्ज मर्यादेचे उल्लंघन करुन विनातारण, अपुरे तारण असुरक्षित कर्ज वाटप केले आहे...

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**सभापती** : या चर्चेला सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी सुरुवात केल्यानंतर, त्यांनी परवा झालेल्या प्रश्नोत्तराच्या तासाच्या अनुषंगाने काही संदर्भ दिला. त्या दिवशी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना दिली होती. ती सूचना त्यांनी फक्त तीन मिनिटामध्ये सदनामध्ये मांडली. आपली प्रथा अशी आहे की, जेव्हा प्रश्नोत्तराचा तास सुरु होतो त्यावेळी नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेच्या अनुषंगाने चर्चा झाली तर तेवढा वेळ प्रश्नोत्तरासाठी वाढवून दिला जातो. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील येथे आहेत....

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील हे नवीन सदस्य आहेत. त्यांना प्रोसीजरची संपूर्णपणे माहिती नाही. त्यानी आपले शब्द लगेच मागे घेतले आहेत. त्यांना तसे वाटत होते म्हणून आज अंतिम आठवडा प्रस्ताव देऊन त्यावर त्यांना बोलण्याची संधी दिलेली आहे. काही चुकून बोलले गेले असेल तर ते सगळे मागे घेतो असे सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांनी म्हटलेले आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील हे माझ्याकडे सतत येणा-यांपैकी आहेत. कधीही कोणत्याही कामासाठी ते माझ्याकडे येतात. अशा परिस्थितीत सभागृहात बोलण्या आधी मला येऊन भेटण्याची तसदी आपण घेतली असती तर बरे झाले असते.

श्री. चंद्रकांत पाटील : माननीय सभापती महोदय, गेल्या अडीच वर्षामध्ये प्रत्येक वेळी आपणास भेटून खूप गप्पा मारलेल्या आहेत. मला तुमच्या विषयी काहीही म्हणावयाचे नाही. पहिला प्रश्न 25 मिनिटे चालला...

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : त्या दिवशी पहिल्या प्रश्नावर 25 मिनिटे चर्चा झाली. अनेक वेळा सदनामध्ये माझी कुरकुर असते की, जास्तीत जास्त प्रश्नांना न्याय द्यायचा असेल तर एकाच प्रश्नावर 14-15 मिनिटे चर्चा होणे बरोबर नाही. प्रत्येक दिवशी 10-12 प्रश्न घेण्याचा माझा प्रयत्न असतो. त्या दिवशी 2 अल्पसूचना प्रश्न चर्चेसाठी होते. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांचे दोन्ही अल्पसूचना प्रश्न अडीच ते तीन मिनिटामध्ये संपले. अल्प सूचना प्रश्न 5 किंवा 7 मिनिटांमध्ये संपवावेत अशी अपेक्षा असते. परंतु तसे होताना दिसत नाही. दुसरे असे की ते दोन अल्पसूचना प्रश्न झाल्यानंतर जो 6 वा प्रश्न चर्चेला आला तो लाईफ इन्शुरन्स कार्पोरेशनचा होता. तोही प्रश्न आपण पिक-अप केला. तसेच नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचने संदर्भात म्हणणे मांडण्यासाठी जी 3 मिनिटे लागली त्यासाठी मी प्रश्नोत्तराच्या तासाचा वेळ 5 मिनिटे वाढवून दिला.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, प्रत्येक दिवशी 10 प्रश्न चर्चिले जावेत असा आपला आग्रह असतो. त्या दिवशी प्रश्नाला न्याय देण्यासाठी आपण तो आग्रह बाजूला ठेवला. त्यामागे सन्माननीय सदस्यांचा प्रश्न चर्चेला येऊ नये असा काही आपला उद्देश नव्हता. म्हणून आम्ही सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांना अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलण्यासाठी संधी दिली. तेव्हा सभापती महोदयांना माझी विनंती आहे की, त्यांनी कृपा करुन तसा काही समज करुन घेऊ नये.

श्री. हेमंत टकले : सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी 6 व्या प्रश्नावर नेमकी चर्चा थांबली अशी शंका उपस्थित केली होती. तसा प्रश्न नव्हता एवढाच त्याचा खुलासा आहे.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, आपल्या बद्दल आमच्या मनात नितांत आदर आहे. माझ्याकडून काही चुकीचे बोलले गेले असेल तर मी दिलगिरी व्यक्त करतो. मी लेखी दिलगिरी देखील व्यक्त करीन. आपणा बद्दल मला खूप आदर आहे. आपण सुरुवातीच्या काळात कसे वेगवेगळया संघर्षातून आलात याचे आम्ही नेहमी संदर्भ देत असतो. सुरुवातीच्या काळात आम्हाला आपले खूप मार्गदर्शन मिळाले. आपल्या भावना दुखावल्या गेल्या असतील तर मी दिलगिरी व्यक्त करतो.

...नंतर श्री. गिते...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील .....

सभापती महोदय, यात दुसऱ्या प्रश्नास माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी उत्तर दिलेले आहे. त्यांनी उत्तर देताना सांगितले की, दिनांक 9.2.2011 च्या शासन निर्णयानुसार(सुधारित) पोलिसात तक्रार दाखल नसल्याने चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही. आजच्या चर्चेत दोन महत्वाचे विषय आहेत. सदरहू भ्रष्टाचाराच्या प्रकरणास 13 महिने झाल्यानंतरही एफ.आय.आर.का दाखल झाला नाही? माननीय श्री. आर.आर.पाटील यांनी म्हटले आहे की, दिनांक 9.2.2011 जे परिपत्रक आहे, ज्याच्या अन्वये विनातारण आणि अपुरे तारण कर्ज दिल्याने सर्व संचालकांना जबाबदार धरले जाते. विनातारण किंवा अपुरे तारण असताना कर्ज द्यावे अशी सूचना संचालकांनी केली तर त्या संचालकांवर जबाबदारी निश्चित होते. दिनांक 9.2.2011 रोजी काढलेल्या परिपत्रकात बदल केला असेल तर त्यात काय बदल करण्यात आला आहे यांचा खुलासा होणे गरजेचे आहे. सदर परिपत्रकातील बदल त्या त्या बँकातील संचालकांना पूरक असा केला गेला आहे काय ही माहिती आम्हाला मिळावी म्हणून या परिपत्रकाच्या अनुषंगाने माननीय सहकार मंत्र्यांनी आपल्या उत्तराच्या भाषणात खुलासा करावा. आज महाराष्ट्रातील सहकारी बॅंका आणि सहकारी पतसंस्था यामध्ये हजारो, लाखो ग्राहकांचे पैसे अडकलेले आहेत. अशा सहकारी संस्थांमध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झाला आहे ही अतिशय भयानक घटना आहे. आपण परिपत्रकात "सुधारित" असे म्हटले आहे म्हणजे काय आहे या गोष्टीचा देखील खुलासा माननीय मंत्री महोदयांनी करावा.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील सहकारी पतसंस्था आणि सहकारी बँका बाबत लोकांमध्ये मोठया प्रमाणात भीती निर्माण झाली आहे. या संस्थाच्या संचालक मंडळावर विश्वास होता म्हणून ग्राहकांनी आपले पैसे त्यामध्ये ठेवले होते. परंतु सदर सहकारी बँकातील आणि सहकारी पतसंस्थांतील संचालक मंडळ विनातारण आपल्या जवळच्या लोकांना मोठया प्रमाणात कर्ज पुरवठा करीत असतील तर या संस्थांच्या ग्राहकांना कधीच न्याय मिळणार नाही. या सस्थांमध्ये भ्रष्टाचार करणाऱ्या संचालक मंडळावर एफआयआर दाखल करा ही बाब काही मी नव्याने सांगत नाही. या अधिवेशनाच्या कालावधीतच पेण अर्बन बँकेच्या संचालक मंडळावर एफआयआर दाखल करण्यात आले आहेत. उस्मानाबाद जिल्हा सहकारी बँक, वर्धा जिल्हा सहकारी बॅंक, नागपूर जिल्हा मध्यवर्ती बँक यांच्यामध्ये सुध्दा मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झाले

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ KTG/ प्रथम श्री. शिगम 10:25

श्री. चंद्रकांत पाटील .....

आहेत. त्यासंदर्भात कलम 88 नुसार चौकशी केली गेली, तसेच तेथील संचालक मंडळावर आरोपपत्र दाखल केले गेले. तसेच त्या संचालक मंडळाच्या विरुध्द एफआयआर दाखल झालेले आहेत. मी कोल्हापूर जिल्हयातील आहे. मी कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेची एक वेगळी कसे आहे असे गृहीत धरा आणि त्या वेगळया केसवर वेगळा काही तरी निर्णय घ्यावा असा मी आग्रह धरत नाही. दीड महिन्याच्या कालावधीत पेण अर्बन बॅंकेच्या संचालक मंडळावर फौजदारी गुन्हे दाखल केले आहेत. काही संचालकांना अटक केली. 15 दिवसांचा रिमांड अजून मिळवून घेतला आहे. त्या बॅंकेतील काही संचालक फरार आहेत. कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेच्या संचालक मंडळाला आपले म्हणण्याची पुन्हा संधी उपलब्ध करुन देऊ नये.कारण कोल्हापूर जिल्हयातील सर्व सामान्य माणसांचे लक्ष लागलेले आहे. या बॅंकेत भ्रष्टाचार करणाऱ्या संचालक मंडळा विरुध्द कधीपर्यंत एफआयआर दाखल केले जातील याबद्दलची माहिती माननीय सहकार मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांनी आपल्या उत्तराच्या भाषणात द्यावी. माननीय श्री.अण्णा हजारे यांच्या प्रयत्नाने 2008 साली शासनाने परिपत्रक काढलेले आहे, त्यात काय बदल करण्यात आला आहे, त्याबाबतचा देखील खुलास माननीय मंत्री महोदयांनी करावा अशी मी विनंती करतो. सभापती महोदय, मला बोलण्यासाठी पुरेसा वेळ दिल्यामुळे मी आभार मानतो आणि माझ्याकडून आपल्या बाबतीत अनावधानाने काही उल्लेख केले गेले असतील, तर त्याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करतो आणि माझे मनोगत पूर्ण करतो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

**सभापतीस्थानी माननीय उप सभापती**

**उप सभापती** : मी सर्व सदस्यांना जाणीव करुन देऊ इच्छितो की, अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चा आपल्याला 12.00 वाजेपर्यंत संपवावयाची आहे. माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरास जवळपास अर्धा तास लागेल. 11 वाजून 20 मिनिटापर्यंत सर्व सन्माननीय सदस्यांनी आपली भाषणे पूर्ण करावीत.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सर्वश्री पांडुरंग फुंडकर व इतर माननीय सदस्यांनी मांडलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाची आर्थिक त्याचबरोबर शैक्षणिक उन्नती झाली तिचे सर्व श्रेय सहकार चळवळीला जाते. सध्या महाराष्ट्रातील सहकारी चळवळ मोडीत निघते की काय अशी भीती माझ्यासारख्या सहकार चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्याला वाटू लागली आहे. प्रशासकीय कारभार योग्य पध्दतीने न केल्यामुळे अनेक सहकारी संस्था आज डबघाईला आलेल्या आहेत. सहकारी संस्थांमध्ये दोन गट पडले आणि अल्पमतात असलेल्या गटामार्फत संस्थेच्या विरोधात वेगवेगळे आरोप केले जाऊन संस्थेचा कारभार ठप्प करण्याचे काम या महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात सुरु झालेले आहे. माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांचे मी अभिनंदन करतो. त्यांचे सहकारी चळवळीला किती प्रमाणात योगदान दिले आहे याची मला माहिती नाही. परंतु त्यांनी कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेबाबत या ठिकाणी आरोप दाखल केले. कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाला आरोपी केले आहे. मी राज्य सहकारी बँकेच्या माध्यमातून गेली 15 वर्षे कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक पदावर कार्यरत आहे. कोल्हापूरची संस्कृती मला आवडते म्हणून मी राज्य सहकारी बँकेत आग्रह धरतो की, मला कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर संचालक म्हणून पाठवावे. संचालक या नात्याने जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या बैठकांना उपस्थित राहण्यासाठी मी अनेकदा कोल्हापूरला जात असतो.

सभापती महोदय, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आरोपपत्रात ऑडिटरचा समावेश केलेला नाही. मंत्री महोदयांनी पेण अर्बन सहकारी बँकेच्या घोटाळ्याबाबत त्या बँकेतील ऑडिटर आणि सनदी लेखापाल यांचा आरोपपत्रात आरोपी म्हणून समावेश केलेला आहे. हीच भूमिका मंत्री महोदयांनी कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेबाबत का घेतली नाही? जिल्हा उपनिबंधक हे त्या बँकेचे संचालक आहेत, त्यांना आरोपी केलेले नाही. नाबार्डचे एक प्रतिनिधी या बँकेचे पदसिध्द संचालक आहेत, त्यांनी बँकेच्या सभेमध्ये त्यांचे म्हणणे मांडावयाचे असते, त्यांनी त्यांचा विरोध नोंदविल्याचे प्रोसिडिंगमध्ये दिसून येत नाही. वेगवेगळ्या माध्यमातून बँकेच्या संचालक मंडळावर प्रतिनिधी नेमले जातात, त्यामध्ये सुधारणा झाली पाहिजे.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.......

सभापती महोदय, सहाव्या आणि सातव्या पंचवार्षिक योजनेमध्ये केंद्र आणि राज्य सरकारने 25 टन क्षमतेचा सहकारी साखर कारखाना काढण्यासाठी 20 कोटी रुपये कर्ज घेण्यास मान्यता दिली होती. परंतु त्यापेक्षा जास्त प्रमाणात किंबहुना 80 ते 100 कोटी रुपये कर्ज सहकारी साखर कारखान्यांना देण्याचे काम राज्य शासनाने केले आहे. मंत्री महोदय स्वत: सहकारी साखर कारखाना चालवित आहेत. रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने त्यांच्या कारखान्याला कर्ज उपलब्ध करुन दिले होते. त्यांच्या साखर कारखान्याने मुदतीपूर्वीच कर्जाची परतफेड केलेली आहे. पूर्वी पुणे जिल्हयातील सहकारी संस्थांना कोणी कर्ज द्यायला तयार नव्हते. आज पुण्यातील सहकारी संस्था कर्ज देण्यास पुढे येत आहेत. आज रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे 25 ते 30 कोटी रुपये पडून आहेत.

नंतर एच.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील.....

आज त्यांच्याकडे पैसे पडून आहेत म्हणून ते आमच्या बँकेचा पैसा घेत नाहीत, यावर चर्चा करण्याची ही वेळ नाही. पण राज्य सहकारी बँकेचा संचालक म्हणून मी गेल्या 15 वर्षांपासून काम करीत आहे हे माननीय विरोधी पक्षनेत्यांना सुध्दा माहीत आहे, कारण ते सुध्दा राज्य सहकारी बँकेवर संचालक म्हणून काम करीत आहेत. तसेच माझी काम करण्याची पध्दत सुध्दा भाऊ साहेबांना माहीत आहे. मी चुकीच्या गोष्टींना कधीच पाठिंबा देत नाही. या निमित्ताने मला इतकेच सांगायचे आहे की, ज्या साखर कारखान्याची किंमत मुळात 20 कोटी असेल आणि त्या कारखान्याला 100 कोटीचे कर्ज दिले तर त्या कर्जाची परतफेड कशी होणार, हे मात्र कधीच रेकॉर्डवर आणलेले दिसत नाही. तेथे आपले नियंत्रण अधिकारी म्हणून सह निबंधक, जिल्हा उप निबंधक असतात त्यांना याची जाणीव नाही काय ? म्हणून मंत्री महोदयांना मला सांगावयाचे आहे की, आपण वेळोवेळी व सोईप्रमाणे सहकार कायद्यात बदल करता, आपल्याला सहकाराचा चांगलाच अनुभव आहे, एक यशस्वी सहकारी चळवळ चालविणारे आपले सहकार मंत्री आहेत. राजकारण्यांची चूक झाली पण शासनाने सुध्दा यामध्ये चूक केलेली आहे हे विसरता येणार नाही.

महोदय, सातव्या आणि आठव्या पंचवार्षिक योजनेत केंद्र सरकारने 38 साखर कारखान्यांना मंजुरी दिली. तसेच या कारखान्यांना मंजुरी मिळाल्यानंतर आयसीआयसीआय आणि आयडीबीआय या केंद्र सरकारच्या फायनान्स करणाऱ्या बँकांनी या कारखान्यांना फायनान्स केले, या कारखान्यांचे प्रोजेक्ट या बँकांनी मंजूर केले. पण नंतरच्या काळात जेव्हा हे साखर कारखाने अडचणीत सापडले तेव्हा मात्र त्याच केंद्र शासनाच्या बँकांनी त्यांना फायनान्स करण्यासाठी नकार दिला. अशा वेळी मात्र जिल्हा बँकेला शासनाने बोलावून सांगितले की, आपण या साखर कारखान्यांना फायनान्स करावे. त्या बैठकीसाठी मी सुध्दा चेअरमन म्हणून अनेक वेळा गेलो होतो. या आजारी साखर कारखान्यांना पैसे देण्याबाबत शासनाने फक्त तोंडी आदेश दिले, लेखी मात्र काहीच दिले नाही. आता मात्र राज्य सहकारी बँकेचे पैसे परत देण्याकडे शासन दुर्लक्ष करताना दिसते, यात सुधारणा होणे आवश्यक आहे. माझी विनंती आहे की, ज्या कारखान्यांना राज्य बँकेने फायनान्स केले त्यांचे पैसे तरी शासनाने परत करावे. तसेच यामध्ये केवळ राज्य बँकच नव्हे तर मुंबई जिल्हा बँक आणि ठाणे जिल्हा बँक सुध्दा अडचणीत आली आहे. शासनाने त्यांना सांगितले की,

.....2.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील..........

आपल्याला शासन सांगते म्हणून फायनान्स करा, तसे लेखी काहीच दिले नाही. ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने कांद्याची अडचण निर्माण झाली तेव्हा 30 कोटी रुपये दिले होते व आमच्या रायगड बँकेकडूनही 5 कोटीचे फायनान्स करण्यात आले होते. पण नंतर मात्र शासनाने आपली भूमिका बदलली. शासन म्हणते की आम्ही कोठे लेखी दिलेले आहे, कोठे गॅरंटी दिली आहे याचाही मंत्री महोदयांनी खुलासा करावा. माझी या निमित्ताने शासनाला अशी सूचना आहे की, ज्यावेळेस अडचणीत असलेल्या साखर उद्योगाला किंवा पणन मंडळाला फायनान्स करण्याचे आदेश शासन देते त्यासंबंधीची कार्यपध्दती ठरविणे आवश्यक आहे.

वास्तविक अर्बन बँका किंवा पतपेढ्यांना अर्थसहाय्य करीत असताना जिल्हा बँक किंवा राज्य सहकारी बँकेकडून फायनान्स करताना त्या पतपेढ्यांनी जे तारण ठेवलेले असते तेच तारण जिल्हा किंवा राज्य सहकारी बँकेने आपल्याकडे वळवून घेतले पाहिजे, अशा रिझर्व्ह बँकेच्या गाईडलाईन्स आहेत. पेण अर्बन बँकेला आम्ही पैसे दिले तेव्हा त्यांच्याकडून कर्जफेडीचे तारण गहाण म्हणून ठेवलेले आहे. मध्यंतरी वर्तमान पत्रात बातमी छापून आली होती की, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने पेण अर्बन बँकेला विनाकारण अडचणीत आणले. पण ते विनाकारण अडचणीत आणले नव्हते तर बँक चालवितांना तशी खबरदारी घ्यावीच लागते. मी बँकेचा व्यवहार करताना पक्का मारवाडी आहे, असे म्हटले तरी चालेल. तसेच सर्व देऊन मागे सोडताना किती काळजी घेतो याची देखील मंत्री महोदयांना चांगलीच माहिती आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर (बसून) : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांना विनंती आहे की, आपण आपल्या भाषणातून "मारवाडी" असा जो शब्दोच्चार केला तो योग्य वाटत नाही.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील : मारवाडी हा व्यवहाराला चांगला असतो. सावकारी आणि मारवाडी हे दोन वेगवेगळे शब्द आहेत.

**उप सभापती** : विरोधी पक्ष नेते श्री. फुंडकरांकडे जास्त मारवाडी लोक राहतात त्यामुळे ते असे म्हणाले असावेत.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, गुजराती मारवाडी हया काही शिव्या नाहीत तर आपण मराठीमध्ये बोलतांना सुध्दा मराठी, घाटी असे शब्द वापरत असतो.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आमची बँक मॉर्गेज घेऊनच सर्व काम करीत असते. नियमामध्ये जे आहे ते घेतल्याशिवाय आम्ही लोन देत नाही. 10 टक्के लोकांनी सहकार चळवळीला बदनाम केले म्हणून आपण सर्वांना एका तराजूमध्ये तोलू नका, सहकार चळवळ मोडीत काढू नका. सभागृहात आपण सावकारी पिळवणुकीच्या संदर्भात ब-याच वेळा चर्चा करीत असतो. सहकारी चळवळ मोडीत निघाली तर शेतक-यांना सावकाराच्या दारात जावे लागेल याचा आपण विचार करावा. राज्यामध्ये सहकारी संस्थेच्या,सहकारी बँकेच्या तसेच जिल्हा सोसायटया व राज्य बँकेच्या माध्यमातून शेती फायनान्स केले जात असते. त्यामुळे ही यंत्रणा मोडीत काढली तर चांगले होणार नाही. मी भाषणाच्या सुरुवातीसच सांगितले होते की, या राज्याची आर्थिक, शैक्षणिक प्रगती ही सहकार चळवळी मुळेच झालेली आहे. त्यामुळे या चर्चेच्या निमित्ताने सहकार मंत्र्यांनी प्रभावी विश्वास देण्याची आवश्यकता आहे. ज्यांनी गुन्हे केले असतील त्यांच्यावर आपण खुशाल गुन्हे दाखल करा परंतु ज्या संचालकांचा यामध्ये काही दोष नाही त्यांना त्यामध्ये जबाबदार धरु नका एवढे मला या चर्चेच्या निमित्ताने सांगावयाचे आहे. पेण बँकेच्या 90 संचालकांना यासंदर्भात काही सुध्दा माहिती नाही. पेण बँकेच्या संचालकांच्या सहया घेऊन वाटेल तसे पैसे वाटण्यात आलेले आहे. त्यांना यासंदर्भात काही सुध्दा माहिती नाही. खरे म्हणजे मुख्य कार्यकारी अधिकारी, चेअरमन आणि एमडी यांना यामध्ये दोषी धरण्याची आवश्यकता आहे. पत संस्थांना डिपॉझिट घेण्यास मर्यादा घाला याबाबत मी गेल्या 10-11 वर्षापासून बोलतो आहे. प्रत्येक अधिवेशनात बोलत असतो. या पतसंस्थांना पतसंस्थेला आरबीआय आणि नाबार्डचे नियंत्रण नसते तर असिस्टंट रजिस्टारचे नियंत्रण पतसंस्थेवर असते. भुदरगड व बुलढाणा अर्बन बँकेची काय परिस्थिती झालेली आहे हे आपल्या सर्वांना माहिती आहे. बुलढाणा अर्बन बँकेमध्ये 2000 कोटी रुपयांच्या ठेवी होत्या. या बँकेला साखर कारखाना चालविण्याची परवानगी राज्य शासनाने दिलेली आहे. या संदर्भात आम्ही विरोध केला होता.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील..

महाराष्ट्र स्टेट को.ऑप.बॅकेच्या कालच्या बैठकीला सन्माननीय विरोधी पक्ष नेते उपस्थित होते. एका पतपेढीला परस्पर साखर कारखाना चालविण्यास दिला या मुद्यावर कालच्या बैठकीत चर्चा झाली होती. साखर कारखाना चालविणे हा पतपेढीचा धंदा आहे काय ? पतपेढी कधी साखर कारखाना चालवू शकते काय ? या पतसंस्थेवर नियंत्रण ठेवण्यासाठी डिपॉझिटची मर्यादा घालण्यात येणार आहे किंवा नाही या संदर्भात माननीय मंत्र्यानी उत्तर दिले पाहिजे अशी मी या चर्चेच्या निमित्ताने मागणी करीत आहे. वास्तविक पतपेढीवर पाच किंवा दहा कोटी रुपया पर्यतची मर्यादा घालण्यात आली पाहिजे. जर ही मर्यादा घालण्यात येत नसेल तर त्याचे रुपांतर अर्बन को.ऑप. बॅकेत करण्यात यावे. बुलढाणा पत संस्थेचे रुपांतर बुलढाणा अर्बन को.ऑप. बॅकेत करण्यात यावे. परंतु तसे न करता पत संस्थेचे पदाधिकारी रजिस्ट्रारला पाच हजार रुपये देतात आणि त्यांना पाहिजे तसे सरक्युलर काढावयास लावतात वा बायलॉजमध्ये दुरुस्त्या करुन घेतात. अशा प्रकारे चाललेल्या पत संस्थेच्या कारभाराबाबत मी अनेकदा बोललो आहे.

सभापती महोदय, पतसंस्थांचे हजारो कोटी रुपये बुडालेले आहेत.राज्य शासनाचे संपूर्ण बजेट जरी त्यासाठी खर्च करण्यात आले तरी त्याचे रिपेमेन्ट होऊ शकणार नाही. विविध कार्यकारी संस्थेने वा पत संस्थेने लहान प्रमाणात म्हणजेच पाच ते दहा हजार रुपयांचे कर्ज द्यावयाचे असते परंतु आज तसे न करता पंधरा आणि वीस कोटी रुपयांचे कर्ज देण्यास त्यांनी सुरुवात केली असून ही पध्दत अत्यंत चुकीची आहे. त्यावर नियंत्रण घालण्यात आले पाहिजे अशी मी या चर्चेच्या निमित्ताने मागणी करीत आहे.

सभापती महोदय, वेगवेगळया सूत गिरण्यांचा प्रश्न आज निर्माण झालेला आहे.विविध सूत गिरण्यांनी एन.सी.डी.सी.कडून कर्ज घेतलेले आहे . माझ्या माहितीप्रमाणे 400 कोटी रुपये एन.सी.डी.सी.चे अडकलेले आहेत. राज्य शासनाने एन.सी.डी.सी.ला थक हमी दिलेली असल्यामुळे राज्य शासनाचे 400 कोटी रुपये सूत गिरण्यांच्या माध्यमातून अडकून पडलेले आहेत.राज्य शासन एन.सी.डी.सी.ला ताबडतोब थकहमी देते पंरतु बॅकेला थकहमी का दिली जात नाही याचे देखील उत्तर माननीय मंत्र्यांची या चर्चेच्या निमित्ताने दिले पाहिजे अशी मी मागणी करीत आहे.

श्री.जयंत प्र.पाटील..

सभापती महोदय, माननीय मंत्र्यांबरोबर मी अनेकदा चर्चा केलेली आहे.मंत्र्याचे असे म्हणणे आहे की तुम्ही 1800 कोटी रुपये मागत आहात परंतु प्रत्यक्षात शासनाकडे 700 कोटी रुपये निघत आहेत. तेव्हा यातून मार्ग काढण्यासाठी त्यांनी आम्हाला चर्चेसाठी बोलवावे.आमच्या बँकांचे पैसे अडकलेले आहेत त्यामुळे सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना व आम्हाला एकत्र चर्चा करण्यासाठी माननीय मंत्र्यांनी बोलवावे.आपण त्या संदर्भात एकत्रित चर्चा करुन काही तरी मार्ग निश्चितपणे काढू असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय,अंतिम आठवडा प्रस्तावाच्या निमित्ताने माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी एक चांगली चर्चा येथे उपस्थित केली आहे त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो आणि महाराष्ट्रातील जे ठेवीदार आहेत तसेच सहकार चळवळीमध्ये काम करणारे जे कार्यकर्ते आहेत त्यांना दिलासा मिळेल या दृष्टीने माननीय मंत्र्यांनी उत्तर द्यावे अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी (विधान सभेने निवडलेले) :सभापती महोदय,नियम 259 अन्वये मांडलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावाच्या अनुषंगाने माझे विचार मांडण्यासाठी मी येथे उभा आहे.

सभापती महोदय, सहकार कायद्यात सुधारणा करण्यात येणार असा माननीय सहकार मंत्री श्री हर्षवर्धन पाटील यांनी विधान सभेत विचार मांडला होता. केवळ सहकार कायद्यात दुरुस्ती करुन चालणार नाही. फक्त संचालक मंडळ बरखास्त केले किंवा संचालकांना अटक करुन जेलमध्ये पाठवून देखील हा प्रश्न सुटणार नाही. त्याकरिता त्यांची मालमत्ता जप्त करावी लागेल व त्यासाठी फौजदारी कायद्यात देखील बदल करावा लागेल. सहकार चळवळ म्हणजे काही सरकारचे खाते नाही तर ती एक जीवनप्रणाली आहे,ती एक चळवळ आहे. मानवतेच्या पायावर उभी राहणारी ही सहकार चळवळ आहे. समता,समानता, समान संधी या माध्यमातून एका नव्या समाजाची निर्मिती करणारी ही चळवळ आहे. दुर्बलला शक्ती देणारी ही सहकार चळवळ आहे.गरिबाला स्वाभिमानाने, ताठ मानेने उभी करणारी ही चळवळ असून या चळवळीमध्ये काही दोष निर्माण झालेले आहेत. ते दोष कसे दूर करता येतील या संबंधी विचार करणे अत्यंत गरजेचे आहे

सभापती महोदय, महाराष्ट्रात 2 लाख 18 हजार 230 सहकारी संस्था आहेत,त्यामध्ये 5 कोटी 39 लाख सभासद आहेत. राज्यातील 18 वर्षाच्या वरील लोकसंख्येचा विचार करता जवळजवळ 75 टक्के लोक सहकार चळवळीमध्ये आहे. मानवाच्या विविध अंगाला स्पर्श करणारी ही सहकारी चळवळ आहे, गृह निर्माण संस्था, हमालांची को ऑपरेटिव्ह सोसायटी किंवा कारखान्यात काम करणा-या कामगारांची सहकारी संस्था इत्यादी राज्यातील सर्व सहकारी संस्थांची आजची स्थिती आपण पाहिली तर 1कोटी 27 लाख 630 कोटी रुपयांची ठेव विविध सहकारी संस्थांमध्ये जमा झालेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्रीसरफरे

श्री. अरुण गुजराथी...

आणि कर्ज 56 हजार 604 कोटी रुपये आहे. जेवढया एकूण ठेवी आहेत त्या रकमेच्या 50 टक्क्यापेक्षा कमी कर्ज दिले. अर्बन बँकांनी सरकारी रोख्यामध्ये गुंतवणूक करावी यासाठी आपण कायदा आणि नियम केले आहेत. त्या प्रमाणे पत पेढयांनी सुध्दा किमान 30 ते 35 टक्के रक्कम सहकारी रोख्यांमध्ये गुंतविणे आवश्यक आहेत. तसे झाले तर तेवढी रक्कम तरी रोख्यांमध्ये सुरक्षित राहू शकते. राज्यामध्ये एकूण 62 हजार 924 इतक्या संस्था तोटयामध्ये आहेत आणि 81 हजार 689 कोटी रुपयांचे कर्ज येणे आहे. मघाशी माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे सहकार चळवळीच्या माध्यमातून जवळपास 90 कोटींच्या वर कृषीकरिता पत पुरवठा होत आहे. आज राज्यात एकूण 21 लाख 392 पतपेढया असून त्यांचे खेळते भांडवल 15 हजार 147 कोटी , कर्ज वाटप 4384 कोटी, कर्ज वसुली 7525 कोटी आणि थकित कर्ज 4890 कोटी रुपये इतके आहे. यामध्ये थकित कर्जाची रक्कम जवळपास 5 हजार कोटी रुपये इतकी आहे. या पतपेढयांमध्ये थकित कर्ज आणखी थकित करावे अशाप्रकारची एक लागण सुरु झाली आहे. कर्ज घेतल्यानंतर ते फेडण्याची आवश्यकता नाही अशी भावना वाढीला लागली आहे. सहकार क्षेत्रात करोडो रुपयांची मालमत्ता असून देखील ज्या संस्थेकडून आपण कर्ज घेतले आहे त्या संस्थेमध्ये परत भरले नाही तरी चालेल असे लोक म्हणू लागले आहेत.

सभापती महोदय, या निमित्ताने मी पाच ते सहा गोष्टींच्या संदर्भात मंत्री महोदयांचे लक्ष वेधणार आहे. एक म्हणजे सहकारी संस्थेमध्ये कंट्रोलिंग सिस्टीम स्ट्राँग केली पाहिजे. दुसरे म्हणजे बायलॉज बदलण्याची आवश्यकता आहे. पतपेढया, अर्बन बॅका, मध्यवर्ती बँका यांच्याकरिता शासनाने एक मॉडेल बायलॉज तयार केला पाहिजे. त्या धर्तीवर पतपेढयांसाठी, जिल्हा बँकासाठी आणि अर्बन बँकासाठी नवीन बायलॉज देण्यासंदर्भात विचार केला पाहिजे. सभापती महोदय, कंपनी ॲक्टमध्ये इन्व्हेस्टिगेशनची तरतूद आहे परंतु सहकार कायद्यामध्ये इंन्व्हेस्टिगेशनची तरतूद नाही, जॉईन्ट स्टॉक कंपनीसाठी इन्व्हेस्टिगेशनची तरतूद आहे ती या कायद्यात आणणे अत्यंत महत्वाचे आहे. जेणेकरुन सहकार खात्यामार्फत या पतपेढयांवर एक चांगला अंकुश राहील. सभापती महोदय, सेक्शन 83 मध्ये सुधारणा करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. सेक्शन 83 मध्ये लायबिलिटी फिक्स करण्यासंदर्भात तरतूद आहे. या तरतुदीमधील "डयुटीज अँड अकाऊंटीबिलिटी" या सेक्शनमध्ये ऑडिटर नेमण्याच्या संदर्भात चार्टर्ड अकाऊटंट, सर्टिफाईड अकाऊंटंट नेमण्याच्या संदर्भात खात्यातील निवृत्त झालेल्या अकाऊटंटना ऑडिटरचे काम देण्यात येते. हे काम आपण



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ D/

श्री. अरुण गुजराथी...

कुणालाही द्यावे त्याची अडचण नाही, परंतु त्याबाबत जबाबदारी फिक्स करणे आवश्यक आहे. जेणेकरुन पतपेढयांचे आर्थिक नुकसान होणार नाही, ठेवीदारांचे आर्थिक नुकसान होणार नाही हे पहाणे अत्यंत महत्वाचे आहे. सहकार क्षेत्रात सातत्याने तपासणी, कंटिन्युअस ऑडिट आपण चालू ठेवले तर भविष्यात होणाऱ्या फ्रॉडना चांगला चेक बसेल. सहकार खात्यामध्ये एक रेक्टिफिकेशन रिपोर्ट असतो त्याकडे कुणीही पहात नाही. त्या रेक्टिफिकेशन रिपोर्टमध्ये वर्षानुवर्षे तेच मुद्दे असतात. म्हणून त्या रिपोर्टमध्ये सुधारणा केल्यास पुढील वर्षीदेखील ते मुद्दे येणार नाहीत या संदर्भात काळजी घेणे अत्यंत महत्वाचे आहे.

सभापती महोदय, लहान पतपेढयांमध्ये लोनिंग प्रोसिजर नाही. त्याठिकाणी एक मॅनेजर बसलेला असतो, त्याच्याकडे कुणीही गेला तर त्याला कर्ज देऊन टाकतो. त्यासाठी एक बंधन असणे आवश्यक आहे, या करिता कर्ज वितरण करणारी समिती अस्तित्वात असली पाहिजे. त्यामध्ये दोन कर्मचारी आणि दोन संचालक यांचा समावेश असला पाहिजे. कर्जाचे वितरण करीत असतांना त्याचे डॉक्युमेंटेशन व्यवस्थित झाले पाहिजे. काही वेळेला या पतपेढया म्हणजे एटीएम "ऑल टाईम मनी" सारख्या वाटतात. केव्हाही या आणि पैसे घेऊन जा, किंवा केव्हाही या आणि पैसे ठेवून जा. रात्री 11 वाजता कुणालाही पैशाची गरज पडली तर डेबिट कार्ड किंवा क्रेडिट कार्ड नेण्याची गरज नाही, त्या पतपेढीमध्ये ऑल टाईम मनी मिळतो. या करिता कर्ज वितरणामध्ये एक बंधन, शिस्त आणली गेली पाहिजे, कर्ज व्यवहारांचे डॉक्युमेंटशन नीट केले पाहिजे. हे केले तर त्याचा फार चांगला उपयोग होईल. जिल्हा बँका आणि शिखर बँका यांच्याकडे जे थकित कर्ज आहे

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी . . . .

ते थकीत कर्ज सहकारी साखर कारखान्यांच्या माध्यमातून जास्तीतजास्त निर्माण झाले. आता कारखाने अडचणीमध्ये का येतात ? याला दोन कारणे आहेत. एक म्हणजे मॅनेजमेंट आणि दुसरे ऊसाची उपलब्धता नसणे. आता ऊसाची उपलब्धता नसणे हे कोणाच्याही हातामध्ये नाही. पण सहकारी साखर कारखान्यांचे मॅनेजमेंट सुधारले पाहिजे. जर सहकारी साखर कारखान्यांचे व्यवस्थापन सुधारल तर आपल्याला जिल्हा मध्यवर्ती बँकेचे व्यवस्थापन सुधारण्यासाठी निश्चितपणे मदत होईल. मागच्या काळामध्ये आपल्याला वैजनाथन् कमिटीच्या माध्यमातून पॅकेजेस् वगैरे देण्यात आले. त्याचे युटीलायझशन सर्टीफीकेट कोण देते ? तर हे सर्टीफीकेट एम.डी.देतो. खरे म्हणजे एम.डी.च्या ऐवजी ऑडीटरच्या माध्यमातून युटीलायझेशन सर्टीफीकेट दिले पाहिजे. मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करणार आहे की, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे जे एम.डी.आहेत, त्याबाबतीत केडर निर्माण करावे आणि एका बँकेतील एम.डी. दुसऱ्या बँकेमध्ये ट्रान्सफर करण्याचे अधिकार हे शासनाने स्वत:कडे घ्यावेत अशी माझी आजच्या चर्चेच्या निमित्ताने विनंती आहे. बँकांच्या माध्यमातून देखील आता विंडो ड्रेसिंग आणि नॉन-परफॉर्मिंग ॲसेटस् या दोन गोष्टींबाबत शासनाने लक्ष घातले पाहिजे. विंडो ड्रेसिंग थांबले पाहिजे, नॉन-परफॉर्मिंग ॲसेटस्, नॉन-बँकींग ॲसेटस् यावर अधिक बंधन आणणे हे अत्यंत गरजेचे आहे.

सभापती महोदय, आज काही पतपेढ्या थकलेल्या आहेत आणि आमच्या जळगाव जिल्ह्याने तर कहर केलेला आहे. जळगाव जिल्ह्यामध्ये बऱ्हे पतपेढी आणि तापी सहकारी पतपेढी याचे मुख्य कार्यालय हे माझ्याच गावामध्ये म्हणजे चोपडा शहरामध्ये आहे. तापी सहकारी पत संस्थेमध्ये 9 कोटीचा गैरव्यवहार झाला असून 12 संचालकांसह 23 जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या पतपेढ्या थकलेल्या आहेत, याची दोन कारणे आहेत. एकतर संचालकांनीच बेनामी कर्ज घेऊन मग तो कदाचित शिपाई असेल, स्वयंपाकी असेल त्याच्या कडील सालगडी असेल किंवा कारकून असेल तर त्यांच्या नावाने कर्ज घेतलेली आहेत. मी आपल्याला एक विनंती करणार आहे की, इनस्वॉल्व्हन्सी ॲक्टबाबत सांगावयाचे तर तो इनस्वॉल्व्हन्ट होण्यापूर्वीचे दोन वर्षाचे खरेदी-विक्रीचे व्यवहार आहेत ते रद्द केले जातात.त्यापध्दतीने कर्जदारांनी जे काही ॲसेटस् विकलेले असतील अशा परिस्थितीत त्यांनी दोन वर्षापूर्वी खरेदी-विक्रीचा केलेला व्यवहार कसा रद्द करता येईल या संदर्भात विचार केला पाहिजे. ज्या संस्था लिक्वीडेशन मध्ये गेलेल्या आहेत, त्यांच्या नातेवाईकांची, बेनामी ट्रॅन्झॅक्शन बाबत तपासणी केली पाहिजे. ज्यांनी कर्ज घेतलेले आहे,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी . . . .

त्यांच्याकडे मालमत्ता असून सुध्दा ते लोक कर्ज भरत नाहीत. तेव्हा त्यांनी देखील कुठे खरेदी केली असेल किंवा बेनामी ट्रॅन्झॅक्शन केले असेल तर ते शोधून काढले पाहिजे आणि त्याचे पैसे जप्त केले पाहिजेत. काही वेळेला संचालकांची चूक नसते, परंतु कर्जदार पैसे भरत नाही. म्हणून याठिकाणी संचालक आणि कर्जदार या दोघांकडे लक्ष देणे हे अत्यंत आवश्यक आहे.

सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी विधानसभेमध्ये घोषणा केली होती की, आम्ही प्रत्येक खातेदाराला 10 हजार रुपये देऊ. पण ते दहा हजार रुपये अद्यापपर्यंत मिळालेले नाहीत आणि खरे म्हणजे 10 हजारामध्ये काही होत नाही. मी सन्माननीय मंत्री श्री.सुरेश शेट्टी साहेबांना सांगू इच्छितो की,जे शिक्षक होते,प्राध्यापक होते त्यांनी पतपेढीमध्ये एक टक्का व्याज जास्त मिळते म्हणून त्यांना मिळालेली 5-10 लाख रुपयांची पेन्शन, संपूर्ण ग्रॅच्युईटी पतपेढीमध्ये ठेवली. परंतु आता आयुष्यभर रडण्याशिवाय त्यांच्याकडे दुसरे काही राहिले नाही. त्यांचे संसार उद्ध्वस्त झाले आणि अशा पध्दतीने त्यांच्या घरावर नांगर फिरवला गेला.म्हणून माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, जळगाव जिल्ह्यामध्ये संबंधितांना दहा हजार रुपयांचे वाटप लवकर व्हावयास पहिजे.सन्माननीय सदस्य श्री.मनिष जैन साहेब यांना या विषयावर भाषण करण्याची संधी मिळेल की नाही हे माहिती नाही म्हणून मी तुमच्यावतीने देखील शासनाला विनंती करीत आहे.

सभापती महोदय, माझी पुढील मागणी अशी आहे की, आपल्याला पतपेढ्यांमध्ये ठेव विमा योजना आणता येईल काय ? पाहिजे तर पाव टक्का व्याज कमी द्यावे पण 25 हजार रुपयांपर्यंत, 50 हजार रुपयांपर्यंत ठेव विमा योजना आणली तर ते सोयीचे होईल. त्यादृष्टीकोनातून आपण याबाबत प्रयत्न केला पाहिजे.

सभापती महोदय, माझी अजून एक मागणी आहे. या कायद्यामध्ये दुरुस्ती करीत असताना दोन्ही सभागृहाची संयुक्त समिती नेमावयास पहिजे.अशा वेळी सहकार क्षेत्रामध्ये काम करणारे जे सभासद आहेत किंवा ज्यांना या संदर्भात माहिती आहे ते आपल्याला निश्चितपणे या बाबत सहकार्य करु शकतील. तसेच मी मघाशी सेक्शन 83 बाबत बोललो होतो. माझी याबाबत विनंती आहे की,आपण यामध्ये सेक्शन 83 (ए) असा नवीन सेक्शन आणावा आणि या विषयाच्या संबंधातील इन्व्हेस्टीगेशनच्या पॉवर्स् आणि प्रोसीजरल ज्या नवीन बाबी आहेत त्याबाबतीत देखील आपण प्रयत्न केला पाहिजे अशी माझी या चर्चेच्या निमित्ताने विनंती आहे. तसेच माझ्याकडे वृत्तपत्रातील काही क्लिपिंग आहेत त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "जळगावमध्ये 40 कोटी रुपयांचा घोटाळा."

अप्रकाशित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी....

श्री. एकनाथराव खडसे म्हणजे माननीय विरोधी पक्ष नेते विधानसभा यांची बँक. मी या सभागृहात स्वत: याच संदर्भात दोन वेळा लक्षवेधी सूचना आणली होती. त्या लक्षवेधी सूचनेला, ही केस न्यायालयात आहे असे मर्यादित उत्तर देण्यात आले. आता त्या आरोपींना पकडून जेलमध्ये टाकण्यात आले आहे, हे ठीक झाले. पण त्याच वेळी शासनाने याकडे लक्ष दिले असते तर मला वाटते काही तरी सुधारणा झाली असती. सभापती महोदय, शिखर बँकेच्या संदर्भात 1900 कोटी रुपयांची शासनाची थकबाकी आहे. ही थकबाकी शिखर बँकेला देण्याच्या संदर्भात विचार करणे महत्वाचे आहे. पतपेढयांचे 2000 संचालक मोकाट आणि 360 कोटी रुपये पाण्यात, अशा प्रकारची माहिती आलेली आहे. या दृष्टिकोनातून कलम 88 महत्वाचे आहे. पतसंस्थामधील ठेवीदारांच्या 360 कोटी रुपयापैकी एक छदामही वसूल करण्यात यश मिळाले नाही, अशा प्रकारची भावना आहे. एका चांगल्या विषयावर सन्माननीय विरोधी पक्षाच्या माध्यमातून नियम 259 अन्वये ही चर्चा या ठिकाणी आणलेली आहे. या बाबतीत मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो की, कायदा सुधारण्याच्या संदर्भातील ज्या पाच-सहा बाबी आहेत, त्या आपण कराव्यात. त्या महाराष्ट्राला ललामभूत अशा ठरतील. महाराष्ट्राची अस्मिता म्हणून सहकारी चळवळीकडे पाहिले जाते. महाराष्ट्रात सर्वात उत्तम, सर्वात निरोगी अशी सहकारी चळवळ आहे, असे म्हटले जाते, त्याला जे ग्रहण लागलेले आहे, ते ग्रहण काढून टाकण्याचा प्रयत्न आपण करु या.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांच्या भाषणासाठी देण्यात आलेल्या वेळेपैकी फक्त 20 मिनिटे शिल्लक आहेत त्यामुळे या विषयावर आता शेवटच्या सन्माननीय सदस्याचे भाषण होईल. त्यानंतर उत्तराचे भाषण सुरु होईल.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ D/ KTG/ KGS/

श्री. मनिष जैन ( जळगाव स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, महाराष्ट्र विधान परिषद नियम 259 अन्वये सन्मानीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, संजय केळकर, डॉ. नीलम गोऱ्हे, श्रीमती शोभाताई फडणवीस, सर्वश्री धनंजय मुंडे, चंद्रकांत पाटील, केशवरा मानकर, रामनाथ मोते यांनी या ठिकाणी जो अंतिम आठवडा प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर मी माझे विचार व्यक्त करण्यासाठी या ठिकाणी उभा आहे. सभापती महोदय, आपण या विषयावर मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो.

सभापती महोदय, महाराष्ट्रात सहकारी चळवळ आहे आणि सहकारी कायदा देखील आहे. महाराष्ट्र हे अग्रगण्य राज्य आहे. सहकारी क्षेत्राच्या संदर्भातील नियम कडक करण्याची गरज आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी सांगितले की, आपल्याकडे ए.आर. वर मर्यादा नाहीत. सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी तापी पतपेढी बद्दल या ठिकाणी उल्लेख केला आहे. ती बाब फारच गंभीर आणि धक्कादायक अशी आहे. माझ्या जिल्हयातील तो विषय आहे.

माझ्या जिल्हयात तापी आणि बडेसर या दोन सहकारी पतपेढया आहेत. या पतपेढयांना बँकेचे स्वरुप देण्यात आलेले आहे. या दोन्ही पतपेढयांचा विषय अतिशय गंभीर आहे. या पतपेढयांमध्ये कोटयवधी रुपयांचा घोटाळा झालेला आहे. त्यांनी स्वतःच्या नावावर आणि दुसऱ्यांच्या नावावर प्रॉपर्टीज घेतलेल्या आहेत. त्यामुळे या बँकेत ठेव ठेवणारी गरीब माणसे व शेतकरी त्रस्त झालेले आहेत. म्हणून मला शासनाला सूचना करावयाची आहे की, एम.एस.सी. बँक, डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह बँक, कोऑपरेटिव्ह बँक, सोसाटया या सगळयांना एका ठराविक रकमेपेक्षा जास्त लोन देता येणार नाही, अशा प्रकारची एक लिमिट असली पाहिजे तरच हे घोटाळे थांबतील.

सभापती महोदय, आपण डिपॉझिटवर किती व्याज द्यावयास पाहिजे याबाबत विचार करतो पण नॅशनलाईज्ड बँकेपेक्षा किती जास्त डिपॉझिट घ्यावयास पाहिजे, या बद्दल काही बोलत नाही. नॅशनलाईज्ड बँकेमध्ये आज डिपॉझिटचा व्याज दर 9 टक्के असताना कोऑपरेटिव्ह बँकामध्ये आणि सोसायटयांमध्ये तो 14 टक्के ते 18 टक्के आहे. डिपॉझिट ठेवणारे लोक भोळे असतात, शेतकरी असतात, मजूर असतात गरीब असतात,त्यांना काही समजत नाही. चा्ंगली बँक असेल, त्या ठिकाणी ए.सी. असेल, कर्मचारी चांगले कपडे घालून बसलेले असतील तर या वरवरच्या

...2..

श्री. मनिष जैन....

दिखाव्याला ते बळी पडतात आणि त्या ठिकाणी आपले पैसे डिपॉझिट ठेवतात. पण या बिचाऱ्या भोळया-भाबडया लोकांचे, आई-बहिणींचे, शेतकऱ्यांचे पैसे जास्त लालचीमुळे डुबले जातात. या बाबतीत सरकार काही प्रमाणात दोषी आहे. एक सोसायटी काढल्या नंतर त्यांच्या 100 ते 200 ब्रँचेस उघडल्या जातात. मग या सोसायटयांचे रुपांतर बँकेत का केले जात नाही? सभापती महोदय, या बाबतीत शासनाने कायदा आणावा आणि या बाबतीत काही तरी प्रबोधन करावे, एवढीच विनंती करुन मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद. जय हिंद, जय महाराष्ट्र.

----

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या विविध शाखांपैकी वारजे, तालुका दौंड या शाखेमध्ये बनावट कर्जवाटप प्रकरण समोर आलेले आहे. त्यामध्ये साडेतीन कोटी रुपयांच्या बनावट कर्ज वाटपाचा घोटाळा समोर आला आहे. यामध्ये श्री. राजेंद्र काकडे यांच्या बरोबर सोमेश्वर शाखेचे तत्कालीन विभागीय अधिकारी यांचा सहभाग आहे किंवा काय या संदर्भात प्रश्न उपस्थित झालेला आहे. विशेष महत्वाचे म्हणजे रविवारी 27 मार्चला जिल्हा बँकेच्या मासिक सभेला माननीय उप मुख्यमत्री श्री. अजित पवार स्वत: हजर होते आणि घोटाळे झालेल्या शाखेतील पोलीस अधिकारी, उप निबंधक यांनाही बोलविले होते. पण बँकेचे व्यवस्थापक श्री. अरुण काळे यांना मात्र कर्जमुक्त करुन रिक्षाने घरी पाठविण्यात आले. म्हणून या सर्व प्रश्नावर प्रत्यक्षात काय कारवाई होणार ? माननीय सहकार मंत्री आमच्या जिल्ह्याचे जरी असले तरी शिवनेर पतसंस्था, जुन्नर या ठिकाणी झालेल्या घोटाळ्याबद्दल त्यांना मी स्वत: भेटावयास गेले होते. त्यानंतर तेथील ठेवीदारांना 10 हजार रुपये परत मिळावयास पाहिजे असे असताना त्यापैकी निम्म्या ठेवीदारांना सुध्दा पैसे परत मिळालेले नाहीत. विशेष म्हणजे शिवनेर पतसंस्थेच्या घोटाळ्याच्या बाबतीत ज्यांची नावे चार्ज शीटमध्ये आहेत, केवळ संशयीत नव्हे तर ज्यांच्यावर आरोप ठेवण्यात आलेला आहे त्यातील अनेक लोक जेव्हा माननीय मुख्यमंत्री शिवनेरी किल्ल्यावर गेले होते तेव्हा माननीय उप मुख्यमंत्र्यांच्या शेजारी बसलेले होते आणि सन्माननीय उपस्थितांमध्ये त्यांचा उल्लेख माननीय मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्र्यांनी केल्यानंतर अशा पध्दतीने जर त्यांना राजकीय प्रतिष्ठा मिळत असेल तर पुणे जिल्ह्यामध्ये आम्ही आता सामूहिक आत्मदहन करुन घ्यावे की काय असे वाटावयास लागले आहे.

**उप सभापती** : आम्ही पुणे जिल्ह्यातील आहोत. आम्ही आपल्याला असे कसे करु देणार ?

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, जुन्नर तालुक्यामध्ये श्री. तुकाराम विठ्ठल वाणी या शेतकऱ्याची आत्महत्या झाली. कशा पध्दतीने ते प्रकरण दडपले गेले याचा हा एक नमुना आहे. त्यांची आत्महत्या झाल्यानंतर मी स्वत: त्यांच्या कुटुंबीयांना भेटले. त्यांच्या खिशामध्ये चिठ्ठी सापडली की, अमुक सावकार याला जबाबदार आहे. त्यानंतर पोलिसांनी वेगवेगळ्या पध्दतीने दबाव आणून शेवटी ती चिठ्ठी बनावट आहे काय या थरापर्यंत ते आले. आम्ही सांगितले की, आपण

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/

डॉ. नीलम गोऱ्हे ....

हस्ताक्षर तज्ज्ञाकडून तपासून घ्या. प्रत्यक्षामध्ये गरीब शेतकऱ्यांना नाडून त्यांच्या जमिनी स्वत:च्या नावावर करुन घ्यावयाच्या आणि अवैध पध्दतीने, दबाव आणून, या जमिनी स्वत:च्या नावावर केल्याचे दाखववयाचे असे मोठे रॅकेट पुणे जिल्ह्यामध्ये चालू आहे. मी एवढी टोकाला येऊन बोलते याचे कारण असे की, आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. पुणे येथील लवासाच्या प्रश्नाबाबत स्वत: माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी बैठक घेऊ असे सांगितले पण बैठक घेतली नाही. या सहकारी बँकेच्या घोटाळ्याच्या बाबतीत स्वत: सहकार मंत्री निर्णय प्रक्रियेच्या संदर्भात सामर्थ्यहीन आहेत की काय, अशी शंका वाटते. शिवनेरच्या ठेवीदारांच्या मेळाव्याला या असे मी स्वत: आपल्याला सांगितले पण आपण आला नाहीत. आम्ही प्रत्येक वेळी आपल्याकडून अपेक्षा करतो. आपण जे उत्तर देता त्याची अंमलबजावणी होते का या संदर्भामध्ये आपण आम्हाला ठामपणे, पारदर्शक पध्दतीने सांगितले पाहिजे. इंदापूर तालुका बारामती लोकसभा मतदार संघाचा भाग असल्यामुळे तुमच्यावर दबाव येतो की काय अशी आम्हाला शंका वाटते. म्हणून पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या घोटाळ्याच्या बाबतीत जे जबाबदार आहेत त्यांच्या संदर्भात केवळ तुरुंगात पाठविणे पुरेसे नाही.

आज भूदरगड असेल, वसंतदादा बँक असेल, अशा शेकडो संस्था आहेत. त्यातील जे आरोपी आहेत ते जामिनावर मुक्त आहेत. आम्ही सहकार आयुक्तांना भेटलो तसेच सहकार मंत्र्यांना सांगितले की, त्यांचे जामीन रद्द करण्याच्या बाबतीत रिव्ह्यू करणार का? आपण किती ठिकाणी रिव्ह्यू केले, किती ठिकाणी खास वकील नेमले, किती ठिकाणी फास्ट ट्रॅक कोर्टात जाऊन त्यांना शिक्षा झाली. या पत संस्थांच्या संदर्भात अनेक लोक फसविले गेले. सहकारी बँकांमध्ये फसविले गेले. माझा असा आरोप आहे की, चांगल्या चाललेल्या बँका मोडीत काढावयाच्या आणि श्री. आगाशे सारख्या माणसाचा मृत्यू कोठडीमध्ये घडवावयाचा हे जे सगळे राजकारण आहे याबद्दल जर आम्ही बोललो तर कोणाला आवडत नसेल पण मला या ठिकाणी सांगावयास पाहिजे की, मी या ठिकाणी केवळ महिला म्हणून बोलत नाही तर सामाजिक आणि राजकीय कार्यकर्ती म्हणून बोलत आहे. ज्या ज्या ठिकाणी भ्रष्टाचार असेल आणि तो थांबवावयाचा असेल तर सरकारची इच्छाशक्ती पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संदर्भात प्रत्यक्षात अंमलबजावणीत आलेली दिसली पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे भाषण संपविते. ---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, चुकीचे रेकॉर्डवर येऊ नये म्हणून मी सांगू इच्छितो की, मध्यवर्ती बँकेचे जे वर्कींग आहे त्यामध्ये सोसायटीचे कमपत्र भरले जाते. माननीय मंत्री महोदयांना हे माहीत असेल. ते कमपत्र तीन वर्षासाठी असते. त्या कमपत्रावर बोजा नाही. ते कमपत्र क्रेडीट कार्ड सारखे वापरण्याबाबत नाबार्डचे निर्देश आहेत. त्यामध्ये घोटाळे कसे होऊ शकतात या बाबत आपण काही तरी मार्गदर्शन केले पाहिजे. आम्ही एखाद्याला कर्ज मंजूर केले तर तो 3 लाख रुपयांपर्यंत कर्ज उचलू शकतो. 10 लोकांनी कर्ज उचलले तर ते लगेच 30 लाख रुपये होतात. कमपत्राच्या माध्यमातून पुणे बँकेमध्ये ते झालेले आहे, असे मला वाटते. चुकीची चर्चा होते आणि त्याचे परिणाम आमच्यावर सुध्दा होतात. म्हणून मी या बाबत उल्लेख केला.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मांडलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलण्यासाठी व या प्रस्तावाचे समर्थन करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावाचा मुळात हेतू असा आहे की, सहकाराची चळवळ केवळ भ्रष्टाचारामुळे संपुष्टात येत आहे. पवित्र असलेली ही चळवळ, समाजाच्या विकासासाठी असलेली ही चळवळ, तळागाळातील माणसांना संरक्षित करणारी चळवळ आज संपुष्टात येत आहे. अशा एका टप्प्यावर ही चळवळ येऊन पोहोचली आहे. परंतु सुदैवाने माननीय सहकार मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील या विभागाचे नेतृत्व करीत आहेत. मंत्री महोदयांनी एक वर्षाच्या आत महाराष्ट्रातील सहकार चळवळीतील सर्व प्रकारचा भ्रष्टाचार निपटण्यासाठी सर्व आयुधांचा उपयोग करुन योग्य ती कारवाई केली तर ही चर्चा फलद्रूप झाली असे म्हणता येईल. त्यासाठी प्रचलित असलेला सहकार कायदा पुरेसा सक्षम आहे. पण शासनाला आवश्यकता वाटली तर या कायद्यात भविष्यात दुरुस्ती करता येईल. पण आहे त्या कायद्याचा योग्य वापर करण्यासाठी एक वर्षाचा कृती कार्यक्रम आखला तर या क्षेत्रातील सबंध भ्रष्टाचाराचा निपटारा होऊ शकेल. यासाठी कदाचित अधिक वेळ लागण्याची शक्यता आहे. या कालावधीत सहकार चळवळीबद्दल सामान्य माणसांचा विश्वास पुन्हा संपादित केला पाहिजे. ज्यांनी या संस्था खाजगी मालमत्ता आहेत असे समजून त्यांचा वापर केला आहे, संस्थेची लूट केलेली आहे. ही लूट भरुन काढण्यासाठी संबंधित व्यक्तीची मालमत्ता जप्त करुन संस्थेचे नुकसान भरुन काढावे. अशा प्रकारची कारवाई करण्याचे धारिष्ट दाखविले तरच प्रस्ताव मांडण्याला व त्यावर चर्चा करण्याला अर्थ आहे असे मी समजतो. सामान्य माणसांमध्ये असा संदेश गेलेला आहे की, सभागृहात केवळ चर्चा होतात, प्रत्यक्षात अंमलबजावणी काही होत नाही. किंबहूना, जे काही गैर घडले आहे त्याला संरक्षित करण्याकरिता या चर्चेचा उपयोग करुन घेतला जातो. हा संदेश बदलण्याचे काम शासनाने या निमित्ताने करावे अशा प्रकारची मी विनंती करतो आणि येथेच थांबतो.

-----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

2.....

श्री.परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहात अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा सुरु आहे, या चर्चेत भाग घेण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, मी सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती बँकेबाबत एकच सांगेन की, या बँकेचे संचालक श्री.विकास सावंत यांचीच एक भाई सावंत नावाची पत संस्था आहे. या पत संस्थेने 5 कोटीचे कर्ज घेतले असून 4-5 वर्षापासून त्याची परतफेड केलेली नाही. त्या संबंधी मी सभागृहात अनेक वेळा प्रश्न उपस्थित केलेला आहे. श्री.सावंत हे त्याच बँकेचे संचालक असल्यामुळे कर्जाची वसुली न झाल्यामुळे सहकार कायद्याच्या कलम 88 नुसार या बँकेवर कारवाई करण्याचे प्रस्तावित केलेले आहे. परंतु हे प्रकरण दप्तरबंद करण्यात आल्यामुळे ती कारवाई होऊ शकली नाही. त्याबद्दल मंत्री महोदयांनी उत्तरात खुलासा करावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, भूदरगड पत संस्थेमार्फत 200 कोटी रुपयांच्या पॅकेजमधून किती पैशाचे वाटप करण्यात आले ते सांगितले पाहिजे. भूदरगड पत संस्थेची मालमत्ता लिलावात काढण्यात येईल व या संस्थेच्या संचालकांवर कारवाई केली जाईल अशा वृत्त पत्रातून बातम्या येतात. ही कारवाई शासन केव्हा करणार आहे, त्या संचालकांविरुध्द फौजदारी खटले केव्हा दाखल केले जाणार आहेत, तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सातेरी पत संस्था व बांदा अर्बन बँकेसंबंधी सुध्दा मंत्री महोदयांनी शासनाची भूमिका काय आहे ते सांगावे अशी विनंती करतो व येथेच थांबतो, जय हिंद, जय महाराष्ट्र.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3....

श्री.हर्षवर्धन पाटील ( सहकार मंत्री ) : सभापती महोदय, आज या सदनामध्ये सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, संजय केळकर व इतर सन्माननीय सदस्यांनी अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा उपस्थित केली होती. परंतु सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांनी या चर्चेला सुरुवात केली. त्यानंतर अनेक सन्माननीय सदस्यांनी या विषयासंबंधी बोलताना राज्य सरकारसंबंधी व सहकार क्षेत्रासंबंधी काही मुद्दे मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. या चर्चेसाठी वेळ कमी होता, तरी सुध्दा कमी वेळामध्ये अतिशय चांगली चर्चा झालेली आहे. कोणत्याही मुद्याची द्विरुक्ती न करता अनेक विषय या ठिकाणी मांडण्यात आले आहेत. विशेष करुन या राज्यातील एकंदरीत सहकार चळवळीबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली आहे. स्पेसिफिक संस्थांबद्दल मुद्दे उपस्थित करण्यात आले आहेत. म्हणून मी प्रथम या सर्व सन्माननीय सदस्यांचे मनापासून आभार मानतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य हे सहकार क्षेत्रात अग्रगण्य समजले जाणारे राज्य आहे. देशामध्ये सर्वात जास्त सहकाराची चळवळ महाराष्ट्रात रुजली. आज सहकारी चळवळीला 107 वर्षे पूर्ण होत आहेत. 2012 हे वर्ष यु.एनो.ने आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून साजरे करण्याचे ठरविले आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर सुध्दा नवीन धोरण आखण्यात येत आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ 11:15

श्री. हर्षवर्धन पाटील...

एकंदरीतच या सहकार चळवळीचा थोडासा अभ्यास करणे आवश्यक आहे असे मला वाटते. या राज्याच्या झालेल्या प्रगतीचे आपण सर्वजण साक्षीदार आहोत. या राज्याच्या प्रगतीला सहकार विभाग कारणीभूत ठरलेला आहे. या राज्यामध्ये सहकाराची झालेली संख्यात्मक वाढ, त्यातून निर्माण झालेले रचनात्मक काम, त्यातून निर्माण झालेली आर्थिक प्रगती या सर्वांचा विचार या चर्चेच्या माध्यमातून होणे अत्यंत आवश्यक आहे. दुर्दैवाने या सहकार क्षेत्रामध्ये ज्या काही चांगल्या गोष्टी झालेल्या आहेत त्याबद्दल फारसे कोणी बोलत नाही. पण जे चुकीचे झालेले त्याचेही समर्थन मी करु इच्छित नाही. या राज्याला निश्चितपणे चांगली दिशा या सहकार चळवळीच्या माध्यमातून मिळालेली आहे. हे होत असताना काही 5-10 लोक चुकीचे वागले असतील.

सभापती महोदय, माझी सहकार चळवळीमध्ये काम करणारी चौथी पिढी आहे. मी देखील सहकार चळवळीमध्ये काम करत करत या पदापर्यंन्त पोहोचलो. गावस्तरावरील विविध सेवा सहकारी सोसायट्यांच्या माध्यमातून काम करत या सभागृहापर्यन्त अनेक सन्माननीय सदस्य आलेले आहेत, अनेक जण मंत्री झाले आहेत, मुख्यमंत्री झाले आहेत. त्यांनी ग्रामीण भागाचे अर्थकारण सहकार चळवळीच्या माध्यमातून निर्माण करण्याचा प्रयत्न केला. म्हणून या विषयावर सकारात्मक दृष्टीकोन ठेवून काम करण्याची आवश्यकता आहे. परंतु या ठिकाणी चर्चा होत असताना आता सहकार चळवळीचे काय होणार, सगळीकडे भ्रष्टाचार चाललेला आहे, सर्वसामान्य माणूस वेठीस धरला गेला आहे अशा प्रकारची चिंती व्यक्त करण्यात आली. अशा प्रकारच्या ज्या घटना घडत आहेत त्याचा मी निश्चितच उल्लेख करणार आहे. एक गोष्ट मात्र निश्चित की, आज आपण या सहकार चळवळीचे चित्र पाहिले तर त्यामध्ये आपण कोणते बदल केले पाहिजे, काय सुधारणा केली पाहिजे यादृष्टीने माझ्या विभागाने एक व्हिजन डॉक्युमेट तयार केलेले आहे. सभापती महोदय, आपली तयारी असेल तर हे व्हिजन डॉक्युमेंट सन्माननीय सदस्यांना दाखविण्याची माझी तयारी आहे. या व्हिजन डॉक्युमेंटमध्ये सहकाराच्या माध्यमातून झालेली प्रगती, मध्यंतरीच्या काळात सहकार क्षेत्रामध्ये झालेले गैरव्यवहार यांचाही समावेश केलेला आहे. मी पुढील 25 वर्षाचे सांगत नाही. पण सन 2015 पर्यन्त या राज्यातील सहकार चळवळ आपल्याला पुढे कोठे न्यावयाची आहे याचे व्हिजन डॉक्युमेंट तयार केलेले आहे. हे व्हिजन डॉक्युमेंट आपण सर्वांनी पहावे अशी माझ ी विनंती आहे. आपल्याला सहकाराचे जुने वैभव पुनश्च आणता येईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील...

ही भूमिका हे डॉक्युमेंट तयार करण्याच्या पाठीमागे आहे. एक गोष्ट मात्र निश्चित आहे की, या राज्यामध्ये 107 वर्षापूर्वी सहकार चळवळ सुरु करण्याचा निर्णय झाला. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या बाबतीत या चळवळीचा फायदा झालेला आहे. या सहकार चळवळीच्या माध्यमातून गावातील लोकांनी एकत्र यावे, त्यांनी एकसंघ व्हावे, गावाचा, सभासदांचा विकास करावा आणि देशाला स्वातंत्र्य मिळवून द्यावे असा उद्देश होता आणि त्यामध्ये आपण यशस्वीही झालो. आपण 1960 चा सहकार कायदा केला. आज या राज्याचा सहकार मंत्री म्हणून माझी भूमिका अशी आहे की, 1960 चा कायदा हा त्यावेळच्या परिस्थितीला अनुसरुन योग्य होता. पण त्यानंतर 50 वर्षामध्ये एवढे बदल झालेले आहेत की आता या सहकार कायद्यामध्ये आमूलाग्र बदल करण्याची आवश्यकता आहे आणि तशा प्रकारचा धोरणात्मक निर्णय सहकार विभागाच्या माध्यमातून घेतलेला आहे. मधल्या 50-60 वर्षाच्या काळामध्ये ॲक्शन घेतली की रिॲक्शन, स्थगिती, प्रकरणे थांबविण्यासाठीचे प्रयत्न अशा प्रकारच्या पळवाटा शोधण्याच्या काही घटना घडलेल्या आहेत हे मला या ठिकाणी नाकारायचे नाही. महाराष्ट्रामध्ये सहकारी संस्थांची संख्या अडीच लाखाच्या आसपास आहे. एका बाजूला संख्यात्मक वाढ होत असताना दुस-या बाजूला गुणात्मक वाढीकडे आपण लक्ष देऊ शकलो नाही. राज्यामध्ये किती संस्था रजिस्टर कराव्यात, कोणत्या क्लासिफिकेशनमध्ये संस्था रजिस्टर करावी यासंबंधीचा मास्टर प्लॅन आपल्याला करावा लागणार आहे. सहकारी संस्थांची तसेच सभासदांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढलेली आहे. आज आपल्या राज्यात 5 कोटी 63 लाख लोक हे डायरेक्ट मेंबर्स आहेत आणि इनडायरेक्ट मेंबर्स पाहिले तर राज्यातील एकूण 11 कोटी जनतेपैकी जवळ जवळ 90 टक्के लोकसंख्या ही सहकाराशी निगडित आहे. मग त्या हौसिंग सोसायट्या असतील, पतसंस्था असतील. जिल्हा बँका असतील, सेवा देणा-या काही संस्था असतील, मार्केट कमिटया असतील. या सर्वांच्या गुणात्मक वाढीच्या संदर्भात धोरणात्मक निर्णय सहकाराच्या माध्यमातून घेण्याची आवश्यकता आहे.

....नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील...

सभापती महोदय, एखादी सहकारी संस्था काढणे हे काम सोपे राहिलेले नाही. संस्था काढताना जो कोणी मुख्य प्रवर्तक असेल, जो कोणी चेअरमन असेल, आज दुर्देवाने तो विश्वस्त आहे. परंतु ती व्यक्ती आता विश्वस्ताची भावना विसरावयास लागला आहे. त्याला असे वाटते की, मी संस्था काढली म्हणून मी मालक झालो. किंबहुना लोकशाहीमध्ये आणि सहकारामध्ये त्या संस्थेचा चेअरमन मालक होऊ शकत नाही. खरे तर त्या संस्थेचे सभासद हे मालक असतात. मला असे वाटते की, या संस्था चालकांना याबाबतची जाणीव देण्याची आवश्यकता आहे. या अधिवेशनामध्ये प्रथम सहकार विभागा विषयी व्यापक चर्चा होत आहे. गेल्या 20 वर्षापासून या सभागृहाचा सदस्य म्हणून काम करीत आहे. एवढी व्यापक चर्चा या सभागृहांमध्ये कधी झाली नाही. राज्यकर्ते म्हणून सभागृह म्हणून सहकार विषयाकडे अतिशय गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्य श्री. गुजराथी साहेबांनी सांगितले. त्यात मी थोडीशी दुरुस्ती करु इच्छितो. 2 कोटी पेक्षा अधिक रक्कम या सहकारी संस्थेमध्ये गुंतलेली आहे. आज राज्यात 18 हजार पतसंस्था आहेत. राज्यात 535 अर्बन को-ऑप.संस्था आहेत. तसेच 31 जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आहेत. राज्यातील भूविकास बँका 29 आहेत, त्या सर्व बँका 1988 मध्ये बंद पडल्या. त्यांची एक सेंट्रल बँक आहे. या सगळयांचा हिशोब पाहिला तर 168 सहकारी साखर कारखान आहेत. 95कृषी उत्पन्न बाजार समित्या आहेत. सूत गिरण्या, जिनींग, प्रेसिंग हा सगळा हिशोब पाहिला तर जवळ जवळ 5 लाख कोटी रुपयांचा टर्न ओव्हर या संस्थांमधून झालेला आहे. या राज्याचे बजेट 41हजार कोटी रुपयांचे आहे. येथे आमचे डिपॉझीट 2 लाख कोटी रुपयांचे आहे. या राज्यातील जनतेसाठी सहकार विषयाकडे एक सकारात्मक दृष्टीकोनातून आपल्याला पहावयाचे आहे.

या चर्चेच्या अनुषंगाने काही सन्माननीय सदस्यांनी अतिशय चांगल्या सूचना केलेल्या आहेत. इनस्वॉल्व्हन्सी ॲक्टच्या बाबतीत मुद्दा मांडला तो योग्य आहे. माझी देखील अशी कल्पना आहे की, ज्यास प्रोफेशनल मॅनेजमेंट म्हणतो, ते प्रोफेशनल मॅनेजमेंट को-ऑपरेटिव्हमध्ये सुध्दा आणण्याची आवश्यकता आहे. जो पर्यंत प्रोफेशनल मॅनेजमेंट येत नाही. तो पर्यंत काही बाबतीत सुधारणा होणार नाही. कोणी तरी आमचे सरंक्षण करण्यासाठी वर बसलेले आहेत. कोणीतरी आम्हाला

2...

श्री. हर्षवर्धन पाटील..

पाठीशी घालण्यासाठी वर बसलेले आहे. आम्ही काहीही केले तर आमचे काही बिघडणार नाही ही धारणा या सहकारी चळवळीला मारक आहे. मी आश्वासित करु इच्छितो की, या राज्याचा सहकार विभाग भविष्यात निश्चितपणाने यशस्वी होईल.

सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांना सांगू इच्छितो की, सहकार क्षेत्रात भ्रष्टाचार करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याला पाठीशी घातले जाणार नाही. या प्रकरणांमध्ये जे दोषी असतील त्यांचे विरुध्द कारवाई करण्याकरिता सक्षमपणे कारवाई केली जाईल असे आश्वासन मी या ठिकाणी देतो. हे आश्वासन मी सभागृहापूरते न देता संपूर्ण राज्यासाठी देत आहे. सहकार क्षेत्रात भ्रष्टाचाराचे प्रकार होऊ नये म्हणून कडक धोरण ठरविण्याची आवश्यकता आहे. एखादी संस्था काढावयाची, त्यात भ्रष्टाचार करावयाचा, पुन्हा ती संस्था बंद पाडावयाची. त्यानंतर दुसरी सहकारी संस्था काढावयाची. त्या संस्थेस शासनाने मदत करावयाची. पुन्हा त्या संस्था चालकाने तसाच गैरव्यवहार करावयाचा, हे प्रकार कोठे तरी थांबले पाहिजेत. या संदर्भातील कायद्यामध्ये आम्ही लवकरच बदल सुचवित आहोत. पत संस्था प्राधिकरणासाठी एक ड्रॉफ्ट तयार केला आहे. या कायद्यातील 69(ख)मध्ये 29 सुधारणा करीत आहोत. तो ड्रॉफ्ट लवकरच या सभागृहात आणण्याचा आमचा प्रयत्न आहे. रिझर्व्ह बँकेने इन्व्हेटमेंट करण्याकरिता म्हणून अर्बन जिल्हा बँक आणि जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या सदंर्भात काही तरतूदी ठेवलेल्या आहेत. इन्व्हेसमेंट 30 ते 35 टक्क्यांचा जो मुद्दा या ठिकाणी उपस्थित केला आहे. यासंदर्भात नवीन प्राधिकरण गठीत करतो आहोत. हे विधेयक विधानसभा सभागृहामध्ये काल आले. विधानसभा सभागृहात या विधेयकावर काल चर्चा झाली. त्या सभागृहातील अनेक ज्येष्ठ सदस्यांनी सांगितले की, हे विधेयक फार मोठे आहे. हे विधेयक घाईगर्दीत मंजूर करुन घेऊ नका. हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठवावे असा रात्री प्रस्ताव आला व ते विधेयक संयुक्त समितीकडे पाठवावे असे ठरले आहे. आपले सभागृह काल लवकर बंद झ ाल्यामुळे तो प्रस्ताव या सभागृहात मांडता आला नाही. परंतु संयुक्त समितीचा 19 सदस्यांचा प्रस्ताव आजच्या कार्यक्रमपत्रिकेत दाखविण्यात आला आहे. हा पतसंस्थेच्या संदर्भातील एक भाग झाला. सहकारी बँकासाठी बॅन्कींग फायनान्स इन्स्टीटयूटच्या बाबतीत दुसरा एक कायदा असण्याची आज आवश्यकता आहे.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील.....

आज आमच्याकडे क्लासिफिकेशन नाही. Any Society registered under Co-operative Act.....1960 चा कायदा लागू होतो. खरे म्हणजे क्लासिफिकेशनची गरज आहे. सहकारी संस्थांचे रजिस्ट्रेशन ही काळाची गरज आहे. टप्प्याटप्प्याने कायद्यामध्ये बदल करण्याचे प्रस्तावित करीत आहोत. अर्थात लोकशाहीमध्ये एखादा कायदा बदलायचा म्हणजे एका रात्रीत प्रस्ताव आणून कायद्यातील बदल मंजूर झाला असे होत नाही. तसे मलाही अपेक्षित नाही. मॉडेल ॲक्ट केंद्र सरकारने 2003 मध्ये मंजूर केल्यानंतर या राज्यामध्ये आपण तो मॉडेल ॲक्ट 2005 मध्ये मंजूर केला. उत्तम पध्दतीने मॉडेल ॲक्ट मंजूर करणारे महाराष्ट्र हे देशामध्ये पहिले राज्य ठरले आहे. देश पातळीवर नॅशनल कमिटीवर काम करण्याची संधी मला माननीय पंतप्रधानांनी दिली. सहकारी संस्थांच्या रचनेमध्ये निश्चितपणे थोडा आमुलाग्र बदल करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, माननीय श्री.शरद पवार यांनी दिल्लीला सहकार मंत्र्यांची परिषद बोलावली होती. त्या परिषदेला मी आणि माननीय राज्यमंत्री जाऊ शकलो नाही, कारण विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु आहे. परंतु त्या परिषदेमध्ये या राज्याच्या संदर्भात काही प्रेझेंटेशन करण्याचा आम्ही प्रयत्न केला. मला सचिवांकडून मिळालेल्या माहितीनुसार त्या नॅशनल कॉन्फरन्समध्ये इतर राज्यांच्या सहकार मंत्र्यांनी देखील महाराष्ट्रातील सहकार विभागाच्या संदर्भात झालेल्या प्रेझेंटेशनबाबत निश्चितपणे अभिनंदन केले. अशा प्रकारच्या सुधारणा या देशामध्ये महाराष्ट्रातील सहकार विभागाच्या माध्यमातून झालेल्या आहेत. सुदैवाने देशाचे सहकार खाते सुध्दा माननीय श्री.शरद पवार यांच्याकडेच आहे. त्या निमित्ताने एक चांगली संधी आपल्याला प्राप्त झाली आहे. केंद्र आणि राज्य स्तरावर अशा प्रकारचे काही धोरणात्मक बदल आपल्याला निश्चितपणे करता येतील.

सभापती महोदय, या राज्यातील सहकारी संस्थांचा ग्रोथ चार्ट बघितल्यानंतर हे प्रेझेंटेशन आपण समजून घेतले पाहिजे. या राज्यातील सहकारी संस्थांचा ग्रोथ वेगाने कमी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. केवळ संस्था वाढवायच्या आणि सदस्य करायचे, मतदानासाठी उपयोग करुन घ्यायचा का? याचा सुध्दा विचार झाला पाहिजे. ब वर्गाचा नवीन विषय अनेक संस्थांमध्ये पहावयास मिळतो. या संदर्भात मतदानाकरिता संस्था रजिस्टर करायच्या की विकासासाठी रजिस्टर करायच्या हा सुध्दा विचार करणे आवश्यक आहे. ती भूमिका सुध्दा निश्चितपणे या संदर्भात घ्यायचे काम आम्ही केले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील.....

सभापती महोदय, Type of Society हा एक मुद्दा आहे. टाईप ऑफ सोसायटी आणि मेंबरबाबत उल्लेख केला गेला. शेअर कॅपिटलबाबत उल्लेख केला गेला. ग्रामीण भागातील पत पुरवठा हा ग्रामीण भागातील सहकाराचा विषय आहे. माननीय सदस्यांनी मांडलेल्या सर्व मुद्यांचे स्पष्टीकरण आणि या संदर्भात काय कारवाई करणार हे मी सांगणार आहे. परंतु कॉज ऑफ ॲक्शन असणे नितांत गरजेचे आहे. Rural credit co-op society च्या संदर्भातील फायनान्स आपण वाढवित आहोत. या वर्षी 13 हजार कोटी रुपयांपर्यंत पीक कर्ज देण्याचा निर्णय घेतला आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील हे अनेक वर्षे सहकारी चळवळीमध्ये काम करीत आहेत. आतापर्यंत 7 ते 8 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त पीक कर्ज या राज्यातील शेतकऱ्यांना देऊ शकलो नाही. या वर्षी आपण 13 हजार कोटी रुपयांपर्यंत पीक कर्ज वाटप करीत आहोत. पुढील वर्षी 15 हजार कोटी रुपयांपर्यंत उद्दिष्ट ठरविले आहे. 2014-2015 या वर्षासाठी 20 हजार कोटी रुपयांचे उद्दिष्ट ठरविले असून ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना भांडवल म्हणून शेती व्यवसायासाठी 20 हजार कोटी रुपये कर्ज म्हणून द्यावयाचे आहेत. 50 हजार रुपयांपर्यंत शून्य टक्के व्याज, 3 लाख रुपयांपर्यंत 4 टक्के व्याज आणि नियमित कर्जाची परतफेड केली तर सवलत देण्याचा विचार आहे. वारंवार राज्य सरकार आणि केंद्र सरकार कर्ज माफ करणार नाही. वारंवार केंद्र आणि राज्य सरकार सबसिडी देणार नाही. बँकिंग व्यवसायामध्ये अशा प्रकारे मोठया प्रमाणात कर्ज माफ करण्याची सवय लावावयास गेलो तर कर्ज वसुलीबाबत खूप अडचणी येणार आहेत. 70 हजार कोटी रुपयांचे कर्ज माफ करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय झाला. आता बातमी आली की, पत संस्थांचे कर्ज माफ होणार आहे. तीन महिन्यात राज्यभरात ही बातमी वाऱ्यासारखी पसरली. याचा परिणाम असा झाला की, पत संस्थांमधून ज्यांनी कोणी कर्ज घेतले त्यांच्याकडे वसुलीसाठी गेल्यानंतर केंद्र सरकार कर्ज माफ करणार आहे, त्यामुळे तुम्ही आमच्याकडे कर्जाची रक्कम मागण्यासाठी येऊ नका असे सांगितले जाते. शेवटी दिलेले कर्ज हे चेअरमनच्या खिशातून दिले जात नाही. प्रकल्पासाठी हर्षवर्धन पाटील वैयक्तिक कर्ज देत नाही.

नंतर एस.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ पूर्वी श्री. भोगले...... 11:30

श्री. हर्षवर्धन पाटील.........

वैयक्तिक जरी दिलेले नसले तरी हे कर्ज सामान्य माणसाच्या ठेवीच्या रुपाने जमा होणाऱ्या पैशातून देत असतो म्हणून या पत संस्थांच्या बाबतीत निश्चितपणे कडक धोरण आखण्याची गरज आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, ज्यांना आपण डीसीसी बँका म्हणतो त्यांच्या बाबतीत एक काळ असा होता की, त्यांनी सहकार क्षेत्रात आपले एक वेगळेच स्थान निर्माण केले होते. आज मात्र परिस्थिती वेगळीच निर्माण झालेली आहे. त्यात सुध्दा काही आठ ते दहा बँकांची कामगिरी अतिशय उत्तम असल्याने त्यांचा अभिमानच वाटतो. मी मुळीच म्हणणार नाही की या जिल्हा बँका अडचणीत आल्या, साखर कारखाने बंद पडणार आहेत तर सहकार क्षेत्रात आजही चांगले काम करणारे काही कार्यकर्ते आहेत. जे विश्वस्त म्हणून अत्यंत योग्य प्रकारचे काम करीत आहेत, पारदर्शकपणे या संस्थांचा कारभार करीत आहेत. पै अन् पैचा हिशेब अगदी स्पष्टपणे देतात, अशा संस्थांमध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता नाही, गैरव्यवहार नाही. आम्ही सुध्दा सहकारी संस्था चालवितो, दोन दोन बँकांमध्ये आमचा प्रत्यक्ष सहभाग आहे. शेवटी आपण लोकांना कशा सवयी लावतो, कशी दिशा दाखवितो त्यावर आपली सहकारी चळवळ अवलंबून असते. पण चुकीच्या पध्दतीने काम करुन सहकारातून संपत्ती, संपत्तीतून सत्ता आणि पुन्हा सत्तेतून संपत्ती व संपत्तीतून पुन्हा सहकार अशा प्रकारे काही ठिकाणी चालत असेल तर ते मोडून काढण्याची भूमिका सहकार विभागाची राहणार आहे. या निमित्ताने मी असेही सांगू इच्छितो की, आमच्या जिल्हा बँकेवर आजही 44 कोटीचे ड्यूज आहेत.

महोदय, सभागृहात चर्चा करीत असताना लायसेन्सिंगच्या बाबतीत उल्लेख झालेला नसला तरी मला प्रामुख्याने सांगितले पाहिजे की, आजकाल सहकारी बँकांवर रिझर्व्ह बँकेचे प्रचंड नियंत्रण आलेले आहे. रिझर्व्ह बँक ऑफिसर्स सहकारी बँकांवर अगदी बारकाईने लक्ष देत आहे. कालच टी.व्ही. वर बातमी आली की, द्वारकानाथ बँकेसंबंधी डायरेक्टली पोलीस केसेस दाखल करण्याच्या ऑर्डर्स रिझर्व्ह बँकेकडून देण्यात आल्या. पेण अर्बन को.ऑप. बँकेच्या बाबतीत सुध्दा येथे उल्लेख करताना सांगण्यात आले की, इंटरनॅशनल लेव्हलला हवाला मार्केटशी या बँकेचे लिंक-अप असल्याचे आढळले. त्याचप्रमाणे प्रत्यक्षात डिपॉझिट 300 कोटी असून 700 कोटीचे असल्याचे रेकॉर्ड तयार करण्यात आले, व्यवहार मात्र 1200 कोटी केले. अशा पध्दतीने त्या

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील......

बँकेच्या चेंबूर व दादर येथील ब्रँचेसमध्ये या सर्व गोष्टी आढळून आल्या म्हणून शासनाने ही चौकशी सीबीआयकडे देण्याचा निर्णय घेतला. त्या बँकेची चौकशी सुरु झाली असून परवाच पोलीस केसेस दाखल करण्यात आल्या. पेण बँकेच्या सी.ए. ने सलग पाच वर्षे त्या बँकेला "अ" वर्ग दिलेला आहे आणि सहाव्या वर्षी मात्र एकदम "ड" वर्ग दिला. यावरुन मी तर असे म्हणेन की, या बँकेत जो प्रकार घडला त्याला चेअरमनपेक्षा जास्त जबाबदार या सी.ए. लाच धरले पाहिजे. म्हणून या निमित्ताने शासनाने पहिल्यांदा कोणता निर्णय घेतला असेल तर तो म्हणजे या बँकेच्या सी.ए. चे नाव एफआयआरमध्ये घेण्यास सांगितले व तो सध्या अंडर अरेस्ट आहे. तसेच या सी.ए. कंपनीला सुध्दा ब्लॅक लिस्टमध्ये टाकण्याचे काम शासनाने केले आहे.

महोदय, वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताबाबत बऱ्याच वेळा असे घडते की, इतिवृत्तावर चेअरमन म्हणून सही घेतली जाते, ते बारीक सारीक गोष्टी बघत नाहीत. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण या पुण्याच्या महापौर असताना पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी एकदा गेल्या होत्या. त्यांचा दुसरीकडे कार्यक्रम असल्यामुळे वार्षिक सभेतून फक्त सही करुन आणि हजेरी देऊन निघून गेल्या. पण आपल्याकडून ३ कोटीची रिकव्हरी का करण्यात येऊ नये म्हणून त्यांना आता नोटीस आली आहे. असे प्रकार होत असल्याने यात कुठेतरी जॉईंट अँड सेव्हरल रिस्पॉन्सिबिलिटी फिक्स करण्याची वेळ आली आहे. कदाचित हा विषय आपल्याला फारसा समजलेला नसावा. पण प्रत्येकाला वाटते की, आपण अमुक पक्षाचे कार्यकर्ते आहोत आणि आपले वरदहस्त असणारे मोठे नेते वरती बसलेले आहेत, त्यामुळे चिंता करण्याचे कारण नाही. यातून हे प्रकार उदभवण्याची शक्यता असते. त्यासाठीच सहकार क्षेत्रात शिस्त, अकौऊंटेबिलिटी, प्रोफेशनलिझम आणि ट्रान्सपरन्सी आणण्याची गरज आहे. एकदा लोकांना समजले की, आमचे जे नेतृत्व आहे त्यांच्यावर आमचा विश्वास आहे. ते नेतृत्व पारदर्शीपणे काम करते, उत्तम प्रकारे मॅनेजमेंट आहे या सर्व गोष्टी बदल्या परिस्थितीत, स्पर्धेच्या युगात आपल्याला योग्य दिशा दाखविणाऱ्या आहेत. असा विश्वास एकदा जनतेत निर्माण झाला तर फारशी चिंता करण्याची गरज राहणार नाही.

....3....



PFK/ KGS/ पूर्वी श्री. भोगले...... 11:30

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील......

काही साखर कारखान्यांच्या बाबतीत आज तर अशी अवस्था आहे की, वार्षिक सर्वसाधारण सभा घ्यावयाची असेल तर एसआरपी दिल्याशिवाय ती सभा घेता येत नाही. आजही माझ्याकडे, आमच्या कारखान्या वार्षिक सर्वसाधारण सभेला मुदतवाढ देण्यात यावी किमान 50 प्रस्ताव तरी आलेले आहेत. मी त्यांना विचारले की, आपल्या कारखान्याची वार्षिक सभा घेण्यात अडचण काय आहे, तर ते सांगतात की, आम्ही वार्षिक सभेला सामोरे जाऊ शकत नाही. म्हणून कामकाजाच्या पध्दतीमध्ये गुणात्मक वाढीचाही विचार आपल्याला करावा लागणार आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील ....

संख्या किती आहे हा विषय महत्वाचा नाही परंतु ज्या संस्था चांगल्या चाललेल्या आहेत अशा संस्थांना आपल्याला प्रोत्साहन द्यावे लागणार आहे. आपण पॅकेज कोणाला देतो ? ज्याचे नेटवर्कींग मायनस झालेले असते त्याला पॅकेज दिले जाते, आमची सवलत कोणाला दिली जाते ? ज्याने सर्व बुडवले आहे त्याला सवलत दिली जाते. आमचे धोरण कसे ठरते याचा सुध्दा विचार होण्याची आवश्यकता आहे. आज विद्युत मंडळाचे नियमित वीज बिल भरणा-यांची संख्या 7 लक्ष असून कायमचे बिल न भरणा-या शेतक-यांची संख्या 5 लाख आहे. वीज बिलाची जेव्हा माफी होते तेव्हा त्याचा फायदा जो वीज बिल भरत नाही त्याला होत असते त्यामुळे जो बिल वेळच्या वेळी भरतो तो म्हणतो मी वेळेवर बिल भरतो हीच माझी चूक झाली. मी जबाबदारीने सांगतो की, 12-15 सूत गिरण्या चांगल्या प्रकारे सुरु आहेत. 10-15 टक्के पतसंस्था सोडल्या तर गावागावामध्ये, शहरा शहरामध्ये, वार्डावार्डामध्ये संसार उभे करण्याचे काम पतसंस्थेच्या मार्फत होते आहे. एखाद्याच्या घरात रात्री मयत झाली व अंत्यसंस्काराला पैसे नसतील तर पतसंस्थेचा चेअरमन अशा वेळी रात्री 2.00 वाजता 5-10 हजार रुपये देऊन मदत करीत असतो. अशा सामाजिक दृष्टीने काम करणा-या काही संस्था आहेत. परंतु दोन लोकांनी चुकीच्या पध्दतीने काम करावयाचे व त्यामुळे 98 टक्के लोकांची बदनामी होणार असेल तर ते यापुढे खपवून घेतले जाणार नाही. मला वाटते की, धोरण म्हणून याकडे पाहण्याची आवश्यकता आहे.

सहकारामध्ये खाते, मंत्री, राज्य मंत्री किंवा 5-25 अधिका-याकडून सर्व काही व्यवस्थित चालेल असे समजण्याचे काही कारण नाही. कारण ही चळवळ मुळातच लोकांची चळवळ आहे. या चळवळीमध्ये जनतेचे हित जोपासले गेले आहे. या चळवळीमध्ये जनतेचा पैसा आहे. या चळवळीमध्ये जनतेची अकौंटॅबिलीटी मोठया प्रमाणात असणे आवश्यक आहे. रिझर्व्ह बँकेचा प्राईम लॅन्डींग रेट 10 टक्के असेल तर आम्ही शिकलेली माणसे सुध्दा 18-20 टक्क्याची जाहिरात वर्तमानपत्रात वाचली तरी अशा ठिकाणी आम्ही लाईन लाऊन पैसे भरतो. त्यामुळे आम्ही बंधन घातले आहे की, अशा प्रकारे कोणालाही वर्तमानपत्राच्या माध्यमातून जाहिरात देता येणार नाही. चुकीच्या पध्दतीने सामान्य माणसाला फसवून अधिक डिपॉझीट पब्लीक मधून चुकीच्या पध्दतीने कोणी घेत असेल तर अशा ठिकाणी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील ....

माझा विभाग कारवाई करण्यास कधीही मागेपुढे पाहणार नाही हे मला प्रामुख्याने सांगावयाचे आहे. बँकेच्या लायन्सींगच्या बाबतीत रिझर्व्ह बँकेने सांगितले आहे की, 4 टक्के सीआरआर असला पाहिजे तरच तुम्हाला 31 मार्चला लायसन्स मिळेल, रिझर्व्ह बँकेने असेही सांगितले आहे की, रिझल्ट्स अव्हेलेबल ऑडिट 2010-11 चे असले पाहिजे, तुमचा रोड मॅप 2011 मार्च ते 2012 मार्च पर्यंतचा तयार करुन दिला पाहिजे, नाबार्डच्या संदर्भात टॅक्स असेट्सच्या थ्रू ओटीएस आणि कॅपिटल इन्फल्यूअन्स मोअर दॅन 1500 कोटी रुपये लागतील अशा प्रकारे रिझर्व्ह बँकेने लायसनच्या संदर्भात अटी घालून दिलेल्या आहेत.

सभापती महोदय, या ठिकाणी गव्हर्नमेंट गॅरंटीच्या बाबतीत उल्लेख करण्यात आला आहे. गव्हर्नमेंट गॅरंटी म्हणजे काय हा विषय एकदा या राज्याला समजण्याची आवश्यकता आहे. आज आम्ही एखाद्या प्रकल्पाला गव्हर्नमेंट गॅरंटी घेतली तर या गॅरंटीतील डीडमध्ये 7 ते 8 प्रकारचे क्लॉजेस असतात. आपण हे क्लॉजेस कधी वाचलेले आहेत काय ? आपण कशावर सहया करतो याचा आपण कधी विचार केलेला आहे काय ? गव्हर्नमेंट गॅरंटी म्हणजे शासनाची थकीत हमी. या राज्यातील राज्य सहकारी बँक, जिल्हा मध्यवर्ती बँक म्हणत आहेत की, आमची सरकारकडे 2800 कोटी रुपयांची गव्हर्नमेंट गॅरंटी आहे. या ठिकाणी माननीय श्री. फुंडकर साहेब खाली बसून म्हणाले की, आम्हाला आमची गव्हर्नमेंट गॅरंटी मिळाली पाहिजे. गव्हर्नमेंट गॅरंटी एक तर प्रिन्सिपल अमाऊंटला असते, गव्हर्नमेंट गॅरंटी ही 10 वर्षाचे व्याज देण्याच्या संदर्भात असते. माझ्याकडे जी माहिती आहे त्याप्रमाणे राज्य सहकारी बँकेने क्लेम केला आहे की, राज्य शासनाने आम्हाला 1800 कोटी रुपये दिले पाहिजे. राज्य सहकारी बँक ही या राज्याची महत्वाची बँक असल्यामुळे ही बँक टिकली पाहिजे, वाढली पाहिजे, त्यांनी लोकांना मदत केली पाहिजे म्हणून शासनाने 31 मार्च रोजी 270 कोटी रुपये राज्य सहकारी बँकेला डिफॉल्ट गॅरंटीच्या संदर्भात ॲडहॉक बेसीसवर दिलेले आहेत.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील ...

सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर आणि सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील हे बँकेचे संचालक आहेत तेव्हा ही रक्कम त्या बॅकेने लेजरमध्ये कोठे जमा केलेली आहे हे आपण तपासून पहावे. 270 कोटी रुपयापैकी 100 कोटी रुपये भाग भांडवलासाठी आणि 170 कोटी रुपये ॲडहॉक बेसिसवर राज्य शासनाने दिलेले आहेत. बँकेने 1800 कोटी रुपयांचा क्लेम राज्य शासनाकडे केलेला आहे.माझ्या माहितीप्रमाणे हा क्लेम 600 ते 650 कोटी रुपयापर्यंत जातो.बँकेच्या रेकॉर्डप्रमाणे 1800 कोटी रुपयांचा क्लेम आहे आणि शासन फक्त 600 ते 650 कोटी रुपयांचे देणे लागते.आपण दोघेही जण बँकेचे ज्येष्ठ संचालक आहात तेव्हा एकूण 88 केसेसमध्ये शासनाने जी काही हमी दिली त्यातील प्रत्येक प्रकरणांचा हिशोब तुम्ही करावा अशी मी तुम्हाला विनंती करतो. याबाबतीत मी आयुक्तांना सुध्दा आदेश दिलेले आहेत आणि एक कमिटी देखील गठीत केलेली आहे. तेव्हा एक महिन्यामध्ये 1800 कोटी रुपयांचा तुम्ही आम्हाला हिशोब करुन द्यावा.नियमाप्रमाणे जे पैसे देणे क्रमप्राप्त आहेत त्या संदर्भात देखील सरकारची भूमिका अत्यंत सकारात्मक राहणार आहे. मात्र हे पैसे वसूल करण्याच्या बाबतीत तुमचीसुध्दा जबाबदारी राहणार आहे. एखाद्या संस्थेला शासनाने 50 कोटी रुपयांची हमी दिलेली आहे. परंतु तुमच्या बँकेने त्या संस्थेला जे कर्ज दिलेले आहे ते वेगळे असते. पण ते सगळे कर्ज एका अकाऊन्टला दाखवले जाते आणि हे सगळया अकाऊन्टचे शासनाच्या हमीचे पैसे शासनाने द्यावे अशी मागणी आमच्याकडे केली जाते. तेव्हा अशा प्रकारे आपल्याला हिशोब करता येणार नाही. बॅकेमध्ये ज्याप्रमाणे गुंतवणूकदारांचा पैसा गुंतलेला असतो त्याप्रमाणे सामान्य माणसांकडून कर रुपाने शासनाच्या तिजोरीत पैसे येत असतात.बँकेमध्ये संचालक मंडळ विश्वस्त असतात आणि शासनामध्ये मंत्री हे विश्वस्त असतात त्यामुळे दोघांचीही ती जबाबदारी आहे.त्या दृष्टीने पुढच्या काळात वाटचाल करण्याची आवश्यकता आहे, असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, डॉ.पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना शासनाने सुरु केलेली आहे.त्या साठी या वर्षी 250 कोटी रुपयांची सवलत देण्यात येणार आहे. या राज्यातील 1 कोटी 10 लाख शेतक-यापैकी 85 लाख शेतकरी पीक कर्ज घेण्यासाठी पात्र आहेत.s मध्यंतरी 70 हजार कोटी रुपयांची कर्ज माफी करण्यात आली होती.राज्य सरकारने देखील 6 हजार 200 कोटी

2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील ....

रुपयांची कर्ज माफी केली होती.35 लाख शेतकरी वर्षानुवर्षे कर्जाच्या थकबाकीमध्ये त्रस्त झाले होते त्या सर्व शेतक-यांचे सात बारे या कर्जमाफीच्या माध्यमातून मोकळे झालेले आहेत व त्या शेतक-यांना पुन्हा नव्याने कर्ज देण्याची व्यवस्था केलेली आहे. त्या लोकांना मला या चर्चेच्या माध्यमातून असे आवाहन करावयाचे आहे की, शेतक-यांने जरुर कर्ज काढावे. कर्ज काढल्याशिवाय प्रगती होऊ शकत नाही. पण काढलेले कर्ज आपल्या आवाक्यात असेल तरच ते कर्ज फिटते.त्याचबरोबर ज्या कामासाठी कर्ज काढलेले आहे त्याच कामासाठी त्या कर्जाचे पैसे वापरले तर कर्ज फेड करण्यामध्ये कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही म्हणूनच कर्जाच्या आवाक्यात आपण जाण्यापेक्षा आपल्या आवाक्यामध्ये ते कर्ज असले पाहिजे एवढे साधे व सोपे तंत्र सर्वांनी पाळले पाहिजे. केवळ कर्ज उपलब्ध होते म्हणून जास्त कर्ज काढले तर अर्थशास्त्र कोलमडल्या शिवाय राहणार नाही.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांना मी असे सांगतो की, कर्ज फेड करण्याची सवय आता आम्ही शेतक-यांना लावत आहोत . मुद्दल व व्याजासह आमची रक्कम माफ करण्यात यावी अशी लोक आता मागणी करीत आहेत. आम्ही त्यांना असे सांगितले की, शासनाने एकदा आपले कर्ज माफ केले होते. कोणत्याही सरकारला वारंवार कर्ज माफ करता येणार नाही आणि तशा प्रकारची सवय जर त्यांना लावण्याचा प्रयत्न केला तर वसुलीवर त्याचा परिणाम होईल. बॅंकेच्या पैशाची वसुली हा देखील एक महत्वाचा मुद्दा आहे.

डॉ.नीलम गो-हे : ज्यांनी गैरव्यवहार केले त्यांच्या विरुध्द कोणती कारवाई केली ?

श्री.हर्षवर्धन पाटील : मी त्या संदर्भात खुलासा करणार आहे. सन्माननीय सदस्यांचे फक्त दोन मुद्दे आहेत आणि त्याचे उत्तर देण्याकरिता मला दोनच मिनिटे लागणार आहेत त्या पेक्षा जास्त वेळ लागणार नाही.कर्ज वसूल करण्याच्या संदर्भात अकाऊन्टीबिलीटी निर्माण करावी लागेल.

सभापती महोदय अर्बन को.ऑप.बॅंकेच्या संदर्भात वेगळे चित्र निर्माण व्हावयास लागले आहे या बॅंका किती वाढविणार आहात अशी रिझर्व्ह बॅंक विचारणा करु लागली आहे.अमलगमेशन ऑफ को.ऑप.बॅंक हा सुध्दा विषय आता समोर यावयास लागला आहे. अमलगमेशन ऑफ अर्बन क्रेडिट को.ऑप बॅंक हा सुध्दा विषय रिझर्व्ह बॅंकेच्या माध्यमातून समोर यावयास लागला आहे.क्लासिफिकेशन ऑफ अर्बन को ऑप बॅंक करावी लागणार असून त्यामध्ये क्लास वन पासून

3..





श्री.हर्षवर्धन पाटील .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

क्लास फोर पर्यंत टॅक्सकॉफच्या माध्यमातून क्लासिफिकेशन करण्याचा शासनाने प्रयत्न केलेला आहे. अर्बन बँकेचे मर्जर हा महत्वाचा विषय आहे. त्याचबरोबर नॉन ॲग्रिकल्चरल क्रेडिट को.ऑप सोसायटीचा फायनान्स हा विषय या माध्यमातून समोर येत आहे.

सभापती महोदय, सहकारी संस्थांसंबंधीचे संपूर्ण चित्र पाहिल्यानंतर को ऑपरेटिव्ह सेक्टरमध्ये प्रोफेशनॅलिझम आणण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते. सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी या चर्चेच्या निमित्ताने केडीसीसी बँकेच्या संदर्भात काही मुद्दे मांडले आहेत. त्या बँकेच्या प्रकरणात आतापर्यंत कोणती कारवाई करण्यात आली आहे याची संपूर्ण माहिती मी येथे आणलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला होता त्याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, आता कलम ८८ खालील चौकशी निश्चित करण्याची अंतिम सुनावणी डिस्ट्रीक्ट डेप्युटी रजिस्ट्रार आणि जॉईन्ट रजिस्ट्रार यांच्या स्तरावर आलेली आहे.

नंतर श्री.सरफरे`

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील...

आणि एका महिन्यात त्या संदर्भातील ॲक्शन पूर्ण होईल. तसेच, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या बाबतीत 110 अ ची कारवाई सहकार विभागाच्या माध्यमातून केली असून त्या ठिकाणी आपण प्रशासक नेमला आहे. त्याचप्रमाणे गेल्या वर्षभरामध्ये जवळ जवळ 180 कोटीपेक्षा अधिक रक्कम वसूल करण्याचा आपण प्रयत्न केला आहे. मी तुम्हाला वसुलीची आकडेवारी सुध्दा या ठिकाणी देईन. सभापती महोदय, कलम 88 खालील अंतिम कारवाईचा प्रश्न राहिला असून त्यासाठी शेवटची तारीख देण्यात आली आहे व त्याची नोटिस याठिकाणी वाचून दाखविली आहे. त्यामध्ये निश्चितपणे कारवाई करण्यास कोणतीही अडचण येणार नाही. त्याच प्रमाणे पेण अर्बन बँकेच्या संदर्भात मुद्दे उपस्थित करण्यात आले. त्या बँकेची प्रॉपर्टी अटॅच करण्यात येत आहे. त्या अटॅच केलेल्या प्रापर्टीच्या माध्यमातून वसुली करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या गॅरंटीबाबत देखील प्रॉपर्टी अटॅच करीत आहोत. त्या बँकेमध्ये काही पतसंस्थांचे, काही महिला बँकेचे पैसे अडकले आहेत. माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांच्या रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे जवळ जवळ 40 कोटी रुपये अडकले आहेत. तुमच्याकडे आता इतके पैसे झाले आहेत की ते कुठे ठेवायचे असा प्रश्न निर्माण झाला आहे. म्हणून तुम्ही सुध्दा पैसे ठेवतांना जरा माणसे बघून ठेवा. मला असे वाटते की, त्याकरिता एखादा चांगला माणूस नेमा, तो कुठेतरी योग्य कारणासाठी पैसे ठेवेल आणि जर तशी अडचण असेल तर मला सांगितल्यास मी आपल्याला मदत करीन.

**उप सभापती** : माझ्यासारखा दुसरा योग्य माणूस तुम्हाला महाराष्ट्रात मिळणार नाही.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, माझी सुध्दा त्याला मान्यता आहे. त्याचप्रमाणे उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या बाबतीत आपण मुद्दा उपस्थित केला होता. त्या संदर्भातील कारवाई सुरु आहे. माननीय सदस्य श्री. मनीष जैन यांनी साखर कारखान्याच्या रिपेमेंट बाबत मुद्दा उपस्थित केला होता, त्या संदर्भातील धोरण जाहीर केले आहे. कर्ज मर्यादेच्या संदर्भात धोरण ठरविण्याबाबत मुद्दा उपस्थित करण्यात आला. सभापती महोदय, मी सुध्दा सहकार क्षेत्रामध्ये कायम काम करणारा एक कार्यकर्ता आहे. त्यामुळे या प्रकरणामध्ये क्लॉजबेस डिपॉझीट किती घेणे, इन्व्हेस्टमेंट किती असावी, रिफायनान्सिंग किती असावे या दृष्टीने या पतपेढयांच्या बाबतीत निश्चितपणे आम्ही धोरण स्वीकारीत आहोत. त्याचप्रमाणे 38 कारखान्यांच्या बाबतीत एमएससी बँकेकडून द्यावयाचा हिशेब आपण म्हटल्याप्रमाणे निश्चितपणे देऊ. माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी प्रापर्टी अटॅच करणे, पतसंस्था केव्ही इन्व्हेस्टमेंटच्या संदर्भात, एनपीएच्या बाबतीत,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/

श्री. हर्षवर्धन पाटील...

थकबाकीच्या बाबतीत चार-पाच अतिशय चांगल्या सूचना केल्या. त्यामध्ये इन्सॉल्व्हन्सी ॲक्ट करण्याबाबत त्यांची सर्वात महत्वाची सूचना आहे.

सभापती महोदय, पत संस्थांच्या संदर्भात आपण संयुक्त चिकित्सा समिती तयार करीत असून त्याबाबतचा प्रस्ताव सभागृहामध्ये मांडण्यात येणार आहे. त्यावेळी या समितीच्या दोन-चार महिन्यातील बैठकीमध्ये विचारविनिमय करुन एक व्यापक धोरण निश्चितपणे आणण्याचा आमचा प्रयत्न राहील. माननीय सदस्य श्री. मनिष जैन यांनी तापी पत संस्थेबाबत मुद्दा उपस्थित केला आहे. त्याबद्दल माननीय राज्यमंत्र्यांकडून आज फायनल हियरींग घेण्यात येणार असून त्यासाठी श्री. बदाम, व्यवस्थापक यांना सूचना देण्यात आल्या आहेत. माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी शिवनेरी सहकारी पत संस्थेबाबत मुद्दा उपस्थित केला. त्या संदर्भात माझ्याकडून डायरेक्शन्स देण्यात आल्या आहेत. त्याकरिता मी जॉईन्ट रजिस्ट्रार यांना एक टाईम बाऊंड कार्यक्रम तयार करुन दिला आहे. आवश्यकता वाटल्यास संबंधित अधिकाऱ्यांना पुन्हा त्या ठिकाणी बोलावून घेण्यात येईल आणि त्या संदर्भात निश्चितपणे एक कॉज ऑफ ॲक्शनचा कार्यक्रम ठरविण्यात येईल आणि मुदतीच्या आत ॲक्शन होईल आणि त्या संदर्भातील निर्णय आपल्यासमोर करण्यात येईल. आठ दिवसांचा ॲक्शन प्लॅन दिला असून आपल्या उपस्थितीत निश्चितपणे त्याबाबत कारवाई करण्यात येईल.

सभापती महोदय, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेबाबत आपण एक मुद्दा उपस्थित केला आहे. आपण पुणे जिल्हयातील रहिवाशी आहात आणि मी सुध्दा तेथील रहिवाशी आहे. परवाच माननीय उपमुख्यमंत्री आणि माननीय अध्यक्ष यांच्याबरोबर एक बैठक झाली आहे. आता अंतिम चौकशीचा भाग राहिला आहे. त्यामध्ये 22 कोटींच्या गैरव्यवहाराबाबत अंतिम निर्णय झाला असून त्या दृष्टीने योग्य ती कारवाई केली जाईल. त्याचबरोबर जिल्हा बँकेने आमच्या सर्व शाखांचे इन्स्पेक्शन करा असे शासनाला कळविले आहे. याकरिता आम्ही 100 लोकांची एक टीम तयार करीत असून जिल्हा मध्यवर्ती बँकेने मागणी केल्याप्रमाणे त्यांच्या सर्व शांखाचे इन्सपेक्शन जरुर केले जाईल. सभापती महोदय, कमपत्राच्या बाबतीत मुद्दा उपस्थित करण्यात आला असून आपण 3 वर्षाचे कमपत्र मंजूर करुन देतो, त्यासाठी विभागीय स्तरावरील अधिकाऱ्यांना मान्यता देण्याचे अधिकार दिलेले आहेत.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अप्रकाशित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील . . . .

त्यामुळे ते लोन कमिटीपुढे किंवा संचालक मंडळापुढे येणार नाही. म्हणून अशा प्रकारचे क्रमप्रत्राव्दारे आपण तीन-तीन वर्षाची ब्लँकेट परवानगी देणे योग्य नाही असे मला वाटते. कारण आज आम्ही क्रमपत्रामध्ये द्राक्षासाठी दीड लाख रुपये देत आहोत. क्रमपत्रामध्ये आम्ही द्राक्षासाठी पीक कर्ज म्हणून 90 हजार रुपये देत आहोत. तसेच 35-40 हजार रुपये ऊसाच्या पिकासाठी कर्ज म्हणून देत आहोत आणि त्याचा क्वाण्टम 500 ते 700 आणि 700 ते 800 कोटीपर्यंत जात आहे. त्यामुळे या अनुषंगाने धोरणात्मक निर्णय घेण्याची निश्चितपणे गरज आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे (खाली बसून) : ठेवीदारांना सॉफ्ट लोनमधून दहा हजाराचा हप्ता अजून मिळालेला नाही.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, आता सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी मुद्दा उपस्थित केला आहे. आम्ही सॉफ्ट लोन म्हणून 200 कोटी रुपये देण्याचा निर्णय घेतला होता. ज्यावेळी याबाबत निर्णय झाला, तेव्हा दहा हजार रुपयापर्यंत मग ती महिला असेल, परित्यक्ता असेल, मागासवर्गीय असेल, पेन्शनर असेल किंवा विधवा असतील तर त्यांना सॉफ्ट लोनमधून पैसे द्यावेत असा निर्णय झाला. आता त्याच्या व्यतिरिक्त काही संस्थांमध्ये असा प्रकार सुरु आहे की, बॅक डेटेड डिपॉझिटची खाती फोड करावयाची. याबाबतीत सांगली, सातारा मध्ये घटना घडली. मी त्याबाबत पोलीस केसेस केलेल्या आहेत. त्यामुळे मला असे वाटते की, याबाबतीत निर्णय होण्यापूर्वी ज्या ठेवीदारांची यादी असेल त्याप्रमाणे पैसे देता येतील. आज माझ्याकडे 200 कोटीपैकी 20 ते 22 कोटी रुपये शिल्लक आहेत. त्यामुळे याबाबतीत देखील आपल्याला निश्चितपणे विचार करता येईल हे मला प्रामुख्याने सांगावयाचे आहे. वसंतदादा सहकारी बँक, भूदरगडच्या बाबतीत देखील सकाळी चर्चा झाली. सन्माननीय सदस्य श्री.साळुंखे साहेबांनी सहकार विभागाच्या संदर्भात एक-दोन सूचना केलेल्या आहेत, त्याबाबतीत कारवाई होईल. सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी त्यांच्या जिल्ह्यातील सिंधुदुर्ग बँकेच्या एका संचालकाबद्दल सांगितले आहे. यासंदर्भात ही काही कारवाई करावयाची आहे ती केली जाईल. याठिकाणी आपण भूदरगडच्या पतसंस्थेबाबत सुध्दा काही मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्याबद्दल सुध्दा निश्चितपणे योग्य त्या प्रकारची कारवाई करण्यामध्ये कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही.

सभापती महोदय, एकंदरीत आपण या राज्यातील अनेक विषयांच्या बाबतीत चर्चा करण्याचा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रयत्न केलेला आहे. परंतु याठिकाणी उपस्थित करण्यात आलेल्या सर्वच मुद्यांना स्पर्श करणे मला वेळेअभावी शक्य होणार नाही. पण याबाबतीत निश्चितपणे काही धोरण आणि ॲक्शन प्लॅन आखावा लागेल. अशा वेळी या सभागृहाने देखील याच्या पाठीमागे खंबीरपणे उभे रहाण्याची आवश्यकता आहे. आपल्याला 1960 च्या कायद्यात बदल करण्यासाठी वेगवेगळे सेक्शन्स् करावे लागतील. मी सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर साहेबांना सांगू इच्छितो की, यामध्ये ॲमेंडमेंट आणण्यासाठी एक व्यापक बिल सदनामध्ये आणावे लागेल. त्यावेळेस तुमच्या सर्वांचे सहकार्य लागेल. बँकेसाठी वेगळा कायदा, पतसंस्थेसाठी वेगळा कायदा, साखर कारखानदारीसाठी वेगळा कायदा, सर्व्हीस देणाऱ्या संस्थांसाठी वेगळा कायदा, हौसिंगसाठी वेगळा कायदा आणावा लागेल.

सभापती महोदय, हौसिंग सोसायटीच्या बाबतीत सांगावयाचे तर आज फक्त मुंबईमध्ये 32 हजार सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत. तसेच ग्रामीण भागामध्ये नागरीकरण वाढत आहे, अर्बनायझेशन वाढत आहे. म्हणून याबाबतीत देखील आपल्याला निश्चित अशा प्रकारचे धोरण स्वीकारणे आवश्यक आहे. तसेच ऑडीटरच्या जबाबदाऱ्या, चार्टर्ड अकाऊंटन्टच्या जबाबदाऱ्या याची देखील काही नियमावली तयार करण्याची आवश्यकता आहे. त्याचबरोबर आता माझ्या सहकार विभागाचे पुनर्गठन देखील करावे लागणार आहे. आज आमच्या सहकार खात्यामध्ये सुध्दा आमूलाग्र बदल करण्याची आवश्यकता आहे. हे जर सर्वकाही पाहिले तर या संदर्भात आज आपण निश्चितपणे काही बदल करीत आहोत आणि आम्ही ते बदल घेऊन लवकरच सदनासमोर येऊ. महाराष्ट्रामध्ये 335 तालुके आहेत. आज दुर्दैवाने विदर्भामध्ये एकेका जिल्ह्यामध्ये एकेक असिस्टंट रजिस्ट्रार आहेत. विदर्भामध्ये दोन-दोन जिल्ह्यांमध्ये आमचे दोन असिस्टंट रजिस्टार आहेत, दोन जिल्ह्यामध्ये एक डी.डी.आर. आहेत.म्हणून स्टाफींग पॅटन, रिक्त पदे आणि वर्ग-1 च्या संदर्भातील सिलेक्शन करण्याबाबत एम.पी.एस.सी.कडून माझ्याकडे काही यादी येत आहे. तसेच आज एम.के.सी.एल.ला 800 पदे भरण्यासाठी परवानगी दिलेली आहे. म्हणून रिक्त पदे भरणे आणि प्रत्येक तालुक्याला एक सहकार भवन असण्याची आवश्यकता आहे आणि त्यासाठी आम्ही 20 लाख रुपयांचा एक प्लॅन तयार केलेला आहे. वर्षभरामध्ये प्रत्येक तालुक्यामध्ये एक सहकार भवन असण्याची आवश्यकता आहे. या सहकार भवनमध्ये ऑडीटर असेल, सहकार विभागाशी संबंधित आमचा स्टाफ असेल. कारण त्या ठिकाणी कार्यालय असणे, संगणकीकरण करणे आवश्यक आहे.

अडीच लाख संस्थेचे ई-गव्हर्नन्स् करणे हे सुध्दा आमच्या समोर एक आव्हान आहे. म्हणून आपल्याला यासंदर्भात काही पॉझिटीव्ह पाऊले उचलण्याची गरज आहे.आज आपल्याकडे सहकाराची स्पर्धा ही प्रामुख्याने खाजगीकरणाशी आहे. मग उद्याच्या काळामध्ये जर आपल्याला या खाजगीकरणाच्या स्पर्धेमध्ये टिकावयाचे असेल तर निश्चितपणे काही गुणात्मक गोष्टी घेऊन याठिकाणी काम करण्याची आवश्यकता आहे. तसेच मी पीक कर्जाच्या बाबतीत देखील उल्लेख केला.

सभापती महोदय, आता मी शेवटचा एक मुद्दा सांगून माझे भाषण संपविणार आहे. हा मुद्दा ट्रेनिंगच्या संबंधातील आहे. आज सहकार विभागामध्ये ट्रेनिंग मिळणे दुरापास्त झालेले आहे. माणसे घेतली जातात, वशिल्याने नेमली जातात.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील....

जवळचा आहे की लांबचा आहे हे बघून त्याला प्रमोशन दिले जाते. त्याची गुणवत्ता बधितली जात नाही त्यामुळे आज या ठिकाणी शून्य गुणवत्ता आहे. म्हणून संचालक मंडळापासून चेअरमन पर्यंत आणि वर्ग - 4 च्या कर्मचाऱ्यांपासून वर्ग-1 च्या अधिकाऱ्यांपर्यंत 'यशदा' , वैकुंठभाई मेहता संस्था आणि नॅशनल को-ऑपरेटिव्ह सेक्टरच्या माध्यमातून ट्रेनिंग प्रोग्रॅम घेण्याचे मान्य केलेले आहे.

सभापती महोदय, शेवटचा महत्वाचा मुद्दा असा की, सहकारामध्ये झालेल्या भ्रष्टाचाराच्या संदर्भात ॲक्शन घेतली जाते, पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल केला जातो आणि संबंधितांना अटक केली जाते. एकदा अटक झाल्यानंतर ती व्यक्ती जामीनावर सुटते त्यानंतर पुढे काय? त्यानंतर ती व्यक्ती असे म्हणते की, मला काही होणार नाही. मला एकदा अटक झाली. आता कायद्याप्रमाणे माझे कुणी काही करु शकणार नाही. ही व्हाईट कॉलर फ्रॉडची संस्कृती दुर्दैवाने सहकारामध्ये वाढत आहे. या संदर्भात इकॉनॉमिकल ऑफेन्सेसच्या संदर्भात, सीआरपीसी कायद्यामध्ये काही बदल करणे आवश्यक आहे. या संदर्भात माझी आणि सन्माननीय सहकार राज्यमंत्र्यांची, सन्मानीय गृह मंत्र्यांबरोबर दोन बैठका झाल्या आहेत. या कामामध्ये मला सभागृहाची मदत लागणार आहे. कारण तो निर्णय एवढा सोपा नाही. तेव्हा जरुर या संदर्भात निर्णय घेण्यात येईल. बँकेचे डिपॉझिट वाढले म्हणजे माझी बँक चांगली चालली आहे, असा थोडासा चुकीचा गोड गैरसमज आता बँकेच्या संचालकांनी डोक्यातून काढण्याची गरज आहे. सन्मानीय सदस्य श्री. जैन, माझे स्पष्ट मत आहे. पण तुम्हाला कदाचित माझे मत आवडणार नाही. पण ज्या बँकेचे डिपॉझिट वाढणार आहे, त्या बँकेचे संकट वाढणार आहे. त्याचे कारण असे की, इन्व्हेस्टमेंट किती करायची, लोन किती द्यावयाचे, डिपॉझिटच्या रकमेवर व्याज किती द्यावयाचे, डिपॉझिट करण्याच्या संदर्भात माझा आवाका किती आहे, माझे कार्यक्षेत्र किती आहे, याचा विचार करुन योग्य कर्जदार निवडणे हे बँकेसमोरचे सगळयात मोठे आव्हान आहे. जी बँक योग्य कर्जदार निवडील त्या बँकेचा एनपीए कधीच शून्य टक्क्याच्या पुढे जाणार नाही.

सभापती महोदय, आम्ही भाषणात असे म्हणतो की, माझ्या बँकेचे डिपॉझिट अमुक एवढे वाढले आहे. डिपॉझिट वाढले म्हणजे तुमची लायब्लिटी सुध्दा वाढलेली आहे. हे पैसे आज ना उद्या द्यावे लागणार आहेत. डिपॉझिट वाढल्यानंतर, पैसे शिल्लक रहातात म्हणून कोणालाही कर्ज देत बसलो तर फार चांगले होईल असे मला वाटत नाही. म्हणून इन्व्हेस्टमेंटचा प्लॅन,





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील......

डिपॉझिटचा प्लॅन, रिकव्हरीचा प्लॅन आणि निरनिराळया प्रकारच्या व्यावसायाच्या माध्यमातून वसुलीची लिंकिंग कशी चांगली करता येईल, याचाही विचार या माध्यमातून करणे आवश्यक आहे. सभापती महोदय, आज या सदनामध्ये अतिशय चांगला विषय विरोधी पक्षाच्या माध्यमातून मांडण्यात आला आहे. मी सर्वांचे मनापासून अभिनंदन करतो. ही चर्चा या सभागृहात खऱ्या अर्थाने सकारात्मक होण्याच्या दृष्टिकोनातून धोरण स्वीकारुन आपण काम करु या आणि पुन्हा एकदा या राज्याचे जुने सहकाराचे वैभव तुम्ही आणि आम्ही सर्वांनी मिळून पुढे नेऊ या, एवढेच आवाहन करतो. धन्यवाद.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, मी सुरुवातील मंत्री महोदय श्री. हर्षवर्धन पाटील यांना आवाहन केले होते की, तुम्ही खालच्या सभागृहात "लवकरात लवकर" असे उत्तर दिले आहे, तसे उत्तर या ठिकाणी देऊन चालणार नाही. नेमके काय ते सांगावे. मुळात दोन विषय वेगवेगळे आहेत. नियम 88 ची चौकशी चालू राहील. कलम 72 (3) अन्वये जे आरोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे, त्यासंबंधीचा एफआयआर कधी दाखल करणार? दिनांक 14 जानेवारी, 2008 ला जे परिपत्रक निघाले होते, त्या परिपत्रकामध्ये क्रमांक 1 वर असे म्हटले आहे की, "नागरी बँका, सहकारी पतसंस्था यांचे चाचणी लेखा परीक्षणाअंती सदर संस्थेने कर्ज मर्यादेचे उल्लंघन करुन विना तारण आणि अपुरे तारण घेऊन असुरक्षित कर्जे वाटप केलेली आहेत, अशा व्यक्ती विरुध्द प्रथम सूचना अहवाल (एफआयआर) संबंधित पोलीस स्टेशनने दाखल करुन घ्यावा" म्हणजे एफआयआर दाखल करण्याचा विषय चाललेला आहे. कलम 72 (3) अन्वये आरोपपत्र दाखल केलेले आहे. त्यासंदर्भात खुलासा करावा.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, कलम 72 (3) ची नोटिस दिली आहे. कलम 72 (3) नंतर कलम 72(4) ची कारवाई करावयाची आहे. कलम 72(4) ची कारवाई अंतिम टप्प्यामध्ये आहे. काल यासंदर्भातील हिअरिंग झाले आहे. हिअरिंग झाल्यानंतर ज्या रकमा आयडेन्टीफाय केल्या होत्या त्यातील काही रकमांच्या संदर्भात, या रक्कमांशी आमचा काही संबंध नाही. असे दोन-तीन संचालकांनी आक्षेप घेतलेले आहेत यामुळे त्यांनी त्या संदर्भात पुन्हा सात दिवसांची वेळ मागून घेतली आहे. शेवटी ती क्वासी ज्युडिशिअल ॲथॉरिटी आहे. सहकार अधिनियमाच्या माध्यमातून आपण 72 (4) च्या कायद्याप्रमाणे नोटिस दिलेली आहे. म्हणून या संदर्भातील चौकशी झाल्या नंतर त्वरित त्या पुढील कारवाई करण्यात येईल.

..3..

**उप सभापती** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केलेला आहे.

सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12 वाजून 15 मिनिटांनी पुन: सुरु होईल.

( सभागृहाची बैठक दुपारी 11. 59 ते दुपारी 12.15 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचनेसंबधी**

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आंब्याच्या विषयाच्या संदर्भात काल नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली होती.

**उप सभापती** : त्या विषयाच्या संदर्भात आज नियम 97 अन्वये चर्चा घेण्यात येणार आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, काल आम्ही सूचना दिली होती. आज ती चर्चा पहिल्यांदा घ्यावी अशी माझी विनंती आहे. माननीय सभापतींनी ते मान्य केले होते.

**उप सभापती** : आधी प्रश्नोत्तरे होऊ द्यावीत. त्यानंतर ती चर्चा घेता येईल.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, काल 289 अन्वये जी प्रस्तावाची सूचना दिली होती त्या संदर्भात आज नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा दाखविलेली आहे.

श्री. रामदास कदम : प्रश्नोत्तरानंतर त्या चर्चेला प्रायोरिटी द्यावी.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**पुणे शहर व जिल्ह्यातील वसतिगृहातील मुलांना अनेक गैरसोयींना तोंड द्यावे लागत असल्याबाबत**

**अल्पसूचना प्रश्न क्रमांक 17717 डॉ. नीलम गोऱ्हे** : सन्माननीय आदिवासी विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पुणे शहर व जिल्ह्यातील 17 वसतिगृहांमध्ये राहणाऱ्या 1200 हून अधिक आदिवासी मुलांना अनेक गैरसोयींना तोंड द्यावे लागत असल्याचे माहे फेब्रुवारी, 2011 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या बाबत मुलांनी तीव्र आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय ?

(3) असल्यास, या वसतिगृहांमधील समस्या सोडविण्याकरिता कोणत्या उपायोजना केल आहेत, वा करण्यात येत आहेत ?

**श्री. बबनराव पाचपुते** : (1) व (2) प्रकल्प कार्यालय, घोडेगाव, जि. पुणे येथे भारतीय विद्यार्थी संघटना, पुणे यांनी सायकलचा पुरवठा करणे, बस पास किंवा एस.टी. पास देणे, वसतिगृहांच्या इमारतीची अंतर्गत व बाहेरील दुरुस्ती करणे, पुरेशा प्रमाणा पाणीपुरवठा करणे, टी.व्ही., कॉम्प्युटर, प्रिंटर उपलब्ध करणे, खेळाचे साहित्य व जिमच्या साहित्याचा पुरवठा करणे, वसतिगृहातील जेवणाचा दर्जा व मेनू सुधारणे, निर्वाह भत्त्यात वाढ करणे,स्टेशनरी शाळा/कॉलेज सुरु होताच पुरवणे, वसतिगृहातील गृहपालाची व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरणे इत्यादी मागण्यांसाठी दि. 8.2.2011 रोजी प्रकल्प कार्यालयावर मोर्चाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे निवेदन प्रकल्प अधिकाऱ्यांना दिले. मात्र संबंधित प्रकल्प अधिकारी, घोडेगाव, जि. पुणे यांनी सदर संघटनेच्या पदाधिकाऱ्यांशी केलेल्या चर्चेनंतर विद्यार्थ्यांनी आंदोलन स्थगित केले आहे.

(3) वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या मागण्यांच्या अनुषंगाने घोडेगाव प्रकल्प कार्यालयाकडून न्युक्लिअस बजेट अंतर्गत विद्यार्थ्यांना सायकलींचा पुरवठा करण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्तालयास सादर केला आहे. वसतिगृहातील नादुरुस्त पंखे, विद्युत यंत्रणा इत्यादी किरकोळ दुरुस्त्या करण्यात आलेल्या आहेत. तसेच मंचर येथील वसतिगृहास अपुरा पाणीपुरवठा होत असल्याने ग्रामपंचायत, मंचर यांना जादा पाणीपुरवठा करण्याबाबत सूचना केली असून सध्या त्या ठिकाणी पाणीपुरवठा सुरळीत चालू आहे. शैक्षणिक साहित्य प्राप्त होताच विद्यार्थ्यांना वाटप करण्याबाबत दक्षता घेण्याच्या सूचना गृहपालांना देण्यात आल्या आहेत. तसेच जेवणाच्या दर्जाबाबत भोजन पुरवठाधारकास योग्य त्या सूचना देण्यात आल्या आहेत. रिक्त पद भरणेबाबतचा प्रस्ताव आयुक्त, यांना सादर करण्यात आला आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सविस्तर उत्तर दिलेले आहे पण पुणे शहर आणि जिल्ह्यात 17 वसतिगृहात राहणाऱ्या 1200 पेक्षा जास्त आदिवासी मुलांना

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अ.सू.प्र.क्र. 17717 ....

गेल्या सहा महिन्यांपासून निर्वाह भत्ता मिळालेला नाही. त्या निर्वाह भत्त्याची शेवटची रक्कम त्यांना कधी मिळाली ? ज्या प्रश्नासाठी आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये नाराजी आहे आणि आंदोलन चालू आहे ते म्हणजे 11 जुलै, 1985 ला या आदिवासी आश्रमशाळांसाठी निर्वाह भत्ता किती असणार, मेनू काय असणार याचे निकष ठरविलेले आहे. आता या आदिवासी आश्रमशाळांसाठी कोणत्या वर्षाचे निकष लागू केलेले आहेत, त्यामध्ये काही बदल केला नसेल तर तो बदल करणार का ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, आपण आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी आश्रमशाळा काढल्या. अकरावी, बारावी झाल्यानंतर कॉलेजच्या शिक्षणासाठी, उच्च शिक्षणासाठी आश्रमशाळेनंतर आपण त्यांच्यासाठी होस्टेल्स सुरु केले. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात होस्टेल्स सुरु केले. हे होस्टेल्स आपण नंतर सुरु केलेले आहेत. त्यामुळे जे जुने नियम आहेत ते बदलावेत या संदर्भात आपण एक समिती नेमलेली आहे. त्या संदर्भातील सगळे जुने नियम बदलण्यात येतील. आता त्यांना 50 रुपये, 75 रुपये भत्ता देतो तसेच वेगवेगळ्या पध्दतीने मदत करतो पण याची सगळीच पाहणी करण्याची आवश्यकता आहे. मी स्वत: पाहिलेले आहे. या होस्टेल्ससाठी स्वत:च्या जागा घेतल्या पाहिजेत. तशा प्रकारे स्वत:च्या जागा सुध्दा घेण्याचे काम चालू आहे. पुण्यामध्ये आपण जागा घेतलेली आहे. एक हजार मुलांचे होस्टेल पुण्यामध्ये आहे. पिंपरी चिंचवडमध्ये सुध्दा 500 मुलामुलींचे होस्टेल करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यांना चांगले शिक्षण मिळावे आणि चांगल्या शहरामध्ये मिळावे हा उद्देश आहे. कारण सगळ्या आश्रमशाळा जंगलामध्ये आहेत किंवा आदिवासी भागामध्ये आहेत. येथून पुढे आश्रमशाळा सुरु करताना शहराच्या जवळ सुरु कराव्यात अशा प्रकारचा निर्णय घेतलेला आहे.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अल्पसूचना प्रश्न क्रमांक 17717... श्री.बबनराव पाचपुते...

निर्वाह भत्यामध्ये वाढ करण्याचा शासन लवकरच निर्णय घेईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, निर्वाह भत्ता गेले 6 महिने मिळालेला नाही. हा निर्वाह भत्ता कधी मिळणार आहे ?

श्री.बबनराव पाचपुते : निर्वाह भत्ता दिलेला आहे. परंतु त्यामध्ये वाढ करण्याची अपेक्षा आहे. या भत्त्यात वाढ करण्याचा निर्णय शासन लवकरच घेईल.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

**बोरीवली (मुंबई) येथील राष्ट्रीय उद्यानात लागलेल्या आगीबाबत**

**अ.सू.प्र.क्र. 17721 श्री.अरुण गुजराथी, वि.प.स.** : सन्माननीय वने मंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

1) बोरीवली (मुंबई) येथील राष्ट्रीय उद्यानात गेल्या 6 वर्षात 356 वेळा आगीच्या घटना घडल्या, हे खरे आहे काय,
2) असल्यास, शासनाने सदर घटनेची चौकशी केली आहे काय,
3) भविष्यात आगी लागू नये म्हणून शासन काय कार्यवाही करणार आहे ?

**श्री.भास्कर जाधव, डॉ.पतंगराव कदम यांच्याकरिता** : (1) बोरीवली (मुंबई) येथील राष्ट्रीय उद्यानात गेल्या 6 वर्षात 327 वेळा आगीच्या घटना घडल्या आहेत.

(2) आग लागण्याच्या घटनेचा गुन्हा नोंदवून चौकशी करण्यात आली आहे.

(3) वन क्षेत्रावर आगी लागू नये म्हणून खालील प्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

वन क्षेत्रावर लागणाऱ्या आगी विझविण्याकरिता वन अधिकारी व कर्मचाऱ्यांची गस्ती पथके तयार करण्यात आले आहेत.

आग प्रतिबंधक योजना तयार करुन त्यानुसार अंमलात आणणे.

संवेदनशील वन क्षेत्रावर जाळ रेषा घेतली जाते.

वन क्षेत्रावर वन मजुरांची पथके तयार करुन वणवे संवेदन काळात टेम्पो/मजुरांच्या सहाय्याने गस्त घालून आग लागल्यास त्वरित विझविली जाते.

आग प्रतिबंधक रखवालदार 15 फेब्रुवारी ते 15 जून पर्यंत वन क्षेत्रावर ठेवले जातात.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, बोरीवली येथील राष्ट्रीय उद्यानामध्ये गेल्या 6 वर्षात 327 आगी लागण्याच्या घटना घडल्या असल्याचे लेखी उत्तरात नमूद केलेले आहे. या आगी लागण्याची कारणे काय आहेत, या आगी मानव निर्मित आहेत काय, या आगींची उच्चस्तरीय चौकशी केली जाईल काय ? उत्तरात असे नमूद केले आहे की, "आग लागण्याच्या घटनेचा गुन्हा नोंदवून चौकशी करण्यात आली आहे." या घटनेचा गुन्हा कोणाविरुध्द व कोणत्या कलमाखाली नोंदला आहे ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, आपल्याला माहीत आहे की, आपल्याच जिल्ह्यात खूप मोठे 25 हजार हेक्टरवर राष्ट्रीय उद्यान आहे. त्या उद्यानामधून रस्ता जातो तसेच तेथे आदिवासी पाडे सुध्दा आहेत. या रस्त्याने लोक जात असतात. हे लोक काही वेळा सिगरेट किंवा विडी पेटवून झाल्यावर सहजपणे त्याची काडी खाली टाकून देतात. त्याच्यातून ह्या आगी लागतात. डिसेंबर महिन्यानंतर मोठ्या प्रमाणावर झाडांची वाढ झाल्यामुळे पाला पाचोळा सुध्दा खाली पडत असतो. त्यामुळे त्या भागात ह्या आगी वाढीस लागतात. त्या ठिकाणी विभागाचे गार्ड

3.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असतात, ते गार्ड आग लागल्यावर आग विझविण्याचे काम करीत असतात. दुसरे असे की, त्या भागात मोठया प्रमाणात बांबूची लागवड झालेली आहे. ते बांबू तोडण्याची परवानगी दिली जात नसल्यामुळे त्याची तोड होत नाही. या बांबूचे साधारणपणे 35-40 वर्षे आयुष्य असते. ते बांबू सुकल्यावर त्यांनी जर पेट घेतला तर आग लागते. त्यामुळे ह्या आगी मानव निर्मितच आहेत हे खरे आहे. अशा घटनांमध्ये शून्य क्रमांकाने गुन्ह्यांची नोंद केली जाते हे सन्माननीय सदस्यांना माहीत आहे. कोकणामध्ये अशा प्रकारच्या आगी लागल्यामुळे मोठ्या प्रमाणात बागा जळलेल्या आहेत. म्हणून यासंबंधी कायद्यात तरतूद करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, या आगी लावण्यामागे कोणी विकासक आहेत का ?

श्री.भास्कर जाधव : या आगी विकासकांनी जाणूनबुजून लावल्या असल्याचे अद्यापपर्यंत उघडकीस आलेले नाही.

------

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## औरंगाबाद जिल्ह्याचे तत्कालीन निवासी जिल्हाधिकारी यांनी शासकीय जमिनीच्या परस्पर विक्रीस दिलेली परवानगी

**(1) * 13928 श्री.जगदीश गुप्ता , श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.सय्यद पाशा पटेल** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) औरंगाबाद जिल्ह्याचे तत्कालीन निवासी जिल्हाधिकारी डॉ.एन.आर.शेळके यांनी विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांचे अधिकार वापरुन माहे नोव्हेंबर, 2009 ते डिसेंबर, 2010 या कालावधीत शासकीय व गायरान आणि प्रतिबंधित भोगवटदार वर्ग-2 च्या जमिनींच्या विक्रीस परवानगी दिल्याचे दिनांक 22 जानेवारी, 2011 रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, त्यानुसार त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

**श्री.प्रकाश सोळंके, श्री.बाळासाहेब थोरात यांच्याकरिता** :(1) औरंगाबाद जिल्ह्यातील शासकीय गायरान जमीन विक्री परवानगीबाबत निम्नस्तरीय अधिकारी श्री.एन.आर.शेळके, तत्कालीन निवासी उपजिल्हाधिकारी यांनी जमीन विक्रीस परवानगी दिल्याचे निष्पन्न झाले आहे.

(2) व (3) 1) अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली असून वरील गायरान जमीन विक्री परवानगी दिलेल्या प्रकरणामध्ये कायदेशीर गुंतागुंत निर्माण होऊ नये म्हणून जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी दि.19-1-11 च्या आदेशान्वये "जैसे थे" परिस्थिती ठेवण्याबाबत आदेश पारित केले आहेत.

2) दि.5-3-2011 च्या आदेशान्वये यथोचित कार्यवाही करुन अंतिम निर्णय पारित करण्यासाठी वरील प्रकरणे अपर जिल्हाधिकारी बीड यांचेकडे चौकशीसाठी वर्ग केली आहेत.

3) तत्कालीन निवासी उपजिल्हाधिकारी श्री.एन.आर.शेळके यांच्या विरुध्द विभागीय चौकशी प्रस्ताव, जोडपत्र व संबंधित कागदपत्रासह विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग यांच्याकडून मागविण्यात आला आहे.

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, सन 2009 मध्ये अतिरिक्त जिल्हाधिकारी श्री.लावंडे यांनी चौकशी केल्यावर 105 प्रकरणामध्ये डॉ.शेळके यांनी अनियमितता केल्याचे आढळले होते. त्यावेळेस शासनाने कोणती कारवाई केली, तसेच पुन्हा 2009 मध्ये जी चौकशी झाली होती त्यामध्ये तथ्य नाही असे शासनाला वाटते काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केल्या प्रमाणे यामध्ये अनियमितता झाल्याचे शासनाला आढळून आलेले आहे. या सर्व प्रकरणामध्ये पुढे थर्ड पार्टी इंटरेस्ट क्रिएट होऊ नये, जागेची विक्री होऊ नये किंवा विकास होऊ नये यासाठी जिल्हाधिकारी

5....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यांनी "जैसे थे" परिस्थिती ठेवण्याबाबतची सर्व कारवाई केलेली आहे. या सर्व प्रकरणांचे पुनर्विलोकन करण्यासाठी जिल्हाधिकारी, बीड यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. 105 प्रकरणांपैकी 55 प्रकरणांसंबंधी नोटीसा देण्याची कारवाई केलेली आहे. एकदा पुनर्विलोकन झ ााल्यानंतर त्यामध्ये गैरप्रकार आहे की अनियमितता आहे ते स्पष्ट होईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, औरंगाबाद जिल्ह्यातील 200 हेक्टर जमिनीचा घोटाळा आहे. ही जमीन गायरान आहे. त्यातील काही जमीन प्रतिबंधित आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 13928.... श्री.पांडुरंग फुंडकर...

या उप जिल्हाधिका-यांनी ही जमीन विकून टाकली. जिल्हाधिका-यांचा अहवाल माझ्याकडे आहे. त्या अहवालामध्ये असे म्हटलेले आहे की, अप्पर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी दिनांक 18.1.2011 रोजी चौकशी करुन अहवाल सादर केला. त्यांनी त्यांच्या अहवालात 108 विक्री परवानगी बाबत चौकशी केली असता. 105 प्रकरणात तत्कालीन निवासी जिल्हाधिकारी यांनी शासन निर्णय दिनांक 8.9.1983 मधील तरतुदीकडे दुर्लक्ष करुन तरतुदीचे पालन न करता गायरान भोगवटादार वर्ग-2 जमीन नियमबाह्य विक्री परवानगी दिल्याची बाब स्पष्ट होत असल्याचे चौकशी अहवालात नमूद केलेले आहे. दुसरा मुद्दा असा आहे की, विभागीय आयुक्त यांचे पत्र दिनांक 8.12.2010 नुसार या कार्यालयास विभागीय आयुक्त यांनी तत्कालीन निवासी जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या अधिकार कक्षा बाहेरील प्रकरणात विक्रीची परवानगी दिलेली आहे. त्याबाबत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम 1966 मधील कलम 257 अनुसार कारवाई करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार अप्पर जिल्हाधिकारी यांनी चौकशी करुन दिलेल्या अहवालातील 108 प्रकरणांचे अवलोकन केले असता 105 प्रकरणांमध्ये प्रामुख्याने जमीन कोणत्या प्रकारची आहे याचा कागदोपत्री पुरवा नाही असे अहवालामध्ये म्हटलेले आहे. या जमिनीच्या विक्रीबाबत चौकशी झाली. त्या चौकशीमध्ये 105 प्रकरणामध्ये गैरव्यवहार झाल्याचे सिद्ध झालेले आहे. या प्रकरणाचे पुनर्विलोकन करण्यात येणार आहे असे मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. आता या प्रकरणी एकदा चौकशी झाल्यानंतर चौकशीचा अहवाल सादर केल्यानंतर पुनर्विलोकन कशासाठी केले जात आहे ? या शेळकेने त्याच्या परिवाराला जमीन दिलेली आहे. या अहवालामध्ये जमीन कुणाला दिली त्यांची नावे आलेली आहेत. ती नावे मी वाचून दाखवितो. त्याने त्याच्या परिवाराला जमीन दिलेली आहे. एवढी गंभीर बाब असताना या अधिका-याला निलंबित करण्यास शासन का मागेपुढे पहात आहे ?

श्री. दिवाकर रावते : या प्रकरणी जैसे थे असे आदेश दिलेले आहेत. याचा अर्थ ज्यांना जमीन विकलेली आहे ती त्यांच्याच नावावर आहे. पहिल्यांदा ही विक्री रद्द झाली पाहिजे. विक्री रद्द होऊन जमीन शासनाच्या ताब्यात आली पाहिजे. हा अधिकारी शासनाचा जावई लागतो काय ? काल मंत्री लुटत होते, आज अधिकारी लुटत आहेत. महाराष्ट्र राज्यात हे काय चालले आहे, या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभागृहामध्ये प्रकरण आल्यानंतर त्यांना सांभाळण्याचा कळवळा का येतो, यामध्ये मंत्री महोदयांचे हात गुंतलेले आहेत काय ? या अधिका-याला निलंबित नाही तर बडतर्फे करावे. या प्रकरणी जमिनीची झालेली खरेदी विक्री रद्द करुन जमीन ताब्यात घेणार काय ?

श्री. प्रकाश सोळंके : 105 प्रकरणामध्ये शासनाकडे अनर्जित रक्कम रु. 2.82 कोटी जमा झाली आहे..

श्री. रामदास कदम : माझा हरकतीचा मुद्दा आहे. ही शासनाची जमीन आहे. गायरान जमीन आहे.

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मला संरक्षण हवे आहे. सन्माननीय सदस्यांनी माझे उत्तर पूर्णपणे ऐकून घ्यावे आणि नंतर प्रश्न विचारावेत. त्यांच्या प्रत्येक प्रश्नाला उत्तर देण्याची माझी तयारी आहे.

**उप सभापती** : प्रश्न विचारल्या नंतर कमीत कमी मंत्री महोदयांचे उत्तर ऐकून घेण्याचे सौजन्य सन्माननीय सदस्यांनी दाखविले पाहिजे. मंत्री महोदयांनी उत्तर देण्यास सुरुवात केली नाही तोच हरकतीचा मुद्दा कसा काय उपस्थित होऊ शकतो ?

श्री. प्रकाश सोळंके : कायद्याप्रमाणे परवानगी न घेता व्यवहार झाला. तो नियमानुकुल करण्याची तरतूद आहे, अनार्जित करण्याची तरतूद आहे. या प्रकरणी कोणताही रेव्हेन्यू लॉस झालेला नाही. एवढाच अनियमितपणा झालेला आहे की, जे अधिकार आयुक्तांना आहेत ते त्यांनी वापरले आहेत. हे प्रकरण आयुक्तांनी 257 खाली पुनर्विलोकन करण्याचे आदेश दिलेले आहेत. विभागीय चौकशी सुरु केलेली आहे. त्याचा रिपोर्ट आल्यानंतर योग्य ती कारवाई केली जाईल.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ प्रथम श्री. शिगम 12:30

ता.प्र.क्र.13928..

श्री.दिवाकर रावते : गायरान जमीन विक्रीचे प्रकरण 2009 या वर्षापासून सुरु आहे. आता 2011 हे वर्ष सुरु झालेले आहे. सरकारची गायरानाची विक्री केलेली आहे, एवढया गंभीर प्रकरणी अजून चौकशीच चालू आहे. या सरकारमध्ये काय चालले आहे हे आम्हाला कळत नाही. त्या अधिकाऱ्यांनी अनियमितता केलेली आहे ही बाब स्पष्ट झालेली असताना त्यांचेवर तातडीने कारवाई का केली जात नाही ? मला तर वाटते की, या शासनाची प्रशासनावर पकड राहिलेली नाही. या प्रकरणाच्या बाबतीत जिल्हाधिकारी यांनी अहवाल सादर केलेला आहे. तरी देखील या अधिकाऱ्यांस शासन का पाठीशी घालत आहे ?

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, गायरानाची जमीन शासनाला विकता येते काय हा माझा प्रश्न आहे. जर ती जमीन विकता येत असेल तर त्यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयाने शासनाचे परवानगी घेतली आहे काय ? या प्रकरणाच्या बाबतीत जिल्हाधिकारी यांनी आपल्या अहवालात स्पष्टपणे म्हटले आहे की, परवानगी न घेता उप जिल्हाधिकारी यांनी हा व्यवहार केलेला आहे. ही बाब 105 प्रकरणामध्ये सिध्द झालेली आहे. जी जमीन त्यांच्या नातेवाईकांनाच विकण्यात आली आहे. ती जमीन कोणकोणाला दिली आहे, त्यांची नावे माझ्याकडे उपलब्ध आहे. वाटल्यास मी ती वाचून दाखविण्यास तयार आहे. जिल्हाधिकारी यांनी अहवालामध्ये स्पष्ट नमूद केले आहे की, या प्रकरणामध्ये अनियमितता झाली आहे, तसेच गैरव्यवहार झालेला आहे. अशी परिस्थिती असताना पुन्हा फेरचौकशा करण्याची गरज काय ? 200 हेक्टर गायरान जमीन परवानगी न घेता विकली, त्या अधिकाऱ्यांविरुध्द आजच काय कारवाई करण्यात येणार आहे याचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी सांगावे.

श्री. प्रकाश सोळंके :सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या ठिकाणी उल्लेख केला की, या गायरानच्या जमिनी रिग्रँट केलेल्या आहेत. या गायरान जमिनी गँट म्हणून शासनाने कोणाला तरी दिलेल्या आहेत. रिग्रँट झालेल्या जमिनीची विक्री करण्याचे अधिकार विभागीय आयुक्तांना आहेत. एक अनियमितता या ठिकाणी जरुर झालेली आहे की, निवासी जिल्हाधिकारी यांनी स्वत:च्या अधिकारात गायरान जमीन विक्री केली. ही अनियमितता शासन नाकारीत नाही. या विक्री व्यवहारामध्ये शासनाचा महसूल बुडालेला नाही. याचे पुनर्विलोकन करण्याची गरज आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते जिल्हाधिकारी याच्या अहवालाचा उल्लेख करीत आहेत, त्या अहवालात

2...

श्री. प्रकाश सोळंके...

जिल्हाधिकारी यांनी सांगितले आहे की, मी या प्रकरणामध्ये स्टेटस्को दिलेला आहे. "जैसे थे परिस्थिती" केलेली आहे. त्यामुळे काही कॉम्पलीकेशन होणार नाहीत. शासनाच्या नियमाप्रमाणे शर्थभंग झाला असेल तर हे नियमित करण्याची कायद्यात तरतूद आहे. कोणाचीही परवानगी न घेता विक्री केली तर तो विक्री व्यवहार नियमानुकूल करण्याची कायद्यामध्ये तरतूद आहे. या प्रकरणी अनियमितता झालेली आहे. या प्रकरणाच्या बाबतीत विभागीय चौकशी पूर्ण झाल्यानंतर योग्य ती कार्यवाही संबंधिताविरुध्द करण्यात येईल.

श्री. जगदीश गुप्ता : या प्रकरणाची पहिली चौकशी अतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी केली. त्याचे पुनर्विलोकन करावयाचे असेल तर वरिष्ठ अधिकाऱ्याची नेमणूक केली पाहिजे. परंतु त्याच स्तरावरील अधिकाऱ्यांकडे प्रकरण पुनर्विलोकनासाठी देणे हे योग्य होणार नाही. जी जमीन ग्रँट झालेली आहे. ती रिग्रँट करण्यामध्ये अनियमिता झालेली आहे. ही जमीन प्रथम ग्रँट केली, ती कोणत्या अधिकाऱ्यांनी केली ? ही जमीन रिग्रॅट करण्याच्या बाबतीत अनियमिता झाली असून त्यासंबंधी विभागीय चौकशी पूर्ण झालेली आहे. शासन या अधिकाऱ्यास वाचविण्याचा प्रयत्न करीत आहे. एकदा चौकशी पूर्ण झाल्यानंतर पुनर्विलोकनाची आवश्यकता काय आहे ? कोणत्या नियमानुसार आपण पुनर्विलोकन करणार आहात ? संबंधित दोषी अधिकाऱ्याला पाठीशी न घालता त्याला तातडीने निलंबित करुन त्यांचे विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करणार आहात काय ?

श्री. प्रकाश सोळंखे : मी या ठिकाणी वारंवार सांगतो आहे की, अशा प्रकारच्या जमिनीचे व्यवहार झालेले आहेत, ते व्यवहार नियमित करण्याची कायद्यामध्ये तरतूद आहे.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 12:35

श्री.प्रकाश सोळंके....... ता.प्र.क्र.13928.....

त्यांनी परवानगी न घेता परस्पर व्यवहार केलेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला त्या बाबत मी सांगू इच्छितो की, आयुक्तांनी नियम 257 अन्वये या प्रकरणी पुनर्विलोकनाचे आदेश दिले आहेत. त्या आदेशाप्रमाणे अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्या माध्यमातून ही कार्यवाही सुरु आहे. हे अधिकारी उप जिल्हाधिकारी दर्जाचे नाहीत. अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्यामार्फत पुनर्विलोकनाची कार्यवाही सुरु आहे.

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, या प्रकरणात भ्रष्टाचार झालेला आहे की अनियमतता झालेली आहे? माननीय विरोधी पक्षनेत्यांकडे जिल्हाधिकाऱ्यांच्या अहवालाची प्रत उपलब्ध आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या अहवालानुसार अतिरिक्त जिल्हाधिकारी पुनर्विलोकनाची कार्यवाही करु शकतात का? जिल्हाधिकाऱ्यांपेक्षा उच्च दर्जाच्या अधिकाऱ्यांनी ही कार्यवाही केली पाहिजे अशी आमची धारणा आहे. मंत्री महोदय खुलासा करतील काय?

श्री.प्रकाश सोळंके : पुनर्विलोकनाची कार्यवाही आयुक्तांनी केलेली आहे. त्यामुळे आयुक्तांच्या आदेशान्वये अतिरिक्त जिल्हाधिकारी पुनर्विलोकनाचे काम करीत आहेत. जिल्हाधिकारी यांच्यापेक्षा उच्च दर्जाच्या अधिकाऱ्यांनी आदेश दिलेले आहेत. या प्रकरणामध्ये भ्रष्टाचार झालेला नसून अनियमिता झालेली आहे हे मी वारंवार सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. विभागीय आयुक्तांकडून विभागीय चौकशी पूर्ण झाल्यानंतर आणि पुनर्विलोकनाची कार्यवाही संपल्यानंतर हे अधिकारी दोषी आढळले तर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी एकदा विभागीय आयुक्तांनी पुनर्विलोकनाची कार्यवाही करीत आहेत असे सांगितले तर एकदा अतिरिक्त जिल्हाधिकारी पुनर्विलोकनाची कार्यवाही करीत आहेत असेही सांगितले. नेमकी वस्तुस्थिती काय आहे? जिल्हाधिकाऱ्यांनी चौकशी केल्यानंतर त्यांच्यापेक्षा कनिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्याकडून पुनर्विलोकनाची कार्यवाही करणार आहात का? आयुक्त विभागीय चौकशी करीत आहेत. या प्रश्नामध्ये गुंतागुंत निर्माण झालेली आहे. मंत्री महोदय म्हणतात की, भ्रष्टाचार झालेला नाही. वास्तविक पाहता गायरान जमीन ग्रामपंचायतीच्या ताब्यात असते. ग्रामपंचायतीच्या परवानगीशिवाय अशा जमिनीला हात लावता येत नाही. मंत्री महोदयांनी सांगितले की, या प्रकरणात अनियमितता झाली आहे. 200 एकर जमीन विकण्यात येऊन भ्रष्टाचार केलेला आहे. त्या काळात महसूल मंत्री कोण होते?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अधिकार नसताना निवासी उप जिल्हाधिकारी यांनी गैरव्यवहार केलेला आहे. मुख्यमंत्र्यांना अधिकार असताना सचिवांनी निर्णय घेतला तर ती अनियमितता ठरेल का? हे प्रकरण गंभीर स्वरुपाचे असल्यामुळे संबंधित अधिकाऱ्याची चौकशी करुन कडक कारवाई करण्यात यावी.

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी पुन्हा एकदा खुलासा करु इच्छितो. ही गायरान जमीन नाही. Re-grant झालेली जमीन आहे. जिल्हाधिकाऱ्यांचा अहवाल हा प्राथमिक चौकशीचा अहवाल आहे. या प्रकरणी उप जिल्हाधिकारी यांच्या निर्णयाबाबत नियम 257 अन्वये पुनर्विलोकनाची कार्यवाही सुरु आहे. सभापती महोदय, याच प्रश्नावर दिनांक 24 मार्च, 2011 रोजी या सभागृहात 27 मिनिटे चर्चा झालेली आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, आम्ही या सभागृहात प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी येत असतो. ही 200 एकर गायरान जमीन शासनाची आहे. मंत्री महोदयांनी उत्तर देताना सांगितले होते की, या जमिनीपोटी 2 कोटी रुपये अनर्जित रक्कम भरुन घेतली आहे. म्हणून मी मघाशी हरकतीचा मुद्दा मांडण्यासाठी उभा राहिलो होतो. या जमिनीची किंमत 200 कोटी रुपये आहे. निवासी उप जिल्हाधिकारी यांनी ही जमीन आपल्या नातेवाईकांना दिली आहे. अशी बेकायदेशीरपणे हस्तांतरित केलेली जमीन शासन अधिकृत करु शकते का?

नंतर 2डी...1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 13928......... श्री. रामदास कदम .......

महोदय, 2 कोटी अनर्जित रक्कम घेऊन ती जमीन अधिकृत केली याचा अर्थ एखाद्या अधिकाऱ्याने भ्रष्टाचार करुन आपल्याच नातेवाईकांच्या घशात गायरान जमीन घालायची व नंतर 2 कोटी रुपये घेऊन अधिकृत करण्याची ही कोणती पध्दत आहे. म्हणून माझी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, अशा प्रकारचा गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्यांना पाठीशी घालण्याचे काम संबंधित मंत्री करीत आहेत म्हणून त्यांचा राजीनामा घेणार काय, कारण या मंत्र्यांचा त्यात हात असल्याची आम्हाला शंका आहे. यासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर द्यावे व तोपर्यंत हा प्रश्न राखून ठेवावा अशी विनंती आहे.

( उत्तर नाही )

प्रा. सुरेश नवले : महोदय, हा अत्यंत महत्वाचा प्रश्न असून साधारण 500 कोटीपेक्षा जास्त किमतीची ही जमीन आहे. एवढ्या किंमतीची जमीन या अधिकाऱ्याच्या पत्नीच्या भावाच्या नावाने करण्यात आली म्हणजे शासनाच्याच जमिनीवर एक प्रकारे दरोडा टाकण्याचे काम संबंधित अधिकाऱ्याने केलेले आहे. चावी नसताना शासनाची तिजोरी फोडण्याचे काम या अधिकाऱ्याने केलेले आहे. माझी शासनाला विनंती आहे की, अशा भ्रष्ट अधिकाऱ्याला शासन पाठीशी घालत असल्याचा चुकीचा मेसेज राज्यात जाऊ नये म्हणून संबंधित अधिकाऱ्यावर प्रथम निलंबनाची कारवाई तसेच फौजदारी खटला दाखल करुन नंतरच पुढील कारवाई करण्यात येणार काय ?

श्री. प्रकाश सोळंके : महोदय, रेडिरेक्नरप्रमाणे या जमिनीची किंमत 5.64 कोटी एवढी असून या प्रकरणात संबंधित अधिकाऱ्याची विभागीय चौकशी सुरुच आहे. तसेच सन्माननीय सदस्यांच्या मागणीनुसार या अधिकाऱ्याला प्रथम निलंबित करुन नंतर पुढील चौकशी करण्यात येईल.

-----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना एक हजार कोटी रुपयांची मदत देण्याकरिता करावयाची उपाययोजना**

**(2) *13413 श्री.चंद्रकांत पाटील, श्री.विनोद तावडे, श्री.भगवान साळुंखे, श्री.धनंजय मुंडे, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.सुभाष चव्हाण, श्री.एम.एम.शेख, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.चरणसिंग सप्रा, श्री.जयप्रकाश छाजेड** : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) अवकाळी पावसामुळे राज्यातील 5 लाख 44 हेक्टर क्षेत्रातील शेती मालाचे मोठया प्रमाणावर नुकसान झाले असून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना एक हजार कोटी रुपयांची मदत देण्याची घोषणा दिनांक 4 सप्टेंबर, 2010 रोजी विधानसभेत मा.मुख्यमंत्री यांनी केली होती, हे खरे आहे काय,

(2) तसेच एप्रिल महिन्यापर्यत बाधित शेतकऱ्यांची वीज जोडणी तोडली जाणार नाही तसेच द्राक्ष बागायतदारांच्या कर्जाचीही पुनर्रचना करण्यात येईल, असेही जाहीर केले होते, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, या घोषणेची अंमलबजावणी झाली आहे काय,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश सोळंके, डॉ.पतंगराव कदम यांच्याकरिता** : (1) सदर घोषणा मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक 4/12/2010 रोजी विधानसभागृहात केली होती.

(2) व (3) नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित आपदग्रस्त शेतकऱ्यांची वीज तोडणी पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत तोडण्यात येऊ नये अशा सूचना महावितरण कंपनीतर्फे दिनांक 7/12/2010 च्या पत्रान्वये सर्व मुख्य अभियंत्यांना दिल्या आहेत.

टंचाईग्रस्त म्हणून जाहीर झालेल्या क्षेत्रातील अल्पमुदत कर्जाचे मध्यम मुदत कर्जात रुपांतर करण्यासाठी शासनाचे प्रचलित धोरण आहे. या धोरणानुसार राज्यातील इतर बाधित पिकांसोबत बाधित क्षेत्रातील द्राक्ष पिकांसाठी शेतकऱ्यांनी उचल केलेल्या पिक कर्जाचे रुपांतरणाचा लाभ सर्व शेतकऱ्यांना बँकाकडून दिला जाणार आहे.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

....2....

ता. प्र. क्र. 13413.......

श्री. चंद्रकांत पाटील : महोदय, अवेळी पावसाने शेतकऱ्यांचे नुकसान झाले त्यासंदर्भात नागपूर येथील हिवाळी अधिवेशनामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी 1 हजार कोटीचे पॅकेज घोषित केले. त्यापूर्वी माननीय उप मुख्यमंत्र्यांनी त्याच वेळेस अगोदरचे 250 कोटी रुपये देण्याची घोषणा केली होती. या निमित्ताने माझा प्रश्न असा आहे की, अगोदरची बाकी असलेले 250 कोटी रुपये आणि 1 हजार कोटी रुपये मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले या दोन्ही बाबी वेगवेगळ्या आहेत की एकत्र आहेत, त्याचप्रमाणे द्राक्ष बागायतदारांना देखील कर्ज रुपांतरीत करण्याचा फायदा मिळेल असे सांगितले होते. त्यानुसार किती द्राक्ष बागायतदारांना फायदा मिळाला आहे ?

श्री. प्रकाश सोळंके : महोदय, ऑक्टोबर-नोव्हेंबर, 2010 या काळात अतिवृष्टी होऊन पिकाचे नुकसान झाले होते त्यासंदर्भात पंचनामे करुन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याचे आदेश शासनाने दिले होते. त्या अनुषंगाने हिवाळी अधिवेशनात सभागृहात अशीही मागणी झाली होती की, मागील देणे सुध्दा बाकी आहे. त्या अनुषंगाने ही घोषणा सभागृहात करण्यात आली होती. त्याप्रमाणे 1 जून ते 30 नोव्हेंबर 2010 या काळात शेतकऱ्यांच्या नुकसानीच्या भरपाई पोटी 813 कोटी रुपये.......

यानंतर श्री. जुन्नरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.: 13413 .....**

श्री. प्रकाश सोळंके ....

दि. 1.1.2008 ते 31.12.2008 या कालावधीत शेतक-यांची जी देणी द्यावयाची होती ती 33.34 कोटी रुपये तसेच 1.1.2009 ते 31.12.2009 पर्यंत 58.49 कोटी रुपये व 1.1..2010 ते 31.5.2010 पर्यंत 17.58 कोटी रुपये व अति उष्णतेमुळे सन 2010 मध्ये विदर्भातील संत्रा पिकाचे नुकसान झाले त्यासाठी 100.72 कोटी रुपये देण्यात आलेले आहेत. माझ्याकडे जिल्हावाईज व विभागवाईज माहिती आहे परंतु ही माहिती मी जास्त प्रमाणात असल्यामुळे वाटप कशा प्रकारे झाले या संदर्भातील सर्व माहिती मी आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी उत्तरात म्हटले आहे की, नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित आपदग्रस्त शेतक-यांची वीज तोडणी पुढील आदेश प्राप्त होईपर्यंत तोडण्यात येवू नये अशा सूचना महावितरण कंपनीतर्फे दिनांक 7.12.2010 च्या पत्रान्वये सर्व मुख्य अभियंत्यांना दिल्या आहेत. नागपूरच्या डिसेंबरच्या अधिवेशनात घोषणा झाली व अधिवेशन संपल्या बरोबर महावितरण कंपनीने अतिवृष्टीत सापडलेल्या शेतक-यांची कनेक्शन तोडण्याचे काम सुरु केले. अकोला व बुलढाणा जिल्हयातील शेकडो शेतक-यांची वीज कनेक्शन तोडली होती. महावितरण कंपनीने शासनाचे आदेश पाळले नाहीत. सभागृहात माननीय वीज मंत्र्यांनी व सभागृहाच्या नेत्यांनी असे सांगितले होते की, अतिवृष्टीत सापडलेल्या एकाही शेतक-याचे कनेक्शन तोडले जाणार नाही. मी या ठिकाणी जबाबदारीने सांगतो आहे की, विदर्भातील अतिवृष्टीत सापडलेल्या शेतक-यांची कनेक्शन्स तोडली गेली होती. अतिवृष्टीत सापडलेल्या शेतक-यांची वीज कनेक्शन्स तोडू नयेत यासाठी शासनाचे आदेश ज्या अधिका-यांनी पाळले नाहीत अशा अधिका-यांवर आपण काय कारवाई करणार आहात ? आपला शब्द अधिकारी पाळीत नसतील तर अशा अधिका-यावर आपण काय कारवाई करणार आहात ? अतिवृष्टीत सापडलेल्या शेतक-यांची तोडलेली कनेक्शन्स पुन्हा जोडून दिली जाणार आहेत काय ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, महावितरण कंपनीने जे परिपत्रक काढलेले आहे त्याचा उल्लेख सदस्यांनी केलेला आहे. सन 2010-11 मध्ये अवकाळी पावसामुळे प्रभावित झालेल्या शेतक-यांचे कृषी पंपाचे कनेक्शन्स चालू देयकाचा किंवा थकीत देयकाचा भरणा न करणा-या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके ....

शेतक-यांचा वीज पुरवठा पुढील आदेश होईपर्यंत खंडित करु नयेत अशा प्रकारचे आदेश महावितरण कंपनीला देण्यात आले होते. यासंदर्भात आपल्याकडे तक्रारी असतील व आदेशा प्रमाणे अधिका-यांनी कारवाई केली नाही असे आढळून आले तर संबंधित अधिका-यांवर योग्य ती कारवाई केली जाईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अतिवृष्टी व अवकाळी पावसामुळे ज्या शेतक-यांच्या जमिनी उध्वस्त झाल्या, रब्बीच्या पिकासाठी त्यांना पुन्हा पाण्याची गरज भासली म्हणून काही अंशी शेतकरी विजेचे बिल भरु शकले नाही अशा शेतक-यांचे वीज कनेक्शन जाणीवपूर्वक तोडले गेले त्या शेतक-यांचे कनेक्शन आपण पुन्हा जोडून देणार आहात काय ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, महावितरण कंपनीला स्पष्ट सूचना दिल्या होत्या की, अतिवृष्टीत सापडलेल्या शेतक-यांकडे चालू किंवा थकीत बाकी असली तरी त्यांचे कनेक्शन तोडू नये अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या होत्या. शासनाच्या आदेशाचे पालन केले गेले नाही यासंदर्भात आपल्याकडे माहिती असेल तर ती माहिती आमच्याकडे दिली तर संबंधित अधिका-यावर कारवाई केली जाईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी असा प्रश्न विचारला होता की, शेतक-यांची जी कनेक्शन्स तोडली होती ती पुन्हा जोडून दिली जाणार आहे काय ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांकडे शासनाच्या आदेशा विरुध्द अधिका-यांनी काम केल्याची प्रकरणे असतील तर ही कनेक्शन्स जोडून देण्याची कार्यवाही केली जाईल.

श्री. जयंत प्र.पाटील : मंत्री महोदयांनी अतिवृष्टीतील शेतक-यांना 1000 कोटी पैकी 836 कोटी रुपयांचे वाटप झालेले आहे अशी माहिती दिलेली आहे. मंत्री महोदयांनी या ठिकाणी जून महिन्यापासूनची आकडेवारी दिलेली आहे. सन्माननीय अर्थमंत्र्यांनी नागपूरचे हिवाळी अधिवेशन झाल्यानंतर 1000 कोटी रुपये दिले जाइल असे जाहीर केले होते. अगोदर आपण जी मदत

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...3...

**ता.प्र.क्र.: 13413 .....**

श्री. जयंत प्र.पाटील....

केलेली आहे ती मदत यामधून मायनस करावयास पाहिजे. माझा दुसरा प्रश्न असा आहे की, 1000 कोटी रुपयांमध्ये केंद्रशासनाचे 600 कोटी रुपयांचा अंतर्भाव आहे काय ? असे जर असेल तर यामध्ये राज्यशासनाने केवळ 150 कोटी रुपये दिलेले आहेत त्यामुळे यासंदर्भातील तपशील मंत्री महोदयांनी देण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13413...

श्री.प्रकाश सोळंके : अतिवृष्टीमुळे जे नुकसान झालेले आहे. त्याबाबतीत पंचनामे करुन नुकसान भरपाई देण्याचे शासनाचे धोरण आहे. एक हजार कोटी रुपये जाहीर केले होते त्यातील 813 कोटी रुपये 1 जून ते 30 नोव्हेंबर 2010 या कालावधीमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे जे नुकसान झालेले होते त्याची नुकसान भरपाई दिली होती.

श्री.जयंत प्र.पाटील :1 हजार कोटी रुपये जाहीर केले होते.

श्री.प्रकाश सोळंके : 1 हजार कोटी रुपये जरी जाहीर केलेले असले तरी पंचनाम्याच्या आधारावरच नुकसान भरपाई दिली जाईल.

श्रीमती शोभा फडणवीस : डिसेंबरच्या अधिवेशनात नुकसान भरपाई देण्याचे घोषित केले होते त्यानुसार अवकाळी पावसासाठी एक हजार कोटी रुपयांची आणि त्या अगोदरची 250 कोटी रुपयांची नुकसान भरपाई त्यावेळी मंजूर करण्यात आली होती. तेव्हा 250 कोटी रुपयांच्या नुकसान भरपाईची रक्कम अजूनही मिळालेली नाही. ही रक्कम केव्हा देण्यात येणार आहे ?

श्री.प्रकाश सोळंके : मी मघाशी आकडेवारी वाचून दाखवली होती. अगोदरच्या काळातील म्हणजे 2008 मधील 33 कोटी 34 लाख रुपये, त्यानंतर 2009 मधील जे काही नुकसान भरपाईचे पैसे द्यावयाचे राहिले होते ते 58 कोटी 49 लाख रुपये होते... अडथळा.. सन्माननीय सदस्यांनी माझे उत्तर पूर्ण झाल्यानंतर उप प्रश्न विचारावा. आकडेवारी देत असतांना मध्येच व्यत्यय आणू नये. 250 कोटी रुपयांच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनीच मागणी केली होती.

श्री.पांडुरंग फुंडकर : आम्ही मागणी केलेली नव्हती.

श्री.प्रकाश सोळंके : मी संपूर्ण आकडेवारी देत आहे. सन्माननीय सदस्यांनी माझे उत्तर पूर्ण ऐकून घ्यावे. 1 जानेवारी 2010 ते 31 मे 2010 या कालावधीतील 17 कोटी 58 लाख रुपये आणि संत्रा पिकाचे 100 कोटी रुपये, सोयाबीनचे 65 कोटी रुपये अशा प्रकारची ही रक्कम आहे. शेतक-यांची नुकसान भरपाईची मागची सर्व रक्कम 31 मार्चच्या अगोदर देण्यात यावी अशी शासनाची भूमिका होती. त्याप्रमाणे नुकसान भरपाईची मागची रक्कम पूर्णपणे देण्यात आलेली आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय उप मुख्यमंत्र्यांचे नागपूरच्या अधिवेशनातील भाषण काढून पहाण्यात यावे.एक हजार कोटी रुपये

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13413.. श्री.पांडुरंग फुंडकर...

जाहीर केल्यानंतर पुन्हा 250 कोटी रुपये देण्याचे त्यांनी जाहीर केले होते. ज्या शेतक-यांच्या जमिनी खरवडून गेल्या होत्या त्यांना द्यावयाची ही रक्कम होती. 1 हजार कोटी रुपया व्यतिरिक्त 250 कोटी रुपये देण्यात येतील असे त्यावेळी सांगण्यात आले होते. 1 हजार कोटी रुपयामध्ये 250 कोटी रुपयांचा समावेश नाही. 1 हजार कोटी रुपयाच्या व्यतिरिक्त 250 कोटी रुपये 31 मार्चच्या आत देण्यात येतील असे सांगण्यात आले होते. 31 मार्चच्या आत या शेतक-यांचे मागील देणे देऊन मग अवकाळी पावसात सापडलेल्या शेतक-यांना एक हजार कोटी रुपयांची मदत दिली जाईल अशा प्रकारचे स्पष्ट उत्तर माननीय उप मुख्यमंत्र्यांनी त्यावेळी दिले होते. आता माननीय राज्य मंत्र्यांनी 1 हजार कोटी रुपयांमध्ये 250 कोटी रुपयांचा समावेश केला आहे.त्याचबरोबर केन्द्र सरकारने दिलेले 400 कोटी रुपयांचा समावेशही त्यामध्ये केला,माननीय केन्द्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार यांनी दिलेल्या 250 कोटी रुपयांचा समावेशसुध्दा त्यामध्ये केला होता. अशा प्रकारे साडे आठशे कोटी रुपये जर वेगळे काढण्यात आले तर राज्य सरकारने या शेतक-यांना फक्त 150 कोटी रुपयेच दिलेले आहेत. तेव्हा विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र,कोकण भागासाठी किती पैसे देण्यात आले आहेत याचा ब्रेकअप माननीय राज्य मंत्र्यांनी द्यावा.माननीय पंतप्रधानांनी आणि केन्द्रीय कृषी मंत्री श्री शरद पवार यांनी दिलेले पैसे या रकमेमध्ये टाकण्याची गरज नव्हती . एक हजार कोटी रुपये राज्य शासनाने देण्याचे जाहीर केले होते.असे असतांना केन्द्र सरकारच्या पैशाचा समावेश एक हजार कोटी रुपयांमध्ये करण्याचे कारण काय आहे ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मागचे पैसे आणि 1 जून ते 30 नोव्हेंबर या कालावधीत अतिवृष्टीमुळे जे नुकसान झाले होते त्याचे पंचनामे करण्यात आले होते त्याप्रमाणे 1 हजार 8 कोटी आणि 88 लाख रुपयांच्या मदतीचे वाटप केलेले आहे.नंतर अवकाळी आणि अवेळी झालेल्या पावसामुळे झालेल्या नुकसानीसाठी एकूण 1500 कोटी रुपयांची मागणी केन्द्र सरकारकडे राज्य सरकारने केली होती . केन्द्र सरकारने राष्ट्रीय कृषी विकास निधी योजनेतून 200 कोटी , राज्य आपत्ती प्रतिसाद निधीतून 200 कोटी रुपये अशा प्रकारे एकूण 400 कोटी रुपयांची मदत आपल्याला केली होती . परंतु जे काही नुकसान झालेले होते ती रक्कम व त्याच प्रमाणे मागेचे जे काही देणे होते ते संपूर्णपणे 31 मार्च पूर्वी दिलेले आहे.

नतर श्री.सरफरे

अग्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 13413...

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. नागपूर येथील हिवाळी अधिवेशनामध्ये माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या प्रश्नाला माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार साहेबांनी दिलेल्या उत्तराचे इतिवृत्त माझ्याकडे आहे ते मी आपणास वाचून दाखवितो. "श्री पांडुरंग फुंडकर : दादा, 250 कोटी रुपये या हजार कोटी रुपयांमध्ये धरले आहेत काय? श्री.अजितदादा पवार : 250 कोटी रुपये मागील कां द्यायचे राहिले हे मला कळले नाही, परंतु आता माझ्याकडे अर्थ खाते आले आहे, त्यामुळे ताबडतोब 31 मार्चपूर्वी देण्यात येतील, त्यामध्ये हजार कोटी रुपये वेगळे आहेत आणि 250 कोटी रुपये वेगळे आहेत". असे माननीय उप मुख्यमंत्र्यांनी दिलेले उत्तर आहे. आमचे म्हणणे एवढेच आहेत की, 250 कोटी रुपये वेगळे आहेत की नाहीत हे आम्हाला सांगा. नाहीतर मंत्री महोदयांवर आम्ही हक्कभंग दाखल करतो.

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी आपल्याला वारंवार आकडेवारी वाचून दाखविली आहे. हजार कोटी रुपये जाहीर केले असले तरी पंचनामे कमी असतील तर त्याप्रमाणे वाटप होणार नाही.

(गोंधळ)

**उप सभापती** : सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांनी नागपूर अधिवेशनामध्ये जे वक्तव्य केले आहे तेच आपण ग्राह्य धरावे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मौजे रायमोहा (ता.शिरुर, जि.बीड) येथील जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मुख्यालयी राहत नसल्याबाबत**

**(३) * १३३२२ श्रीमती उषाताई दराडे , श्री.हेमंत टकले , श्री.रमेश शेंडगे , श्री.विक्रम काळे , श्री.प्रकाश बिनसाळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे रायमोहा (ता.शिरुर, जि.बीड) येथील जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मुख्यालयी राहत नसल्याने ते शाळेत उशिरा येत असल्या प्रकरणी दिनांक १४ डिसेंबर, २०१० रोजी वा त्यासुमारास ग्रामस्थांनी शाळेस कुलूप लावल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शाळेत उशिरा येणाऱ्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यांत येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) गट शिक्षणाधिकारी शिरूर कासार यांनी शाळेला समक्ष भेट देवून चौकशी केली असता संबंधित शिक्षक हे मुख्यालयी राहत नसल्याचे आढळून आल्याने त्यांनी संबंधित शिक्षकांना दिनांक २२.३.२००१ रोजी नोटीस देवून त्यांचे वेतनातून घरभाडे भत्ता व वाहन भत्ता कपात करण्याचे आदेशित केले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, शिक्षक गैरहजर राहिल्यामुळे लोकांनी शाळेला कुलूप ठोकले अशी परिस्थिती आहे. त्याबाबत शासनाने कारवाई देखील केली आहे. यापुढे ही शाळा बंद राहणार नाही यासाठी गट शिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी कोणती उपाय योजना करणार आहेत? शिक्षक गैरहजर राहू नयेत यासाठी गट शिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी काळजी घेणार आहेत काय?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

ता.प्र.क्र. 13322...

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, शिक्षक मुख्यालयी थांबत नाहीत हे ज्यावेळी गट शिक्षणाधिकाऱ्यांच्या लक्षात आले त्यावेळी त्यांच्यावर कारवाई करुन घरभाडे भत्ता आणि अन्य भत्ते रोखण्याचा निर्णय घेतला. शाळा उशिरा भरण्याचा जिल्हा परिषदेने निर्णय घेतल्यामुळे शिक्षक गैरहजर असल्याचे निदर्शनास आले. परंतु सकाळी 11 वाजता सर्व शिक्षक शाळेमध्ये हजर होते. त्यामुळे त्यांचे रोखण्यात आलेल्या भत्याबाबत आदेश काढून त्याचा इफेक्ट त्यांना देण्यात आला आहे. फक्त जे 9 शिक्षक मुख्यालयी रहात नाहीत त्यांच्यावर कारवाई करण्याचा निर्णय गट शिक्षणाधिकाऱ्यांनी घेतला आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**देवई (जि.चंद्रपूर) येथील आदिवासी आश्रमशाळेत विद्यार्थ्यांना योग्य आहाराचा पुरवठा होत नसल्याबाबत**

**(४) * १२७५५ श्रीमती शोभाताई फडणवीस** : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाअंतर्गत चालविल्या जाणाऱ्या देवई येथील आश्रम शाळेत विद्यार्थ्यांना योग्य सोय होत नसल्याचे दिनांक २९ डिसेंबर, २०१० रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना योग्य आहार, दूध, केळी, मिळत नसल्याचे दिसून आल्याने त्याची तक्रार संबंधित पालकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली काय व त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री.बबनराव पाचपुते :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, छापील उत्तरामध्ये "व, हे खरे नाही. प्रश्न उद्भवत नाही" अशाप्रकारचे उत्तर दिले आहे. प्रत्यक्षात जिल्हा सत्र न्यायाधीशांनी या शाळेची चौकशी केली आणि त्यांनी प्रत्यक्षात पाऊणशे् आक्षेप घेतले त्याबाबत हा प्रश्न आहे. सत्र न्यायाधीशांनी सांगून सुध्दा तुमचे अधिकारी प्रश्न उदभवत नाही असे सांगत असतील तर कुणाचे ऐकून घेतल्यानंतर प्रश्न उदभवणार आहे हे सांगावे. त्या ठिकाणी केंद्र प्रमुख रहात नाहीत, वर्ष झ ाले तरी त्याचा पत्ता माहीत नाही. त्या ठिकाणी ५०० मुलांची संख्या असायला पाहिजे त्याऐवजी ५० टक्के संख्या असल्याचे न्यायाधीशांचे म्हणणे आहे. तसेच, शाळेतील मुलांना केळी व दूध दिले जात नाही. माझा पहिला प्रश्न असा की, श्री. हुलके यांच्यावर आपण कारवाई करणार काय? दुसरा प्रश्न असा की, शासकीय आश्रमशाळा व अनुदानित आश्रमशाळेतील मुलांना दिल्या जाणाऱ्या दैनंदिन खर्चाच्या रकमेमध्ये फरक केला आहे. शासकीय आश्रमशाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यामागे १६०० रुपये दिले जातात आणि अनुदानित आश्रमशाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यामागे ६३० रुपये दिले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

ताप्र.क्र. १२७५५....

श्रीमती शोभा फडणवीस....

जात आहेत. दोन्ही शाळांमधील मुले आदिवासी असतांना जास्तीचे १ हजार रुपये आपण कुणासाठी देत आहात? म्हणून माझा प्रश्न असा आहे की, दोन्ही शाळांमधील मुलांना प्रत्येकी रु. १६०० आपण देणार आहात काय. तसेच, श्री. फुलके यांच्यावर कारवाई करणार काय, ज्या अधिकाऱ्यांनी हे उत्तर लिहून दिले आणि ज्यांनी न्यायाधीशांनी दिलेला निर्णय डावलला त्या व्यक्तिला आपण शो-कॉज नोटिस देणार आहात काय?

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12755 . .. .

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी एकंदर तीन प्रश्न विचारलेले आहेत.सन्माननीय सदस्यांनी शाळेच्या बाबतीत जो प्रश्न विचारलेला आहे, त्याबाबत सांगावयाचे तर शाळेच्या बाबतीत चौकशी केलेली असून त्यासंबंधात जे उत्तर लिहून दिले होते, ते परत पाठविलेले आहे. ही निवासी शाळा असून तेथे 1 ते 10 पर्यंत वर्ग खोल्या आहेत. त्याठिकाणी मुलांची संख्या कमी आहे ही वस्तुस्थिती असून, ती नाकारण्यात आलेली नाही.मात्र सन्माननीय सदस्यांकडून श्री.हुलके यांच्या संदर्भात सांगण्यात आले की, ते तेथे रहात नाहीत ही वस्तुस्थिती आहे आणि त्यांच्याविषयी खूप तक्रारी देखील आहेत. त्यामुळे त्यांची ताबडतोब ट्रान्सफर करुन, त्यांची चौकशी करु आणि चौकशी पूर्ण झाल्यावर पुढील कारवाई करु, त्यमध्ये काही अडचण असणार नाही. तसेच आश्रमशाळेच्या संदर्भात सांगावयाचे तर आपण आश्रमशाळेला पैसे देतो.पण शासकीय आश्रमशाळेला देण्यात येणारा निधी आणि अनुदानित आश्रमशाळेला देण्यात येणारा निधी याच्यामध्ये फरक आहे. याबाबतीत आम्ही लवकरच बैठक घेऊन हा फरक कमी करण्याचा प्रयत्न करणार आहोत. यासाठी वेळ लागणार नाही. नवीन वर्षामध्ये शाळा सुरु होतील . . ..

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, येत्या शैक्षणिक सत्रापर्यंत याबाबत कार्यवाही करावी.

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, आता नवीन शाळा सुरु होतील, नवीन सत्र सुरु होईल तोपर्यंत हा फरक कमी केला जाईल.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय आपल्या विभागाला अर्थसंकल्पामध्ये 9 टक्के रक्कम देण्यात आलेली आहे म्हणजे 100 रुपयातील 9 रुपये आपल्या विभागाच्या हातात आहेत. असे असताना सदर शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना योग्य आहार, दूध, केळी वगैरे मिळत नाहीत. त्याबाबतीत प्रश्न निर्माण होत आहेत. सन्माननीय सदस्य श्री.बबनराव पाचपुते हे एक कार्यक्षम मंत्री आहेत. माझा माननीय सभापती साहेबांच्या माध्यमातून माननीय मंत्री महोदयांना प्रश्न आहे की, अनेक आश्रमशाळांच्या इमारती देखील जुन्या झाल्या असून त्या आता जीर्ण झालेल्या आहेत. त्यामुळे त्या इमारती नवीन बांधण्याच्या बाबतीत आपण कार्यवाही करणार आहात काय ? तसेच आपण ज्याप्रमाणे अनुदानित आश्रमशाळांची तपासणी करतो,त्याप्रमाणे शासकीय आश्रमशाळांची देखील तपासणी करण्यात येईल काय ? तसेच या आश्रमशाळेतील सर्व



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12755 . .. .

विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सोयी-सुविधा किंवा त्यांना देण्यात येणारे जे अन्न आहे, इतरही काही बाबी आहेत, त्यासंदर्भात शासन निश्चितपणे काय कार्यवाही करणार आहे ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्यांनी अत्यंत योग्य असा प्रश्न विचारलेला आहे. महाराष्ट्रामध्ये ज्या आश्रमशाळा आहेत. त्यामध्ये मोठया प्रमाणात शासकीय आणि अनुदानित आश्रमशाळा असून ही संख्या 1100 च्या वर आहे. आश्रमशाळांच्या बाबतीत काही नियम बदलले पाहिजेत ही वस्तुस्थिती आहे. खाजगी आश्रमशाळेच्या इमारतीसाठी ज्याप्रमाणात मुले असतील त्याप्रमाणे 3 लाख किंवा 5 लाख इतका निधी देतो. पण यामध्येही अडचणी आहेत. जर एखाद्याची स्वत:ची शाळा असेल तर आम्ही अनुदान देत नाही आणि जर आश्रमशाळा भाड्याने घेतली असेल तर अनुदान देतो. मात्र हे चुकीचे आहे. म्हणून जे आश्रमशाळांचे मालक आहेत, संस्था चालक आहेत ते स्वत:च्या जवळच्या नातेवाईकांच्या मार्फत शाळा बांधतात आणि ती भाड्याने दिल्याचे दाखविले जाते. ही चुकीची पध्दत असून आम्ही ती दुरुस्त करणार आहोत. एखाद्या संस्थेने स्वत: शाळा बांधलेली असली तरी भाडे देण्याची व्यवस्था करावी अशा प्रकारची सुधारणा करण्याची माझी तयारी आहे. त्याचबरोबर आपण अनुदानित आश्रमशाळांची तपासणी करतो, त्याप्रमाणे शासकीय आश्रमशाळांची देखील तपासणी केली पाहिजे.

सभापती महोदय, मागे एकदा आम्ही संबंधितांवर कारवाई केली होती, त्याप्रमाणे इतरांवर कारवाई का होत नाही असा प्रश्न उपस्थित करण्यात येतो. याबाबतीत सांगावयाचे तर सर्वच आश्रमशाळा तपासण्याचा कार्यक्रम सुरु करण्यात आलेला आहे. यामध्ये केवळ इमारती आणि साहित्याबाबत तपासणी नाही तर ज्यावेळेस आम्ही अनुदानित आश्रमशाळांना सांगतो की, तुम्ही इमारती बांधाव्यात, त्याठिकाणी शौचालय असले पाहिजे, ते नियमाप्रमाणे असले पाहिजे आणि ते नियमाप्रमाणे झालेले नाही ही वस्तुस्थिती आहे. त्याचप्रमाणे आमच्यावर देखील बंधन आहे. यावर्षी आम्ही 130 शाळा घेतलेल्या आहेत आणि साधारणत: 600 कोटी रुपयांची व्यवस्था केलेली आहे आणि सगळ्या आश्रमशाळा नवीन बांधण्याचे ठरविले असून जे शिक्षक तेथे रहात नाहीत त्यांच्यासाठी निवासाची सोय, पाण्याची सोय सुध्दा करण्यात येणार आहे. वॉटर हॉर्वेस्टींगचे काम सुध्दा घेण्यात येणार आहे. अशा प्रकारे टप्प्याटप्प्याने पाच वर्षामध्ये महाराष्ट्रातील सर्व आश्रमशाळा अत्याधुनिक करावयाच्या आहेत. तसेच काही आश्रमशाळा जंगला मध्ये आहेत. त्याठिकाणी जर कोणी शहराच्या जवळ ट्रान्सफरची मागणी करीत असतील आणि आम्ही त्याठिकाणी काम करु असे



APR/ 13:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सांगितले तर त्यांना जागा बदलून देण्याच्या बाबतीत सुध्दा आम्ही तयारी ठेवलेली आहे. तसेच या ठिकाणी जे साहित्य मिळते ते अद्ययावत आणि व्यवस्थित मिळावे यादृष्टीने देखील काळजी घेण्यात आलेली आहे. या आश्रमशाळांमधील मुलांना अंडी आणि केळी सुध्दा दिली पाहिजेत आणि त्यासाठी जो नियम आहे, त्यामध्ये सुध्दा बदल करुन त्यांना पौष्टिक आहार मिळाला पाहिजे, शाळा चांगली असावयास पाहिजे आणि शाळेमधून मुलांना उत्कृष्ट शिक्षण मिळाले पाहिजे या दृष्टीने कार्यवाही सुरु झालेली आहे.

----

. . . .2 एच-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**मु.पो.भगवतीशिवार (ता.सेनगाव, जि.हिंगोली) येथील पैनगंगा नदीपात्रातून**

**जेसीबी मशीनद्वारे बेसुमार वाळू उपसा केल्याबाबत**

**(5) *13531 श्री.सय्यद पाशा पटेल, श्री.धनंजय मुंडे, श्री.चंद्रकांत पाटील, श्री.संजय केळकर, श्री.रामनाथ मोते, श्री.सय्यद पाशा पटेल** : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मु.पो.भगवतीशिवार (ता.सेनगाव, जि.हिंगोली) येथे दिनांक 22 जानेवारी, 2011 रोजी पैनगंगा नदीपात्रातून जेसीबी मशीनद्वारे बेसुमार वाळू उपसा करून त्याची वाहतूक करणाऱ्या वाळू चोराविरोधात माझोडसज्जाचे तलाठी श्री.विठ्ठल सूर्यवंशी यांनी अटकाव करताच जेसीबी चालकासह 20 ते 25 जणांनी तलाठ्याला धक्काबुक्की करुन मारहाण केली अशी तक्रार तलाठी श्री.सूर्यवंशी यांनी गोरेगाव पोलीस ठाण्यात दाखल केली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, तक्रारीमध्ये श्री.संतोष काकडे, श्री.गजानन काकडे, श्री.पंढरी काकडे, श्री.भगवान साळुंखे इत्यादी ज्या व्यक्तींच्या विरोधात तक्रार दाखल केली आहे त्यांच्या विरोधात कोणकोणत्या कलमाखाली गुन्हा नोंदवून काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(3) असल्यास, शासकीय कामात अडथळा, शासकीय नोकराला झालेली मारहाण व शासकीय मालमत्तेची अवैध चोरी या संदर्भात असणारी कायद्यातील कलमे लावून या सर्व आरोपीविरोधात कारवाई करण्यात आली आहे काय,

(4) नसल्यास, संबंधित पोलीस स्टेशनच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कायद्याचे पालन करण्यात दाखविलेल्या अकार्यक्षमतेबाबत त्यांच्या विरोधात काय कारवाई करण्यात आली आहे,

(5) नसल्यास, कामात कुचराई करणारे पोलीस अधिकारी व तलाठ्याला मारहाण करणारे वाळू चोर यांच्याविरोधात काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(6) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश सोळंके, श्री.बाळासाहेब थोरात यांच्याकरिता** : (1) हे खरे आहे.

(2), (3), (4) व (5)

या प्रकरणी संबंधितांविरुध्द पोलीस स्टेशन गोरेगांव येथे भा.द.वि.कलम 143, 147, 148, 149, 323, 504, 506, 353, 332 व 427, अन्वये दि.22.2.2011 रोजी गुन्हा क्र.11/2011 दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याच्या अनुषंगाने दि.24.01.2011 रोजी 18 व्यक्तींना अटक करण्यात आली असून त्यांना न्यायालयाने त्याच दिवशी जामिनावर मुक्त केले आहे.पोलिसामार्फत चौकशी सुरु आहे.

(6) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, या प्रश्नाच्या उत्तरात मला आपल्या परवानगीने पुढील सुधारणा करावयाची आहे.

याठिकाणी प्रश्न क्रमांक 2,3,4,5च्या उत्तरामध्ये दुसऱ्या ओळीमध्ये दिनांक"22-02-2011" रोजी गुन्हा क्र.11/2011 दाखल करण्यात आला आहे असे म्हटलेले आहे.त्याऐवजी दिनांक "22-01-2011" असे वाचण्यात यावे.

यानंतर कु.थोरात .....

अस्सुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13531....

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, अधिकृत वाळू उपशाला अटकाव करण्यासाठी गेल्यानंतर तलाठी श्री. विठ्ठल सूर्यवंशी यांच्यावर हल्ला झाला आहे. त्यांना जिवे मारण्याचा प्रयत्न झालेला असताना आरोपीला लगेच जामीन मिळेल,त्याच्यावर कुठलीही कारवाई होणार नाही, अशा प्रकारची कलमे लावण्यात आली आहेत. ज्या प्रकारे त्यांच्यावर हल्ला झाला त्यावरुन त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आला, अशा प्रकारचे कलम या आरोपीवर का लावण्यात आले नाही? सरकारी अधिकाऱ्यांवर प्रामुख्याने वाळू माफियांकडून हल्ले होण्याचे प्रमाण वाढलेले आहे तेव्हा सरकारी अधिकाऱ्यांना पोलीस संरक्षण मिळणार आहे काय?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, ज्यावेळी अशा प्रकारे अनधिकृतपणे वाळू उपसा करण्यात येत आहे असे निदर्शनास आले, त्यावेळी त्या ठिकाणी तलाठयाला पाठविण्यात आले. त्यावेळी त्या ठिकाणी 20 ते 25 व्यक्तिंनी या तलाठयाला धक्काबुकी केली, ही गोष्ट खरी आहे. त्यामुळे संबंधिता विरुध्द कलम 143, 147,148,149,323,504,506, 353, 332 व 427 आणि डी.पी. ॲक्ट 135 अन्वये गुन्हा क्रमांक 11/2011 दाखल करण्यात आलेला आहे. सभापती महोदय, दिनांक 24/01/2011 रोजी 18 व्यक्तिंना अटक करुन त्यांना न्यायालयात नेले असता न्यायालयाने त्याच दिवशी जामीनावर मुक्त केले आहे. या ठिकाणी असे निदर्शनास आलेले आहे की, हे सगळे आरोपी मौजे टोव, तालुका, जिल्हा वाशिम येथील रहिवाशी आहेत. त्यांच्यावर यापूर्वी कुठलेही गुन्हे दाखल झालेले नाहीत. त्या गावामध्ये गजानन महाराजांचे मंदिर आहे. त्या मंदिराच्या बांधकामासाठी त्या ठिकाणावरुन ते वाळू नेत होते असे निदर्शनास आले आहे. या सर्वांना तडीपार करावे असे शासनाने प्रस्तावित केले होते, परंतु यापूर्वी यांच्यावर कुठलेही गुन्हे दाखल झालेले नाहीत आणि प्रत्यक्षात त्या ठिकाणावरुन वाळूचा उपसा झालेला नाही, त्यांनी केवळ तसा प्रयत्न केला होता म्हणून त्यांच्या बाबतीत ही कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच धाडी घालताना कर्मचाऱ्यांनी पोलीस संरक्षण घेऊनच घालाव्यात अशा प्रकारच्या सूचना विभागाच्या माध्यमातून देण्यात आलेल्या आहेत.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**शिरुर कासार (जि.बीड) तालुक्यातील तहसील कार्यालयातील तहसीलदारासह ११ पदे रिक्त असल्याबाबत**

**(६) * १४२४० प्रा.सुरेश नवले , श्री.एम.एम.शेख , श्री.राजन तेली , श्रीमती उषाताई दराडे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरुर कासार (जि.बीड) तालुक्यातील तहसील कार्यालयातील तहसीलदारासह ११ पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०११ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या सहा महिन्यांपासून पाटोदा तालुक्यातील तहसीलदारांना दोन्ही तालुक्यातील कामे करावी लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची रिक्त पदे त्वरित भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश सोळंके ,श्री.बाळासाहेब थोरात यांच्या करिता :** (१) हे खरे आहे.

तहसीलदार, शिरुर या पदावर श्री.संतोषकुमार देशमुख यांची नियुक्ती करण्यात आलेली होती. तथापि, ते सदर पदावर रुजू होईपर्यंतचा कार्यभार तहसीलदार, पाटोदा यांच्याकडे सोपविण्यात आलेला होता. दि.१३.१.२०११ रोजी श्री.देशमुख हे तहसीलदार, शिरुर कासार या पदावर हजर झालेले आहेत. जिल्हा बीड तहसील कार्यालयात मंजूर ४७ पदापैकी ४० पदे भरण्यात आलेली असून ३ नायब तहसीलदार, २ लिपिक व २ तलाठी अशी एकूण ७ पदे सद्य:स्थितीत रिक्त आहेत.

(२) तहसीलदार, शिरुर कासार या पदावर श्री.संतोष देशमुख यांची नियुक्ती होऊन ते रुजू होईपर्यंत म्हणजेच दि.१३.१.२०११ पर्यंत तहसीलदार, पाटोदा यांनी तहसीलदार शिरुर या पदाचा कार्यभार सांभाळलेला आहे. दि.१३.१.२०११ पासून तहसीलदार, शिरुर या पदावर नियमित तहसीलदार कार्यरत आहेत.

(३) व (४) नायब तहसीलदार संवर्गात पदोन्नतीद्वारे पदे भरण्यासाठी निवडसूचीस मान्यता देण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे. जिल्हाधिकारी, बीड यांच्या स्तरावर तलाठी या संवर्गातील पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. त्याचप्रमाणे वर्ग ३ व वर्ग ४ ची पदे भरण्यावर जून, २०११ पर्यंत शासकीय निर्बंध आहेत.

सभापती महोदय, या प्रश्नाच्या उत्तरात मला आपल्या अनुमतीने पुढील सुधारणा करावयाची आहे.

उत्तरामध्ये "शिरुर कासार ( जिल्हा बीड) तहसील कार्यालय" असे वाचावे.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, शिरुर कासार, (जि.बीड) तहसील कार्यालय या ठिकाणी 7 पदे रिक्त आहेत असे मंत्री महोदयांनी मान्य केले आहे. ही पदे किती दिवसात भरण्यात येतील? मध्यंतरी तलाठी संवर्गातील जागा भरण्यासाठी जाहिरात दिली होती आणि आम्हीच आग्रहपूर्वक त्याला या सभागृहात शासनाकडून स्थगिती मिळविली होती. तलाठी

..3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.14240....

प्रा. सुरेश नवले.....

संवर्गातील सर्व पदे भरण्याची प्रक्रिया प्रभारी जिल्हाधिकारी, बीड करण्यास तयार नाहीत. त्यामुळे तात्काळ ही तलाठयाची पदे भरण्याचे आदेश जिल्हाधिकारी बीड यांना देण्यात येतील काय?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, शिरुर कासार (जिल्हा बीड)तालुक्यातील तहसील कार्यालयात प्रामुख्याने नायब तहसीलदारची 3 पदे रिक्त आहेत. या नायब तहसीलदार पदांच्या बाबतीत औरंगाबाद विभागातून अव्वल कारकून आणि मंडल अधिकारी संवर्गातून नायब तहसीलदार संवर्गात पदोन्नती देण्यासाठी दिनांक 13/4/2011 रोजी आदेश निर्गमित केले आहेत. विभागीय आयुक्तांच्या माध्यमातून ही पदे तातडीने भरण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

सभापती महोदय, सन्मानीय सदस्यांच्या दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर असे की,तलाठी या पदाच्या परीक्षेला काही तक्रारींच्या माध्यमातून स्थगिती देण्यात आली होती. आता जे जिल्हाधिकारी आहेत त्यांना या परीक्षा पंधरा दिवसात घेण्या बाबत आदेश दिले जातील.

---

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**जळगांव येथील आदिवासी वसतिगृहात मुलांचा छळ होत असल्याबाबतची तक्रार**

**(७) * १४३३२ श्री.दिवाकर रावते :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव येथील राष्ट्रीय महामार्गावरील आदिवासी वसतिगृहात गेल्या जेवणात पाल सापडल्याचे माहे जानेवारी, २०११ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वसतिगृहात मुलांचा छळ केला जात असल्याच्या तक्रारी येथील जिल्हापेठ पोलीस स्थानकात दाखल करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे,
(४) तद्नुसार यास जबाबदार असणाऱ्या वसतिगृह चालकांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव पाचपुते :** (१) दि.१२.९.२०१० रोजी सदर वसतिगृहातील कु.मोग्या भिमा वसावे हा विद्यार्थी आपल्या खोलीत जेवत असताना त्याच्या हातावर पाल पडली व ती हातावरुन त्याच्या जेवणाच्या ताटात पडली असल्याची माहिती विद्यार्थ्याने गृहपालाला दिली होती.
(२) व (३) सदर वसतिगृहातील रोजंदारी शिपाई श्री.दिलीप मुसा तडवी यांचे विरुध्द शिवीगाळ व दमदाटी करण्याच्या कारणावरुन वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी जिल्हापेठ रोड पोलीस स्थानकात तक्रार दाखल केली होती. वसतिगृहातील विद्यार्थ्यांशी सतत हुज्जत घालण्याच्या कारणावरुन श्री.दिलीप मुसा तडवी यास दि.१.१.२०११ रोजी कामावरुन कमी करण्यात आले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, वसतिगृहातील संबंधित कर्मचाऱ्यावर प्रथमत:च मंत्री महोदयांनी कारवाई केल्या बद्दल धन्यवाद. लेखी उत्तराने माझे समाधान झालेले आहे.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, धन्यवाद.

---

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**रायगड जिल्ह्यातील रिलायन्स कंपनीचा ऊर्जा प्रकल्पाला**
**जमीन उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(८) * १४४१४ डॉ.दीपक सावंत , श्री.रामदास कदम , श्री.दिवाकर रावते , डॉ.निलम गोऱ्हे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील पेण, उरण, पनवेल, तालुक्यामध्ये सेझअंतर्गत उभारण्यात येणाऱ्या उर्जा प्रकल्पासाठी सुमारे दहा हजार हेक्टर जमिनीची आवश्यकता असून त्यापैकी ७० टक्के जमीन रिलायन्स ऊर्जा कपंनीने व ३० टक्के जमीन ही शासनाने संपादित करुन द्यावयाची आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ऊर्जा प्रकल्पाना तेथील शेतकऱ्यांचा सक्त विरोध असतांना आतापर्यंत रिलायन्स कंपनीने फक्त १३ टक्के जमीन संपादन केली असून जमीन संपादनासाठी कंपनीला दोन वेळा मुदतवाढ देण्यात आली असून उर्वरित जमीन उपलब्ध होत नसल्याने रिलायन्स कंपनी सदर प्रकल्प गुंडाळण्याच्या निर्णयात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पासाठी नेमण्यात आलेल्या हजारो कर्मचाऱ्यांना रिलायन्सने कमी केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने ३० टक्के जमीन संपादन करावयाची असून ती शासनाने संपादित केली आहे काय,

(५) असल्यास, सदर ऊर्जा प्रकल्पाची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री.प्रकाश सोळंके, बाळासाहेब थोरात यांच्याकरिता :** (१), (२), (३), (४) व (५) हे खरे नाही.
रायगड जिल्ह्यातील पेण, पनवेल व उरण या तीन तालुक्यातील ४५ गावांच्या क्षेत्रामध्ये प्रस्तावित असलेल्या मुंबई विशेष आर्थिक क्षेत्र प्रकल्पांतर्गत कोणताही ऊर्जा प्रकल्प प्रस्तावित नव्हता. मुंबई विशेष आर्थिक क्षेत्र प्रकल्पाकरिता ७० टक्के जमीन कंपनीने व ३० टक्के जमीन शासनाने संपादित करावी अशा प्रकारची तरतूद सद्य:स्थितीतील भूसंपादन अधिनियमात आढळून येत नाही. केंद्र शासनाने दिनांक १.६.२००७ च्या पत्रान्वये दिलेले निर्देश व भूधारकांकडून संपादनास झालेला विरोध यामुळे केवळ १५०५ हेक्टर आर जमीनीचे संमती निवाडे करून ती जमीन विशेष आर्थिक क्षेत्र प्रकल्पास हस्तांतरीत करण्यात आली. परंतु सदर संपादित क्षेत्राचा ऊर्जा प्रकल्पाशी कोणताही संबंध नाही. विशेष आर्थिक क्षेत्र प्रकल्पासाठी नेमण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना कमी करणे ही बाब मुंबई विशेष आर्थिक क्षेत्र लि. या कंपनीच्या अखत्यारीतील आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, एका बाजूला जैतापूरमध्ये आपण लोकांना गोळ्या घालतो, लाठ्या चालवतो आणि दुसऱ्या बाजूला या ठिकाणी ऊर्जा प्रकल्पासाठी जी जमीन पाहिजे त्यासाठी शासनाने नेमके काय नियोजन केले आहे, त्या ठिकाणी जमीन का देत नाही, रायगडमध्ये याबाबतीत काय अडचण आहे ?

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 14414.......

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, उत्तरामध्ये स्पष्ट म्हटले आहे की, मुंबई विशेष आर्थिक क्षेत्र प्रकल्पांतर्गत कोणताही ऊर्जा प्रकल्पाचा प्रस्ताव त्या ठिकाणी प्रस्तावित नाही. या मुंबई विशेष आर्थिक क्षेत्रांतर्गत पेण, पनवेल व उरण या तीन तालुक्यातील 45 गावांमध्ये ही भूसंपादनाची कार्यवाही त्यावेळी चालू होती. परंतु त्यामध्ये ऊर्जा प्रकल्पाचा अंतर्भाव नाही.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, आपल्याला आवश्यकता नाही तर मग त्या वेळेला 45 गावात भूसंपादनाचे काम कशासाठी हातात घेतले होते, त्याचा उद्देश काय होता ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, यामध्ये मुंबई विशेष आर्थिक क्षेत्र म्हणजे एमएसईझेड हा प्रकल्प या ठिकाणी येणार होता आणि त्याकरिता ही भूसंपादनाची कार्यवाही केलेली आहे. पण त्यामध्ये कोणताही ऊर्जा प्रकल्प नाही, हे निश्चित आहे. उत्तरामध्ये सांगितले आहे की, 7/12 वर ज्या नोंदी होत्या त्या सुध्दा कमी केलेल्या आहेत. त्यामुळे आता त्या ठिकाणी भूसंपादनाची कार्यवाही चालू नाही. पूर्वी जे काही क्षेत्र संपादित झालेले आहे तेवढ्यापुरतेच ते मर्यादित आहे.

श्री. रामदास कदम : मग जे क्षेत्र संपादित केले आहे त्या ठिकाणी नेमके काय करणार, ती जमीन कोणाला देणार, त्या ठिकाणी कोणते उद्योग होणार, त्या ठिकाणी किती लोकांना रोजगार मिळणार आहे, नेमके काय आहे, या बाबत मंत्री महोदयांनी स्पष्ट करावे.

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मुंबई विशेष आर्थिक क्षेत्र लिमिटेड या सेझ प्रकल्पामध्ये ज्या उद्योगांचा समावेश आहे त्यामध्ये रेडिमेड गार्मेन्ट्स, ॲप्रल लेदर, फार्मास्युटिकल, जेम्स ज्वेलरी, लाईट इंजिनिअरींग, इलेक्ट्रॉनिक्स, ऑटो, बायोटेक्नॉलॉजी, फूड अँड ॲग्रो, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, हेल्थ केयर, अशा प्रकारच्या उद्योगांचा समावेश आहे. त्यामध्ये ऊर्जा प्रकल्पाचा समावेश नाही. सद्य:स्थितीमध्ये मुंबई विशेष आर्थिक क्षेत्र लिमिटेड यांना परत 'ए' फॉर्ममध्ये केंद्र शासनाकडून परवानगी मागण्यास सांगण्यात आले आहे. ती परवानगी जर त्यांना मिळाली तर हे उद्योग त्या ठिकाणी कार्यरत होतील.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

ता. प्र. क्र. 14414 ....

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, 6(1) च्या नोटिसेस रद्द करण्याच्या संदर्भात उत्तर दिले आहे. आपण एसईझेडवर अनेक वेळा चर्चा केलेली आहे. ज्या शेतकऱ्यांनी काही ना काही कारणांनी जमिनी दिलेल्या आहेत, त्याची त्यांना पाहिजे ती किंमत मिळालेली आहे आणि तो विषय वेगळा आहे. परंतु काही वेगळ्या कारणामुळे किती टक्के जमिनी शेतकऱ्यांना परत पाहिजे ? जर एसईझेडच जर गेलेला आहे तर सर्व शेतकऱ्यांना जमिनी परत देण्याच्या संदर्भात शासन सकारात्मक पावले कशी उचलणार आहे ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, या ठिकाणी कलम 4 च्या ज्या नोटिसेस देण्यात आल्या होत्या त्याचे क्षेत्र 8257 हेक्टर होते. त्यापैकी संमती निवाडे 1505 हेक्टरचे झालेले आहेत. आता आपण भूसंपादनाच्या बाबतीत जे शेरे होते ते 3982 हेक्टरवरुन काढून टाकले आहेत आणि 2695 हेक्टर जमिनीवर हे शेरेच आलेले नव्हते. त्यामुळे 1505 हेक्टर सोडून सगळ्या जमिनी शेतकऱ्यांच्या ताब्यामध्ये आहेत. भविष्यामध्ये जर सेझचे काम सुरु झाले नाही तर त्या बाबतीत काय कारवाई करावयाची या बाबतचा निर्णय त्यावेळी घेतला जाईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. काल आपण अशी भूमिका मांडली होती की, पाणीच काय पण शेतकऱ्याच्या कोणत्याही प्रश्नाच्या बाबतीत आमचे सरकार आघाडीवर राहून निर्णय घेईल. त्या ठिकाणचा सेझ रद्द झालेला आहे. ज्या जमिनी सेझकरिता घेतलेल्या आहेत त्या आता कामाच्या नाहीत त्यामुळे त्या जमिनी शेतकऱ्यांना परत दिल्या पाहिजेत. तो निर्णय घेण्याकरिता तपासून पाहण्याचा काय प्रश्न आहे ? या बाबत एक महिन्यात, दोन महिन्यात, तीन महिन्यात आम्ही तातडीने निर्णय घेऊ असे सांगावे. या बाबत शासनाचे काय म्हणणे आहे ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, त्या ठिकाणी या कंपनीने खाजगी वाटाघाटीतून 1505 हेक्टर जमीन संपादित केलेली आहे. त्यांनी शेतकऱ्यांशी डायरेक्ट वाटाघाटी करुन या जमिनी संपादित केलेल्या आहेत. त्या ठिकाणी निश्चितपणे भविष्यामध्ये जर सेझ उभा राहिला नाही तर त्या वेळेस या बाबत निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.14414....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हा धोरणात्मक विषय आहे. खाजगी कंपनीनी त्यांच्याशी वाटाघाटी केल्या आहेत. त्यानंतर सेझ रद्द झालेला आहे. आता त्या जमिनीवर काहीही होणार नाही. शेतकऱ्यांच्या त्या जमिनीवर सेझ होणार नसेल तर तेथे शेती झाली पाहिजे. त्या ठिकाणी वेगवेगळे कॉम्प्लेक्स उभे केले जातील. हे होता कामा नये. म्हणून शासनाला या संबंधी धोरणात्मक भूमिका घ्यावी लागेल.

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, दिनांक 8.8.2003 रोजी वाणिज्य व उद्योग मंत्रालयाने याला मंजुरी दिल्यानंतर 2008-09 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. दिनांक 5.11.2009 रोजी त्यांनी फॉर्म-ए मध्ये परत प्रस्ताव दाखल करुन राज्य शासनाची शिफारस या अटीच्या पूर्तत राहून सदर आर्थिक क्षेत्रासाठी डी नोवो मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला. परंतु अद्यापपर्यंत कंपनीकडून अर्ज आलेला नाही. त्या संदर्भात कारवाई करण्याची गरज आहे असे मला वाटत नाही. ज्या ज्या शेतक-यांची जमीन संपादित झालेली आहे त्या संबंधी शासनाने करार केलेला आहे. त्यामध्ये इतर कारणासाठी जमिनीचा वापर करण्याची मुभा नाही. करारामधील तरतुदीप्रमाणे निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

**उप सभापती** : मंत्री महोदय, रिलायन्स कंपनीच्या संदर्भात मी आपल्याला प्रश्न विचारतो. पुणे जिल्ह्यातील नगर रोडवर पिंपळे, जगताप ही गावे आहेत. तसेच तेथे शिखापूर नावाचे गाव आहे. रिलायन्स कंपनीच्या गॅसच्या प्रोजेक्टसाठी या गावातील शेतकऱ्यांच्या जमिनी या कंपनीने घेतल्या आहेत. जमिनी घेतल्यानंतर शेतातून पाईप लाईन टाकण्यात आली. या जमिनीची नुकसान भरपाई म्हणून काही शेतकऱ्यांना 2 लाख, 2.25 लाख रुपये देण्यात आले. काही शेतकऱ्यांपैकी कोणाला 20 हजार तर कोणाला 25 हजार रुपये देण्यात आले आणि त्यांना पुढील रक्कम नजीकच्या काळात देण्यात येईल असे सांगून शेतामध्ये पाईप लाईन्स टाकण्याचे काम पूर्ण करण्यात आले. आता या कंपनीचे पुणे येथील कार्यालय बंद करण्याची वेळ आली आहे. उर्वरित रक्कम मिळण्यासाठी त्या शेतकऱ्यांनी कंपनीकडे अनेकदा खेपा मारल्या आहेत, परंतु कंपनीने त्या शेतकऱ्यांना एक रुपया सुध्दा दिलेला नाही. त्यामुळे या शेतकऱ्यांचा कालच विनंती अर्ज दाखल

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** ..... ता.प्र.क्र.14414...

करुन घेण्यात आलेला आहे. परंतु जर त्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासंबंधी कंपनीकडून चालढकल केली जात असेल व पैसे देण्यामध्ये विसंगती आढळून आली असेल तर राज्य सरकार त्यामध्ये हस्तक्षेप करील काय आणि त्या शेतकऱ्यांना शासन न्याय मिळवून देईल काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, आपण आता जो काही प्रकार या ठिकाणी सांगितला आहे त्यासंबंधी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत चौकशी करण्यात येईल...

श्री.अजित पवार : सभापती महोदय, आपण आता जो मुद्दा उपस्थित केला आहे ती वस्तुस्थिती आहे. ज्यावेळी रिलायन्स कंपनीने त्या भागात गॅसची पाईप लाईन टाकण्याचा निर्णय घेतला त्यावेळी त्यांनी स्वतःच्या अखत्यारीतीमध्ये शेतकऱ्यांबरोबर तडजोड करुन पाईप लाईप लाईन टाकण्याची सुरुवात केली. ज्या शेतकऱ्यांना सुरुवातीला पैसे देण्यात आले त्यांना असे वाटले की, ठीक आहे, आपल्याला पैसे मिळाले आहेत. त्या ठिकाणी काही जणांनी शेतकऱ्यांचे पैसे आम्ही मिळवून देतो असे सांगून धंदा सुरु केला. याच लोकांनी रिलायन्सच्या लोकांना असे सांगितले की, आम्ही तुम्हाला जास्तीत जास्त पैसे मिळवून देतो, तुम्ही आमच्या बरोबर रहावे. या संदर्भात मी सुध्दा 1-2 बैठका घेतल्या आहेत. रिलायन्सच्या अधिकाऱ्यांनी सुध्दा शेतकऱ्यांच्या नावावर कित्येक लाख रुपये कमविले आहेत.

या अधिकाऱ्यांनी कंपनीला असे सांगितले की, हा शेतकरी आपल्याला जागाच देत नाही. त्या शेतकऱ्याच्या जमिनीतून पाईप लाईन टाकण्यासाठी त्याला 5 लाख रुपये द्यावे लागतील. दुसरीकडे शेतकऱ्याला असे सांगितले की, तू 2 लाख रुपये मागत होतास, पण मी तुला 3 लाख रुपये मिळवून दिले आहेत. उरलेले 2 लाख रुपये कंपनीच्या अधिकाऱ्याने खिशात घातले आहेत. हा प्रकार मी रिलायन्स कंपनीच्या उच्च अधिका-यांना सांगितल्यावर त्यांच्या सुध्दा ही गोष्ट लक्षात आली. ज्यांनी सुरुवातीला नुकसान भरपाई घेतली त्यावेळचा दर लक्षात घेता त्यांना कमी पैसे मिळाले आहेत. ज्यांनी थोडेसे ताणून धरले, आपल्या शेतीमध्ये खोदण्याचे काम करु दिले नाही. अशा शेतकऱ्यांना पैसे वाढवून मिळाले. मी आता जे उदाहरण दिले तसे काहींच्या बाबतीत झाले आहे. म्हणजे एकाच शिरुर तालुक्यामध्ये काही ठिकाणच्या शेतकऱ्यांना एकरी 50 हजार रुपये

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मिळाले तर काही ठिकाणच्या शेतकऱ्यांना एकरी 5 लाख रुपये मिळाले आहेत. हे काम राज्य सरकारचे नव्हते, राज्य सरकारने त्यासाठी जमिनी संपादित केल्या नव्हत्या. रिलायन्स कंपनीने असे सांगितले होते की, आम्ही आमच्या पध्दतीने प्रत्येक शेतकऱ्याशी फेस टू फेस तडजोड करु व त्यासंबंधीचा निर्णय घेऊ. त्यानंतर त्यांचे पाईप लाईन टाकण्याचे काम पूर्ण झाले आहे. हे काम पूर्ण झाल्यावर ते निघून गेले आहेत. शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची पूर्ण रक्कम न मिळाल्यामुळे आपण त्या संदर्भातील विनंती अर्ज दाखल करुन घेतलेला आहे. त्यातून शेतकऱ्यांना जर काही रक्कम जास्त मिळणार असेल तर राज्य सरकारची सुध्दा तीच भूमिका आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 13:20

ता.प्र.क्र.14414.. ..श्री. अजित पवार...

रिलायन्सला पैशाची कमतरता नाही. त्यांच्या कडून शेतक-यांना थोडेफार पैसे अधिक मिळाले तरी हरकत नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : सेझ राज्य सरकारने रद्द केल्याचे जाहीर केले. "सेझसाठी राखीव जमीन" अशी 7/12च्या उता-यावर नोंद आहे. ती नोंद रद्द करणार काय ? रिलायन्सने सेझसाठी जमिनी विकत घेतला. आता त्या जमिनीचा वापर सेझसाठी होणार नाही. इंडस्ट्रियल ऑडर काढून जमिनी घेतलेल्या आहेत. त्या इंडस्ट्रियल ऑर्डरची पूर्तता होत नसल्यामुळे त्या जमिनी शेतक-यांना परत करण्याचे धोरण शासन घेईल काय ?

श्री. अजित पवार : राज्य सरकारने सगळीकडे सेझ रद्द केलेला नाही. जर एखाद्या कोणत्या कंपनीने दिल्लीला जाऊन तशी परवानगी आणली आणि त्यांनी एखाद्या भागामध्ये शेतक-यांकडून स्वखुशीने जमिनी घेतल्या, त्यांचा सेझ केला आणि त्यातून व्यवसाय वाढला, उद्योगधंदा वाढला, रोजगार मिळाला तर त्याबाबतीत शासनाचा विरोध असण्याचे काही कारण नाही. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, रायगड जिल्ह्याच्या परिसरामध्ये रिलायन्सने पुढाकार घेऊन तेथे सेझ करण्याचे प्रयत्न चालले होते. तेथे बरीच आंदोलने झाली, ब-याच गोष्टी झाल्या. काही बाबतीत रिलायन्सने शेतक-यांना पॅकेज दिले. शेतक-यांना पॅकेज चांगले वाटले म्हणून शेतक-यांनी त्यांच्या जमिनी रिलायन्सला दिल्या. ज्या शेतक-यांनी शेवटपर्यन्त लढा चालू ठेवला त्या संदर्भात जे काही घडले ते सभागृहाला माहीत आहे. त्या जमिनी आपण घेतलेल्या नाहीत. आता असा मुद्दा उपस्थित झालेला आहे की, शेतक-यांना पॅकेज देऊन त्यांच्याकडून ज्या जमिनी घेतल्या त्या एमआयडीसी कायद्याचा आधार घेऊन घेतल्या, त्याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. परंतु याबाबतीत राज्य सरकारने ठोस अशा प्रकारचा काही निर्णय घेतलेला नाही. मी सभागृहाला सांगू इच्छितो की. या संदर्भात मंत्रिमंडळामध्ये चर्चा करण्यात येईल. ती चर्चा करुन राज्याच्या हिताचे काय आहे, एकंदरीतच आपल्याला कोणता योग्य निर्णय घ्यावा लागेल, ज्या जमिनी कंपनीच्या ताब्यात आहेत त्या संदर्भात त्यांचे काय मत आहे हे जाणून घेऊन शेतक-यांचा हिताचा निर्णय घेतला जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

ता.प्र.क्र.14414...

श्री. जयंत प्र. पाटील : तो सर्व परिसर सिंचनाखाली येतो. हेटवणा प्रकल्पाची चर्चा या सभागृहामध्ये झाली. बाकीची जमीन शेतीची आणि मध्येच इंडस्ट्री राहिली तर ते योग्य होणार नाही. रिलायन्स कंपनीने शेती केली तर आमचे काही म्हणणे नाही. पण तो भाग सिंचनासाठी राखीव ठेवण्याचे धोरण शासन करील काय ?

श्री. अजित पवार : कालच सभागृहामध्ये राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी राज्य सरकारचा निर्णय सांगितलेला आहे. पाण्याचे पहिले प्राधान्य पिण्यासाठी, दुसरे प्राधान्य शेतीसाठी आणि तिसरे प्राधान्य इंडस्ट्रिला राहाणार आहे. सन्माननीय सदस्यांनी आता जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याबाबतीत मी सांगू इच्छितो की, कालचा निर्णय झाल्यानंतर हा प्रस्ताव आलेला आहे. मी सुरुवातीलाच सांगितले की, हे राज्य सरकार शेतक-यांचेच प्रतिनिधित्व करीत आहे. त्यामुळे शेतक-यांच्याच हिताचे निर्णय घेण्याचा प्रयत्न आम्ही सातत्याने केलेले आहेत. याही बाबतीत शेतक-यांच्या हिताचा निर्णय घेऊ. परंतु आज ज्या जमिनी कंपनीच्या ताब्यात आहेत त्याबाबतीत त्यांचे काय म्हणणे आहे हे ऐकून घ्यावे लागेल. कोणताही निर्णय घेत असताना तो एकतर्फी घेता येणार नाही. त्यांचे म्हणणे शेतक-यांच्या विरोधातील असेल, आणखी नवीन प्रश्न निर्माण करणारे असेल तर त्या बाबतीत राज्य सरकार योग्य भूमिका बजाविल एवढा शब्द मी सभागृहाला देतो.

**उप सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला.

----

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ पूर्वी श्री. खंदारे 13:20

## राखून ठेवलेल्या लक्षवेधी सूचनेसंबंधी

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय मंत्री महोदय येथे उपस्थित आहेत. परवा या सभागृहामध्ये लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यासंबंधी माननीय सभापती महोदयांनी निर्णय दिला होता. ती लक्षेवेधी सूचना आज कामकाजपत्रिकेमध्ये दाखविलेली नाही. "शासनाने ही गोष्ट मान्य केलेली आहे की, अधिवेशन संपण्यापूर्वी कारवाई केली जाईल. हे निवेदन कारवाई संबंधीची निश्चित घोषणा होईपर्यन्त राखून ठेवण्यात येत आहे" असा माननीय सभापतींनी निर्णय दिलेला आहे. म्हणून आज कारवाईच्या संदर्भात सांगितले गेले पाहिजे.

तसेच ज्या अधिका-यांनी माननीय राज्यपालांचे निदेश सभागृहाला वेळेत सादर केले नाहीत त्यांच्या बाबतीत काय कारवाई केली हे माननीय मंत्री महोदय श्री. हर्षवर्धन पाटील यांनी सभागृहाला सांगितले पाहिजे. ह्या दोन गोष्टी झाल्या पाहिजेत.

--

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**शोक प्रस्तावाबाबत**

**उप सभापती** : प्रा.सुभाष बाबाराव दापके,माजी विधान परिषद सदस्य यांचे दुःखद निधन झाल्याचे या सचिवालयास कळविण्यात आलेले आहे. आजच्या कार्यक्रमपत्रिकेत सदर शोकप्रस्ताव दाखविण्यात आलेला नसला तरी आजचा अधिवेशनाचा शेवटचा दिवस असल्यामुळे सभागृहाच्या अनुमतीने शोक प्रस्ताव घेण्यात येत आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: शोक प्रस्ताव

**मु.शी.**: प्रा.सुभाष बाबाराव दापके-देशमुख यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव

श्री. अजित पवार ( उप मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, प्रा.सुभाष बाबाराव दापके-देशमुख, माजी विधान परिषद सदस्य यांच्या निधनाबद्दल मी खालील शोक प्रस्ताव मांडतो.

"प्रा.सुभाष बाबाराव दापके-देशमुख यांच्या दुःखद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दुःख व्यक्त करते"

कै.प्रा.सुभाष बाबाराव दापके-देशमुख यांचा जन्म 2 मे, 1945 रोजी लातूर जिल्हयात अहमदपूर तालुक्यातील तळेगांव येथे झाला. त्यांचे शिक्षण एम.ए.पर्यंत झाले होते.

कै. दापके-देशमुख यांनी कोल्हापूर येथील नाईट कॉलेज ऑफ ऑर्टस् अँड कॉमर्स मध्ये इंग्रजी विषयाचे विभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील विधी शाखा व इंग्रजी अभ्यास मंडळाचे सदस्य, बापूराव जोशी ज्ञानप्रबोधिनीचे सचिव तसेच योग विद्यालय व विद्यार्थी सहयोग कोल्हापूरचे अध्यक्ष म्हणूनही कार्य केले होते.

कै. दापके-देशमुख यांनी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या महाराष्ट्र शाखेचे प्रदेशाध्यक्षा व राष्ट्रीय कार्यकारिणीचे सदस्य तसेच कोल्हापूर येथील लेखकांच्या सहकारी पतसंस्थेचे संस्थापक-अध्यक्ष, पंचगंगा नागरी सहकारी बँकेचे संचालक व कृष्णाखोरे सिंचन विकास महामंडळाचे सदस्य म्हणूनही कार्य केले होते. त्यांचा अनेक शैक्षणिक, सामाजिक व सहकारी संस्थांशी निकटचा संबंध होता.

कै.दापके-देशमुख हे सन 1996 मध्ये महाराष्ट्र विधान परिषदेवर राज्यपालांव्दारा नामनियुक्त सदस्य म्हणून निर्वाचित झाले होते.

अशा या समाज सेवकाचे बुधवार, दिनांक 20 एप्रिल, 2011 रोजी दुःखद निधन झाले.

---

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

3...

श्री. पांडुरंग फुंडकर ( विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते व उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी प्रा.सुभाष बाबाराव दापके-देशमुख, माजी विधान परिषद सदस्य यांचा दु:खद निधनाबद्दलचा शोक प्रस्ताव मांडला, त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, लातूर जिल्हयात जन्माला येऊन विविध संस्थांवर प्रा.सुभाष दापके-देशमुख यांनी काम केलेले आहे. विद्यार्थी परिषदेमध्ये काम करीत असताना माझा आणि त्यांचा अगदी जवळून संबंध आला. विविध संस्थांवर काम करताना त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटविला होता. कोल्हापूर येथील नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्स, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, बापूराव जोशी ज्ञानप्रबोधिनी या संस्थांमध्ये अतिशय चांगले काम त्यांनी केलेले आहे. त्याचप्रमाणे पंचगंगा नागरी सहकारी बँकेचे संचालक, कृष्णा सिंचन विकास महामंडळाचे सदस्य, या ठिकाणी त्यांनी अतिशय उत्तमपणे काम केलेले आहे. सामाजिक आणि सहकारी संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध होता म्हणूनच त्यांना 1996 मध्ये राज्यपालांव्दारा विधान परिषदेवर सदस्य म्हणून त्यांची नियुक्ती झाली होती. प्रा.सुभाष दापके-देशमुख यांना विधान परिषद सदस्य म्हणून एकदाच संधी मिळाली. सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्र, सहकार क्षेत्र या बाबत त्यांचा चांगला अभ्यास होता, त्या दृष्टीनेच त्यांनी या सभागृहात काम केलेले आहे. अशा या थोर समाज सेवकाचे काल दु:खद निधन झाले. त्यांच्या आत्म्याला शांती लाभो अशी प्रभुचरणी प्रार्थना करतो.

-------------

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सभागृहाचे नेते यांनी कै.सुभाष बाबाराव दापके-देशमुख, माजी विधानपरिषद सदस्य यांच्या दु:खद निधनाबद्दलचा शोक प्रस्ताव मांडलेला आहे. या शोक प्रस्तावावर सन्माननीय विरोधी पक्षनेते यांनी देखील आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

कै.सुभाष बाबाराव दापके-देशमुख यांनी कोल्हापूर येथील नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्स या कॉलेजमध्ये अध्यापन क्षेत्रातील कार्याला सुरुवात केली. शिवाजी विद्यापीठाच्या विधी शाखा आणि इंग्रजी अभ्यास मंडळाचे सदस्य म्हणून त्यांनी काम केले होते. त्यांनी विविध स्तरावरील शैक्षणिक चर्चासत्रात भाग घेतला होता. तसेच शैक्षणिक व सामाजिक प्रश्नासंबंधीच्या अनेक आंदोलनाचे नेतृत्वही त्यांनी केले होते. कै.दापके-देशमुख अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या महाराष्ट्र शाखेच्या प्रदेशाध्यक्ष पदी आणि राष्ट्रीय कार्यकारिणीचे सदस्य, कोल्हापूर येथील पंचगंगा नागरी सहकारी पत संस्थेचे संचालक तसेच कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळाचे सदस्य म्हणूनही कार्य केले होते. त्यांचा अनेक शैक्षणिक, सामाजिक व सहकारी संस्थांशी निकटचा संबंध होता.

कै.सुभाष बाबाराव दापके-देशमुख हे सन 1996 मध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेवर राज्यपालांद्वारा नामनियुक्त सदस्य म्हणून निर्वाचित झाले होते. त्यांचे बुधवार, दिनांक 20 एप्रिल, 2011 रोजी दु:खद निधन झाले. कै.सुभाष बाबाराव दापके-देशमुख यांच्या स्मृतीला मी अभिवादन करतो व भावपूर्ण श्रध्दांजली वाहतो.

सन्माननीय सदस्यांनी स्तब्ध उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

(सदस्य उभे राहतात)

सदस्यांनी खाली बसावे. शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकुल कुटुंबीयांकडे पाठविण्यात येईल.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**शोक प्रस्तावाच्या वेळी पाळावयाच्या शिष्टाचारासंबंधी**

श्री.अजित पवार (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, मला एक मुद्दा निदर्शनास आणून द्यावयाचा आहे. शोक प्रस्ताव संमत करण्यासाठी सभागृहातील सर्वच माननीय सदस्य दोन मिनिटे स्तब्ध उभे राहिले. परंतु गॅलरीमधील काही अधिकारी उभे राहतात व काही अधिकारी जागेवरच बसून राहतात असे दिसून आले. जर त्यांना उभे रहायचे असेल तर सर्वच अधिकाऱ्यांनी उभे रहावे किंवा सगळ्यांनीच बसून रहावे. दहापैकी पाच जणांनी उभे रहायचे आणि पाच जणांनी बसून रहायचे हे दिसायला योग्य वाटत नाही. तुमच्या माझ्या घरातील एखाद्या व्यक्तीचे निधन झ ाल्यानंतर शोक प्रकट करणे ही भारतीय आणि हिंदू परंपरा व संस्कृती आहे. पूर्वी काय होते हे न पाहता शोक व्यक्त करण्यासाठी एक-दोन मिनिटे सगळ्यांनीच स्तब्ध उभे राहिल्याने काही बिघडत नाही. या संदर्भात योग्य तो निर्णय घेतला जावा, अशी माझी सूचना आहे.

**उप सभापती** : आपली सूचना अंमलात आणण्याबाबत निश्चितपणे कार्यवाही केली जाईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, शोक प्रस्ताव संमत झाल्यानंतर काही काळासाठी सभागृहाची बैठक तहकूब करण्याची प्रथा आहे. त्यानुसार सभागृहाची बैठक दहा ते पंधरा मिनिटांसाठी तहकूब करावी, अशी माझी विनंती आहे.

**उप सभापती** : सभागृहाची बैठक दुपारी 1.45 वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.33 ते 1.45 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----

नंतर 2ओ.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगिती नंतर )**

**सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी**

**पृ.शी.** : लेखी उत्तरे

**मु.शी.** : तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री. प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने "औरंगाबाद जिल्ह्यातील गायरान, वतन, इनामी, कुळ आणि बक्षिसीमध्ये मिळालेल्या 200 हेक्टर जमिनीच्या खरेदी विक्रीमध्ये झालेला गैरव्यवहार" या विषयावरील सर्वश्री. सतीश चव्हाण, एम.एम.शेख, विक्रम काळे, श्रीमती उषाताई दराडे, सर्वश्री रमेश शेंडगे, हेमंत टकले वि.प.स. यांच्या दिनांक 24 मार्च, 2011 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 13632 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : तारांकित प्रश्नाबाबतची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबतची अधिक माहिती छापावी)

----------

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : लेखी उत्तरे

**मु.शी.**: तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवणे

सह सचिव : महोदय, मी आपल्या अनुमतीने दिनांक 20 एप्रिल, 2011 रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहासमोर ठेवीत आहे.

**तालिका सभापती** : दिनांक 20 एप्रिल, 2011 रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी)

-----

....3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : लेखी उत्तरे

**मु.शी.**: अतारांकित प्रश्नोत्तराची एकविसावी, बावीसावी व तेवीसावी यादी सभागृहासमोर ठेवणे

सह सचिव : महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तराची एकविसावी, बावीसावी व तेवीसावी यादी सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : अतारांकित प्रश्नोत्तराची एकविसावी, बावीसावी व तेवीसावी यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी)

----

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

प्रा. फौजिया खान (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने दिनांक 29 जानेवारी, 2000, दिनांक 19 मे, 2000, दिनांक 15 मार्च, 2001, दिनांक 9 मे, 2001, दिनांक 21 मार्च, 2002, दिनांक 16 ऑक्टोबर, 2002, दिनांक 9 डिसेंबर, 2002, दिनांक 20 ऑक्टोबर, 2008, दिनांक 12 जानेवारी, 2009, दिनांक 21 जानेवारी, 2009, दिनांक 9 नोव्हेंबर, 2009, दिनांक 19 नोव्हेंबर, 2009, दिनांक 1 डिसेंबर, 2009, दिनांक 16 फेब्रुवारी, 2010, दिनांक 22 फेब्रुवारी, 2010, दिनांक 17 मार्च, 2010, दिनांक 7 एप्रिल, 2010, दिनांक 8 जून, 2010, दिनांक 8 जून, 2010, दिनांक 8 जून, 2010, दिनांक 8 जून, 2010, दिनांक 11 जून, 2010, दिनांक 16 जून, 2010, दिनांक 25 जून, 2010, दिनांक 2 जुलै, 2010, दिनांक 6 जुलै, 2010, दिनांक 30 ऑगस्ट, 2010, दिनांक 8 सप्टेंबर, 2010, दिनांक 16 नोव्हेंबर, 2010 रोजीचे विशेष अहवाल त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह सभागृहासमोर ठेवते.

**तालिका सभापती** : लोक आयुक्त व उप लोक आयुक्तांचे विशेष अहवाल त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री. दिवाकर रावते : महोदय, लोक आयुक्त व उप लोक आयुक्तांचे अहवाल दहा वर्षानंतर सभागृहाच्या पटलावर ठेवले जात आहेत. नुकताच जन लोकपाल विधेयकासंबंधीचा मुद्दा देशाच्या पातळीवर गाज आहे. राज्यात असाच प्रकार होत राहिला तर कदाचित आणखी कोणाला तरी उपोषणाला बसावे लागेल, म्हणून या अहवालांना उशीर का झाला याचे कारण सभागृहाला कळले पाहिजे.

प्रा. फौजिया खान : महोदय, यामध्ये एक प्रश्न होता व त्याचे निराकरण करण्याचा प्रयत्न शासनाने केलेला आहे. लोक आयुक्तांचा एक अहवाल असा होता की त्यामध्ये ॲक्शन टेकन रिपोर्टसहित सादर करावयाचा होता पण संबंधित विभागांकडून त्याची माहिती प्राप्त होत नव्हती. वेळोवेळी त्यासाठी बैठका घेऊन हा अहवाल एकत्रित करुन सादर करण्यात आला आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान ...

आता हे अहवाल बरेचसे नियंत्रणात आलेले आहेत. जुलै महिन्याच्या अधिवेशनामध्ये 15 अहवालाचे अहवालांचे काम पूर्ण होईल. यामध्ये केवळ दोनच विभागाचे जुने अहवाल आहेत. पुढच्या अधिवेशनापासून यासंदर्भातील कोणताही प्रश्न उपस्थित होणार नाही एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छिते.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माझा शिक्षण विभागाच्या संदर्भात औचित्याचा मुद्दा असून शिक्षण मंत्री आता सभागृहात उपस्थित आहेत. माननीय शिक्षण मंत्र्यांना खालच्या सभागृहात जावयाचे असल्यामुळे मला शिक्षण विभागाच्या संदर्भातील औचित्याचा मुद्दा मांडण्याची संधी देण्यात यावी अशी आपल्याला विनंती आहे.

**तालिका सभापती** ( श्री. मोहन जोशी ) : आता सभागृहापुढे कागदपत्र पटलावर ठेवणे हा विषय असून हा विषय संपल्यानंतर आपल्याला औचित्याचा मुद्दा मांडण्याची संधी दिली जाईल.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान (सामान्य प्रशासन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादितचा सन 2009-2010 चा आठवा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने, माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अन्वये प्रसिध्द करण्यात आलेली अधिसूचना क्रमांक केंमाअ 2010/प्र.क्र.331/10/सहा, दिनांकित 7 मार्च, 2011 सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

श्री. सचिन अहिर (गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने, झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरण, मुंबई यांचे सन 2007-2008 व 2008-2009 चे वार्षिक लेखा व लेखा परीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक लेखा व लेखा परीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्रीमती फौजिया खान( सामान्य प्रशासन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सन 1999-2000, 2000-2001, 2001-2002, 2002-2003, 2003-2004, 2004-2005 व 2005-2006 चे वार्षिक अहवाल व कारणमिमांसा दर्शविणारी स्पष्टीकरणात्मक निवेदने सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक व स्पष्टीकरणात्मक निवेदने सभागृहासमोर ठेवण्यात आली आहेत.

श्री. राजेंद्र मुळक ( वित्त राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने, मॅफ्को लिमिटेडचा सन 2009-2010 चा एकोणचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचा सन 2010-2011 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने,भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा दिनांक 31 मार्च, 2010 रोजी संपलेल्या वर्षाचा (वाणिज्यिक) अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे सन 2009-2010 या वर्षाचे (1) वित्तीय लेखे अहवाल खंड-1 व खंड-2(2) विनियोजन लेखे अहवाल, (3) नागरी अहवाल क्रमांक -2(4) राज्य वित्त व्यवस्थेवरील अहवाल व (5) महसुली जमा अहवाल क्रमांक-3 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री. सचिन अहिर (गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने, मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित, औरंगाबाद यांचा सन 2007-2008 चा एकेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे सन 2008-2009 चे वार्षिक हिशेब सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक हिशेब सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कोकण विकास महामंडळ मर्यादितचा सन 1998-1999 चा अठ्ठाविसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.राजेंद्र मुळक ( जलसंपदा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्पाच्या डाव्या कालव्याच्या अस्तरीकरणाची तपासणी व दुरुस्तीसाठी उपाययोजना करण्याकरिता गठीत केलेल्या समितीचा चौकशी अहवाल (शिफारशी) व त्यावरील कार्यवाहीचा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.डी.पी.सावंत (उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री ) सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचा सन 2008-2009 चा शेहेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

प्रा.फौजिया खान (महिला व बाल कल्याण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महिला आर्थिक विकास महामंडळ मर्यादित यांचा सन 2000-2001,2001-2002,2002-2003 व 2003-2004 चा अनुक्रमे सव्विसावा, सत्ताविसावा, अठ्ठाविसावा व एकोणतिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवते.

**तालिका सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य महिला आयोगाचा सन 2007-2008 चा पंधरावा अहवाल सभागृहासमोर ठेवते.

**तालिका सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : विधेयकांना संमती व अधिसंमती

**तालिका सभापती** : विधान परिषदेने संमत केलेल्या विधेयकाला विधानसभेची संमती मिळाल्याची यादी सह सचिव वाचून दाखवतील.

सह सचिव : खालील विधेयकांना विधानसभेची संमती मिळाली आहे.

(1) सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक 1 - महाराष्ट्र विद्यापीठ, (सुधारणा) विधेयक,2011

(2) सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक 2 - महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त (सुधारणा) विधेयक 2011

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : लोकलेखा समितीचा अहवाल सादर करणे

श्री.भाई जगताप ( समिती सदस्य ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने लोकलेखा समितीचा तिसरा, चौथा व पाचवा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**तालिका सभापती** : लोकलेखा समितीचा तिसरा,चौथा व पाचवा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

----

**पृ.शी/.मु.शी** : पंचायत राज समितीचा अहवाल सादर करणे

ॲड.उषा दराडे (समिती सदस्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पंचायत राज समितीचा चौथा पाचवा व सहावा अहवाल सभागृहाला सादर करते.

**तालिका सभापती** : पंचायत राज समितीचा चौथा पाचवा व सहावा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

---

**पृ.शी. व मु.शी.** : विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण
समितीचा अहवाल सादर करणे

श्री.भगवान साळुंखे (समिती सदस्य): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा पहिला अहवाल सभागृहाला सादर करतो.

**तालिका सभापती** : विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा पहिला अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

---

4.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./ मु.शी** : अनुसूचित जाती कल्याण सामितीचा अहवाल सादर करणे

श्री.वसंतराव खोटरे (समिती सदस्य): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अनुसूचित जाती कल्याण समितीचा पहिला अहवाल सभागृहाला सादर करतो

**तालिका सभापती** : अनुसूचित जाती कल्याण समितीचा पहिला अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

----

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मा. राज्यपालांच्या निदेशाची प्रत उपलब्ध होण्यास झालेला विलंब

**मु.शी.**: मा. राज्यपालांच्या निदेशाची प्रत उपलब्ध होण्यास झालेला विलंब यासंबंधी माननीय वित्त राज्यमंत्र्यांचे निवेदन

श्री. राजेंद्र मुळक (अर्थ राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी माननीय राज्यपाल महोदयांच्या निदेशाची प्रत उपलब्ध होण्यास झ ालेल्या विलंबासंदर्भात शासनाने निवेदन करावे अशाप्रकारची विनंती केली होती त्या अनुषंगाने नियम 46 अन्वये मी पुढील निवेदन करीत आहे.

सभापती महोदय, या संदर्भात दिनांक 14.3.2011 रोजी माननीय राज्यपालांचे इंग्रजी भाषेतील निदेश माननीय राज्यपालांचे सचिव यांच्यामार्फत दिनांक 10.3.2011 रोजी प्राप्त झाले. त्यानंतर दिनांक 14.3.2011 रोजी निदेशाची प्रत मराठी अनुवादाकरिता भाषा संचालनालयाकडे पाठविण्यात आली. दिनांक 18.3.2011 रोजी भाषा संचालनालयाकडून मराठी अनुवादाची प्रत सॉफ्ट कॉपीसह प्राप्त झाली. दिनांक 20.3.2011 रोजी सार्वजनिक सुट्टी होती. दिनांक 21.3.2011 रोजी भाषा संचालनालयाकडें पाठविलेल्या अनुवादाचा मसुदा माननीय राज्यपालांच्या निदेशानुसार बरोबर आहे किंवा कसा व निदेशाच्या अभिप्रेत असलेला गाभा बदलू नये या अनुषंगाने तपासणी करुन आवश्यक त्या सुधारणा करण्यात आल्या व राज्यपालांच्या सचिवांकडें पाठविण्याकरिता प्रस्तावित करण्यात आल्या. दिनांक 24.3.2011 ला माननीय राज्यपाल यांच्या सचिवांनी मराठी अनुवादाची प्रत मान्यतेसाठी अवलोकनार्थ पाठविण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्या नुसार अनुवादाची सॉफ्ट कॉपी माननीय राज्यपालांच्या सचिव कार्यालयास प्रधान सचिव, नियोजन विभाग यांच्या मान्यतेअंती दिनांक 24.3.2011 रोजी पाठविण्यात आली. सभापती महोदय, दिनांक 26 व 27.3.2011 रोजी शासकीय सुट्टया होत्या. दिनांक 28.3.2011 रोजी माननीय राज्यपाल यांची मान्यता घेण्याकरिता त्यांच्या कार्यालयात सक्षमरित्या उपस्थित राहून विनंती करण्यात आली. दिनांक 29.3.2011 रोजी माननीय राज्यपाल यांच्या कार्यालयाकडून मान्यता प्राप्त सदर अनुवाद पुन्हा मुद्रित करण्याबाबतच्या सूचना प्राप्त झाल्या. दिनांक 31.3.2011 रोजी माननीय राज्यपाल यांच्या निदेशाची मराठी अनुवादीत प्रत तपासणीअंती मुद्रणालयाकडे पाठविण्यात आली. दिनांक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. राजेंद्र मुळक....

1.4.2011 रोजी शासकीय मुद्रणालयाकडून मराठी अनुवादाची मुद्रित प्रत प्राप्त झाली. माननीय उप मुख्यमंत्री आणि वित्त नियोजन मंत्री यांच्या स्वाक्षरीने माननीय अध्यक्ष, विधानसभा व माननीय सभापती, विधानपरिषद यांना प्रत पटलावर ठेवण्याबाबत विनंती करण्यात आली.

सभापती महोदय, मी या ठिकाणी वरीलप्रमाणे घटनाक्रम सांगितला आहे. दि.2.4.2011 रोजी शासकीय सुट्टी असल्यामुळे सभागृहाच्या पटलावर प्रत ठेवण्यास विलंब झाला. दि.5.4.2011 रोजी माननीय उप मुख्यमंत्र्यांनी निदेशाची प्रत सभागृहाच्या पटलावर ठेवली. विलंब झाल्याची कारणे निवेदनात देण्यात आली आहेत. या संदर्भात श्री. मते, कक्ष अधिकारी, श्री. म्हात्रे, अवर सचिव, श्री. भांडारकर, उप सचिव यांना शो-कॉज नोटिस देऊन त्यांच्याकडून स्पष्टीकरण मागितले आहे. त्यांच्याकडून स्पष्टीकरण आल्यानंतर जर ते असमाधानकारक वाटल्यास त्या संदर्भात त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी या ठिकाण्ी घटनाक्रम वाचून दाखविला आहे. 22 तारखेला अर्थसंकल्प सादर करण्यात आला . दिनांक 24 रोजी माननीय राज्यपालांकडें मान्यतेसाठी प्रत पाठविण्यात आली, त्यांच्या कार्यालयाकडून दिनांक 28 रोजी प्रत प्राप्त झाली.. माझे एवढेच म्हणणे आहे की, माननीय राज्यपालांच्या कार्यालयामध्ये प्रत पाठविण्यास विलंब झाला आहे. या बाबत संबंधित अधिकाऱ्यांना शिक्षा करणे हा आमचा आग्रह असला तरी भविष्यात माननीय राज्यपालांनी दिलेल्या निदेशाचा अवमान होणार नाही याची संबंधित खात्याला काळजी घेण्यास सांगावे. बाकी आमची त्यांच्याविरुध्द काहीही तक्रार नाही. त्यांना शो-कॉज नोटिस दिली असली तरी आपण त्यांना फक्त समज द्यावी एवढेच मला सांगावयाचे आहे.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, भविष्यात माननीय राज्यपालांनी दिलेले निदेश वेळेवर सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतील.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**एस.एस.सी. बोर्डाच्या अभ्यासक्रमामध्ये आमूलाग्र बदल करण्यासंबंधी श्री. कपिल पाटील,वि.प.स. यांनी केलेली सूचना**

श्री. कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, एस.एस.सी. बोर्डाच्या संदर्भात विशेष करुन शिक्षणामध्ये आपला महाराष्ट्र देशाच्या पातळीवर तेराव्या क्रमांकावर आहे. या त्रुटी कशामुळे निर्माण झाल्या आहेत, आपण कां मागे पडत आहोत? केरळ, बिहार आणि दिल्ली ही तीन राज्ये आपल्यापुढे कां आहेत? देशामध्ये ही तीन राज्ये अव्वल स्थानावर आहेत. याचा शोध घेण्यासाठी आणि अभ्यास करण्यासाठी मुंबईतील काही चांगल्या शाळांमधील मुख्याध्यापक आणि तज्ज्ञ शिक्षक असे 30 जणांचे शिष्टमंडळ 10-10 जणांची टीम करुन आम्ही तीन राज्यांमध्ये पाठविले होते. मी स्वत:, शिक्षक भारती आणि मासूम या एन.जी.ओ. ने त्यासाठी मदत केली होती. ही टीम तीन राज्यामध्ये जावून आली आणि तेथील शालेय शिक्षण पध्दतीचा, एस.एस.सी. बोर्डाच्या अभ्यासक्रमाचा त्यांनी अभ्यास केला. त्यांनी त्या ठिकाणी जे पाहिले आणि त्यांनी ज्या शिफारशी केल्या आहेत त्या संबंधीचा अहवाल मी आपल्या मार्फत माननीय शिक्षण मंत्र्यांना देऊ इच्छितो. यामधील शिफारशी वाचून मी सभागृहाचा वेळ घेत नाही. या अहवालाची आपण दखल घ्यावी. शिक्षणामध्ये आपले राज्य कसे अव्वल होईल यादृष्टीने आपण प्रयत्न करावेत. धन्यवाद.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ D/ पूर्वी श्री.सरफरे . . . 14:05

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, आता सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील साहेबांनी अशी माहिती दिलेली आहे की, तीन राज्यांमध्ये अभ्यासक्रमाच्या बाबतीत ज्या चांगल्या गोष्टी आहेत किंवा त्यांनी एकंदर एस.एस.सी.बोर्डाबद्दल काही सांगितले.याबाबतीत मुंबईतील शाळांमधील मुख्याध्यापक आणि प्रमुख यांना तीन राज्यामध्ये पाठविण्यात आले. त्यासंबंधीचा अहवाल आणि शिफारशी त्यांनी आपल्या माध्यमातून मला द्याव्यात. याबाबतीत निश्चितपणे अभ्यास करण्यात येईल आणि याबाबत अभ्यास करुन सध्या राज्याचा आराखडा तयार करण्याचे काम सुरु आहे. त्यामध्ये निश्चितपणे त्याचा उपयोग करण्यात येईल.

-----

. . . .2 एस-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

21-04-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) SS-2

<u>नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील निवेदनांबाबत</u>

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये 93 च्या सूचनांच्या बाबतीत कुठेही उल्लेख करण्यात आलेला नाही. माननीय सभापती महोदयांनी साधारणपणे 132 93 च्या सूचना स्वीकारलेल्या आहेत अणि त्यापैकी 52 सूचनांच्या संबंधातील निवेदने सदनासमोर ठेवण्यात आली असून त्यापैकी 30 निवेदनांच्या बाबत चर्चा झालेली आहे. प्रत्येक अधिवेशनामध्ये 93 च्या सूचनांवरील निवेदने नेहमी उशिरा येतात म्हणून आम्ही पहिल्या आठवड्यापासून तक्रार करीत असतो.पण आजच्या कार्यक्रम पत्रिकेवर 93 अन्वये सूचनांच्या संदर्भातील निवेदना बाबत विषय देखील दाखविण्यात आलेला नाही.आतापर्यंत जी अधिवेशने झाली, त्यावेळी कमीतकमी 93 च्या सूचनांवरील निवेदने सदनाच्या पटलावर ठेवण्याबाबतचा विषय तरी कामकाज पत्रिकेमध्ये दाखविण्यात येतो आणि मग त्याबद्दल आम्ही नाराजी व्यक्त करतो.पण आज तर कहरच झालेला असून आजच्या कार्यक्रम पत्रिकेवर नियम 93 अन्वये सूचनांवरील निवेदने सदनाच्या पटलावर ठेवण्याबाबतचा विषयच दाखविण्यात आलेला नाही. सभापती महोदय, ही अतिशय गंभीर बाब आहे. मग नियम 93 अन्वये सूचनांच्या संबंधातील विषयच बाजूला करण्यात यावा असे माझे म्हणणे आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे,तो खरा आहे.आपल्या सभागृहाचे कामकाजाचे जे नियम आहेत,त्यामध्ये नियम 93 अन्वये देण्यात येणाऱ्या सूचनांचे आगळे-वेगळे महत्व आहे.विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांना प्रश्न उपस्थित करण्यासाठी एक चांगल्या प्रकारचे हत्यार उपलब्ध करुन दिलेले आहे.सभापती महोदय, याबाबतीत संकेत असे आहेत की,सन्माननीय सदस्यांनी नियम 93 अन्वये सूचना दिल्यानंतर नियमानुसार सात दिवसामध्ये सदरहू सूचनेच्या संदर्भातील निवेदने सदनासमोर आली पाहिजेत.याबाबतीत माझ्याजवळ जी माहिती आहे,त्यानुसार या अधिवेशनामध्ये सन्माननीय सदस्यांनी नियम 93 अन्वये एकंदर 287 सूचना दिलेल्या आहेत. त्यापैकी 132 सूचनांबाबत निवेदन करावे असे आदेश देण्यात आलेले आहेत. गेल्या 40 दिवसांमध्ये नियम 93 अन्वये देण्यात आलेल्या सूचनांपैकी केवळ 15 सूचनांच्या निवेदनावर चर्चा झालेली आहे.ज्या निवेदनांवर आजपर्यंत चर्चा झालेली नाही अशा निवेदनांची संख्या 117 आहे म्हणजेच 117 निवेदने सदना-समोर चर्चेसाठी आलीच नाहीत.तसेच नियम 93 अन्वये देण्यात येणाऱ्या सूचनांच्या संदर्भातील एकंदर 50 निवेदने आजपर्यंत विधान मंडळाकडे प्राप्त झालेली नाहीत.

श्री.जयंत प्र.पाटील :सभापती महोदय,आता सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

साहेब यांनी जी माहिती दिली आहे,त्यानुसार नियम 93 अन्वये देण्यात येणाऱ्या सूचनांच्या संदर्भातील एकंदर 50 निवेदने आजपर्यंत विधान मंडळाकडे प्राप्त झाली नसतील तर ती अतिशय गंभीर बाब आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी नियम 93 अन्वये ज्या सूचना दिलेल्या आहेत, त्याबाबत आपण असे निर्देश दिलेले आहेत की, याबाबत शासनाने निवेदन करावे. पण असे निदेश दिल्यानंतर सुध्दा अद्यापपर्यंत आम्हाला नियम 93 अन्वये सूचनांवरील निवेदने प्राप्त झालेली नाहीत आणि मघाशी उल्लेख केल्याप्रमाणे 50 निवेदने विधान मंडळाकडे देखील प्राप्त झ ाालेली नाहीत ही अतिशय गंभीर बाब आहे.त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी नियम 93 अन्वये ज्या सूचना दिलेल्या आहेत,त्या संदर्भातील निवेदनांच्या बाबतीत काय झाले आहे हे सदनाला समजले पाहिजे. ही निवेदने परस्पर कोण थांबवित आहे? आमची माहिती अशी आहे की, ज्याच्या विरुध्द नियम 93 अन्वये सूचना दिली जाते, तेच परस्पर विभागाच्या माध्यमातून तिकडच्या तिकडेच सदरहू निवेदने थांबविण्याचा प्रयत्न करतात ही देखील गंभीर बाब असून त्याची दखल घेतली पाहिजे. नियम 93 च्या सूचनांवरील निवेदने सदस्यांना मिळणार नसतील तर त्या सूचना मांडण्यामध्ये काही अर्थच रहाणार नाही. जर पैशाच्या जोरावर निवेदने थांबविली जात असतील तर हा वरिष्ठ सभागृहाचा, माननीय सभापतींचा अवमान आहे.एकदा माननीय सभापतींनी नियम 93 अन्वये वरील सूचनांवर निवेदन करावे असे म्हटल्या-नंतर जर भ्रष्टाचारी लोक ही निवेदने तिकडच्या तिकडे थांबविण्याचा प्रयत्न करणार असतील तर हा माननीय सभापती महोदयांचाही अपमान आहे म्हणून ही गंभीर बाब असून याबाबतीत सभापती महोदय आपण निर्णय दिला पाहिजे. आपण याबाबतीत चौकशी करावयास पाहिजे.मघाशी सांगितल्याप्रमाणे नियम 93 अन्वये देण्यात आलेल्या 132 सूचनांबाबत निवेदन करावे असे माननीय सभापतींनी आदेश दिले आहेत. परंतु नियम 93 अन्वये देण्यात आलेल्या 132 सूचना कुठे आहेत, त्या सूचना संबंधित विभागांकडे पाठविल्या आहेत की नाही, जर या सूचना संबंधित विभागांकडे पाठविण्यात आल्या असतील तर त्यांच्याकडून निवेदने का प्राप्त झाली नाहीत, ती कोणी थांबविली आहेत ? या सर्व बाबींची चौकशी होणे आवश्यक आहे. सभापती महोदय, आपण याबाबतीत चौकशी करण्याचे आदेश दिले पाहिजेत.

यानंतर कु.थोरात . . . .

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मराठी भाषेमध्ये एक शब्द आहे. तो थोडा अवघड शब्द आहे. "अरण्य रुदन" म्हणजे जंगलात जाऊन रडत बसावे, तसा प्रश्न या ठिकाणी निर्माण झालेला आहे. गेल्या तीन अधिवेशनामध्ये, अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशीच विरोधी पक्ष आठवण करुन देतात असे नाही तर त्याच्या अगोदर अधिवेशनाच्या पहिल्या आठवडयापासून नियम 93 अन्वये सूचनांची निवेदने आली पाहिजेत अशी आम्ही आठवण करुन देतो. परंतु नेहमीच्या पध्दतीने नियम 93 अन्वये सूचनांची निवेदने पुढच्या आठवडयात केली जातील असे सभागृहात सांगितले जाते. माझी अशी सूचना आहे की, प्रत्येक अधिवेशनाच्यावेळी अधिवेशन संपण्याच्या चार ते पाच दिवस आधी या संबंधीचा आढावा घेण्यात यावा. अन्यथा मी संसदीय शब्द वापरते 'कोडग्या सारखे" प्रत्येक अधिवेशनात परत तेच, परत तेच घडते. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी निवेदने येतात आणि ती चर्चेला न येता तशीच राहतात. मुंबई-पुणे एक्स्प्रेस हाय-वे वरील अपघाताच्या संदर्भात मी औचित्याचा मुद्दा मांडला, शासनाला अनेक निवेदने दिली. पण अशा प्रकारे शेकडो निवेदनांची वाऱ्यावर वरात निघणार असेल तर ना सरकारची प्रतिष्ठा राहील ना विधिमंडळाची प्रतिष्ठा राहील. म्हणून नियम 93 अन्वये सूचनांवरील निवेदनाला नेमका कुठे विलंब झाला या बद्दल संसदीय कार्य मंत्र्यांच्या वतीने निवेदन करण्यात यावे. सभापती महोदय, या बाबतीत फक्त नियम समितीत बोलणे पुरसे नाही तर या संदर्भात चौकशी झाली पाहिजे आणि पुढील अधिवेशनात या संबंधीचा तपशील या सभागृहाला मिळाला पाहिजे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशीच मी या संदर्भात माननीय सभापतींना विनंती केली होती. आता पर्यंतचा आमचा अनुभव असा आहे की, अधिकाऱ्यांना अशी चटक लागलेली आहे की, आपल्याला कोणी जाबच विचारु नये. आपण गुन्हेगार असलो तरी त्याबाबत कोणी बोलूच नये. आपण कुठे दोषी आढळून आलो तर आपल्यावर कारवाईच होऊ नये. मंत्रीही खुश असतात. आपल्या खात्याचा एक अधिकारी सांभाळला की, मग तो सगळे चहापाणी बघतो म्हणजे कार्यालयात गेल्या नंतर चहा वगैरे देणे, याबद्दल गैरसमज व्हायला नको. अधिकाऱ्यांना कसे सांभाळावयाचे याची दुर्दैवाने मंत्र्यांमध्ये शर्यत असते. या सरकारमध्ये हे सत्य

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

आहे. त्याचा परिणाम असा झालेला आहे की, या अधिकाऱ्यांना माहीत आहे की, आपण काहीही केले तरी काही होत नाही. या विधिमंडळाला कोण मोजत नाही. सभापती महोदय, अत्यंत गलिच्छ पध्दतीने या विधिमंडळाचा उल्लेख करण्यात येतो. आता सभागृहात एक लक्षवेधी सूचना चर्चेला येणार आहे. या लक्षवेधी सूचनेतील एक शिक्षक असे सांगतो की, मी विधान परिषदेला आणि विधानसभेला मोजतच नाही. त्याचे मुख्य कारण असे की, या विधिमंडळातून अधिकाऱ्यांना जरब बसायला पाहिजे, असे निर्णय व्हावयास पाहिजेत, ते होत नाहीत.

सभापती महोदय, पीठासीन अधिकारी म्हणून आपल्याकडून या सरकारला निर्देश देण्यात आले की, मी सभागृहात निर्णय दिल्या नंतर तिसऱ्या दिवशी निवेदन झाले पाहिजे. सभापती महोदय, आपल्या अशा प्रकारच्या निर्देशाची नोंद रेकॉर्डवर आहे असे असताना या अधिवेशनामध्ये ज्या नियम 93 अन्वये सूचना आल्या होत्या त्या संदर्भात सभापती महोदय, आपण निर्णय दिल्या नंतर त्या संबंधीची निवेदने तीन दिवसात आलेली नाहीत. त्या संदर्भात प्रधान सचिवांच्या माध्यमातून चौकशी नेमण्यात यावी आणि आपण निर्णय दिल्यानंतरही जी निवेदने करण्यात आली नाहीत त्यांची एक यादी तयार करण्यात यावी आणि या संदर्भात ज्या ज्या विभागाचे अधिकारी दोषी आहेत त्या संदर्भात पुढच्या अधिवेशनामध्ये माहिती द्यावी. त्यानंतर त्यांच्यावर काय कारवाई करावयाची या संदर्भात संबंधित विभागाला निर्देश देण्यात यावेत. अन्यथा हे प्रशासन असे वळणार नाही. आम्ही नियम 93 अन्वये सूचना देत राहू, पीठासीन अधिकारी आदेश देत राहतील, आणि पुढे काहीच होणार नाही. अधिवेशन संपले की, फाईली बगलेत मारुन लाल दिव्यांच्या गाडया घेऊन मंत्री महोदय गावोगाव फिरायला मोकळे होतात आणि अधिकारीही त्यांचे कामकाज करायला मोकळे होतात. आम्ही सदस्य म्हणून सभागृहात नियम 93 अन्वयेच्या सूचना मांडल्या तरी संबंधित लोक आपल्या गावामध्ये जाऊन हात वर करुन विधानसभेला कोणी मोजत नाही असे सांगावयाला मोकळे होतात. ही विधिमंडळाची अत्यंत अप्रतिष्ठा आहे. सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून माननीय सभापतींना सांगू इच्छितो कारण ते आमचे म्हणणे ऐकत असतील. ते या ठिकाणी येतील तेव्हा याबाबतीत त्यांनी जाहीर करावे. या अधिवेशनात देण्यात आलेल्या नियम 93 अन्वये सूचनांच्या संदर्भात प्रधान सचिवांच्या माध्यमातून चौकशी नेमण्यात यावी, तरच या संबंधीचा निर्णय होऊ शकेल.

..3...



SMT/ 14:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, ही अतिशय गंभीर बाब आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले त्या प्रमाणे मागील तीन अधिवेशनात सातत्याने हाच प्रश्न चर्चेला आल्यानंतर प्रत्येक अधिवेशनामध्ये एका कॅबिनेट मंत्र्यांनी सभागृहात उत्तर दिले की, चार दिवसात नियम 93 अन्वये सूचनांची निवेदने सादर करण्यात येतील. मी या अधिवेशनामध्ये 20 ते 22 मार्चच्या दरम्यान दोन नियम 93 अन्वये सूचना दिल्या होत्या. आज दिनांक 22 एप्रिल आहे. तरी देखील त्या सूचनांवरील निवेदने अद्याप करण्यात आलेली नाहीत किंवा आज अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी सभागृहाच्या पटलावर देखील ठेवण्यात आलेली नाहीत.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

श्री. गोपिकिसन बाजोरिया ....

या अधिवेशनामध्ये मी नियम 93 अन्वये 2 सूचना 20 ते 22 मार्चच्या दरम्यान दिल्या होत्या. आज 21 एप्रिल तारीख आली तरी त्यांची निवेदने आलेली नाहीत. पटलावर सुध्दा निवेदन आलेले नाही. तीन कॅबिनेट मंत्र्यांनी आपल्या आदेशानंतर उत्तरामध्ये सांगितले होते की, 4 दिवसांमध्ये नियम 93 च्या सूचनेवरील निवेदने पटलावर ठेवण्यात येतील. परंतु निवेदने पटलावर सुध्दा ठेवत नाहीत आणि घरी सुध्दा पाठवित नाहीत. हा सभागृहाचा अपमान आहे. त्याचबरोबर त्या आयुधाचा सुध्दा अपमान आहे. आपल्या आयुधामध्ये नियम 93 बादच केलेला आहे का ? अशा परिस्थितीमध्ये आपण या सभागृहामध्ये सुस्पष्ट निदेश द्यावेत अशी मी विनंती करतो.

**सभापती** : नियम 93 अन्वये देण्यात येणाऱ्या सूचना हे अत्यंत महत्वाचे आयुध असून या आयुधाचा सेन्सॉर जरी आपणाला देता आला नाही तरी आपण या आयुधाचा वापर करतो. सभागृहामध्ये नियम 93 अन्वयेच्या ज्या सूचनांवर निवेदने करावयास सांगितली जातात ती निवेदने त्या त्या विभागाने तातडीने करावीत अशी आपली अपेक्षा आहे. मला असे वाटते की, विधान परिषदेच्या माध्यमातून येणाऱ्या ज्या सूचना किंवा बाबी असतील त्यांना सर्वोच्च प्राधान्य देणे सरकारचे काम आहे आणि त्या दृष्टीने स्वत: लक्ष घालावे, त्या त्या विभागाला सूचना द्याव्यात याकरिता मी यापूर्वी सुध्दा एकदा मुख्य सचिवांना माझ्या कार्यालयात बोलविले होते. आज या ठिकाणी एकूण 58 निवेदने प्राप्त झालेली आहेत. आपली जी इच्छा आहे ती खरी आहे की, आपण जो विषय नियम 93 अन्वयेच्या सूचनेव्दारे उपस्थित करतो त्याची 100 टक्के निवेदने येण्यामध्ये काय अडचण आहे ? या दृष्टीने मी सांगेन की, येत्या आठ दिवसात या अनुषंगाने मी मुख्य सचिवांना तसेच सन्माननीय विरोधी पक्ष नेते, गट नेते यांना माझ्या दालनामध्ये चर्चेसाठी बोलवीन. त्यावेळी नियम समितीच्या सन्माननीय सदस्यांना सुध्दा बोलवीन. या ठिकाणी सभापती, उप सभापती किंवा तालिका सभापती काही सूचना देतात त्याची जर योग्य पध्दतीने अंमलबजावणी झाली नाही तर ती बाब योग्य नाही. या दृष्टीने मी पूर्वी जसा प्रयत्न केला त्याच पध्दतीने येत्या आठ दिवसांमध्ये मुख्य सचिवांना बोलवीन आणि त्यांना सूचना देईन की, ही निवेदने असतील,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**सभापती** .....

एखादी औचित्याची बाब असेल, विशेष उल्लेखाची बाब असेल किंवा नियम 93 अन्वये दिलेल्या सूचना असतील त्या बाबतीत काटेकोरपणे कार्यवाही करण्यात यावी. आज या ठिकाणी जी 58 निवेदने प्राप्त झालेली आहेत ती तातडीने सन्माननीय सदस्यांना वितरित करण्यात येतील. मला असे वाटते की, हे यापूर्वीच झाले असते तर सन्माननीय सदस्यांनी आज ज्या पध्दतीने या ठिकाणी आपल्या भावना व्यक्त केल्या, ती परिस्थिती आली नसती. म्हणून नियम 93 अन्वयेच्या सूचनेच्या अनुषंगाने आपल्याला एखादी निश्चित अशा पध्दतीची कार्यवाही कशी करता येईल या बाबत मी चर्चा करणार आहे. कारण विधानसभेमध्ये अशा प्रकारची सूचना सेन्सॉर म्हणून येते पण विधान परिषदेमध्ये सेन्सॉरची प्रोव्हीजन नाही त्या करिता आपण ही व्यवस्था केलेली आहे. म्हणून त्या दृष्टीने मी नियम समिती बरोबरही चर्चा करणार आहे आणि या सर्व गोष्टी तातडीने होण्याकरिता मी मुख्य सचिवांना सुध्दा बोलविणार आहे आणि त्यावेळी माननीय विरोधी पक्ष नेते, गट नेते यांनाही बोलवून मी त्या बाबत चर्चा करणार आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी आपली आभारी आहे तसेच सर्वच सन्माननीय सदस्य आपले आभारी आहेत. आपली आजच्या दिवसाच्या कामकाजाची जी पत्रिका आहे त्या बाबत माझा मूलभूत प्रश्न आहे. आपल्या सगळ्या प्रधातामध्ये शेवटच्या दिवशी नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील निवेदने एवढा उल्लेख तरी कामकाज पत्रिकेवर असतो. जरी चर्चा झाली नाही तरी उल्लेख असतो. पण आजच्या दिवसाच्या कामकाजामधून नियम 93 चा उल्लेख का काढण्यात आला हे आम्हाला समजले तर बरे होईल.

**सभापती** : आज कामकाज पत्रिकेमध्ये जे एकूण कामकाज दाखविले आहे ते आपल्या सर्वसाधारण कामकाजापेक्षाही जास्त आहे. नियम 97 अन्वये 4 चर्चा आहेत. सर्वसाधारणपणे आपण नियम 97 अन्वये एवढ्या चर्चा एकाच दिवशी घेत नाही. पण मला कोकणातील आंब्याच्या संदर्भातील चर्चा महत्वाची वाटली. म्हणून ती चर्चा उपस्थित करण्यास मी अनुमती दिली. एकदा प्रश्नोत्तराच्या तासामध्ये शिवछत्रपतींच्या अरबी समुद्रातील स्मारकाच्या संदर्भातील प्रश्न चर्चेला आला होता त्या विषयावरील चर्चेला देखील मी परवानगी दिली होती.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**....

परंतु वेळे अभावी ती चर्चा आजपर्यंत होऊ शकली नाही. मराठी भाषेच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी काही दिवसांपूर्वी नियम 289 अन्वये प्रस्ताव दिला होता. त्यावेळी मी त्यांना सांगितले होते की, प्रस्तावातील विषय महत्वाचा आहे, मूलभूत स्वरुपाचा आहे. त्या विषयावरील चर्चा देखील आजच्या कामकाज पत्रिकेत दाखविण्यात आली आहे. सन्माननीय सदस्यांचे कदाचित असे म्हणणे असू शकेल की, नियम 97 अन्वये एवढ्या चर्चा घेण्याचे कारण काय ? परंतु सभापतींना त्या त्यावेळची परिस्थिती पाहून निर्णय घेण्याचा अधिकार आहे असे मला वाटते. माझ्या कार्यालयाने नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील निवेदन चर्चेसाठी घेण्याचे ठरविले होते. परंतु मी अधिकाऱ्यांना असे सांगितले की, आज नियम 97 अन्वये एकूण 4 अल्पकालीन चर्चा होणार असल्यामुळे त्यासाठी 2 तासाचा वेळ लागेल. त्याशिवाय नियम 93 ची निवेदने चर्चेसाठी घ्यावयाची असतील तर त्यासाठी आणखी काही वेळ लागेल. म्हणून आज नियम 93 ची निवेदने चर्चेसाठी दाखवू नयेत. त्यामुळे नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील निवेदने कामकाज पत्रिकेवर घेण्यात आलेली नाहीत. तरी...

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ज्या ज्या नियम 93 अन्वयेच्या सूचनांवर शासनाने निवेदन करण्याचे आपण निदेश दिलेले आहेत. ती निवेदने किमान सभागृहाच्या पटलावर तरी ठेवली गेली पाहिजे. कारण आज अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे.

**सभापती** : नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील निवेदनांच्या संदर्भात माझी अशी कल्पना होती की, ही निवेदने सन्माननीय सदस्यांना पोस्टाद्वारे पाठविण्यात यावीत. परंतु सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितल्या प्रमाणे नियम 93 अन्वयेच्या सूचनांवरील निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतील. आज एकूण 58 निवेदने चर्चेसाठी उपलब्ध झाली आहेत.

-----

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**:   औचित्याचा मुद्दा

**सभापती** : सन्माननीय सदस्या ॲड.उषा दराडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे.  त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी एक औचित्याचा मुद्दा मांडला होता.  त्यावेळी त्यांनी असे म्हटले होते की, बीड जिल्ह्यात 50 हजार ऊसतोड कामगार आहेत.  या ऊसतोड कामगारांची मुले शाळेपासून वंचित होतात.  या मुलांची जेवणाची व्यवस्था शासनाकडून केली जाते.  परंतु एप्रिल महिन्यापासून या मुलांना जेवण दिले जात नाही. हा विषय मांडला होता त्यावेळी माननीय उप सभापती आसनस्थ होते.  त्यांनी शासनाला असे निदेश दिले होते की, या मुलांचे जेवण 1 तारखेपासून सुरु करावे.  परंतु अद्यापपर्यंत जेवण सुरु करण्यात आलेले नाही.  सभागृहामध्ये माननीय शालेय शिक्षण मंत्री उपस्थित आहेत.  मला आपल्यामार्फत त्यांना विनंती करावयाची आहे की, दरवर्षी शासनाकडून जेवणासाठी कोट्यवधी रुपये खर्च केले जातात.  त्यातून या मुलांची ताबडतोब जेवणाची व्यवस्था करावी.

त्याचबरोबर बीड जिल्ह्यात या मुलांसाठी कायम स्वरुपी वसतिगृह सुरु करण्यासाठी शासनाने तातडीने उपाययोजना करावी अशी मी विनंती करीत आहे.

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या ॲड.उषाताई दराडे यांनी मार्च महिन्यापर्यंत ऊसतोड कामगार व त्यांची मुले बाहेर जातात त्यामुळे ही मुले इतरापेक्षा मागे राहतात असा औचित्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. या मुलांची जेवणाची व्यवस्था मार्च महिन्यापर्यंतच करण्यात आली होती.  एप्रिल महिन्याचे जेवण देण्यासाठी निधी उपलब्ध नसल्याचे त्यांनी सांगितले आहे.  एप्रिल महिन्यात जेवणासाठी लागणारी संपूर्ण रक्कम मी उपलब्ध करुन देतो. सगळयात महत्वाचा मुद्दा असा आहे की, या मुलांना केवळ जेवण देऊन चालणार नाही.  त्या ठिकाणी हंगामी वसतिगृह होण्याची आवश्यकता आहे.  या मुलांची संख्या खूप मोठी आहे.  त्यामुळे येणाऱ्या वर्षामध्ये हंगामी वसतिगृह बांधण्यासाठी निधीची व्यवस्था करण्यात येईल.

3....





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी असे सांगितले की, एप्रिल महिन्याचे सर्व पैसे देण्यास शासन तयार आहे. आज 21 एप्रिल आहे. त्यामुळे 1 एप्रिल ते 20 एप्रिल पर्यंत ही मुले उपाशी राहिली आहेत त्याबाबत शासनाची भूमिका काय आहे, त्यांनी असे सांगितले आहे की, एप्रिल महिन्याचे शासन पैसे देणार आहे.

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, त्या मुलांना आजही जेवण दिले जात आहे. परंतु त्यासाठी लागणारी रक्कम देण्याचा मुद्दा सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताईंनी उपस्थित केला होता. म्हणूनच मी असे सांगितले की, शासन त्या बाबतची व्यवस्था करणार आहे.

-----

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, आदिवासी उपयोजनेतील माध्यमिक शाळांमधील शिक्षकांना 2010 पासून वेतन मिळालेले नाही. या संदर्भात आदिवासी विभागाला या बाबत माहिती दिली आहे. तरी सुध्दा त्यांचे पगार मिळालेले नाहीत. या आर्थिक वर्षात शासनाने तरतूद केली नसल्यामुळे हे शिक्षक वेतनापासून वंचित राहतील. यासाठी शासनाने आर्थिक तरतूद करावी अशी मी विनंती करतो.

( विरोधी पक्षातील काही सदस्य एकाच वेळी बोलत असतात. )

**सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडल्यानंतर मंत्री महोदयांनी त्याबाबत उत्तर दिले आहे. अन्य सन्माननीय सदस्यांना औचित्याचा मुद्दा मांडण्यास मी परवानगी दिली आहे असा त्याचा अर्थ होत नाही.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई : सभापती महोदय, माझा एक प्रश्न स्वीकारल्या संबंधी मला दिनांक 18.3.2011रोजी लेखी माहिती देण्यात आली होती. त्यानंतर मला सांगण्यात आले की, दिनांक 21.3.2011रोजी माझा प्रश्न घेण्यात येईल. अद्यापही तो प्रश्न घेण्यात आलेला नाही हे मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

**सभापती** : ठीक आहे.

श्री एस. क्यू. जमा : माननीय सभापति जी, आपने अभी यहां पर एक निर्णय लिया है कि आप अपने चेंबर में मीटिंग लेंगे. मेरा आपसे अनुरोध है कि जब आप अपने चेंबर में मीटिंग लें तो उस मीटिंग में मेरे दो मुद्दों पर भी आप विचार कर सकें तो बहुत अच्छा होगा.

मेरा पहला मुद्दा यह है कि आज इस अधिवेशन का आखिरी दिन है और आज की कार्यक्रम पत्रिका में विषय तो बहुत हैं लेकिन समय बहुत कम है. इसलिए मुझे लगता है कि उन सभी विषयों पर आज यहां पर चर्चा नहीं हो पाएगी, ऐसी परिस्थिति में मैं कहना चाहूंगा कि हमारे नियमों में इस तरह का प्रावधान किया जाना चाहिए कि जरुरत पड़ने पर हम अधिवेशन को एक-दो दिन के लिए और बढ़ा सकें. ताकि जिन विषयों पर चर्चा नहीं हो पायी है, उन विषयों पर चर्चा की जा सके.

मेरा दूसरा मुद्दा यह है कि अनेक बार इस सभागृह में बहुत ही महत्वपूर्ण विषयों पर चर्चा होती है और उस समय विभिन्न माननीय सदस्यों को अपने विचार रखने के लिए दिए जाने वाले समय का बंटवारा समान रुप से नहीं हो पाता है. किसी माननीय सदस्य को बहुत ज्यादा समय मिल जाता है और किसी माननीय सदस्य को बहुत कम समय दिया जाता है. इसलिए आपके चेंबर में होने वाली बैठक में इस बात पर विचार करने का भी मैं आपसे अनुरोध करुंगा कि सदन में होने वाली चर्चा में सभी माननीय सदस्यों को पर्याप्त समय कैसे दिया जा सकता है, इस बारे में भी उचित निर्णय लिया जाना चाहिए. इन्हीं दो मुद्दो की ओर मैं आपका ध्यान आकर्षित करना चाहता हूं.

-0-

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**पृ.शी.**: कोकणात झालेल्या अवकाळी पावसामुळे आंबा व काजू पिकाचे झालेले नुकसान

**मु.शी.**: कोकणात झालेल्या अवकाळी पावसामुळे आंबा व काजू पिकाचे झालेले नुकसान या विषयावर श्री. रामदास कदम, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा

**उप सभापती** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी मी 30 मिनिटांचा वेळ दिलेला आहे. सूचना देणारे सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम हे आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री. रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :-

"आधीच हवामानाच्या लहरीपणामुळे कोकणातील आंबा बागायतदार हवालदिल होणे, त्यातच माहे एप्रिल, 2011च्या सुमारास झालेल्या अवकाळी वादळी पावसामुळे अत्यल्प लागलेला आंबा देखील गळून पडणे, कृषी खात्याने संरक्षण केलेल्या 30 टक्के आंब्याचे पीक देखील त्यानंतर आलेल्या अवकाळी पावसाने गळून पडल्यामुळे आंबा व काजू बागायतदार पूर्णपणे उद्ध्वस्त होणे, परिणामी आंबा बागायतदारांमध्ये पसरलेले चिंतेचे वातावरण, याकरिता कोकणातील शेतक-यांना शासनाने तातडीने भरीव आर्थिक मदत देण्याबाबत निर्णय घेण्याची आवश्यकता."

सभापती महोदय, जैतापूर येथील अणुऊर्जा प्रकल्पाच्या माध्यमातून कोकण उद्ध्वस्त होत आहे अशी भावना सर्व कोकणवासीयांच्या मनामध्ये निर्माण झालेली आहे. जैतापूरचे सुलतानी संकट आणि अचानक आलेल्या अवकाळी पावसामुळे आंबा, काजू पिकाचे मोठ्या प्रमाणावर झालेले नुकसान हे अस्मानी संकट, अशा अस्मानी आणि सुलतानी संकटामध्ये कोकणातील शेतकरी सापडलेला आहे. त्याला दिलासा देण्यासाठी शासनाने तातडीने कारवाई करावी हे सांगण्यासाठी मी ही अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे. दिनांक 14-15 एप्रिलला कोकणामध्ये जोरदार वादळी पाऊस झाला. किडीच्या प्रादुर्भावातून जो काही 10 टक्के आंबा शिल्लक राहिला होता तो

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री कदम....

या अवकाळी वादळी पावसामुळे पूर्णपणे गळून पडलेला आहे. आंब्याचे पीक पूर्णपणे नष्ट झालेले आहे. आंब्याची जी परिस्थिती आहे तिच काजूच्या बाबतीत आहे. आंबा आणि काजू फळबागांवर अवलंबून असलेल्या शेतक-यांवर आता उपासमारीची पाळी आलेली आहे. राज्य शासनाने 10-15 वर्षापूर्वी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून कोकणामध्ये फळबाग योजना राबविली. या योजनेअंतर्गत कोकणामध्ये लोकांनी आंबा आणि काजूची मोठ्या प्रमाणावर लागवड केली. आता कुठे आंबा आणि काजूचे पीक हातामध्ये येतेय असे वाटत असतानाच अवकाळी पावसामुळे ते हातातून गेलेले आहे.

....नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

सभापती महोदय, मी या विषयाच्या बाबतीत अधिक बोलणार नाही. पूर्वी किडीच्या प्रादुर्भावाने आंबा व काजू पिकाचे नुकसान झाले होते, त्या बाबतीत विधानसभेत चर्चा झाली होती. त्यावेळी शासनाने या फळपिकांच्या बाबतीत सर्वे करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे कृषी विभागाने सर्व्हे होता. त्यावेळी 30 टक्के आंबा पीक शिल्लक राहिले आहे अशा प्रकारचा अहवाल दिला होता. त्यानंतर आता अवकाळी व वादळी पाऊस कोकणात पडला आहे. त्यामुळे जो काही 30 टक्के आंबा शिल्लक होता, त्यातील एक टक्का, दोन टक्के आंबा शिल्लक राहिलेला नाही. पूर्वी अशा प्रकारचे नुकसान झाले त्यावेळी कोकणातील आंबा, काजू उत्पादक शेतकऱ्यांना प्रत्येक झाड निहाय आर्थिक मदत देण्यात आली होती, त्याप्रमाणे याही वेळेला आंबा व काजू उत्पादक शेतकऱ्यांना झाडनिहाय आर्थिक मदत देण्यात यावी अशी माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, कोकणात अवकाळी पाऊस झाल्यामुळे आंबा व काजू उत्पादक शेतकऱ्यांचे फार मोठया प्रमाणात नुकसान झाले असून तेथील शेतकरी पूर्णपणे उद्ध्वस्त झालेले आहेत. विधान परिषदेला सुटी होती, त्या कालावधीत मी सिंधुदुर्ग, रत्नागिरी या जिल्हयामध्ये गेलो होतो. तेथील शेतकरी अतिशय चिंताग्रस्त अवस्थेत मला दिसले. कोकणात मागच्या वेळी अशाच प्रकारची परिस्थिती निर्माण झाली होती, त्यावेळी शासनाने आंबा,काजू उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक मदत दिली होती. गेल्या तीन चार वर्षापासून कोकणातील आंबा व काजू उत्पादकांवर संकट कोसळते आहे. राष्ट्रीय विमा योजनेत आंबा आणि काजू या फळपिकाचा समावेश केला आहे, या दोन राष्ट्रीय फळांचा अंतर्भाव राष्ट्रीय पीक विमा योजनेत झालेला आहे यासंबंधी मला पत्र प्राप्त झालेले आहे त्याची प्रक्रिया कधीपासून सुरु करण्यात येणार आहे?

राजापूरमधील सोलगाव पंचक्रोशीमध्ये वादळी पावसामुळे 350 एकर पीक क्षेत्र उद्ध्वस्त झालेले आहे. त्या ठिकाणच्या 54 उत्पादकांचे पंचनामे झालेले आहेत. मला अशी धास्ती वाटते की, विभाग वणवा म्हणून दाखवील आणि तेथील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिली जाणार नाही. त्या ठिकाणी वणवा नव्हता, त्या ठिकाणी प्रचंड वादळी वारे आले होते आणि त्यामुळे 350 एकरवरील पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. मी स्वत: त्या ठिकाणी जाऊन आलो, तसेच फळ पीक उत्पादकांना प्रत्यक्ष भेटलो. त्यामुळे त्यांना देखील मदत देण्याची गरज आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे तेथील शेतकऱ्यांवर संकट कोसळले आहे. कोकणातील आंबा व काजू उत्पादक शेतकऱ्यांना काही प्रमाणात दिलासा दिला होता. त्याप्रमाणे याही वेळेला त्यांना आर्थिक मदत देऊन दिलासा द्यावा अशी माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे.

---------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, कोकणामध्ये आंबा, काजू हे प्रमुख पीक म्हणून ओळखले जाते. नोव्हेंबर अखेर कोकणात अवकाळी पाऊस पडला त्यामुळे आंब्यास मोहोर येण्यास उशीर झाला. आब्यास मोहोर आला होता, परंतु थंडीचा कालावधी वाढल्यामुळे मोहोर फुलावर नर फुलाचे प्रमाण जास्त झाल्यामुळे फळधारणा कमी झालेली आहे. ढगाळ वातावरण आणि तापमानात होणारा बदल यामुळे फळधारणा कमी झालेली आहे. सिंधुदूर्ग जिल्हयात 1 लाख 41 हजार हेक्टर जमिनीवर लागवड झालेली आहे. रत्नागिरी जिल्हयात 2 लाख 74 हजार हेक्टर जमिनीवर लागवड झालेली आहे. आंबा आणि काजू या फळा बरोबर रातंबा यापासून कोकम व अन्य पदार्थ बनविले जातात. रातंब्याचे देखील पीक कमी झालेले आहे. सिंधुदुर्ग जिल्हयातील जांभूळ परदेशात निर्यात केले जाते. त्याचेही उत्पादन या वेळी कमी झालेले आहे. दर दिवशी मुंबईत 10 ते 15 ट्रक जांभूळ येत असतात. ते येणे देखील बंद झालेले आहे. फणस देखील कमी झालेले आहेत. करवंदे लागली नाहीत, कोकणातील सर्व प्रकारची फळे हवामानामुळे नष्ट झालेली आहेत...

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर......

त्यामुळे कोकणातील आंबा फळासाठी आतापर्यंत एकरी क्षेत्रानुसार नुकसान भरपाई दिली. शासनाने किमान आंब्याच्या प्रत्येक झाडासाठी 1000 रुपये व काजूच्या प्रत्येक झाडासाठी 500 रुपये नुकसान भरपाई जाहीर करावी. त्याचप्रमाणे कोकम, जांभूळ व फणस या फळझाडांसाठी नव्याने योजना जाहीर करुन नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी मी मंत्री महोदयांना विनंती करतो.

---

2 वाय.2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम (पुनर्वसन व मदत कार्य मंत्री) : सभापती महोदय, माननीय सदस्य सर्वश्री रामदास कदम, संजय केळकर व परशुराम उपरकर यांनी कोकणातील आंबा फळपिकाच्या नुकसानीबद्दल अल्पकालीन चर्चा उपस्थित केली आहे. पंचनामे पूर्वीच झालेले आहेत. मागच्या अवकाळी पावसामुळे काही पंचनामे शिल्लक असतील तर पुन्हा पंचनामे केले जातील. मी आताच कॅबिनेट सब कमिटीच्या बैठकीला उपस्थित राहून आलो. त्या समितीसमोर इतर चार-पाच जिल्हयातील फळपिकांच्या नुकसानीचा प्रश्न सादर झालेला होता. अशा प्रकारे पुन्हा फळपिकांचे नुकसान झाले असेल तर जिल्हाधिकाऱ्यांना सूचना दिल्या जातील. पुन्हा पंचनामे करुन अहवाल मागवू. फलोद्यान विभागाशी संबंधित हा प्रश्न आहे. त्या विभागाकडून सुध्दा अहवाल येतील आणि त्या नंतर माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन आणखी काही मदत देता येईल काय याचा विचार केला जाईल.

श्री.हुसेन दलवाई : झाडामागे नुकसान भरपाई दिली जावी अशी विनंती आहे.

श्री.रामदास कदम : आर्थिक मदत देत असताना प्रत्येक झाड नजरेसमोर ठेवून मदत द्यावी.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, नुकसान भरपाई देण्यासाठी मागच्या वेळी जो पॅटर्न ठरला होता, जी पध्दत अवलंबिली होती त्या पध्दतीचा पुनर्विचार करु.

-----

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: बोरीवली, मुंबई येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील झोपडीधारकांचे एसआरए योजनेंतर्गत अद्याप पुनर्वसन न होणे

मु.शी.: बोरीवली, मुंबई येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील झोपडीधारकांचे एसआरए योजनेंतर्गत अद्याप पुनर्वसन न होणे याबाबत श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री अनिल भोसले, रमेश शेंडगे, संदीप बाजोरिया, जयवंतराव जाधव यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"बोरीवली मुंबई येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यान झोपडपट्टीत १ जानेवारी, १९९५ पूर्वी राहणा-या सुमारे १२,००० झोपडपट्टीधारकांचे एसआरए योजनेअंतर्गत चांदिवली येथे पुनर्वसन करण्याचा सुमारे ५ वर्षांपूर्वी घेण्यात आलेला निर्णय, अद्याप झोपडपट्टीधारकांना पहिल्या टप्प्यातील घरेही न मिळणे, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान येथील सर्व्हे क्रमांक ए-२३९ बाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने तेथे राहणारे रहिवाशी हे वन जमिनीवर अतिक्रमित आहेत किंवा नाही याची चौकशी करण्याबाबत दिलेले आदेश, मात्र सदर आदेशाची पूर्तता अद्याप न होणे, त्यामुळे तेथील रहिवाश्यांत निर्माण झालेला असंतोष व निराशेचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.सचिन अहिर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-1....

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, निवेदनामध्ये मूळ सिव्हील अपील क्र.2352/05 मा.सर्वोच्च न्यायालयाने अंतिमत: फेटाळला आहे असे म्हटले आहे. मी सभागृहाला माहिती देऊ इच्छिते की, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान हे 1950 साली कृष्णगिरीचे जन्मस्थान म्हणून ओळखले जायचे. त्यावेळी या उद्यानाचे क्षेत्रफळ 20 चौ.कि.मी.होते. 1960 साली हे क्षेत्र वन विभागाकडे हस्तांतरित करण्यात आले. हे उद्यान 1968 मध्ये बोरीवली नॅशनल पार्क म्हणून ओळखले जाऊ लागले. 1972 मध्ये या उद्यानाचे पोट विभाजन झाले. 1976 मध्ये मुंबई उपनगर जिल्हयातील 44.45 चौ.कि.मी.व ठाणे जिल्हयातील 58.64 चौ.कि.मी.क्षेत्र या उद्यानासाठी संपादित केले गेले. अशा प्रकारे 103 चौ.कि.मी.क्षेत्र या राष्ट्रीय उद्यानासाठी नव्याने संपादित करण्यात आले. मुंबई शहराचे एकूण क्षेत्रफळ 437 चौ.कि.मी. इतके आहे. वन विभागाकडून खाजगी जमीन मालकांना भूसंपादनाची नोटीस देण्यात येऊन 103 चौ.कि.मी.एवढी जमीन वन विभागाने आपल्याकडे घेतली. 1981 मध्ये या उद्यानाचे 'संजय गांधी राष्ट्रीय उद्यान' असे नामकरण करण्यात आले. मुंबई उपनगरातील मालाड, कांदिवली, बोरीवली, दहिसर व मुलुंड येथील जमीन वन विभागाने संपादित केली. परंतु ही जमीन संपादित करताना वन विभागाने कोणत्याही नियमाचे पालन केले नाही. 103 चौ.कि.मी.क्षेत्र वन विभागाला दिल्यानंतर या क्षेत्राबाहेर ज्या वस्त्या होत्या, त्या वस्त्यांचा वन विभागाशी काही संबंध नव्हता. या वस्त्यांमध्ये राहणाऱ्या लोकांना भूसंपादनाची नोटीस दिलेली नव्हती. या वस्त्यांमधील 68 हजार लोकांची घरे वन विभागाने निष्कासित केली. वन विभागाला हा अधिकार नव्हता.

नंतर 2झेड.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र. 1........ श्रीमती विद्या चव्हाण .......

या निमित्ताने मी असा प्रश्न विचारु इच्छिते की, मालाड येथील सर्व्हे क्र. 239 कसा तयार झाला व जुना सर्व्हे नंबर कोणता होता तसेच ही जमीन कोणाची होती ? खरे तर या जमिनीचा मूळ मालक हा वेगळाच असून त्याचे सर्व्हे क्र. 143 पासून 270 पर्यंत असून एकूण 1694 एकर जमीन त्याच मालकाच्या ताब्यात होती. या मूळ मालकाने सन 1971 मध्ये यातील 163 ते 177 सर्व्हे क्रमांकाची 206 एकर शेतजमीन म्हणून वापरात आणली होती व तशी नोंद मालमत्ता पत्रकात व तहसीलदाराकडे देखील झालेली आहे. नंतर 1488.33 एकर जमीन उरली व त्या जमिनीला सन 1975 मध्ये संपादनाची नोटीस देण्यात आली होती. त्यानंतर एफ.ई. दिनशॉ ट्रस्ट याविरुध्द कोर्टात गेले. त्यांनी कोर्टात सांगितले की, आम्हाला ही जमीन संपादनासाठी देणे शक्य नाही. तसेच सन 1979 मध्ये या जमिनीबाबत न्यायालयात समझोता करार झाला व त्यानुसार 848.20 एकर आणि 12 आणे एवढ्या जमिनीवर वन विभागाचे नाव लागले. या जमिनीवर कोणत्याही प्रकारचे डिमार्केशन न लावता, तिची कोणतीही मोजणी करुन न घेता 206 एकर जमिनीसह, ज्या 206 एकर जमिनीची नोंद रेकॉर्डवर शेतजमीन म्हणून झालेली आहे, तिच्यावरील घरे तोडली. म्हणून माझा प्रश्न आहे की, वन विभागाने जी जमीन त्यांची आहे असे सांगितले त्या 239 सर्व्हे नंबरचे क्षेत्रफळ किती होते, त्यातून वन विभागाला किती जमीन देण्यात आली व ती कोणी दिली ?

श्री. सचिन अहिर : महोदय, या लक्षवेधी सूचनेमागचा हेतू इतकाच आहे की, या भागातील लोकांच्या पुनर्वसनाबाबत कोणती भूमिका घेणार आहे. पुनर्वसनाच्या बाबतीत विशेष करुन गृह निर्माण विभागाशी या प्रकरणाचा संबंध येतो. कारण या जमिनीचे प्रकरण उच्च न्यायालयात गेल्यानंतर कॉम्पीटंट ऑथॉरिटी म्हणून वन विभागाला पुनर्वसनाची जबाबदारी शासनाकडून देण्यात आली अशी कोर्टात भूमिका घेण्यात आली होती. यामध्ये पुनर्वसनासाठी जेवढे अर्ज आले त्यांची छाननी करुन घ्यावी अशाही सूचना देण्यात आल्या. त्या अनुषंगाने मी सांगू इच्छितो की, या जमिनीवर एकंदरीत 33 हजार झोपड्या होत्या त्यापैकी 25144 झोपड्या निकषात बसल्या कारण त्यांच्याकडे 1995 चे पुरावे होते. इतकेच नव्हे तर पहिल्या टप्प्यात 12134 झोपड्यांचे पुनर्वसन करण्यासाठी एसआरएच्या माध्यमातून खाजगी विकासकांनी स्वत:ची जमीन ॲडिशनल टीडीआरच्या स्वरुपात देऊन एक योजना तयार केली. त्यानुसार 8 हजार पेक्षा जास्त सदनिका निर्माण

....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र. 1........ श्री. सचिन अहिर......

करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्याप्रमाणे या एकंदरीत जमिनीवर नॅशनल वाईल्ड लाईफ ॲक्टनुसार वाईल्ड लाईफचा हक्क आहे म्हणूनच तेथे संजय गांधी राष्ट्रीय उद्यान आज उभे आहे. तसेच ही जमीन संपादित करण्याची गरज नव्हती, ती बाजूला ठेवायला पाहिजे होती. पण आपणा सर्वांनाच माहीत आहे की, हे प्रकरण सन 1972 नंतर सन 1976 मध्ये दिनशॉ ट्रस्टने कोर्टात आपली बाजू मांडण्याचे काम केले. हे सर्व वक्तव्य केल्यानंतर नोटिफिकेशन फॉर वाईल्ड लाईफ काढून वाईल्ड लाईफ कायद्यानुसार ही जमीन त्यांची असल्याचे जाहीर केले. इतकेच नव्हे तर काही लोकांनी याविरुध्द उच्च न्यायालयात दाद सुध्दा मागितली, काही लोकांनी पीआयएल केस फाईल केली. त्यानुसार पुढील कार्यवाही चालू आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात गृहनिर्माण राज्यमंत्री उत्तर देत आहेत. परंतु या लक्षवेधी सूचनेमध्ये प्रत्यक्षात फॉरेस्ट व महसूल विभागाचा संबंध येतो. फॉरेस्टच्या अधिका-यांनी लयलूट करुन 300 एकर जमीन खाजगी बिल्डरच्या घशात घातलेली आहे. त्यामुळे या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात माझी मागणी आहे की, या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात केवळ गृहनिर्माण मत्र्यांनी उत्तर देऊन लक्षवेधी सूचनेला न्याय मिळणार नाही. फॉरेस्ट डिपार्टमेंटने मनमानी करुन सोई प्रमाणे जागा वाटलेल्या आहेत. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण या गेल्या 25 वर्षापासून झोपडपट्टीवासियांच्या बाजूने लढत आहेत. फॉरेस्ट डिपार्टमेंट मध्ये मुंढे नावाचे अधिकारी ब-याच वर्षापासून त्या ठिकाणी काम करीत होते. या अधिका-याने फॉरेस्टची 300 एकर जमीन कमी करुन खाजगी बिल्डराच्या घशात घातलेली आहे त्यामुळे संबंधित अधिका-याची चौकशी केली जाणार आहे काय ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांना चुकीची माहिती मिळालेली दिसते, त्यांचे मिसअंडरस्टँडींग झालेले दिसते. मुळातच ही जमीन उद्यानासाठी आहे. या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे रिडेव्हलपमेंट होत नाही. या ठिकाणच्या झोपडपट्टीतील लोकांची पात्रता ठरवून त्यांना दुसरीकडे शिफ्टींग करण्याचे काम केले जात आहे. ही जमीन खाजगी विकासकाला दिली, पुनर्वसन दुसरीकडे केले असा मुद्दा नाही व तसे करताही येत नाही व तसे करण्याचा प्रयत्नही केला जात नाही. ही संपूर्ण जमीन एन्क्रोचमेंट फ्री करण्याच्या संदर्भात हायकोर्ट व सुप्रीम कोर्टाच्या निदेशांचे पालन केले जात आहे. या प्रश्नाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी पुढाकार घेऊन त्या कोर्टात गेलेल्या आहेत, या विषयाच्या संदर्भात अनेक बाबतीत अजून कोर्टाचे निर्णय झालेले नाहीत. ज्यावेळी घरे तोडण्याची कारवाई केली जात होती त्यावेळेस या ठिकाणच्या लोकांना कोणत्याही प्रकारचे प्रोटेक्शन मिळत नव्हते व त्यामुळे राज्य शासनाने हस्तक्षेप करुन या लोकांना प्रोटेक्ट करण्याची भूमिका घेतली व या ठिकाणच्या झोपडपट्टी धारकाना शासनाने पात्र व अपात्र करण्याची भूमिका घेतली. या ठिकाणच्या लोकांचे रिहॅबिलेटेशन फॉरेस्टच्या जागेवर न करता दुस-या विभागात किंवा दुस-या वॉर्डात करण्याचे काम केलेले आहे. सन्माननीय सदस्यांच्या जवळ कोर्टाची ऑर्डर असून त्यामध्ये या ठिकाणचा रिसर्व्हे

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर....

करण्याचा निर्णय झालेला आहे असे त्यांच्या माहिती वरुन दिसते. जर कोर्टाचे अशा प्रकारचे आदेश असतील तर शासनाची सुध्दा त्या प्रमाणे अंमलबजावणी करण्याचे धोरण राहील. आता सुध्दा मी जे काही सांगत आहे ते कोर्ट ऑर्डरच्या धर्तीवरच आहे.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेमध्ये या जमिनीची मोजणी होणे हा महत्वाचा मुद्दा आहे. वन विभाग व महसूल विभाग हे काम आमचे नाही असे सांगत आहेत. यासंदर्भात अवर सचिव श्री. कोळेकर यांचे स्पष्ट निर्देश असे आहेत की, प्रस्तावाधीन जमिनीच्या हद्दी निश्चित करण्याबाबत माननीय सर्वोच्च न्यायालयाने निदेश दिलेले आहेत. या जमिनीची हद्द निश्चित करण्यासाठी विशेष बाब म्हणून प्रथमत: मोजणी करुन सदर जमिनीचे अभिलेख व नकाशे तयार करण्यात यावेत. मुळात हेच काम का होत नाही हाच प्रश्न या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून आलेला आहे त्याचे उत्तर मंत्री महोदय देणार आहेत काय ?

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय,सन्माननीय सदस्यांच्या हातामध्ये जो कागद आहे त्या कागदाच्या संदर्भात मी माहिती घेतली होती. 2004 साली सन्माननीय सदस्यांनी पुढाकार घेतला होता. योगायोगाने मी विधानसभेचा सदस्य असल्यामुळे मी त्यावेळी विधान सभेमध्ये हा प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळच्या माननीय मंत्र्यांकडून या प्रकरणी न्याय मागून घेतला होता. राज्य शासनाने कोर्टामध्ये इंटरव्हीन व्हावे अशा प्रकारची भूमिका घेतली होती. वास्तविक कोर्टामध्ये इंटरव्हीन होण्यास राज्य सरकार तयार नव्हते असे असतांनासुध्दा विधानसभेत प्रश्न लावल्यानंतर इंटरव्हीन करण्यात आले. 2004 साली राज्य शासन म्हणून सुप्रीम कोर्टात इन्टरव्हीन झालो आणि सुप्रीम कोर्टाने पाच वर्षात कोणताही निर्णय घेतला नाही आणि 2009 साली स्पेशल लीव्ह पिटीशन फेटाळण्याचे काम केले होते. त्यानंतर आपण एक पाऊल पुढे गेलो होतो. सन्माननीय सदस्यांनी राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांकडे आणि इतर मंत्र्यांकडे हा प्रश्न मांडला होता. त्यावेळी एक विशेष बाब म्हणून या जमिनीचा सर्व्हे करण्यात यावा अशी ऑर्डर महसूल विभागा कडून काढण्याचे काम करण्यात आले होते परंतु त्यानंतर सुप्रीम कोर्टाचा अवमान होईल म्हणून महसूल विभागाने जी ऑर्डर काढली होती त्याच ऑर्डरला स्थगिती देण्याचे काम महसूल विभागाने केलेले होते. अशा प्रकारे हे प्रकरण आता आमच्याकडे आलेले आहे. या सभागृहाच्या माध्यमातून मी सांगू इच्छितो की सन्माननीय सदस्यांनी जर मला अधिकची माहिती दिली तर त्याबाबतीत निश्चितपणे सकारात्मक भूमिका घेण्याची तयारी राज्य शासनाची आहे. परंतु यात एक मूलभूत प्रश्न आहे ज्याला आपण रिसेटलमेन्ट किंवा रिहॅबिलीटेशन म्हणतो त्याप्रमाणे झोपडपट्टीमध्ये जेवढे पात्र लोक असतील त्या सर्वाना घरे देणे हे शासनावर बंधनकारक आहे अशी भूमिका घेण्यात येईल त्यामुळे एकाही व्यक्तीला बाहेर ठेवण्यात येणार नाही

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, त्या भागातील लोकांचे पुनर्वसन करावे हा प्रश्न नाही. ती जमीन वन विभागाची नव्हती असे असतांना 2000 साली तेथील बांधकाम तोडण्यास वन विभागाचे अधिकारी का गेले ? त्यांनी जर बांधकाम तोडले नसते तर पुनर्वसनाचा प्रश्न आलाच नसता. सुप्रीम कोर्ट आणि हायकोर्टाने दिलेल्या निर्णयाची प्रत माझ्याकडे आहेत. त्यांनी दिलेले दोन्हीही निर्णय मी वाचून दाखविणार आहे.सन्माननीय मंत्री निर्णयाच्या प्रती न वाचताच सभागृहात माहिती देत आहेत. बॉम्बे एनव्हायरमेन्टल ॲक्शन ग्रुपने क्रमांक 305 ची याचिका दाखल केली होती त्या याचिकेमध्ये सुध्दा कोर्टाने सविस्तर ऑर्डर दिलेली असली तरी त्यातील एक परिच्छेद

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण .....

झोपडपट्टीधारकाशी संबंधित आहे. तो परिच्छेद मी आपल्याला वाचून दाखविते. त्या परिच्छेदामध्ये असे म्हटलेले आहे की, "With respect to slum dwellers residing within the National Park division, whose names appear on the electoral roll prepared with reference to January 1995, who continued to live in the same structure, It is directed that the State Government shall within 18 months from the date, relocate these persons outside the boundaries of the National Park and thereafter demolish the structure. Until such time the electricity and water supply to the structure will also be allowed to be continued."

अशा प्रकारे कोर्टाने अगदी व्यवस्थित ऑर्डर दिली होती. जर हे लोक फॉरेस्टच्या आतमध्ये असतील तर 18 महिन्याच्या आत त्यांचे पुनर्वसन करावे तोपर्यंत त्यांची कोणतीही सुविधा काढून घेण्यात येऊ नये, त्यांची घरे तोडण्यात येऊ नयेत, असे कोर्टाने सांगितले होते असे असतांना तेथील लोकांची घरे तोडण्याचा वन विभागाच्या अधिका-यांना काय अधिकार होता ? त्याचबरोबर 848 एकर जमीन वन विभागाची आहे. सर्व्हे नंबर 239 मध्ये एकूण 1694 एकर जमीन होती. 1971 साली ट्रस्टच्या मूळ मालकांनी 206 एकर शेत जमीन म्हणून वेगळी केली होती. रेकॉर्डमध्ये सुध्दा ही जमीन शेत जमीन आहे असा उल्लेख करण्यात आला होता.उरलेल्या 1488 एकर जमीन संपादन करण्याची नोटीस काढण्यात आली होती. हायकोर्टाच्या आदेशाचे बंधन फक्त 1488 एकर जमिनीला होते. बाहेरची जी 206 एकर जमीन होती त्या जमिनीवर वस्त्या , शाळा आणि पक्की घरे होती. त्या ठिकाणी राहणा-या 68 हजार लोकांची घरे तोडण्यात आली होती. एखादा भूकंप व्हावा अशा प्रकारे लोकांना बेघर करण्यात आले होते तेथील मुलांच्या शाळा तोडण्यात आल्यामुळे मुलांचे भविष्य अंधकारमय केले. महाराष्ट्रातील नेते भाषण करीत असतांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले,शाहू महाराज ,शिवाजी महाराज यांची नावे घेतात परंतु त्या भागातील 68 हजार घरे ज्यावेळी तोडली जात होती त्यावेळी कोणताही नेत्यांनी त्या लोकांना वाचवले नाही. ती जमीन वन विभागाची नाही. एवढेच मला सांगावयाचे आहे . त्या ठिकाणी एकूण 1464 एकर जमीन होती त्यातील 206 एकर जमीन शेत जमीन म्हणून वेगळी झालेली असतांना तसेच वन विभागाला हे माहीत होते. त्याचबरोबर कोर्टामध्ये कन्सेंट टर्म झाली.

2..



VTG/ प्रथम श्री.जुन्नरे 14.40

श्रीमती विद्या चव्हाण .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्या कन्सेंट टर्म मध्ये 848 एकर जमीन वन विभागाला द्यावयाचे आदेश झाले होते आणि 572 एकर जमीन महानगरपालिकेला तबेले हटविण्यासाठी दिली होती. परंतु महानगरपालिकेने रेकॉर्डवर ती जमीन घेतली नाही अगोदर ही जमीन घेऊ असे महानगरपालिकेने सांगितले होते पंरतु नंतर रेकॉर्डवर ही जमीन लागल्यावर महानगरपालिकेने ती जमीन नाकारली ..

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण...

ती नाकारल्यानंतर पुन्हा वन विभागाकडे ती जमीन हस्तांतरित होणे आवश्यक होते. परंतु वन विभागाने ती जमीन न स्वीकारता ती परस्पर बिल्डरला देऊन टाकली. या बाबतीत वन विभागाने आणि पर्यावरणवाद्यांनी बिल्डरशी हातमिळवणी केली आहे. अशा प्रकारे 68 हजार लोकांची घरे तोडण्याचे काम केले आहे. या लोकांना आपण कशाप्रकारे न्याय देणार आहात. त्याचप्रमाणे सन 2009 ची सर्वोच्च न्यायालयाची ऑर्डर माझ्याकडे आहे. त्यानंतर महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी या जमिनीची मोजणी करण्याचे आदेश दिले आहेत...

**उप सभापती** : माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा...

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, माझा असा प्रश्न आहे की, महसूल विभागाने या जमिनीची मोजणी केली पाहिजे. गव्हर्नमेंटच्या गॅझेटमध्ये त्या जमिनीचे नंबर दिलेले आहेत. ही जमीन वन विभागाची नसतांना त्या लोकांची घरे कां तोडण्यात आली आहेत?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, वन विभागाने त्या ठिकाणी घरे तोडण्याची कारवाई कां केली, किंवा त्या ठिकाणी असलेली घरे अधिकृत होती की अनधिकृत होती याबाबत काही सांगू शकणार नाही. याचे कारण हा वेगळया विभागाशी संबंधित प्रश्न आहे. माननीय सदस्यांच्या दुसऱ्या प्रश्नामध्ये त्या लोकांचे पुनर्वसन करता येत नाही असे त्यांचे म्हणणे आहे...

(अडथळा)

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, याकरिता आपण आपल्या दालनामध्ये बैठक घ्यावी.

श्री. सचिन अहिर : माननीय वन मंत्र्यांच्या माध्यमातून या संदर्भात एक बैठक घेतली तर बरे होईल असे मला म्हणावयाचे आहे.

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी संजय गांधी उद्यानामधील लोकांच्या पुनर्वसनाच्या प्रश्नासंबंधी लक्षवेधी सूचना उपस्थित केली आहे. या विषयावर त्यांच्याबरोबर अनेक वेळा चर्चा सुध्दा झालेली आहे. माननीय राज्यमंत्री श्री. सचिन अहिर यांनी सुंदर व व्यवस्थित उत्तर दिले आहे त्याबद्दल त्यांना माझ्या वतीने धन्यवाद देतो. सभापती महोदय, माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण या ठिकाणी माझ्याकडे हायकोर्टाची ऑर्डर आहे, सुप्रीम कोर्टाची ऑर्डर आहे असे म्हणत आहेत. त्यानंतर माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी तेथील अधिकारी श्री. मुंडे यांच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केला. श्री. मुंडे यांची बदली

DGS/

डॉ.पतंगराव कदम...

करण्यात येऊ नये अशी हायकोर्टाने आम्हाला सूचना केली आहे. श्री. मुंडे हे चांगले काम करणारे अधिकारी असल्यामुळे त्यांची बदली करण्यात येऊ नये असे सांगितले आहे. आता आम्ही हायकोर्टाला सांगितले आहे की, आम्हाला त्यांची बदली करावयाची आहे. ते चांगले काम करीत आहेत म्हणून मी कोल्हापूरला त्यांची बदली करतो. माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांची तळमळ लक्षात घेऊन माननीय सदस्यांसह महसूल विभागाचे प्रधान सचिव, विधी व न्याय विभागाचे सचिव आणि वन विभागाचे प्रधान सचिव यांची माझ्या दालनामध्ये एक बैठक घेण्यात येऊन या प्रश्नाचा निर्णय लावण्यात येईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राजूरा (जि. चंद्रपूर) येथील उपवन विभागामधून सागवान झाडांची सुरु असलेली तस्करी

**मु. शी.** : राजूरा (जि. चंद्रपूर) येथील उपवन विभागामधून सागवान झाडांची सुरु असलेली तस्करी यासंबंधी सर्वश्री जैनुद्दीन जव्हेरी, एस. क्यू. जमा, एम. एम. शेख, हुसेन दलवाई,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी (वर्धा, चंद्रपूर व गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राजूरा (जि.चंद्रपूर) येथील उपवन विभागातील विरुर वन परिक्षेत्रातील कोस्टाळा खंड क्रमांक १२७ व १२८ मधील सागवान झाडांची मोठ्या प्रमाणात तोड करण्यात येऊन अवैध तस्करी करण्यात येत असल्याची भयंकर घटना माहे मार्च, २०११ रोजी वा त्यादरम्यान उघडकीस येणे, या सागवान तस्करीत शेकडो सागवानच्या झाडांची कत्तल करण्यात येणे, सदर तस्कर आंध्रप्रदेशातील असणे, उपवन अधिकारी यांनी पूर्ण परिसर फिरुन न पाहताच फक्त रस्ता परिसरातील तोडलेल्या सागवानच्या झाडांची पाहणी करुन या प्रकरणाची मोका चौकशी करुन फक्त १४ सागवानांच्या झाडांची कत्तल करण्यात आल्याचा खोटा अहवाल सादर करण्यात येणे, वन अधिकारी/कर्मचारी यांच्या संगनमतानेच सागवानची मोठ्या प्रमाणात तस्करी वाढत असून ग्रामस्थांनी या वन परिसराची फेर तपासणी विशेष पथकाकडून करुन अहवाल सादर करण्याची संबंधितांकडे वारंवार मागणी करण्यात येऊनही फेर तपासणी करण्यात न येणे, ग्रामस्थांमध्ये निर्माण होत असलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, सागवान तस्करांवर कठोर कारवाई करण्याची त्याचप्रमाणे दिवसेंदिवस वाढत असलेली सागवानाची कत्तल थांबविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव (वन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यामध्ये आंध्र प्रदेश राज्याची जी सीमा आहे ती ओलांडून आंध्र प्रदेशमधील काही व्यापारी या दोन जिल्ह्यामध्ये येऊन जंगल तोड करुन लाकडांची चोरी करतात. ही गोष्ट शासनाला माहीत आहे. निवेदनात असे म्हटले आहे की, लाकडे चोरुन नेणारे सापडले नाहीत, परंतु 22 सायकली जप्त करण्यात आल्या. माझ्या मते या जिल्ह्यामधून करोडो रुपयांची लाकूड तोड झालेली आहे. शासनाने देखील ही गोष्ट कबूल केली आहे. माझा असा प्रश्न आहे की, चंद्रपूर, गडचिरोली व आंध्र प्रदेशच्या सीमेवर आंध्र प्रदेशचे व्यापारी व आपले अधिकारी संगनमत करुन लाकडांची चोरी करीत आहेत. या बाबत शासनाने कारवाई करावी यासाठी अनेक वेळा सभागृहात प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. आतापर्यन्त शासनाने कोणत्या अधिकाऱ्यांवर कारवाई केली आहे? शासनाला आंध्र प्रदेशातील लाकूड चोरी करणारे लोक सापडले आहेत काय? हा माझा प्रश्न आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जैनुद्दीन जव्हेरी . . . .

याठिकाणी निवेदनामध्ये दुसऱ्या परिच्छेदामध्ये शेवटी असे म्हटलेले आहे की,"हे क्षेत्र डोंगराळ व दुर्गम असून वनरक्षकाच्या मुख्यालयापासून दूर तसेच महाराष्ट्रातून पोहोचण्यास अडचणीचे आहे." म्हणजे आम्ही गडचिरोली, चंद्रपूर, विदर्भातील लोक प्रत्येक वेळी महाराष्ट्रापासून दूर रहातो. आमच्याकडे 50 ते 60 टक्के जंगल आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, मला थोडे बोलू द्यावे. मघाशी सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांना बोलावयास दिले आहे......

**उप सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण नवीन आहेत.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, आम्ही महाराष्ट्रापासून दूर आहोत असे मी म्हणत नाही तर तसे निवेदनामध्ये म्हटलेले आहे. आम्ही विदर्भामध्ये जंगल वाचविलेले आहे. तसेच पाणी, खनिज वाचविलेले आहे. पण तेथे अनेक प्रकारचे दरोडेखोर येतात. त्यातील काहीजण व्यापाऱ्याच्या रुपामध्ये तर काही अधिकाऱ्यांच्या रुपामध्ये येतात आणि त्यामुळे आमच्या भागाचे नुकसान होते. मात्र याठिकाणी असे उत्तर दिले जाते की, हा भाग महाराष्ट्रापासून दूर आहे.परंतु माझे असे म्हणणे आहे की, आमच्या भागातील जे वन आहे त्यासंबंधातील नवीन कार्यालय पुणे येथे आहे असे माननीय मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये सांगितले आहे. पण माझी अशी विनंती आहे की, या विषयाशी संबंधित असलेले कार्यालय आणि संबंधित अधिकारी नागपूर येथे असावे. मात्र निवेदनामध्ये असे उत्तर देतात की, हे क्षेत्र डोंगराळ व दुर्गम असून वनरक्षकाच्या मुख्यालयापासून दूर तसेच महाराष्ट्रातून पोहोचण्यास अडचणीचे आहे म्हणून आम्ही हे करु शकत नाही.माझा पहिला प्रश्न असा आहे की, याठिकाणी लाकडाची चोरी केली जाते. अशा प्रकारे चोरी करणाऱ्या व्यापाऱ्यांची, चोरांची नावे माहिती आहेत काय ? तसेच इतक्या वर्षापासून करोडो रुपयांची लाकूड चोरी होत आहे आणि याबाबत तपास करताना संबंधितांना केवळ सायकलच सापडते काय ? जे दरोडेखोर आणि चोर आहेत ते सापडत नाही काय आणि यासंबंधात शासन काही कारवाई करणार आहे काय?

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सभापती महोदय, जे विरुर वन क्षेत्र आहे, तेथे कोस्टाळा हा सुध्दा नियत क्षेत्रातील एक भाग आहे आणि हा भाग अत्यंत दुर्गम ठिकाणी असून त्याचा एरिया 395 हेक्टरपेक्षा जास्त आहे आणि हा एरिया टेकडावर आहे. अशा वेळी तेथे पहाणी करण्यासाठी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महाराष्ट्र राज्याच्या हद्दीतून जावयाचे तर खूप दुर्गम भागातून जावे लागते.त्यामुळे आंध्र राज्यामधून जाऊन मग तेथील पहाणी करावी लागते.त्याठिकाणी संबंधित लोक अशा प्रकारची झाडे तोडून त्याचे छोटे-छोटे तुकडे करतात. मग ते तुकडे सायकलवर ठेऊन पळवून नेतात अशा प्रकारे तेथे चोरी केली जाते. अशा प्रकारे चोरी होत असताना दिनांक 15-02-2002 आणि दिनांक 25-01-2011 रोजी देखील अशाच पध्दतीने 50-60 लोक एकत्रितपणे आले. तसेच आपल्याला माहिती आहे की, या जंगलामध्ये एखाद-दुसरा गार्ड असतो आणि त्याच्यावर हे लोक मोठ्या प्रमाणात हल्ला करतात. त्यामुळे त्या गार्डला परत जावे लागते. पण तरी देखील त्या कर्मचाऱ्याने थोडे धाडस दाखविले. परंतु तरीदेखील ते लोक पळून जाण्यामध्ये यशस्वी झाले, कारण ते मोठया प्रमाणात होते. म्हणून ते सापडले नाहीत. परंतु त्यांच्या 22 सायकली जप्त करण्यात आलेल्या आहेत. ही वस्तुस्थिती आहे.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की,"हे क्षेत्र डोंगराळ व दुर्गम असून वनरक्षकाच्या मुख्यालयापासून दूर तसेच महाराष्ट्रातून पोहोचण्यास अडचणीचे आहे,त्यामुळे आंध्र प्रदेशमधून जावे लागते." याबाबत असे कसे म्हणता येईल ? हे बरोबर नाही.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, याबाबतीत सांगावयाचे तर हे जे संपूर्ण क्षेत्र आहे, तेथे महाराष्ट्रातून पोहोचण्यासाठी अडचणीचे आहे.म्हणून या राज्यातून आंध्र प्रदेशमध्ये जावे लागते आणि मग तेथून या भागामध्ये जाता येते. त्यामुळे तेथून हा भाग जवळ आहे. आपल्या राज्यातून तेथे जाणारा रस्ता अत्यंत दुर्गम आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, याठिकाणी निवेदनामध्ये म्हटलेले आहे की, "आंध्रप्रदेश राज्याच्या सीमेवरील कागजनगर वन विभागातील वन अधिकारी व क्षेत्रीय कर्मचारी यांचे समवेत दिनांक 15-02-2011 रोजी राजूरा येथे संयुक्त समन्वय बैठक आयोजित करुन त्यांना प्रभावी संरक्षण, संयुक्त गस्त, संवेदनशील क्षेत्राबद्दल माहितीचे आदानप्रदान करण्यांबाबत आवश्यक ते सहकार्य करण्यास विनंती करण्यात आली. संवेदनशील भागातील गस्तीकरता अतिरिक्त वाहन पुरविण्यात आले आहे. कोस्टाळा नियतक्षेत्राचे वनक्षेत्र जास्त असल्यामुळे प्रभावी संरक्षणाच्या दृष्टीने कोस्टाळा - 1 व कोस्टाळा - 2 असे पुनर्गठन करण्यात आले. अशा प्रकारची ठोस कार्यवाही सागाच्या अवैध तोडीवर नियंत्रण घालण्यासाठी करण्यात आलेली आहे." परंतु ......





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2000 मध्ये मी हाय कोर्टामध्ये याच बाबतीत पी.आय.एल.दाखल केली. माननीय मंत्री महोदय चुकीचे उत्तर देत आहेत. कोस्टाळा येथे महाराष्ट्र राज्यातून जाता येते, आंघ्र प्रदेशमधून जाण्याची गरज नाही. याठिकाणी सागाच्या लाकडाची चोरी होते त्यासंबंधात आम्ही आंध्र प्रदेश मध्ये जाऊन पहाणी केलेली आहे. आंध्र प्रदेशच्या बॉर्डरवर 300 सॉ-मिल आहेत आणि महाराष्ट्रातील सगळे लाकूड ज्याला ते लोक "चॉकलेट" असे म्हणतात म्हणजे लाकडाच्या उभ्या पाट्या तयार करुन सायकलला बांधून किंवा नदीतून घेऊन जातात.अशा प्रकारे या राज्यातील लाकूड नेऊन त्याचे फर्निचर तयार करुन ते रातोरात खपविले जाते. मी जेव्हा 2000 मध्ये हाय कोर्टामध्ये पी.आय.एल. दाखल केली, तेव्हा याबाबतीत हाय कोर्टाने 2002 मध्ये इन्स्ट्रक्शन दिलेल्या आहेत. त्यानंतर आता तेथे चोरी झ ाल्यानंतर माननीय मंत्री महोदय 2011 मध्ये परत तेच उत्तर देत आहेत.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

सभापती महोदय, त्यावेळेला असे सांगण्यात आले होते की, वन विभागाचे क्षेत्र लहान-लहान करण्यात यावेत,जेणे करुन एका गार्डला ते तपासता येतील. दुसरी गोष्ट अशी की, या गार्डसना तेथे वाहने देण्यात यावीत. आजही त्या ठिकाणचे गार्ड सायकलवर फिरतात. मोटार सायकलवर रेंजर फिरतात आणि गाडया शहरामध्ये असणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी असतात. या प्रकरणातील गार्डवर वीस-पंवीस लोकांनी हल्ला केला आहे. वन विभागाला या संबंधीची माहिती नव्हती काय? वन विभागाला हे माहीत आहे. गेल्या 10 ते 20 वर्षापासून चोऱ्या होत आहेत. या चोऱ्यांमध्ये अधिकाऱ्यांचा हात आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही. अशी प्रकरणे उघडकीस आल्या नंतर गार्डला सस्पेंड करण्यात येते, वनपालाला सस्पेंट करण्यात येते. पण त्या वनाचे संरक्षण करण्या इतपत त्यांची क्षमता वाढविण्या करिता त्यांना चांगल्या गाडया देण्यात येतात काय, त्यांच्या सोबत चार-दोन लोक असतात काय, त्याच्या बरोबर मोठया प्रमाणात वन कर्मचारी असतो काय,याचा विचार करुन त्या ठिकाणी वन कर्मचारी देणार काय, कोर्टाने आदेश दिल्या प्रमाणे चांगल्या गाडया देणार काय? खऱ्या अर्थाने या गार्डसना शस्त्र देण्या करिता सांगण्यात आले होते. पण शासन त्यांना शस्त्र देऊ शकले नाही. वन जमीनचे कारण केवळ प्रकल्प अडविण्या करिता सांगितले जाते. परंतु वनातील लाकूड चोऱ्यांसाठी सपोर्ट करण्यात येतो, हे बरोबर नाही. या चोऱ्या वाचविण्याकरिता भविष्यात वन विभाग कोणती ठोस कारवाई करणार आहे याचे उत्तर देण्यात यावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, वन विभागाचे क्षेत्र मोठे असते म्हणून त्याचे दोन उप विभाग करण्याचा निर्णय त्याच अनुषंगाने घेण्यात आलेला आहे. अर्थातच दोन उप विभाग निर्माण झाले की, त्याच्याबरोबर स्टाफ आला, कर्मचारी वाढले, वाहने वाढली या सगळया गोष्टींची सोय होईलच पण सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, आपण एखाद्या गार्ड सारख्या लहान माणसाला वगैरे सस्पेंड करतो आणि वरिष्ठ अधिकाऱ्याकडे दुर्लक्ष करतो. निवेदन वाचल्यानंतर मला देखील तसे जाणवले. वन रक्षक म्हणजे एका साध्या गार्डला सस्पेंड करण्यात आले आहे. दुसरा क्षेत्र सहाय्यक म्हणजे, तो वनपालच असणार. याच्यावर दोषारोप ठेवण्यात आले आहे. वन परिक्षेत्र अधिकारी म्हणजे आर.एफ.ओ. याला फक्त कारणे दाखवा नोटिस देण्यात आलेली आहे. ज्याला संरक्षण जास्त असते, ज्याला अधिकार जास्त असतात, ज्याला साधनसामुग्री जास्त असते त्यांची सुध्दा याबाबतीत जबाबदारी फिक्स करण्याची आवश्यकता आहे. या संदर्भात अशा अधिकाऱ्यांची जबाबदारी फिक्स करता येते काय, हे तपासून जबाबदारी फिक्स केली जाईल.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, भविष्यात वन विभागाच्या क्षेत्रात चोऱ्या होणार नाहीत, या संदर्भात विचार करुन ठोस उपाययोजना करण्यात येईल काय?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/

**पृ. शी.** : मुंबई, माहिम येथील रामघर झोपडपट्टीत भेडसावत असलेला पाण्याचा प्रश्न.

**मु. शी.** : मुंबई, माहिम येथील रामघर झोपडपट्टीत भेडसावत असलेला पाण्याचा प्रश्न यासंबंधी श्री. राम पंडागळे वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** कांदिवली (पूर्व) अशोकनगर येथील आर-दक्षिण विभागातील वाचनालयासाठी आरक्षित असलेली इमारत शिवतेज आरोग्य सेवा संस्थेला देण्याबाबत कोणतीही कार्यवाही न होणे.

**मु. शी.** : कांदिवली (पूर्व) अशोकनगर येथील आर-दक्षिण विभागातील वाचनालयासाठी आरक्षित असलेली इमारत शिवतेज आरोग्य सेवा संस्थेला देण्याबाबत कोणतीही कार्यवाही न होणे यासंबंधी श्री रामदास कदम,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. रामदास कदम ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई उपनगरातील कांदिवली (पूर्व) अशोक नगर येथील वाढवण गाव, आत्माराम सावंत मार्ग न.भू.क्र.५८ (भाग) व ५९ (भाग) येथील आर-दक्षिण विभागातील वाचनालयासाठी आरक्षित असलेली इमारत विकासकांकडून दि.२१.४.२००९ रोजीपासून ताब्यात घेणे, सदर इमारत शिवतेज आरोग्य सेवा संस्थेला काळजीवाहू तत्वावर देणेबाबत दि.३१.५.२०१० रोजी महापौरांच्या दालनात बैठक घेऊन यासंदर्भातील जाहिरात काढण्याचे दिलेले आदेश, परंतु अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली निदर्शनास आलेली नसणे, त्यामुळे तेथील रहिवाश्यांची व विशेषत: विद्यार्थ्यांची मोठी अडचण निर्माण होणे, याकरिता शिवतेज आरोग्य सेवा संस्थेला सदर वाचनालयाची इमारत देखभालीसाठी देण्याबाबत कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री.भास्कर जाधव ( वन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे ) ..5...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, मला कल्पना आहे की, हा जो निर्णय घ्यावयाचा असतो याच्या संदर्भात जाहिरात काढावयाची असते. जाहिरात काढल्यानंतर जी संस्था योग्य असेल त्या संस्थेला वाचनालय, हॉस्पिटल या सारख्या गोष्टी द्यावयाच्या असतात. मागच्या एका वर्षापासून कांदिवलीतील वाचनालयाबाबत जाहिरात काढण्या बाबत सातत्याने मागणी करण्यात आली. या इमारतीचे दरवाजे तोडलेले आहेत. खिडक्या तोडलेल्या आहेत आणि त्या जागेचा वेगळया पध्दतीने उपयोग केला जात आहे. मागच्या एक वर्षापासून जाहिरात काढण्या बाबत सातत्याने सांगितले जाते पंरतु त्या ठिकाणी श्री. आबासाहेब जाधव नावाचा कोणी तरी महामानव आहे. तो एक वर्षापासून असे सांगतो की, जाहिरात काढण्यासाठी माझ्याकडे स्टाफ नाही. सभापती महोदय, माझ्याकडे त्याचे लेखी उत्तर आहे, त्याची प्रत मी मंत्री महोदयांना वाचण्यासाठी देतो.आयुक्तांचे पत्र सुध्दा देतो. हा जो अतिशहाणा शिक्षणाधिकारी श्री. आबासाहेब जाधव आहे तो मागच्या एका वर्षापासून साधी जाहिरात काढण्याची प्रोसेस करु शकत नसेल तर अशा अधिकाऱ्यावर काय कारवाई करणार, या शिक्षणाधिकाऱ्यामुळे मुंबई मध्ये अशीच पडून असलेली व ज्याचा उपयोग केला जात नाही अशी किती वाचनालये आहेत?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, अशा पध्दतीच्या वाचनालयाला जागा देण्याकरिता जाहिरात काढावी लागते. जाहिरात काढल्या शिवाय जागा परस्पर देता येत नाही, ही गोष्ट खरी आहे आणि ती सन्माननीय सदस्यांनी मान्य केलेली आहे.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ....

खरे तर हा विषय मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीत आहे पण तरी देखील जाहिरात काढण्यासाठी किती स्टाफ लागतो, कशा प्रकारचे कर्मचारी लागतात हे मला माहीत नाही. सन्माननीय सदस्यांनी माझ्याकडे पत्र सुध्दा दिलेले आहे. तत्कालीन आयुक्तांनी तशा प्रकारची कारवाई करण्याकरिता संबंधितांना निदेश दिल्याचे पत्र सुध्दा सन्माननीय सदस्यांनी माझ्या निदर्शनास आणून दिलेले आहे. अशा पध्दतीने या सगळ्या गोष्टी निदर्शनास आणून देखील आणि सन्माननीय सदस्य सातत्याने पाठपुरावा करीत असून देखील अशा पध्दतीने टाळाटाळ करणारे जे शिक्षण अधिकारी असतील त्यांची चौकशी केली जाईल. अमुकच संस्थेला द्या असा सन्माननीय सदस्यांचा आग्रह नाही, तुम्ही जाहिरात काढा आणि ज्याला द्यावयाचे असेल त्याला द्या असे स्पष्ट म्हणणे असेल तर त्यांनी जाहिरात काढावयास पाहिजे होती म्हणून अशा पध्दतीने जाहिरात करण्याकरिता टाळाटाळ करणाऱ्या शिक्षण अधिकाऱ्याची तत्काळ चौकशी केली जाईल आणि त्यांच्या हलगर्जीपणाबद्दल जी काही उचित कारवाई करणे आवश्यक आहे ती केली जाईल.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : मुंबईतील उपनगरात सरसकट 0.33 टक्के वाढीव चटईक्षेत्र निर्देशांक देण्याची शासनाने केलेली घोषणा

**मु. शी**. : मुंबईतील उपनगरात सरसकट 0.33 टक्के वाढीव चटईक्षेत्र निर्देशांक देण्याची शासनाने केलेली घोषणा या संबंधी श्री. चरणसिंग सप्रा, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. चरणसिंग सप्रा (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबईतील उपलब्ध तुटपुंजी जागा आणि घरांची वाढती मागणी याचा खाजगी विकासकांनी फायदा उठवत मनमानीपणे गगनाला भिडवलेल्या किंमतीवर नियंत्रण आणण्यासाठी शासनाने उपनगरात सरसकट 0.33 टक्के वाढीव चटईक्षेत्र निर्देशांक देण्याची घोषणा करुन त्यानुसार ऑक्टोबर, 2008 मध्ये अध्यादेश काढणे, त्यात 0.33 टक्के वाढीव चटईक्षेत्र निर्देशांकावर कर आकारण्याची केलेली तरतूद, मात्र महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 च्या कायद्यात चटईक्षेत्र निर्देशांकावर कर आकारण्याची कोणत्याही प्रकारची तरतूद नसल्याचा दावा करुन अमीन मारु व अन्य काही मंडळीनी उच्च न्यायालयात शासनाच्या अध्यादेशाला आव्हान देणे, शासनाचा सदर अध्यादेश उच्च न्यायालयाने रद्द ठरविणे, त्यानंतर पुन्हा सप्टेंबर, 2010 मध्ये नगरविकास विभागाने प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 च्या कलम (22) मध्ये सुधारणा करीत वाढीव एफएसआय देतांना त्यावर कर आकारण्याची कायदेशीर तरतूद करुन 21 सप्टेंबर, 2010 रोजी अध्यादेश काढणे, परंतु या अध्यादेशात कुठे आणि किती एफएसआय द्यावा याची कोणतीही तरतूद नसणे, महापालिकेने 3 ऑक्टोबर, 2010 रोजीच्या पत्राद्वारे याबाबत स्पष्टीकरणाची मागणी नगरविकास विभागाकडे करणे, परंतु अद्यापपर्यंत यावर कोणताच निर्णय झालेला नसणे, यामुळे शासनाचे कोट्यावधी रुपयांच्या महसुलाचे नुकसान होत असणे, जनमानसात तीव्र संतापाची व भावना निर्माण होणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. भास्कर जाधव ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चरणसिंग सप्रा : सभापती महोदय, 0.33 टक्के वाढीव एफएसआयचा हा विषय अतिशय गंभीर आहे. उपनगरात राहणाऱ्या जवळजवळ 1 कोटी लोकांचा हा विषय आहे. जर 0.33 टक्के वाढीव एफएसआय लागू झाला तर लोकांना स्वस्त घरे मिळतील आणि जास्त लोकांना घरे मिळतील. मधल्या काळात कोणी तरी कोर्टामध्ये गेल्यामुळे एमआरटीपी कायद्यामध्ये तरतूद करण्याची गरज भासली होती. सप्टेंबर, 2010 मध्ये ती तरतूद करण्यात आली आणि हिवाळी अधिवेशनात त्याला मंजुरी सुध्दा दिली गेली. त्यानंतर चार महिने होऊन सुध्दा आतापर्यंत या 0.33 टक्के एफएसआयची अंमलबजावणी केलेली नाही. लोकांच्या मनात अशी शंका आली की, कदाचित जी टीडीआर लॉबी आहे त्यांना फेवर करण्यासाठी शासनाकडून हे चालले आहे. हा अतिशय गंभीर विषय आहे. कारण लोकांना स्वस्त घरे मिळतील आणि शासनाचेही काही नुकसान होणार नाही. या 0.33 टक्के वाढीव एफएसआयसाठी प्रिमियम आकारण्यात येणार आहे. त्यामुळे शासनाचा महसूल वाढेल आणि लोकांना स्वस्त घरे मिळतील. सगळ्यांसाठी विन-विन परिस्थिती असताना त्याची अंमलबजावणी होत नाही. त्याची अंमलबजावणी प्रलंबित आहे. निवेदनामध्ये इन्फ्रास्ट्रक्चरवर भार पडणार आहे म्हणून ही अंमलबजावणी प्रलंबित आहे असे कारण दिलेले आहे. परंतु माझ्या माहितीप्रमाणे नगरविकास विभागाने प्रत्यक्षात कोर्टात ॲफिडेव्हिट केले आहे की, इन्फ्रास्ट्रक्चरवर काहीही भार पडणार नाही. त्या बाबत महानगरपालिकेच्या आयुक्तांनी सहमती दर्शविलेली आहे की, अशा प्रकारे कोणताही भार पडणार नाही. असे असताना हा विषय प्रलंबित असण्याचे कारण काय ? या संदर्भात माझे तीन स्पेसिफिक प्रश्न आहेत. इन्फ्रास्ट्रक्चरवर भार पडणार नाही असे ॲफिडेव्हिट शासनाने कोर्टात केले आहे की नाही ? शासन टीडीआर लॉबीच्या दबावाखाली आहे असे लोकांचे मत आहे. त्या बाबत शासनाने खुलासा करावा. तिसरा प्रश्न असा की, जर शासन दबावाखाली नसेल तर 15 दिवसात शासन 0.33 टक्के एफएसआय देण्याची अंमलबजावणी करणार का ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर मी आधी देतो. शासन कोणाच्या दबावाखाली आहे का असे सन्माननीय सदस्यांनी विचारले. राज्य शासन कोणाच्याही दबावाखाली नाही आणि या राज्य शासनावर कोणी दबाव आणू शकत नाही.

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. भास्कर जाधव .....

यामध्ये दबावाचा प्रश्न नाही. राज्य शासनानेच हा विचार केला. ज्यावेळी टीडीआर लोड करण्याचा विषय आला तेव्हा मार्केटमध्ये चार पाच लोकांकडे टीडीआर बॅलन्स होता आणि त्याचा रेट खूप वाढला होता. त्यामुळे सर्वसामान्य माणसाला न परवडणारी घरे तयार होत होती. म्हणून शासनाने स्वत: 10.4.2008 असा निर्णय घेतला की, एकंदरीत जो टीडीआर लोड करावयाचा आहे त्यामध्ये 0.33 टीडीआरचा प्रिमियम घेऊन शासनानेच तो टीडीआर द्यावा अशा प्रकारचा निर्णय घेतला. अध्यादेश काढून त्याची अंमलबजावणी सुध्दा झाली.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव....

परंतु त्यासंबंधी काही लोक कोर्टामध्ये गेले होते. कोर्टाने डीसीआरमध्ये तशी तरतूदच नाही, त्यामुळे तुम्ही घेऊ शकत नाही, यासाठी शासनाने प्रथम कायद्यात तरतूद करावी, अशा प्रकारचा निर्णय दिला आहे. दिनांक 10.6.2010 रोजी अध्यादेश जारी केला व त्यानंतर दिनांक 21.9.2010 रोजी अध्यादेशाचे कायद्यामध्ये रुपांतर सुध्दा झालेले आहे. कायद्यात रुपांतर झाल्यानंतर कोर्टाच्या निर्णयाच्या संदर्भात थोडयाशा तांत्रिक बाबी निर्माण झालेल्या आहेत. त्या संदर्भातील अंतिम निर्णय घेण्याचा प्रस्ताव माननीय मुख्यमंत्री यांच्याकडे प्रलंबित आहे. यासंबंधी लवकरच निर्णय घेण्यात येईल अशी माझी खात्री आहे.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने माझे 3 स्पेसिफिक प्रश्न आहेत. अतिरिक्त एफएसआय 0.33 इतका दिला जातो त्यामुळे किती चौ.मी.बांधकाम उपनगरामध्ये होईल. हे अतिरिक्त बांधकाम झाल्यामुळे घराच्या किंमती कमी होतील अशी सरकारची धारणा आहे का ? परंतु सामान्यतः असे दिसून येते की, बिल्डर्स घराच्या किंमती कमी करण्यास तयार होत नाहीत. त्यामुळे लोकांना कमी किंमतीमध्ये घरे उपलब्ध झाली पाहिजेत असा शासनाचा उद्देश आहे तो साध्य होत नाही. अतिरिक्त एफएसआय देऊनही लोकांना कमी किंमतीत घरे उपलब्ध होत नसतील तर त्यातील घरे शासनाने ठराविक किंमतीमध्ये विकत घेऊन म्हाडामार्फत लॉटरी पध्दतीने सामान्य लोकांना उपलब्ध करुन दिली जातील काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांनी विचारलेले तिन्ही प्रश्न महत्वाचे व मूलभूत स्वरुपाचे आहेत. सन्माननीय सदस्य श्री.चरणसिंग सप्रा यांनी विचारलेले तिन्ही प्रश्न तितकेच महत्वाचे होते. शासनाने प्रिमियम घेऊन टीडीआर दिल्यानंतरही बाजारातील घरे शासनाच्या धोरणाप्रमाणे किंवा शासनाला असलेल्या अपेक्षेप्रमाणे कमी किंमतीमध्ये उपलब्ध होतील काय, कमी किंमतीत घरे मिळत नाहीत, बिल्डर लॉबीच त्याचा फायदा घेत आहे असा त्यांच्या प्रश्नाचा रोख आहे. याबाबत मी सांगेन की, सन्माननीय मुख्यमंत्री यांनी अत्यंत दूरगामी व चांगले परिणाम होणारे काही निर्णय घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचाच एक भाग म्हणून या निर्णयामुळे उद्या कोणता परिणाम होऊ शकतो, कोणता चांगला परिणाम होऊ

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.भास्कर जाधव....

शकतो, यावर निर्णय घेण्यासाठी हा विषय प्रलंबित आहे. अशा पध्दतीने बाजारामध्ये जर टीडीआर लोड केल्यानंतर उपनगरात किती बांधकाम होईल असा प्रश्न या ठिकाणी विचारण्यात आला आहे. या बाबत सुध्दा एकंदरीत आढावा घेण्याचे व अभ्यास करण्याचे काम सुरु आहे. या तिन्ही प्रश्नांविषयी विचार केला जात आहे. त्याचे साधकबाधक काय परिणाम होतील यावर चर्चा करण्यासाठी व माहिती घेण्यासाठी हा प्रस्ताव प्रलंबित आहे.

श्री.चरणसिंग सप्रा : सभापती महोदय, मी मघाशी 3 प्रश्न विचारले होते, परंतु माझ्या दोन प्रश्नांना मंत्री महोदयांकडून उत्तरे मिळालेली नाहीत. शासनाने कोर्टात ॲफिडेव्हिट सादर केले आहे काय असा एक प्रश्न विचारला होता आणि शासनाने हिवाळी अधिवेशनात या प्रश्नासंबंधी आश्वासन दिले होते त्याला 4 महिने झाले आहेत. म्हणून शासन 15 दिवसामध्ये याची अंमलबजावणी करणार आहे काय असा मी दुसरा प्रश्न विचारला होता.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.चरणसिंग सप्रा यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत न्यायालयाने स्थगिती दिल्याचा मी उल्लेख केला आहे, जी.आर.काढल्याचा उल्लेख केला आहे. या संदर्भात कोणत्याही प्रकारच्या इन्फ्रास्ट्रक्चरवर परिणाम होणार नाही, असे मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांनी नुकतेच शासनाला सांगितलेले आहे. कोर्टामध्ये ॲफिडेव्हिट केलेले नाही.

श्री.चरणसिंग सप्रा : शासनाने कोर्टात तशा प्रकारचे ॲफिडेव्हिट केलेले आहे.

श्री.भास्कर जाधव : मी सन्माननीय सदस्यांना सर्व तारखा सांगितल्या आहेत. महापालिकेच्या आयुक्तांनी शासनाकडे ॲफिडेव्हिट सादर केलेले आहे अशी माझी माहिती आहे. या बाबत शासन किती दिवसात निर्णय घेणार आहे असे विचारले होते. शासन या बाबत लवकर निर्णय घेईल असे मी यापूर्वीच सांगितले आहे.

यानंतर श्री.शिगम....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 15:20

श्री. चरणसिंग सप्रा : लवकरात लवकर म्हणजे किती दिवसात करण्यात येईल.

श्री. भास्कर जाधव : या सभागृहामध्ये एखादी तारीख सांगणे आणि सभागृहाच्या बाहेर एखादी तारीख सांगणे यामध्ये खूप फरक आहे. त्यामुळे अमुक दिवसात हे होईल हे सांगता येणार नाही. म्हणून लवकरात लवकर होईल असे मी सांगितले. यामुळे प्रिमियम चांगला मिळालेला आहे.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : जळगाव जिल्ह्यातील रामदेववाडी गावालगतच्या वन जमिनीतून मातीची होत असलेली तस्करी

**मु.शी.** : जळगाव जिल्ह्यातील रामदेववाडी गावालगतच्या वन जमिनीतून मातीची होत असलेली तस्करी यासंबंधी श्री. दिलीपराव सोनवणे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. दिलीपराव सोनवणे (नाशिक विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वने मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो अणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"जळगाव जिल्ह्यातील रामदेववाडी गावालगत असलेल्या वन जमिनीतून मोठ्या प्रमाणात मातीची तस्करी गेल्या दोन महिन्यांपासून होणे, लाखो रुपयांची माती चोरीस जाणे, स्थानिक नागरिकांनी वन अधिका-यांना कळवूनही कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, तसेच सद्य:स्थितीत रामदेववाडी गावात मोठमोठ्या विटांच्या भट्टया लावण्यात आल्याने त्यापासून मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असणे, मात्र सदर प्रकरणी शासनाच्या अधिका-यांकडून कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, परिणामी स्थानिक नागरिकांत पसरलेला असंतोष, निराशेचे वातावरण, या बाबत शासनाने चौकशी करुन मातीच्या तस्करी प्रकरणी आणि वीटभट्टयांपासून होत असलेल्या प्रदूषणाबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. भास्कर जाधव (वने राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ पूर्वी श्री. खंदारे 15:20

श्री. दिलीपराव सोनवणे : जळगाव जिल्ह्यातील रामदेववाडी गावालगत असलेल्या वन जमिनीतून मोठ्या प्रमाणात होत असलेल्या मातीच्या तस्करी बाबत तसेच वीटभट्टयामुळे होणा-या प्रदूषणाबाबत प्रश्न विचारलेला आहे. ही लक्षवेधी सूचना दोन विभागाशी संबंधित आहे. लक्षवेधीच्या निवेदनामध्ये असे नमूद केलेले आहे की, मौजे रामदेववाडी गावालगतचे राखीव वन क.क्र. 415 व त्यालगतच्या वनक्षेत्रामध्ये कोठेही माती, गौण खनिज चोरी झालेली नसल्याचे तसेच वीट भट्टया देखील आढळून आलेल्या नाहीत." निवेदनातील हे उत्तर चुकीचे आहे. गावातील वीटभट्टयामुळे होणा-या प्रदूषणाबाबत निवेदनामध्ये कोणताही उल्लेख करण्यात आलेला नाही. तेव्हा मातीच्या तस्करीबाबत आणि होणा-या प्रदूषणाबाबत उच्चस्तरीच चौकशी करुन कारवाई करण्यात येईल काय ?

श्री. भास्कर जाधव :सन्माननीय सदस्यांनी जळगाव जिल्ह्यातील रामदेववाडी गावालगत असलेल्या वन जमिनीतून मातीची तस्करी होते का आणि रामदेववाडी गावात वीटभट्टयामुळे प्रदूषण होते का असे प्रश्न विचारलेले आहेत. वन जमिनीवर अशा प्रकारच्या वीटभट्टया असल्याचे आणि मातीची चोरी होत असल्याचे निदर्शनास आले नाही. आजूबाजूला गावामध्ये वीटभट्टया नाहीत असे मी म्हणत नाही, त्या असतीलही. परंतु वन जमिनीवर वीटभट्टया नाहीत. वर्तमानपत्रात जाणीवपूर्वक बातमी दिलेली होती. त्याबाबत खुलासा केलेला आहे.

श्री. दिलीपराव सोनवणे : प्रदूषणाच्या बाबतीत उच्चस्तरीच चौकशी करुन कारवाई करण्यात येईल काय ?

श्री. भास्कर जाधव : हा प्रश्न माझ्या विभागाशी संबंधित नाही. तरीही तेथे वीटभट्टयामुळे प्रदूषण निर्माण होत असेल तर त्याबाबतीत संबंधित विभागाला चौकशी करण्यास सांगितले जाईल.

**उप सभापती** : त्या विभागाला चौकशी करुन कारवाई सुरु करण्यास सांगा.

श्री. भास्कर जाधव : ठीक आहे.

----

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : शिळ-म्हापे,जि.ठाणे येथे मुकेश स्टोन क्रशर कंपनी लावत असलेल्या भूसुरुंगामुळे इमारतीना गेलेले तडे

**मु.शी.** : शिळ-म्हापे,जि.ठाणे येथे मुकेश स्टोन क्रशर कंपनी लावत असलेल्या भूसुरुंगामुळे इमारतीना गेलेले तडे यासंबंधी श्री.सुभाष भोईर वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. सुभाष भोईर (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वने मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो अणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"शिळ-म्हापे, जि. ठाणे स्थित "मुकेश स्टोन क्रशर कंपनी" दगडखाणीचा व्यवसाय करत असून सदर खाणीमध्ये दगड फोडण्याकरिता जिलेटीनच्या माध्यमाने सुरुंग लावले जाणे, या भू सुरुंगामुळे सभोवतालच्या इमारतींना व घरातील भिंतींना तडे जाणे, सदर क्रशर कंपनी रहदारीच्या मुख्य रस्त्याच्या जवळ असल्यामुळे रहदारी करणा-या गाड्यांवर, बाईकस्वारांच्या शरीरावर दगड पडणे, या भू सुरुंगामुळे वित्तहानी व जीवितहानी होण्याची निर्माण झालेली शक्यता, सदर कंपनी बंद करण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयातून मुख्य वनसंरक्षक, ठाणे यांना पत्र क्र. रेतीगट/गौख/टे-1/कावि/कॉ-38142 दिनांक 01 जुलै 2010 नुसार कळविणे, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. भास्कर जाधव (वने राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..5..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष भोईर : ठाणे जिल्ह्यातील  शिळ-म्हापे  येथील मुकेश स्टोनक्रशर कंपनी अनेक वर्षापासून बेकायदेशीरपणे दगडखाणीचा व्यवसाय करीत असून खाणीमध्ये जिलेटीनच्या माध्यमातून लावलेल्या भू सुरुंगामुळे सभोवतालच्या इमारतींना व घरातील भिंतींना तडे गेलेले आहेत. निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की,"सदर संमतीपत्रातील अटी व शर्तीनुसार सदर कंपनीने हवा प्रदूषण नियंत्रण उपाययोजनेसाठी बंदीस्त आवरण असलेले शेड व पाणी फवारणी यंत्रणा उभारलेली असून ती कार्यरत असल्याचे प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नवी मुंबई यांनी कळविले आहे". सभापती महोदय, गेल्या 25 वर्षापासून मी त्या परिसरामध्ये रहात आहे. त्या ठिकाणी असलेली दगडखाण रस्त्यापासून 5 मीटरवर आहे. तेथे मोठया प्रमाणावर लोकवस्ती आहे. त्या दगडखाणीमुळे मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होते. रोज सकाळी 7 ते 8 या वेळेत दगडखाणीमध्ये सुरुंग लावले जातात. त्यामुळे ध्वनी प्रदूषण तर होतेच. परंतु सुरुंगामुळे घरांना आणि इमारतींना तडे गेल्यामुळे आणि धुळीच्या प्रदूषणामुळे नागरिकांच्या जीविताला आणि आरोग्याला धोका निर्माण झालेला आहे. या दगडखाणीच्या माध्यमातून शासनाला किती महसूल प्राप्त होतो ? या दगडखाणीसाठी महानगरपालिकेची कोणतीही परवानगी घेतलेली नाही.

**उप सभापती** :  सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष भोईर : सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, 1980 च्या वन कायद्याप्रमाणे केंद्र सरकारने क्वॉरीजची परवानगी दिली असेल. परंतु आता त्या ठिकाणी मोठया प्रमाणात रहदारी सुरु आहे. त्या ठिकाणी लोकवस्ती वाढली आहे. त्या क्वॉरीजमुळे प्रदूषणात मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. क्वॉरीजमुळे गंभीर प्रश्न त्या ठिकाणी निर्माण झाले आहेत. त्यामुळे ती क्वॉरीज शासन तातडीने बंद करील काय ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, ही दगडी खाण 1999 पासून सुरु आहे. ही क्वॉरीज वन विभागाच्या जागेवर आहे. दगडी खाण मालकाने वन संवर्धन अधिनियम 1980 अंतर्गत परवानगी घेतलेली आहे. त्याने केंद्र सरकारची व वन विभागाची परवानगी घेतलेली आहे. परंतु महाराष्ट्र शासनाची परवानगी घेतलेली नाही ही बाब सन्माननीय सदस्यांनी निदर्शनास आणून दिली आहे. खाण मालक स्वत: तेथे राहतात, तसेच त्या दगडी खाणीच्या आजूबाजूला जे लोक राहतात, त्यांना खूप त्रास होतो आहे अशीही त्यांनी माहिती दिली. 1999 वर्षी ही दगडी खाण सुरु केली आहे. आता 2011 हे वर्ष चालू आहे. त्या ठिकाणची त्यावेळची लोकसंख्या आणि आताची लोकसंख्या यामध्ये बराच फरक झालेला असेल. 1999 साली ही दगडी खाण गावापासून खूप लांब असेल. परंतु त्या ठिकाणी पूर्वी पेक्षा जास्त लोकवस्ती झाली असेल. यासंदर्भात मी अधिक माहिती घेतली. या दगडी खाणीला प्रती वर्ष 2 हजार 500 ब्रॉस उत्खनन करण्यास परवानगी दिलेली आहे. म्हणजे महिन्याला 200 ब्रॉस उत्खनन करण्यास परवानगी आहे. दिवसाला 7 ब्रॉस देखील उत्खनन त्या खाणीतून होते. ही माहिती मला न पटण्यासारखी वाटते आहे. त्या ठिकाणी आजूबाजूला वस्ती वाढली असेल, पर्यायाने तेथील लोकांना त्रास होत असेल. महाराष्ट्र शासनाची परवानगी घेतली नसेल. येत्या 15 दिवसात यासंबंधी पूर्णपणे माहिती घेतली जाईल. सन्माननीय सदस्यांनी सांगितलेल्या गोष्टी वस्तुनिष्ठ असतील तर ती दगडी खाण तत्काळ बंद करण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : लोकवस्ती पासून दगडी खाणीचे अंतर किती असावे, यासाठी कोणते नॉर्मस् ठरविण्यात आले आहेत ? महानगरपालिका क्षेत्रात दगडी खाणी संदर्भात वेगळे नॉर्म्स आहेत, नगरपालिका क्षेत्रात वेगळे नॉर्मस् आहेत. ग्रामपंचायती क्षेत्रात वेगळे नॉर्म्स आहेत. त्या

श्री.जयंत प्र.पाटील..

नॉर्मस्‌मध्ये ही दगडी खाण बसत नसेल तर ती खाण तात्काळ बंद करण्यात येईल काय ? या खाणीतून जास्त उत्खनन केले गेले असेल तर त्या खाण मालकाविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात येईल काय ?

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांनी नॉर्म्सच्या बाबतीत माहिती विचारली आहे. नॅशनल हायवे असेल तर तेथील खाणीचे अंतर ठरलेले आहे. हा रोड कोणता आहे, त्या बाबतची माहिती घेतली जाईल. ती खाण रोड पासून किती अंतरावर आहे व ती खाण नार्म्समध्ये बसते की नाही याची देखील माहिती घेतली जाईल. या दगडी खाणीतून एकूण उत्खनन किती झाले आहे, प्रत्यक्ष खाण मालकाने रॉयल्टी किती भरली असा दुसरा प्रश्न उपस्थित केला गेला, त्या बाबतीत सांगू इच्छितो की, या खाणी संदर्भात पूर्णपणे माहिती घेतली जाणार आहे, त्यावेळी दुस-या प्रश्नांची देखील माहिती घेतली जाईल. त्या खाण मालकाने ठरवून दिलेल्या मर्यादेपेक्षा अधिकचे उत्खनन केले असेल व तेवढी रॉयल्टी भरली नसेल तर ती रॉयल्टी देखील वसूल केली जाईल. ज्या अधिकाऱ्याने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले असेल, त्या अधिकाऱ्यास जबाबदार धरले जाईल.

**उप सभापती** : दगड खाण बंद करा म्हणून जिल्हाधिकारी यांनी कळविले आहे. त्यामुळे या बाबतीत आणखी चौकशी कशाची करणार आहात ? जिल्हाधिकारी हा राज्य सरकारचा प्रतिनिधी म्हणून काम करीत असतो. मला वाटते की, या गोष्टीस विलंब न करता ती खाण बंद करण्याचे ताबडतोबीने आदेश द्यावेत. ते अतिशय सोयीचे होईल.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, आपण सांगितल्याप्रमाणे आदेश देता येतील. परंतु त्या खाणीतून अधिकचे उत्खनन करण्यात आले आहे काय ही माहिती घ्यावी लागेल..

**उप सभापती** : तो दंडात्मक कारवाईचा भाग झाला. ती चौकशी आपण जरुर करा. ही खाण बंद करावी म्हणून जिल्हाधिकारी यांनी अहवाल दिलेला आहे त्यामुळे या बाबतीत आणखी चौकशी करण्याचे काहीही कारण नाही.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती....**

अन्यथा 15 दिवसात खाण मालकाकडून स्टे आणला जाईल. यासाठी इतर बाबींचा विचार करण्याची आवश्यकता आहे असे दिसून येत नाही.

श्री.भास्कर जाधव : तशा प्रकारचा जिल्हाधिकाऱ्यांचा कोणताही अहवाल आलेला नाही.

**उप सभापती** : निवेदनात तसे म्हटले आहे. या संदर्भात अडचण असेल तर मी स्वत: निर्देश देतो. या निर्देशान्वये शासनाने ही खाण बंद करावी.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, आपल्या निर्देशाची अंमलबजावणी केली जाईल.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, 1999 साली या खाणीला शासनाने परवानगी दिली होती. दरवर्षी खाणीच्या परवानगीचे नूतनीकरण करावे लागते. प्रत्येक वर्षी परवानगीचे नूतनीकरण करताना त्या भागात किती वस्ती वाढली आहे, वस्तीपासून खाण किती अंतरावर आहे याची तपासणी केली जात नाही का? महाराष्ट्रामध्ये जेवढ्या खाणींना परवानगी दिली आहे त्यांच्या परवानगीचे नूतनीकरण करताना निकषांचे उल्लंघन होत असेल तर त्यांच्यावर बंदी घातली जाईल काय?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, ही खाण केवळ वन विभागाच्या जागेवर असल्यामुळे वन विभागाचा संबंध आलेला आहे. खाणीचा विषय महसूल विभागाशी संबंधित आहे.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सोलापूर जिल्हयात ऊसाच्या विक्रमी उत्पादनामुळे ऊस गाळप होण्यास निर्माण झालेली अडचण

**मु.शी.**: सोलापूर जिल्हयात ऊसाच्या विक्रमी उत्पादनामुळे ऊस गाळप होण्यास निर्माण झालेली अडचण याबाबत सर्वश्री दिपकराव साळुंखे, जयवंतराव जाधव, अनिल भोसले, रमेश शेंडगे, संदीप बाजोरिया,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.दिपकराव साळुंखे (सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"ऊसाच्या विक्रमी उत्पादनामुळे सोलापूर जिल्ह्यात अद्यापही ३५ ते ३७ लाख मेट्रीक टन ऊस गळीताविना शेतात उभा राहणे, जिल्ह्यातील कारखान्यांची गाळप क्षमता व ऊस तोडणी मजुरांची कमतरता, यामुळे उभा असलेला सर्व ऊस गाळप होणे अडचणीचे होणे, गाळपाअभावी शिल्लक असलेल्या ऊसामुळे शेतक-यांत पसरलेले चिंतेचे वातावरण, राज्य शासनाकडून अतिरिक्त ऊस गाळप करणा-या कारखान्यांकरिता तोडणी व वाहतुकीच्या खर्चासाठी अनुदान देण्याची आवश्यकता, शेतक-यांना व कारखान्यांना वाचविण्यासाठी शासनाकडून घट अनुदान व गाळप अनुदान देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करण्यांत येत असलेली उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...३..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-8....

श्री.दिपकराव साळुंखे : सभापती महोदय, सोलापूर जिल्हयात यंदा ऊसाचे विक्रमी उत्पादन झाले आहे. निवेदनात म्हटले आहे की, 139.43 लाख टन ऊस उत्पादन होणे अपेक्षित आहे. ही आकडेवारी चुकीची आहे. सोलापूर जिल्हयात 165 ते 170 लाख टन ऊस उपलब्ध आहे. त्यापैकी 120 ते 125 लाख टन ऊसाचे गाळप झाले असून 40 लाख टन ऊस शेतात उभा आहे. शेतकऱ्यांच्या मनामध्ये भीती निर्माण झाली आहे. वादळी वारे, उन्हाची तीव्रता यामुळे 15 जूनपर्यंत कारखाने सुरु न ठेवल्यास 5 ते 6 लाख टन ऊस गाळपाअभावी शिल्लक राहण्याची शक्यता आहे. शासनाने अद्याप अतिरिक्त ऊसाच्या वितरणाचे आदेश दिलेले नाहीत. 50 कि.मी.च्या पुढील अंतरासाठी वाहतूक अनुदान दिले जाते. 50 कि.मी.अंतराच्या वाहतुकीसाठी 400 ते 450 रुपये खर्च येतो, हा खर्च परवडत नाही. म्हणून वाहतुकीसाठी अनुदान शून्य कि.मी.पासून मंजूर करण्यात यावे. मार्च व एप्रिल महिन्यात 1 टक्का रिकव्हरी घटली आहे. मे महिन्यात आणखी रिकव्हरी घटणार आहे. त्यामुळे घट जाहीर केली तरच कारखाने तग धरतील. मजूर उपलब्ध होण्याची शक्यता कमी आहे. एका एकरासाठी 20 हजार रुपये मजुरी मागितली जाते, ती शेतकऱ्यांना परवडत नाही. त्यामुळे शासन अतिरिक्त ऊसाच्या वितरणाचे आदेश तातडीने देणार आहे काय, वाहतुकीसाठी 50 कि.मी.ऐवजी शून्य कि.मी.अंतरापासून विचार केला जाईल काय, 3 रुपये प्रती कि.मी. प्रती टन वाहतूक अनुदान दिले जाते ते 5 रुपये प्रती कि.मी. प्रती टन वाढवून दिले जाईल काय, घट अनुदान 1 मे पासून दिले जाईल काय?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सोलापूर जिल्हयातील ऊस गाळपाच्या संदर्भात ही लक्षवेधी सूचना मांडलेली आहे. सोलापूर जिल्हयात 165 ते 170 लाख टन ऊसाचे उत्पादन झाले आहे अशी माहिती सन्माननीय सदस्यांनी दिली आहे. साधारणपणे 35 ते 40 लाख टन ऊस अजूनही गाळपाअभावी शिल्लक आहे. निश्चितपणे या आकडेवारीची तपासणी पुन्हा एकदा करुन घेतली जाईल. राज्य शासनाने दि.16.3.2011 पासून 50 कि.मी.वरील अंतरासाठी 3 रुपये प्रती टन प्रती कि.मी. वाहतूक अनुदान जाहीर केलेले आहे.

अग्रिम प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

नंतर 3 के.1...

लक्षवेधी क्र. 8...................... श्री. प्रकाश सोळंके .........

हे अनुदान आहे. शेवटी कारखान्याला मदत म्हणून आपण त्या कारखान्याचे कार्यक्षेत्र हे 50 किलोमीटरचे समजले आहे. आपण "0" किलोमीटरपासून मागणी केली आहे पण या मागणीचा विचार शासनाला करता येणार नाही. कारण 50 किलोमीटरपर्यंत ऊसाची वाहतूक करुन ऊसाचे गाळप करावे असेच अपेक्षित असते तरी देखील त्याबाहेरील अंतराला आपण सबसिडी दिली आहे. तसेच वितरणाचे आदेश अजून मिळाले नाही यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, कारखान्यांच्या मागणीप्रमाणे वितरणाचे आदेश मिळावेत अशा सूचना ताबडतोब दिल्या जातील. तसेच घट अनुदानासंबंधीचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर केला होता पण अद्याप त्याला मान्यता मिळाली नाही. पुन्हा हा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात येईल. तसेच तीन रुपये प्रति किलोमीटर हा दर कमी होतो असेही सन्माननीय सदस्यांनी सांगितले. पण आपण प्रति किलोमीटर, प्रति टन 2 रुपये एवढा दर होता त्यामध्ये आता 50 टक्के वाढ केली आहे. सोलापूर, पुणे आणि नगर जिल्ह्यात अतिरिक्त ऊस शिल्लक राहील की काय अशी शंका विभागाला सुध्दा आहे. यासंदर्भात संबंधित जिल्ह्याचे वरिष्ठ अधिकारी व सहकार विभागाचे सचिव यांची बैठक घेऊन उर्वरित ऊसाचे जास्तीत जास्त गाळप कसे होईल याचा विचार केला जाईल.

श्री. जयंत प्र. पाटील : महोदय, जो ऊस गाळपाविना शिल्लक राहणार आहे त्या ऊसापोटी त्या त्या शेतकऱ्यांना शासन नुकसान भरपाई देणार काय ?

श्री. प्रकाश सोळंके : महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, हा प्रश्न आता उपस्थित होणार नाही. कारण 15 जून पर्यंत ऊसाचे गाळप करावे असे अपेक्षित आहे. त्यानंतर काय परिस्थिती निर्माण होते त्यातून मार्ग काढण्यासाठी योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

श्री. जयंत पाटील : महोदय, 15 जून पर्यंत गाळप केले तर त्या ऊसाला उतारा कमी येणार, परिणामी ॲव्हरेज उतारा सुध्दा कमी भरेल. तसेच काही कारखान्यांची गाळप क्षमता एवढी नसते तर काही कारखान्यांकडे उत्पादित झालेला माल ठेवण्यासाठी गोडावून्स नाहीत. ज्याप्रमाणे सोलापूर जिल्ह्यात ऊस शिल्लक राहणार आहे तसाच मराठवाड्यातही गाळपाविना ऊस शिल्लक राहणार आहे याची आपणाला सुध्दा जाणीव आहेच. त्यामुळे तेथील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याचे आश्वासन कारखाना सुरु करण्यापूर्वीच दिले होते, त्याची पूर्तता शासन करणार काय ?

...2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी क्र. 8......................

श्री. प्रकाश सोळंके : महोदय, सध्याच्या परिस्थितीत हा प्रश्न उपस्थित होत नाही, कारण जास्तीत जास्त ऊसाचे गाळप व्हावे असाच शासनाचा प्रयत्न राहणार आहे. कारण आपण कारखान्यांना, कार्यक्षेत्राच्या बाहेरच्या ऊसासाठी सुध्दा वाहतूक अनुदानाची सवलत देतो. त्या व्यतिरिक्त ऊस शिल्लक राहिला तर त्या अनुषंगाने योग्य निर्णय घेण्यात येईल.

श्री. दीपकराव साळुंखे : महोदय, असा अतिरिक्त ऊस शिल्लक राहू नये म्हणून आतापासूनच तयारी ठेवून त्या त्या भागातील कारखान्यांना आवश्यक सोई-सुविधा दिल्या तर त्याचा फायदा होऊ शकतो. कारण नंतर ऊस तोड कामगार कामावर टिकून राहत नाहीत आणि उक्ता ऊस तोडण्यासाठी स्थानिक मजुरांना दिला तर 15-20 हजार रुपये एका एकरासाठी घेतात. त्यामुळे शासन जेवढी मदत करणार त्यापेक्षा जास्त नुकसान या अतिरिक्त ऊसाच्या तोडणीमध्ये होत असते. माझी अशी मागणी आहे की, यासंदर्भात आपण आताच सांगितल्याप्रमाणे केवळ अधिकाऱ्यांबरोबर बैठक घेऊन चालणार नाही तर या दोन तीन आवश्यक मागण्यांचा विचार करुन शासन निर्णय घेणार काय ?

श्री. प्रकाश सोळंके : महोदय, वाहतूक अनुदान, घट उतारा अनुदान मिळावे असा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर केला होता त्यापैकी वाहतूक अनुदानाला मंत्रिमंडळाने मान्यता दिली. घट उताऱ्यावर अनुदान मिळण्याबाबतचा प्रस्ताव अद्याप मान्य झालेला नसला तरी पुन्हा एकदा असे घट अनुदान मिळण्याबाबत मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव सादर करण्यात येईल.

------

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: उल्हासनगर कॅम्प नं.1येथील शीशमहल अपार्टमेंट या इमारतीचा स्लॅब कोसळून झालेली दुर्घटना

**मु.शी.**: उल्हासनगर कॅम्प नं.1येथील शीशमहल अपार्टमेंट या इमारतीचा स्लॅब कोसळून झालेली दुर्घटना या विषयावर श्री. रामनाथ मोते यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यास अनुलक्षून माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांचे निवेदन.

श्री. भास्कर जाधव :(नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी उल्हास नगर कॅम्प नं.1येथील शीशमहल अपार्टमेंट या इमारतीचा स्लॅब कोसळून झालेली दुर्घटना या विषयासंबंधी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यास अनुलक्षून मी पुढील निवेदन करीत आहे.

उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील कॅम्प नं.1 येथील शीशमहल अपार्टमेंट नावाची तळमजला+पाच मजले अशा स्वरुपाच्या इमारतीमधील पाचव्या मजल्यावरील एका बेडरुमचा स्लॅब दिनांक 19 एप्रिल, 2011 रोजी सायंकाळी 5.30 वाजेच्या सुमारास कोसळून अपघात झालेला आहे.

शीशमहल अपार्टमेंट या इमारतीमध्ये तळमजल्यावर 7 दुकाने व 25 सदनिका होत्या. सदरची इमारत तळ मजला+पाच मजले अशा स्वरुपाची आहे. सदरच्या इमारतीचे बांधकाम सन 1993 च्या सुमारास करण्यात आले होते. सदरची इमारत पूर्णपणे अनाधिकृत होती. सदरच्या इमारतीविरुध्द तत्कालीन नगरपालिकेतर्फे स्थानिक पोलीस स्टेशनला एमआरटीपी ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करणे कामी पत्रव्यवहार करण्यात आला होता. महापालिकेने घोषित केलेल्या धोकादायक इमारतीमध्ये सदर इमारतीचा समावेश नव्हता.

दिनांक 19 एप्रिल, 2011 रोजी सायंकाळी 5.30 च्या सुमारास सदर इमारतीमधील पाचव्या मजल्यावरील बेडरुमचा स्लॅब कोसळून तो चौथ्या मजल्यावर व त्यानंतर चौथ्या मजल्यावरील स्लॅब तिस-या मजल्यावर पडला. सदरच्या दुर्घटनेमध्ये 6 मुले व दोन महिला मयत झाल्या आहेत. सदर दुर्घटनेमध्ये मयत झालेल्या व्यक्तींच्या कायदेशीर वारसदारांना प्रत्येकी रुपये एक लक्ष या प्रमाणे आर्थिक मदत देण्यात येईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ...

त्याच प्रमाणे सदरची घटना घडल्यानंतर महापालिकेतर्फे तात्काळ दुर्धटनास्थळी मदत व बचाव कार्य सुरु करण्यात आले आहे. सदरची इमारत सुरक्षिततेच्या दृष्टीने रिकामी करण्यात आलेली आहे. त्याच प्रमाणे शहर अभियंता व कार्यकारी अभियंता सावर्जनिक बांधकाम विभाग यांना इमारतीची संरचनात्मकदृष्टया तपासणी करण्याचे आदेश देखील देण्यात आले आहेत.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी जे निवेदन केलेले आहे त्यासंदर्भात माझी मंत्री महोदयांना एकच विनंती आहे. परवा उल्हासनगर मध्ये जी घटना घडली त्यासंदर्भात सभागृहात मी औचित्याचा मुद्दा उपस्थित केला होता व आता माननीय मंत्री महोदयांनी तातडीने निवेदन देखील केले त्याबद्दल मी मंत्री महोदयांना धन्यवाद देतो. मंत्री महोदयांनी पर्टीक्यूलर उल्हानगरच्या विषयाच्या संदर्भात लक्ष घातलेले आहे तसेच उल्हासनगरसाठी प्रयत्न देखील करीत आहेत त्यामुळे मी शासनाला एवढीच विनंती करतो की, उल्हासनगर मधील ज्या काही अनधिकृत व धोकादायक इमारती आहेत त्या सातत्याने कोसळत आहेत व त्यामध्ये अनेकांचे प्राण जात आहेत. कालच्या घटनेत इमारत कोसळून 8-10 लोकांचा मृत्यू झालेला आहे. त्यामुळे उल्हासनगरच्या अडचणी सोडविण्यासाठी मी मंत्री महोदयांना विनंती करतो की, उल्हास नगर मधील असे प्रकार टाळण्यासाठी लवकरात लवकर उपाययोजना झाली तर बरे होऊ शकेल एवढी मी आपल्या माध्यमातून मंत्री महोदयांना विनंती करतो.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नियुक्त करण्यात आली असून या समितीचा अहवाल लवकरच येण्याची शक्यता आहे.

---------

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**

**पृ. शी.** : राज्यातील शासन अनुदानित शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना सहावा वेतन आयोग लागू करणे

**मु. शी.** : राज्यातील शासन अनुदानित शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना सहावा वेतन आयोग लागू करणे यासंबंधी सर्वश्री भगवान साळुंखे, रामनाथ मोते, नागो गाणार, चंद्रकांत पाटील, डॉ. रणजित पाटील, सर्वश्री संजय केळकर, विनोद तावडे ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. भगवान साळुंखे ( पुणे विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील शासन अनुदानित शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतरांना सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन मिळणे क्रमप्राप्त असूनही अद्यापही या आठ महाविद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहाव्या वेतन आयोगाच्या लाभापासून वंचित असणे, क्रीडा व युवकसेवा विभागाने योग्य वेळी योग्य ती कार्यवाही न करणे, संचालक, क्रीडा व युवकसेवा विभाग, पुणे यांनी या ८ महाविद्यालयांना सहावा वेतन आयोग लागू करण्यासाठी निधीची मागणी व पाठपुरावा करुनही राज्य शासनाने अद्याप या प्रश्नी कोणतीही उचित कार्यवाही न करणे, या महाविद्यालयीन शिक्षक व शिक्षकेतरांनी आंदोलनाची भूमिका घोषित करणे, शासनाने या प्रश्नी सहानुभूतीपूर्वक भूमिका घेऊन शिक्षक व शिक्षकेतरांना सहावा वेतन आयोग लागू करण्यासाठी उचित कार्यवाही करण्याची आवश्यकता व यावर शासनाची प्रतिक्रिया."

श्री. पद्माकर वळवी ( क्रीडा मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये अशासकीय स्वरुपाच्या 8 अनुदानित शारीरिक महाविद्यालये आहेत. महाराष्ट्रातील सर्व कॉलेजमधील सर्व प्राध्यापकांना सहावा वेतन आयोग लागू केलेला आहे. परंतु शारीरिक महाविद्यालयातील कर्मचा-यांसाठी सहावा वेतन आयोग लागू करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे असे उत्तर देण्यात आलेले आहे. परंतु सहावा वेतन आयोग या कर्मचा-यांना केव्हापासून लागू केला जाणार आहे ? ही शारीरिक महाविद्यालये क्रीडा विभागाच्या आधिपत्याखाली असल्यामुळे असे प्रश्न नेहमी उद्‌भवत असतात त्यामुळे ही शारीरिक महाविद्यालये क्रीडा शिक्षणाच्या आधिपत्यातून काढून उच्च व तंत्र शिक्षणाच्या आधिपत्याखाली घातली तर या ठिकाणच्या कर्मचा-यांना अशा प्रकारच्या प्रसंगाना सामोरे जावे लागणार नाही, नेहमी तोंड द्यावे लागणार नाही त्यामुळे अशा त-हेचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय ?

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पद्माकर वळवी :सभापती महोदय,राज्यातील 8 शासन अनुदानित शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्यासंबंधीच्या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने प्रश्न विचारण्यात आला असून शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना सहावा वेतन आयोग लागू करण्यासंबंधीचा प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे सादर करण्यासाठी पाठविलेला आहे.वित्त विभागाने काही अभिप्राय व काही अधिकची माहिती मागितली होती ती माहितीसुध्दा त्यांच्याकडे ताबडतोबीने पाठवत आहोत आणि लवकरात लवकर हा प्रस्ताव मंजूर होईल अशी अपेक्षा आहे. या बाबतीत वित्त विभागाचे असे म्हणणे आहे की, शिक्षकांना सहावा वेतन आयोग लागू करण्यासबंधीचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर जाईल आणि शिक्षकेतर कर्मचा-यांचा प्रस्ताव कार्यालयीन पातळीवर मंजूर होऊ शकेल. लवकरात लवकर दोघांनाही सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्यात येतील.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, राज्य सरकारी कर्मचा-यांना 1.1.2006 पासून सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू केल्या होत्या.अन्य अनुदानित संस्थांमधील कर्मचा-यांना देखील 1.1.2006 पासून या शिफारशी लागू केल्या होत्या. प्रत्येक वेतन आयोग दहा वर्षासाठी असतो. राज्य सरकारी कर्मचा-यांना 1.1.2006 पासून सहावा वेतन आयोग लागू करण्यात आला होता आता 2011 साल सुरु असून पाच वर्षे होऊन गेलेली आहेत परंतु अजूनही अनुदानित शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्यात आलेल्या नाहीत. त्या लागू कराव्यात अशी मागणी आम्हाला सतत करावी लागते हे आमचे दुर्दैव आहे. या कर्मचा-यांना लवकरात लवकर या शिफारशी लागू करण्यात येतील असे माननीय मंत्र्यांनी सागितले आहे. पुढील शैक्षणिक वर्ष सुरु होण्याच्या आत शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-याना या शिफारशी लागू करण्याच्या बाबतीत माननीय मंत्री स्वत: पुढाकार घेऊन निश्चित निर्णय घेणार आहे काय ?

श्री.पद्माकर वळवी : होय. यासाठी क्रीडा विभागाने 2011-2012 या अर्थसंकल्पामध्ये 9 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. त्याचबरोबर शासन या संबंधी सकारात्मक भूमिका घेत आहे. वित्त विभागाने थोडीशी माहिती मागितली होती ती त्यांना सादर केली होती. शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील कर्मचारी सोडून इतर कर्मचा-यांसाठी सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पद्माकर वळवी .....

झाल्या आहेत तसेच या कर्मचा-यांना देखील त्या लागू व्हाव्यात म्हणून शासन सकारात्मक भूमिका घेत आहे.लवकरात लवकर या कर्मचा-यांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू होतील.शारीरिक शिक्षण महाविद्यालये क्रीडा विभागाच्या आधिपत्याखाली असून क्रीडा विभागा ऐवजी उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या आधिपत्याखाली ही महाविद्यालये देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, राज्यामध्ये शारीरिक शिक्षण देणारी 8 महाविद्यालये असून या महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना सहावा वेतन आयोग लागू करणे हे उच्च शिक्षण विभागाचे काम आहे. या संबंधीचा प्रस्ताव क्रीडा विभागाने तयार केलेला आहे परंतु यासंबंधीचा प्रस्ताव तयार करण्याचे काम दुस-या विभागाचे आहे.त्यामुळे मला असे म्हणावयाचे आहे की इतर शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांना तसेच प्राध्यापकांना सहावा वेतन आयोग लागू करुन दोन वर्षे होऊन गेलेली आहेत. अशा प्रकारे इतर कर्मचारी दोन वर्षापासून सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशींचा लाभ घेत आहेत आणि संपूर्ण राज्यात 8 शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील फक्त 120 कर्मचा-यांना सहावा वेतन आयोग लागू करण्यात आलेला नाही. या कर्मचा-यांची संख्या खूपच कमी आहे तसेच त्यांची बाजू कोणी मांडणारे नाही म्हणून त्यांच्याकडे सातत्याने दुर्लक्ष करावयाचे काय ? त्यांना लवकरात लवकर सहावा वेतन आयोग लागू करण्यात येईल हेच आम्ही या सभागृहात सतत ऐकत आलो आहे. येत्या महाराष्ट्र दिना पूर्वी या
कर्मचा-यांना सहावा वेतन आयोग लागू करण्यात येईल असे माननीय मंत्र्यांनी स्पष्टपणे सांगावे. तेव्हा येत्या महाराष्ट्र दिनापूर्वी म्हणजेच 1 मे पूर्वी शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना सहावा वेतन आयोग लागू करण्यात येईल असे माननीय मंत्री महोदय उत्तर देणार आहेत काय व तसा आदेश निर्गमित करणार आहे काय ?

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की उच्च व तंत्र शिक्षण विभाग,वित्त विभाग या सारख्या वेगवेगळया विभागाचा यामध्ये संबंध येत असून बाकीच्या विभागाकडून अभिप्राय आलेला आहे व आता हे काम झालेले आहे. मंत्रिमंडळा समोर एखादा प्रस्ताव सादर करावयाचा असेल तर त्याची प्रोसेस आहे. मंत्रिमंडळा समोर नक्की कोणत्या तारखेला हा प्रस्ताव येईल हे मी सांगू शकत नाही. यामध्ये विलंब झालेला आहे हे मला मान्य आहे

3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

परंतु लवकरात लवकर तो प्रस्ताव मंजूर होईल. क्रीडा विभाग आता स्वतंत्र झालेला आहे. हा विभाग त्यांच्या मागण्यांकडे पूर्णपणे लक्ष देत आहे.

श्री.विक्रम काळे : 120 कर्मचा-यांचाच फक्त प्रश्न आहे त्यामुळे 1 मे पूर्वी त्यांना सहाव्या वेतन आयोग लागू करणार आहात काय ?

श्री.पद्माकर वळवी : सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी ताबडतोबीने लागू करु.

श्री.विक्रम काळे : 1 मे पूर्वी त्यांना वेतन आयोग लागू करावा.

श्री.पद्माकर वळवी : अशा प्रकारे आपल्याला करता येणार नाही. मंत्रिमंडळापुढे एखादा प्रस्ताव पाठवत असतांना त्यांची प्रोसेस ठरलेली आहे. त्यामध्ये वित्त विभागाचा देखील संबंध येतो. सन्माननीय सदस्यांना सगळी माहिती आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, .......

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांना मी सांगू इच्छितो की,आपण विचारलेल्या प्रश्नाला माननीय मंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे.

श्री.सतीश चव्हाण :. 1 मे पूर्वी शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील कर्मचा-यांना सहावा वेतन आयोग लागू करण्यात येईल काय असा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री विक्रम काळे यांनी विचारला आहे.माननीय मंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, सर्व कर्मचा-यांबरोबराच शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षक कर्मचा-यांना सहावा वेतन आयोग लागू व्हावयास पाहिजे होता. या महाविद्यालयात फक्त 120 कर्मचारी आहेत. राज्यातील लाखो कर्मचा-यांना सहावा वेतन आयोग लागू करण्यासाठी किती दिवस लागले हे मला माहीत नाही.परंतु 120 कर्मचा-यांना सहावा वेतन आयोग लागू करण्या संबंधीची माहिती संकलित करुन तो प्रस्ताव तयार करण्यासाठी बराच विलंब लागला आहे. माननीय मंत्र्यांनी आताच असे सांगितले आहे की, आता क्रीडा विभाग स्वतंत्रपणे स्थापन करण्यात आला आहे. 120 कर्मचा-यांना सहावा वेतन आयोग लागू करण्यासंबंधीची माहिती एकत्रित करुन 1 मे च्या आत तो प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर ठेवणार आहात काय ?

नंतर श्री.सरफरे

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, आपण सन 2011-2012 च्या अर्थसंकल्पामध्ये तरतूद सुध्दा केली आहे. मागील थकबाकी आणि चालू देणी देण्यासाठी आपण 9 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्याबाबत आम्ही निश्चितपणे पॉझिटीव्ह आहोत. त्याच प्रमाणे या संदर्भात वित्त विभागाने मागविलेली माहिती चार दिवसात वित्त विभागाला सादर केली जाईल आणि पुढील काही दिवसात मंत्रिमंडळापुढे हा प्रस्ताव आणण्यात येईल.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी आता सांगितले की, हा विषय कॅबिनेटपुढे मांडण्यात येईल. आपण जर यामध्ये एवढे सकारात्मक उत्तर देत आहात तर हा विषय मंत्रिमंडळापुढें नेऊन किती दिवसात सोडविणार आहात?

श्री. पद्माकर वळवी : सभापती महोदय, मंत्रिमंडळापुढे विषय नेल्यानंतर तत्काळ मान्य होतो. त्यामुळे मंत्रिमंडळापुढे नेण्याची प्रक्रिया पूर्ण करुन लवकरात लवकर ते मान्य करुन घेण्यात येईल. यामध्ये निश्चितपणे उशीर झालेला आहे हे मला मान्य आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, पुढील अधिवेशनाला अजून तीन महिने शिल्लक आहेत, या तीन महिन्यात मंत्रिमंडळाच्या किती तरी बैठका होतील. पुढील अधिवेशनापूर्वी हा आदेश निर्गमित केला जाईल असे मंत्री महोदयांनी उत्तर देतील काय?

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, मान्य आहे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, पुढील अधिवेशन सुरु होण्याअगोदर आदेश निर्गमित केले जातील काय?

श्री. पद्माकर वळवी : सभापती महोदय, होय.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मु.शी.: लक्षवेधी सूचना क्रमांक 10 संबंधी**

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, आजच्या कार्यक्रम पत्रिकेमधील दहावी लक्षवेधी सूचना आम्हाला याठिकाणी उपस्थित करावयाची आहे, परंतु संबंधित मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नाहीत. आजचा अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. लक्षवेधी सूचनेतील विषय अतिशय महत्वाचा आहे. मघाशी माननीय श्री. रावते साहेबांनी सांगितल्याप्रमाणे शासनामध्ये बसलेली ही अधिकारी मंडळी आम्ही विधिमंडळाला विचारीत नाही असे समजणारी आहेत. त्याच्याशी संबंधित हा विषय आहे. त्यामुळे ही लक्षवेधी सूचना आपण आजच घ्यावी अशी विनंती करतो.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : ही लक्षवेधी सूचना आज चर्चेला घेण्यात येईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: लक्षवेधी सूचनांसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे

प्रधान सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेतील बाब क्रमांक आठ (ब) च्या अंतर्गत दाखविण्यात आलेल्या क्रमांक 1 ते 286 या लक्षवेधी सूचनांसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहेत.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली क्रमांक 1 ते 286 ही निवेदन कृपया छापावीत.)

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मु.शी.: लक्षवेधी सूचना क्रमांक 10 संबंधी**

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, आजच्या कार्यक्रम पत्रिकेमध्ये दहाव्या क्रमांकावर दाखविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचनेचे काय झाले?

**तालिका सभापती** : सदर लक्षवेधी सूचना मंत्री महोदय सभागृहामध्ये उपस्थित झाल्यानंतर चर्चेला घेण्यात येईल.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : औचित्याचे मुद्दे

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, गोंदिया येथील केटीएस हॉस्पिटलचे निर्माण कार्य सुरु आहे. त्या ठिकाणी 12 फूट खोल खड्डा खणला गेला असून त्यामध्ये कॉंक्रिट बेसचे काम सुरु आहे. त्या खड्डयामध्ये 19 तारखेला साफसफाई करण्यासाठी 5 मजूर उतरुन काम करीत असतांना त्यामध्ये 3 महिलांचा मृत्यू झाला आणि 2 कर्मचारी जखमी झाले. त्यामध्ये खमारी निवासी कविता कालीराम कुडवते (33 वर्षे), कमरगांव निवासी उर्मिला शोभेलाल दमाहे (32 वर्षे) खमारी निवासी कोडतेबाई (26 वर्षे) या 3 महिलांचा मृत्यू झाला आणि जखमींमध्ये नवेगाव निवासी शोधनलाल गोधराज सुलाखे (51 वर्षे) खमारी निवासी अनिता तुलसीराम गोडंगे (36 वर्षे) यांचा समावेश आहे. एका शासकीय हॉस्पिटलच्या उभारणीचे काम करीत असतांना मरण पावलेल्या कामगारांना शासनाने प्रति 2 लाख रुपयांची मदत करावी. तसेच जे कामगार गंभीररित्या जखमी झाले आहेत त्यांना सुध्दा आर्थिक मदत करावी अशी मी या ठिकाणी मागणी करतो. सार्वजनिक बांधकाम विभागाने काम करीत असतांना त्या मजुरांचा विमा उतरविला पाहिजे अशाप्रकारे प्रत्येक कॉंट्रॅक्टरला सूचना दिली पाहिजे. तसेच या ठिकाणी कॉंट्रॅक्टरच्या हलगर्जीपणामुळे घटना घडली आहे म्हणून त्याबाबत निश्चितपणे चौकशी केली पाहिजे. अशी मी या ठिकाणी औचित्याच्या मुद्दयाव्दारे मागणी करीत आहे.

----

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : सन्माननीय सदस्या ॲड.उषाताई दराडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

ॲड.उषाताई दराडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"समाजकल्याण न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालयाने कॅलेंडर छापलेले आहे. त्यामध्ये माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री व समाजकल्याण खात्याचे माननीय मंत्री, माननीय राज्यमंत्री आणि मुख्य सचिव यांचे फोटो वरच्या बाजूला छापले तर घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचे फोटो कॅलेंडरच्या खालच्या बाजूला छापल्यामुळे समाजामध्ये प्रचंड संताप व्यक्त केला जात आहे. या कृतीमुळे महामानवांच्या कार्याचीच नव्हेतर अखंड महाराष्ट्राची घोर अवहेलना झाली आहे. माझी या औचित्याच्या मुद्याव्दारे अशी विनंती आहे की, या कॅलेंडरचे वितरण ताबडतोब थांबविण्यात यावे आणि या प्रकरणाची सखोल चौकशी करुन ज्यांनी ही चूक केलेली असेल त्यांच्या विरोधात ताबडतोब कारवाई करावी.

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : माननीय मुख्यमंत्र्यांवरच कारवाई करावी लागेल.

ॲड.उषाताई दराडे : नाही. त्यांचा या बाबतीत काय संबंध आहे.

----

3 ओ-2 . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.एस.क्यू.जमा यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.एस.क्यू.जमा : सभापति महोदय, मेरा औचित्य का मुद्दा है.नागपुर विमानतल पहले एयरपोर्ट अथॉरिटी ऑफ इंडिया के अधीन था. बाद में महाराष्ट्र सरकार और केन्द्रीय सरकार की एयरपोर्ट अथॉरिटी ने एक जॉइंट कंपनी एम.आई.पी.एल. बनाई.इस कंपनी में महाराष्ट्र सरकार के 51 प्रतिशत शेयर हैं और केन्द्रीय सरकार की एयरपोर्ट अथॉरिटी के 49 प्रतिशत शेयर हैं. अब यह विमानतल एम.आई.पी.एल. के अधीन है.सभापति महोदय, मैं आपका ध्यान आकर्षित करना चाहता हूँ, क्योंकि आप भी विमान से सफर करते हैं.नागपुर विमानतल का रनवे बहुत खराब हो गया है, उसमें खड्डे हो गए हैं और कोई भी फ्लाइट जब लँड करती है तो बहुत उछलती है. इस रनवे की रिपेयरिंग एम.आई.पी.एल. को करनी है और इस को रिपेयर करने का प्रस्ताव इस कंपनी के मुंबई मुख्यालय में घूम रहा है.नागपुर विमानतल का रनवे रिपेयर नहीं हो रहा है और इससे बहुत बड़ा खतरा हो सकता है. मैं आपके माध्यम से सरकार का ध्यान इस ओर खींचना चाहता हूँ. सरकार इस ओर ध्यान दे जिससे कि वहां पर रिपेयर का काम अविलम्ब किया जाए, ताकि वहां पर कोई खतरा न हो.

-----

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** ( श्री. मोहन जोशी) : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. खरे म्हणजे हा औचित्याचा मुद्दा मांडावा की, नाही अशा संभ्रमावस्थेत मी आहे. परंतु नाईलाजाने तो मांडावा लागत आहे.

सभापती महोदय, दादर येथील कबुतरखाना संपूर्ण जगाला माहीत आहे. दादरचा पत्ता देताना कबुतरखाना असा दिला जातो. हा कबुतरखाना 125 वर्षा पूर्वीचा आहे. ज्यावेळी दादरमध्ये रस्ते नव्हते, त्यावेळे पासून हा कबुतरखाना येथे आहे. महापालिकेकडून हा कबुतरखाना पूर्णपणे तोडण्यात आलेला आहे. तो रस्त्यामध्ये येत होता, रस्त्याच्या आडवा येत होता, अमुक होता, तमुक होता असे काही नाही, असे असताना कोणा नगरसेवकाच्या सांगण्यावरुन तो तोडण्यात आला आहे. याचा अर्थ कोणाच्या मर्जीत येईल, तेव्हा त्यांनी काहीही करावयाचे काय? श्री. प्रमोद नवलकर यांनी ज्यावेळी दादर चौपटी स्वच्छ केली होती, त्यावेळी त्यांनी एका कोपऱ्यात कबुतरखाना निर्माण केला होता. अशा प्रकारे मुंबईमध्ये अनेक ठिकाणी कबुतरखाने आहेत. 125 वर्षा पूर्वीचा हा कबुतरखाना कोणासाठी तोडला, हा कबुतरखाना तोडण्याचे काय कारण आहे, हे कळले पाहिजे. यामुळे दादरमधील जैन समाज अत्यंत संतप्त झालेला आहे. दादरमधील जैन समाजाचे लोक एकत्र येतात, दानधर्मातून निधी गोळा करतात आणि स्वत:च्या खर्चातून या कबुतरखान्याची डागडुजी करतात. त्यांनी त्या ठिकाणी आजारी कबुतरांसाठी एक खोके तयार केलेले आहे. मी ज्यावेळी शाळेत जात होतो, त्यावेळी कबुतरांसाठी तयार करण्यात आलेले हे खोके मी पहात होतो. या खोक्यामध्ये आजारी कबुतरांसाठी औषधपाणी ठेवण्यात येत होते. हा भावनेचा विषय आहे. त्यावेळी मी सुध्दा हौसेने कबुतर पाळत होतो. पण तो कबुतरखाना तोडण्याचे कारण मला कळलेले नाही. दादरमध्ये जे नवीन विभागीय अधिकारी आलेले आहेत ते त्या ठिकाणी गेले आणि त्यांनी धडाधड कबुतरखाना तोडून टाकला आहे. त्यामुळे तेथील जनतेत प्रचंड प्रमाणात संताप निर्माण झालेला आहे. एक विचित्र अशी अवस्था त्या भागात निर्माण झाली आहे. ज्या हजारो कबुतरांना त्या ठिकाणी येण्याची सवय लागलेली होती, ती त्या ठिकाणी येतात, फडफडतात आणि निघून जातात.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करतो की, शासनाने तो कबुतरखाना ताबडतोब बांधण्याच्या संदर्भात महापालिकेला निर्देश द्यावेत. तो कबुतरखाना महापालिका बांधणार नसेल तर जैन समाज बांधेल. पण तो कबुतरखाना बांधण्याची परवानगी द्यावी आणि अशा प्रकारचे वेडेपणाचे कुठलेही कृत्य कोणाच्या सांगण्यावरुन करण्यात येऊ नये. नगरसेवक असेल, आमदार असेल त्यांच्या हातून अशा प्रकारचे कृत्य घडणार असेल तर ते चुकीचे आहे. (अडथळा) असे कृत्य करणारे कोणीही असोत, मला या संदर्भात अशी माहिती मिळालेली आहे की, या कबुतरखान्याच्या संदर्भात नगरसेवकाने तक्रार केली आहे. अर्थात नगरसेवकाने तक्रार केली आहे काय, हे मला नक्की माहीत नाही. पण कबुतरखाना का तोडण्यात आला, यासंबंधीची माहिती घेण्यात यावी आणि तो परत तेथेच असावा अशा प्रकारची मी विनंती करतो.जगाच्या पाठीवरील कुठल्याही माणसाला दादरमध्ये यावयाचे असेल तर कबुतरखाना हा पत्ता दिला जातो, असा हा कबुतरखाना पुन्हा निर्माण झाला पाहिजे, अशी मी विनंती करतो. धन्यवाद.

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

श्री. भास्कर जाधव ( नगरविकास राज्य मंत्री ) : सभापती महोदय, या सदनाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. रावते यांनी एका अत्यंत महत्वाच्या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधलेले आहे. आपण आपल्या शहरातील जुन्या इमारतींचे हेरिटेज इमारती म्हणून जतन करतो. तशाच पध्दतीने दादर येथील कबुतरखाना अनेक वर्षापासून आहे. तो का तोडला, कशा करता तोडला, यापेक्षा अशा पध्दतीने कोणी तक्रार करीत असतील आणि तो तोडण्यात येत असेल तर ते चुकीचे आहे. कबुतर हे शांतीचे प्रतीक समजले जाते. मुंबईत कबुतरे असणे हा सुध्दा प्रत्येकाच्या जिव्हाळयाचा विषय आहे. मी या संदर्भातील माहिती आजच्या आज घेतो आणि काय वस्तुस्थिती आहे हे जाणून घेऊन, शक्यतो पुन्हा तो त्या ठिकाणी उभा करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येईल.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेता श्री. पांडुरंग फुंडकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याच मुद्दा मांडावा.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मला या ठिकाणी दोन औचित्याचे मुद्दे मांडावयाचे आहेत.

**सभापती** : ठीक आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा पुढील प्रमाणे आहे.

सभापती महोदय, दिनांक 14 डिसेंबर, 2010 रोजी विधान भवन, नागपूर येथे हजेरी सहायकांना शासन सेवेत सामावून घेण्याबाबत आपण आपल्या दालनात बैठकीचे आयोजन केले होते. हा प्रश्न गेली अनेक वर्षे प्रलंबित आहे. या बैठकीला माननीय रोजगार हमी योजना मंत्री तसेच सन्माननीय सदस्य श्री. गणपतराव देशमुख देखील उपस्थित होते. या बैठकीत हजेरी सहायकांना शासन सेवेत समावून घेण्याबाबत दरम्यानच्या काळात तपासणी करुन आमची फाईल तयार करु ,असे आश्वासन माननीय रोजगार हमी योजना मंत्र्यांनी देऊन सुध्दा अद्यापपर्यंत त्यावर कुठलीही कार्यवाही झाली नसल्यामुळे हा औचित्याचा मुद्दा मी या ठिकाणी मांडलेला आहे.

सभापती महोदय, खरे म्हणजे आपण निर्देश दिल्या नंतर त्याबद्दल काय कार्यवाही झाली हे आपल्याला कळवावयास पाहिजे होते. या औचित्याच्या मुद्याद्वारे माझी आपल्याला विनंती आहे की, काही कर्मचाऱ्यांची वये आता 50 ते 60 वर्षापर्यंत पोहचलेली आहेत. पण हा प्रश्न अद्याप सुटलेला नाही. जवळ जवळ 600 ते 650 लोकांचा हा प्रश्न आहे. जवळपास 5 ते 6 हजार लोकांना ऑलरेडी ॲडजेस्ट केलेले आहे. पण उर्वरित थोडयाच लोकांवर अन्याय होत आहे. सभापती महोदय, या औचित्याच्या मुद्याद्वारे मी आपल्याला विनंती करतो की, आपण शासनाला तशा प्रकारचे निर्देश द्यावेत आणि हा प्रश्न सोडवावा.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी हजेरी सहाय्यकांचा प्रश्न माझ्यासमोर मांडला होता तसेच विधान परिषदेमध्ये सुध्दा ज्यावेळी तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून हा प्रश्न आला त्यावेळी असे ठरले की, माझ्या कार्यालयामध्ये या अनुषंगाने बैठक घ्यावी आणि या प्रश्नाचा पाठपुरावा करावा. 14 डिसेंबरला अशा पध्दतीची बैठक झाली. त्या बैठकीत माननीय रोजगार हमी योजना मंत्री डॉ. नितीन राऊत उपस्थित होते. माझ्या दालनामध्ये ज्यावेळी चर्चा झाली त्यावेळी हा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने वित्त विभाग आणि माननीय वित्त मंत्र्यांशी चर्चा करणे गरजेचे आहे म्हणून पुन्हा एकदा माननीय रोजगार हमी योजना मंत्री, माननीय वित्त मंत्री या दोघांना बोलवून रोजगार हमी योजनेमध्ये अनेक वर्षे सातत्याने काम करणारे जे कर्मचारी आहेत त्यांचा हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करावा अशी चर्चा झाली होती. मी हे अधिवेशन संपल्यानंतर एक दिवस आपल्याला बोलवीन. त्याचप्रमाणे माननीय वित्तमंत्री आणि माननीय रोजगार हमी योजना मंत्री यांनाही बोलवीन आणि अनेक दिवस प्रलंबित असणारा हा प्रश्न कसा सुटेल या दृष्टीने आपण प्रयत्न करु.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : यानंतर माननीय विरोधी पक्ष नेते यांनी आणखी एक औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. राज्यातील युवा पिढी सक्षम व्हावी यासाठी त्यांना शारीरिक शिक्षण योग्य प्रकारे मिळाले पाहिजे असे धोरण राज्य शासनाने स्वीकारले असल्यामुळे राज्यातील शाळांमध्ये क्रीडा विषयाला महत्व आले असून शारीरिक शिक्षण देणाऱ्या शिक्षकांचे महत्वही वाढले आहे. महाराष्ट्रात शारीरिक शिक्षण शिकविणारे शिक्षक तयार करणारी 8 अनुदानित अशासकीय शारीरिक शिक्षण महाविद्यालये असून त्यातून दरवर्षी 1200 शिक्षक तयार होतात. शारीरिक शिक्षक तयार करणाऱ्या अध्यापक वर्गात जवळजवळ 90 प्राध्यापक असून ग्रंथपाल तसेच इतर कर्मचारी मिळून 35 जण कार्यरत आहेत. उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक 12 सप्टेंबर, 2009 रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील सर्व शिक्षकांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी लागू करण्यात आली असून दिनांक 29 एप्रिल, 2009 रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यातील सर्व अशासकीय अनुदानित महाविद्यालयामधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. महाराष्ट्रात शारीरिक शिक्षण शिकविणारे शिक्षक तयार करणारी 8 अनुदानित अशासकीय शारीरिक शिक्षण महाविद्यालये शासनाच्या अधिपत्याखाली असूनही, या महाविद्यालयीन असोसिएशनच्या अध्यक्षांनी गेल्या दोन वर्षापासून शासनाकडे वारंवार पाठपुरावा करुनही या अध्यापकांच्या पदरात न्याय पडलेला नाही. शासनाने या गोष्टीची गांभीर्याने दखल घ्यावी यासाठी या औचित्याच्या मुद्याव्दारे मी आपले व सदनाचे लक्ष वेधत आहे.

सभापती महोदय, या मुद्याच्या संदर्भात शासनाने गांभीर्याने दखल घ्यावी अशी मी विनंती करतो. हा फक्त 8 महाविद्यालयांचा आणि 90 प्राध्यापकांचा प्रश्न आहे. खरे म्हणजे आपण सर्वांना लाभ देत असताना या 90 लोकांना वंचित ठेवणे योग्य नाही. म्हणून शासनाने या 90 लोकांचा विचार करुन ताबडतोबीने त्यांना सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी लागू करावी अशी मी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करतो.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एस. क्यू जमा : सभापति महोदय, शारीरिक शिक्षण देने वाले महाविद्यालयों के प्राध्यापको का प्रश्न उपस्थित करते हुए माननीय विरोधी पक्ष नेता ने यहां पर कहा कि उन्हें भी छटे वेतन आयोग का लाभ मिलना चाहिए. मैं उनकी बात का समर्थन करते हुए कहना चाहता हूं कि पिछले 25-30 सालों में हमने देखा कि दूसरे राज्यों के अनेक बच्चे हमारे राज्य में शारीरिक शिक्षण देने संबंधी टीचर ट्रेनिंग लेने के लिए हमारे राज्य में आते थे. यहां पर ट्रेनिंग लेने के बाद जब वे बच्चे अपने राज्यों में वापस जाते थे तो उनको बहुत अच्छी नौकरी मिल जाती थीं. लेकिन बाहर से ट्रेनिंग लेने के लिए आने वाले बच्चों की संख्या अब कम होती जा रही है.

मेरा कहना है कि हमारा राज्य एक प्रगतिशील राज्य है. इसलिए सभापति महोदय, मैं आपके माध्यम से सरकार से मांग करता हूं कि हमारे राज्य में एक फिजिकल एज्यूकेशन यूनिवर्सिटी बनायी जानी चाहिए. इतना ही मुझे कहना है.

---

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये एनआरएचएम अंतर्गत 11 महिन्यांकरिता एएनएमच्या नियुक्त्या करण्याचे आदेश काढण्यात आले होते. या एएनएमपैकी काही एएनएमची 3 महिन्याच्या आतच सेवा खंडित करण्यात आली आहे. यापैकी आंब्रड येथील एका एएनएमने आत्महत्या केलेली आहे. या एएनएमसंबंधी ज्या आयुक्तांनी आदेश काढले आहेत त्याबाबत चौकशी करण्यात यावी व आत्महत्या केलेल्या नर्सच्या कुटुंबीयांना मदत करण्यात यावी व 66 नर्सेसना सेवेत पुन्हा घेण्यात यावे अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला विनंती करीत आहे.

-----

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. महात्माजींचे थोर अनुयायी आचार्य विनोबा भावे यांना दिनांक 18 एप्रिल, 1951 रोजी पहिले भूदान मिळाले. त्या घटनेला परवा 60 वर्षे झाली आहेत. आधुनिक भारताच्या इतिहासातील ती एक अनन्य साधारण, विलक्षण चळवळ होती. त्यावेळच्या हैद्राबाद राज्यात हिंसक वातावरण पसरले होते. तेथे शांतता प्रस्थापित करण्यासाठी आचार्य विनोबा भावेंनी पायी प्रवासाला सुरुवात केली. दिनांक 18 एप्रिल, 1951 रोजी ते पोचमपल्ली येथे पोहोचले. त्या गावाची लोकसंख्या 3000 व त्यापैकी 2500 लोक भूमिहीन मजूर होते. त्यांची मजुरी म्हणजे धान्याचा विसावा भाग, एक वाहाणाचा जोड व एक कांबळे. भूमिहीनांनी विनोबाजींना साकडे घातले की, आम्हाला 80 एकर जमीन द्यावी. त्यांनी विनोबाजींचे सामुदायिक शेती करण्याचे तत्व मान्य केले. ही बैठक चालू असताना रामचंद्र रेड्डी नावाचा एक सधन शेतकरी उठला व त्याने 50 एकर खरड व 50 एकर चांगली अशी 100 एकर जमीन दान दिली आणि पहिले भूदान प्रत्यक्षात आले. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील रचनात्मक चळवळ म्हणून भूदानाला अनन्य साधारण महत्व आहे. कालौघात अशा चळवळींचे यशापयश कमी होऊ शकते. परंतु भूमिहीन व दारिद्रयात जगणाऱ्यांसाठी अनेक योजना त्यानंतरच्या काळात आल्या, त्याची बीजे या भूदान चळवळीमध्ये आहेत. स्वत: विनोबाजींनी आपल्या गागोद या मूळ गावातील स्वत:ची 60 एकर जमीन भूदानाला दिली मग या चळवळीला सुरुवात केली. त्यावेळी विनोबाजींनी "पाच-ब" ची काळजी घ्यावी असे सरकारला सांगितले होते. ते पाच म्हणजे बच्चे, बुढे, बेवा, बेकार व बिमार. या 5 च्या संबंधात कल्याणकारी योजनांसाठी पुढील काळात प्रगती झालेली आहे. त्याचा मूळ पाया त्यात होता, त्याचे स्मरण आपण या दिवशी करावे यासाठी मी हा औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

**राखून ठेवलेल्या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनाबाबत**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी आपल्यामार्फत शासनाला आठवण करुन दिली होती. सभागृहात एक लक्षवेधी सूचना चर्चेसाठी आल्यानंतर आपण ती राखून ठेवली होती. गट शिक्षणाधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासंबंधीचा तो विषय होता. त्यांना निलंबित करावे अशी सन्माननीय सदस्यांनी मागणी केली होती. त्यासाठी शासन तयार नसल्यामुळे या बाबत आपण शासनाला निदेश दिले होते. शासनाने एक गोष्ट मान्य केली होती, त्यामुळे हे अधिवेशन संपण्यापूर्वी कारवाई केली जाईल असे सांगण्यात आले होते. हे निवेदन करण्याची घोषणा झ ाालेली असताना सुध्दा आजपर्यंत झालेले नाही. हे अधिवेशन आता संपत आलेले आहे. त्या लक्षवेधी सूचनेबाबत शासनाने मान्य केलेले आहे व आपणही त्या बाबत शासनाला निदेश दिलेले आहेत. मी आज सकाळपासून शासनाला 3 वेळा आठवण करुन दिलेली आहे. त्यामुळे शासनाकडून केलेली कारवाई जाहीर करण्यात यावी अशी मी पुन्हा एकदा विनंती करीत आहे.

------

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

**पृ.शी.**: सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक

**मु.शी.**: सन 2010 चे वि.स.वि.क्रमांक 91 विधेयक दोन्ही सभागृहांच्या संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविण्यात यावे या विधानसभेने पारित केलेल्या प्रस्तावास विधानपरिषदेने सहमती देण्याची विनंती करणारा विधानसभेचा संदेश व प्रस्तावास सहमती

**सभापती** : विधानसभेकडून एक संदेश आलेला आहे. प्रधान सचिव तो वाचून दाखवतील.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 16:15

**संदेश**

सह सचिव : विधानसभेने दिनांक 20 एप्रिल 2011 रोजी झालेल्या बैठकीत संमत केलेला खालील प्रस्ताव विधानपरिषदेच्या सहमतीसाठी महाराष्ट्र विधानसभेच्या नियमावलीतील नियम 129 व 198(2) अन्वये पाठविण्याचा मला निदेश देण्यात आलेला आहे.

**प्रस्ताव**

सन 2010चे वि.स.वि. क्रमांक 91 महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक 2010 विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहाच्या 19 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यन्त सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

श्री. प्रकाश सोळंके (सहकार राज्यमंत्री) : सभापती महोदय, दिनांक 20 एप्रिल 2011 रोजी झालेल्या सभेत विधानसभेने संमत केलेल्या पुढील प्रस्तावास सभागृहाने सहमती द्यावी, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

"सन 2010चे वि.स.वि. क्रमांक 91 महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहाच्या 19 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यन्त सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

श्री. दिवाकर रावते : एकूण सदस्य संख्या 19 आहे. विधानसभेचे 14 सदस्य आहेत. विधानपरिषदेचे 5 सदस्य घेण्यात येणार आहेत. विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील हे सहकार क्षेत्रामध्ये काम करतात. या विधेयकाच्या बाबतीत त्यांचे चांगले मार्गदर्शन मिळू शकते. तेव्हा विरोधी पक्षातील आणखी एक सदस्य संयुक्त समितीमध्ये घ्यावा अशी माझी विनंती आहे.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो.

"सन 2010चे वि.स.वि. क्रमांक 91 महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहाच्या 19 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यन्त सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके....

यावे, अशा विधानसभेने संमत केलेल्या या प्रस्तावास सभागृहाने संमती दिलेली आहे. या समितीवर या सभागृहाचे पुढील सदस्य नामनिर्दिष्ट करण्यात यावेत.

1) श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स.
2) श्री. दिवाकर रावते, वि.प.स.
3) श्री. अरुण गुजराथी, वि.प.स.
4) श्री. दिलीपराव देशमुख, वि.प.स.
5) डॉ. सुधीर तांबे, वि.प.स.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : माननीय श्री. हर्षवर्धन पाटील, सहकार मंत्री यांना या संयुक्त समितीचे समिती प्रमुख म्हणून नियुक्त करावे.

----

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : शैक्षणिक संस्था (फी वसुलीचे विनियमन) विधेयक

**मु. शी.** : सन 2011 चे वि. स. वि. क्रमांक 24-महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (फी वसुलीचे विनियमन) विधेयक दोन्ही सभागहांच्या संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविण्यात यावे या विधानसभेने पारित केलेल्या प्रस्तावास विधान परिषदेने सहमती देण्याची विनंती करणारा विधानसभेचा संदेश व प्रस्तावास सहमती.

**सभापती** : विधानसभेकडून एक संदेश आलेला आहे. सह सचिव तो वाचून दाखवतील.

**संदेश**

सह सचिव : दिनांक 21 एप्रिल, 2011 रोजी झालेल्या सभेत विधानसभेने संमत केलेला पुढील प्रस्ताव विधान परिषदेच्या सहमतीकरिता पाठविण्यात येत आहे.

**प्रस्ताव**

सन 2011 चे वि. स. वि. क्रमांक 24 - महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (फी वसुलीचे विनियमन) विधेयक विधान परिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यंत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

श्री. राजेंद्र दर्डा ( शालेय शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, दिनांक 21 एप्रिल, 2011 रोजी झालेल्या सभेत विधानसभेने संमत केलेल्या पुढील प्रस्तावास सभागृहाने सहमती द्यावी, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

सन 2011 चे वि. स. वि. क्रमांक 24 - महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (फी वसुलीचे विनियमन) विधेयक विधान परिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यंत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

सभापती महोदय, विना अनुदानित आणि कायम विना अनुदानित शाळांमधील शैक्षणिक



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र दर्डा ....

शुल्क व इतर शुल्क विनियमित करण्याविषयी विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांवर व्यापक चर्चा झाली. मी व्यापक जनहित विचारात घेऊन यासंदर्भात शुल्क विनियम अधिनियमन आगामी अधिवेशनात सादर करण्यात येईल असे आश्वासन दिले होते. अधिनियमात लोकभावनेचे प्रतिबिंब उमटावे या उद्देशाने अधिनियमाचे प्रारुप वेबसाईटवर टाकून लोकांच्या सूचना व हरकती मागविण्यात आल्या होत्या. लोकांकडून प्राप्त हरकती व सूचना विचारात घेऊन तयार केलेल्या अधिनियमन प्रारुपास 18 एप्रिल रोजी मंत्रिमंडळाची मान्यता घेण्यात आली. राज्यात शासनाने सर्वदूर अनुदानित स्वरुपाच्या शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या असल्या तरी विना अनुदानित शाळाही मोठया प्रमाणात आहेत. यातील काही शाळा अवाजवी शुल्क आकारीत असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेऊन अशा शाळांवर वाजवी निर्बंध आणणे आवश्यक आहे. समाजातील विविध घटकांकडून या बाबत होणारी मागणी, विविध संघटनांनी केलेली आंदोलने, दोन्ही सभागृहात झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने दिलेले आश्वासन आणि विद्यार्थ्यांच्या व्यापक हिता बरोबरच शिक्षणाचा समतोल विकास साधता यावा, या भूमिकेतून काल हे विधेयक विधानसभेमध्ये मांडले होते. या विधेयकात पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, अध्यापक विद्यालये यांचा समावेश आहे. शासकीय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांबरोबरच खाजगी व्यवस्थापनांच्या शाळांचाही समावेश आहे. यात राज्य मंडळाशी संलग्नित शाळांबरोबरच आयसीएसई, सीबीएसई,आयबी, सीएसई अथवा कोणत्याही मंडळाशी संलग्नित राज्यातील सर्व शाळांचा समावेश करण्यात आलेला आहे.

मी या सभागृहास आश्वस्त करु इच्छितो की, या विधेयकाव्दारे शिक्षण क्षेत्रातील अपप्रवृत्ती व शोषणास आळा बसेलच पण त्याचबरोबर राज्यात शिक्षण क्षेत्रात भरीव काम करणाऱ्या चांगल्या संस्थानाही थोडयासाठी अडथळा येणार नाही. राज्यातील कोणत्याही शाळांकडून अवाजवी शुल्क आकारले जावू नये, शिक्षणाचे व्यापारीकरण रोखावे, शिक्षणाची गुणवत्ता वाढावी आणि विद्यार्थी व पालकांच्या हितांचे रक्षण करावे या उद्देशाने हे विधेयक या ठिकाणी आणण्यात आले.

सभापती महोदय, काल या विधेयकावर विधानसभेत चर्चा झाल्या नंतर सर्वच सदस्यांचे मत असे पडले की, या विधेयकासंबंधी दोन्ही सभागृहातील प्रमुख सदस्यांची बैठक व्हावी. आज

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/

श्री. राजेंद्र दर्डा .....

सकाळी माननीय सभापती, विधान परिषद आणि अध्यक्ष, विधानसभा यांच्या अध्यक्षतेखाली दोन्ही सभागृहातील विरोधी पक्ष नेते, गट नेते यांची बैठक झाली. या बैठकीत सर्व ज्येष्ठ सदस्यांचे तसेच विरोधी पक्ष नेते, सर्व गट नेते यांचे मत झाले की, हे विधेयक महत्वाचे आहे. या विधेयकामुळे येणाऱ्या काळात दूरगामी परिणाम होणार आहे. त्यामुळे या विधेयकावर पूर्ण चर्चा होणे आवश्यक आहे आणि सबब या बैठकीत हे विधेयक दोन्ही सभागृहाच्या संयुक्त समितीकडे पाठविण्याच्या निर्णय एकमताने घेण्यात आला. सन 2011 चे विधानसभा विधेयक क्रमांक- 24 महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक संस्थांकडून घेतल्या जाणाऱ्या फी चे विनियमन करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित व तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्यासाठी विधेयक विधान परिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहाच्या 26 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यंत सादर करण्याच्या अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 16:25

श्री.राजेंद्र दर्डा......

सभापती महोदय, या समितीवर विधानसभेचे पुढील सदस्य नामनिर्देशित होणार आहे.

1) श्री.राजेंद्र दर्डा, शालेय शिक्षण मंत्री

2) श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील, राज्यमंत्री

3) श्री.प्रशांत ठाकूर, वि.स.स.

4) श्री.राहुल बोंद्रे, वि.स.स.

5) श्री.कृष्णा हेगडे, वि.स.स.

6) श्री.शशिकांत शिंदे, वि.स.स.

7) श्री.राजेंद्र शिंगणे, वि.स.स.

8) श्री.जितेंद्र आव्हाड, वि.स.स.

9) श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स.

10) श्री.मंगलप्रभात लोढा, वि.स.स.

11) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

12) श्री.सुभाष देसाई, वि.स.स.

13) प्रा.शरद पाटील, वि.स.स.

14) श्री.विनोद घोसाळकर, वि.स.स.

15) श्री.बाळा नांदगावकर, वि.स.स.

16) श्री.गणपतराव देशमुख, वि.स.स.

17) श्री.शिरीष चौधरी, वि.स.स.

या शिवाय विधानपरिषदेचे खालील सदस्य नामनिर्देशित करण्यात यावेत, असा मी ठराव मांडतो.

1) प्रा.फौजिया खान, राज्यमंत्री

2) श्री.माणिकराव ठाकरे, वि.प.स.

3) श्री.एस.क्यू.ज़मा, वि.प.स.

4) श्री.उल्हास पवार, वि.प.स.

5) श्री.विक्रम काळे, वि.प.स.

6) श्री.हेमंत टकले, वि.प.स.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा........

7) श्री.विनोद तावडे, वि.प.स.

8) श्री.भगवानराव साळुंखे, वि.प.स.

9) डॉ.दीपक सावंत, वि.प.स.

10) डॉ.नीलम गो-हे, वि.प.स.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, या शिवाय सदरहू समितीवर निमंत्रित म्हणून श्री.हर्षवर्धन पाटील, संसदीय कार्यमंत्री, श्री.बाळासाहेब थोरात, महसूल मंत्री, श्री.अनिल देशमुख, अन्न व नागरी पुरवठा मंत्री, श्री.पांडुरंग फुंडकर, विरोधी पक्षनेते, विधानपरिषद, श्री.एकनाथ खडसे, विरोधी पक्षनेते, विधानसभा यांना नामनिर्देशित करण्यात यावे.

सभापती महोदय, मी आपल्याला विनंती करतो की, आपण आणि विधानसभेचे अध्यक्ष, दोघांनी या समितीला मार्गदर्शन करावे. एकूणच हे विधेयक अत्यंत महत्वपूर्ण आहे.

**सभापती** : पुढील मान्यवर सदरहू समितीवर निमंत्रक म्हणून राहतील.

श्री.हर्षवर्धन पाटील, संसदीय कार्य मंत्री

श्री.बाळासाहेब थोरात, महसूल मंत्री

श्री.अनिल देशमुख, अन्न व नागरी पुरवठा मंत्री

श्री.पांडुरंग फुंडकर, विरोधी पक्षनेते, विधानपरिषद

श्री.एकनाथ खडसे, विरोधी पक्षनेते, विधानसभा

श्री.राजेंद्र दर्डा, शालेय शिक्षण मंत्री यांना मी संयुक्त समितीचा समिती प्रमुख म्हणून नियुक्त करतो.

-----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मंत्री महोदयांच्या अनुपस्थितीमुळे राखून ठेवलेली लक्षवेधी सूचना क्र.10 चर्चेला घेण्यासंबंधी**

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आजच्या कामकाजपत्रिकेवरील लक्षवेधी सूचना क्रमांक-10 चर्चेला आली असता माननीय शालेय शिक्षण मंत्री सभागृहात उपस्थित नसल्यामुळे मागाहून चर्चेला घेण्यात येईल असे पीठासीन अधिकाऱ्यांनी सांगितले होते. आता सभागृहात शालेय शिक्षण मंत्री उपस्थित असल्यामुळे ही लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात यावी, अशी मी विनंती करतो.

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, संयुक्त समितीवरील सदस्यांच्या नामनिर्देशनाचा प्रस्ताव विधानसभेत मांडून झाल्यानंतर मी पुन्हा या सभागृहात येतो. त्यानंतर ही लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात यावी.

**सभापती** : ठीक आहे. शालेय शिक्षणमंत्री विधानसभा सभागृहातील कामकाज आटोपून या सभागृहात येतील, तेव्हा ही लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येईल.

--

नंतर 3व्ही.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : मुंबई दिवाणी न्यायालये (सुधारणा) विधेयक

L.A.BILL No. XXII OF 2011

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY CIVIL COURTS ACT, 1869) AND MOTION FOR REFERRING THE BILL TO JOINT SELECT COMMITTEE.

श्री. भास्कर जाधव (विधि व न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.स.वि.क्र. 22-मुंबई दिवाणी न्यायालये अधिनियम, 1869 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.स.वि.क्र. 22-मुंबई दिवाणी न्यायालये अधिनियम, 1869 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

महोदय, सन 1869 च्या कायद्याप्रमाणे राज्यातील कनिष्ठ न्यायालये किंवा जिल्हा न्यायालयांनी किती रकमेपर्यंतचे दावे दाखल करावेत यासंबंधीचा निर्णय सन 1992 मध्ये घेण्यात आला होता. त्यानुसार कनिष्ठ न्यायालयाला 1.50 लाखापर्यंतचे दावे दाखल करण्याचे अधिकार मिळाले होते आणि जिल्हा न्यायालयांना 2 लाखापर्यंतचे अधिकार दिले होते. सध्या आपल्याकडे कोर्टात प्रलंबित असलेली प्रकरणे कमी करण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाच्या सूचनेनुसार आणि राज्य शासनाच्या प्रयत्नांनी अनेक प्रकारच्या योजना अंमलात आणल्या जात आहेत. हे करीत असताना आपण पाहतोच की राज्यात केंद्र शासनाच्या फास्ट ट्रॅक कोर्ट योजनेची मुदत संपलेली आहे. तरी देखील दि. 1.4.2011 पासून पुन्हा आपण 100 फास्ट ट्रॅक कोर्ट चालू ठेवण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्याचबरोबर शासनामार्फत सकाळी आणि सायंकाळची न्यायालये सुरु आहेत. त्या माध्यमातून सप्टेंबर, 2010 ते फेब्रुवारी, 2011 या काळात अशा न्यायालयांच्या माध्यमातून 1 लाख 15 हजार खटले निकाली काढण्यात आले. मागील वर्षी दुय्यम न्यायालयामार्फत जवळपास 23 लाख खटले निकाली निघाले आहेत. पण त्याचबरोबर 22 लाख नवीन खटले सुध्दा दाखल झाले

....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ..........

आहेत. तसेच यासंदर्भात एक नवीन योजना आखण्यात आली असून त्यानुसार दि. 6 फेब्रुवारी, 2011 रोजी राज्यात एकाच दिवशी महालोक अदालतीचे आयोजन करुन 1.23 लाख खटले निकाली निघाले. तसेच महात्मा गांधी तंटा मुक्ती योजना आपल्या राज्यात अत्यंत प्रभावी ठरली आहे. या योजनेचा विचार देश पातळीवर सर्वच राज्यांमध्ये करण्याचा मनोदय केंद्र शासनाच्या वतीने व्यक्त केला आहे. तरी देखील राज्यात आजही दिवाणी न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या खटल्यांची संख्या 5,59,972 एवढी आहे. फौजदारी खटल्यांची संख्या 22,46,120 एवढी आहे. मुंबईत विविध न्यायालयात 6 लाख केसेस प्रलंबित आहेत. अशा प्रकारे एकूण 34, 06,092 इतकी प्रलंबित केसेसची संख्या राज्य स्तरावर आहे.

महोदय, या विधेयकाच्या अनुषंगाने विधि व न्याय विभागाने जिल्हा न्यायालयांना 2 लाखापर्यंतचे दावे दाखल करण्याचे अधिकार होते त्यात वाढ करुन ते आता 10 लाखापर्यंत वाढविण्यात आले आहेत, त्यासाठीच हे विधेयक मंजूर करण्याची मी सभागृहाला परवानगी मागतो.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव...

सभापती महोदय, तालुका पातळीवरील जे दिवाणी न्यायालये आहेत त्या ठिकाणी 1 लाख ते 1.50 लाखापर्यंत दावे दाखल करता येत होते परंतु आता त्या ठिकाणी 5 लाख ते 7.50 लाख रुपयांपर्यंतचे दावे दाखल करण्याची परवानगी या विधेयकाच्या माध्यमातून दिली जाणार आहे. उच्च न्यायालयामध्ये अंदाजे 19 हजार अपील प्रकरणे असून त्यापैकी 50 टक्के प्रकरणे 10 लाखापर्यंतची आहेत. मुंबई मधील उच्च न्यायालयातील 19 हजार प्रकरणे आता वेगवेगळया न्यायालयात जातील. न्यायालयात 10 लाखापर्यंतची जी प्रकरणे प्रलंबित आहेत ती त्वरित निकाली निघू शकतील. एका बाजूला 10 लाखापर्यंत, 7.5 लाखपर्यंत, 5 लाखापर्यंतचे नवीनचे दावे दाखल करता येतील. छोटया छोटया प्रकरणामध्ये सर्वसामान्य माणसाला हायकोर्टात यावे लागते. पूर्वीची 10 लाखापर्यंतची प्रकरणे त्या त्या न्यायालयाकडे वर्ग करण्याचा निर्णय या विधेयकाच्या माध्यमातून शासन घेऊ इच्छित आहे. या विधेयकाच्या संदर्भात अधिक न बोलता या विधेयकाचा उद्देश थोडक्यात व स्पष्ट शब्दात मी सांगितलेला आहे. उत्तम प्रकारचे व लोकांना झटपट न्याय देणारे व छोटया छोटया गोष्टी करिता जनतेला हायकोर्टात जावे लागत होते परंतु आता या विधेयकामुळे जनतेचा वेळ व पैसा वाचणार असून प्रकरणांचा निपटारा लवकर होणार असल्यामुळे हे महत्वाचे विधेयक या ठिकाणी मांडण्यात आले असून या विधेयकास सभागृहाने एकमुखाने संमत करावे अशी विनंती करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**सभापती** : हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्रीमती शोभाताई फडणवीस व डॉ. रणजीत पाटील यांनी दिलेला आहे. त्यांच्यापैकी कोणीही एकाने तो मांडावा.

( प्रस्ताव मांडण्यात आला नाही. )

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले ) :सभापती महोदय, सन्माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांनी बील मांडल्या बद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो, स्वागत करतो व अभिनंदनही करतो. याचे कारण असे आहे की, ग्रामीण भागात विशेष करुन न्याय व्यवस्थेच्या बाबतीत सर्वसामान्य गरीब, कष्टकरी, कामगार, बांधावरील वाद असे अनेक प्रश्न असतात. इरेला व ईर्षेला भरीस घालून होते नव्हते ते उध्वस्त करीन परंतु कोर्टात लढवून तुला हरवीन अशी मानसिकता बाळगून पैसा व वेळ मोठया प्रमाणात घालवला जात आहे. जवळपास 40 लाख प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत. 21 लाख खटले निकाली काढल्यानंतर आता पुन्हा नवीन 22 लाख खटले दाखल झाले आहेत. लोकांची भांडखोर मानसिक प्रवृत्ती दिवसेंदिवस वाढीस लागल्याचे हे उदाहरण आहे. गुन्हयाच्या संदर्भात न्यायालयीन वेगवेगळे प्रकार आहेत त्यामुळे खटल्यांची संख्या वाढतच जाणार आहे. न्यायालयात दावे दाखल करण्याची मर्यादा वाढविल्यामुळे त्या त्या न्यायालयाला खटले निकाली काढण्याचे अधिकार न्यायाधीशांना मिळणार आहेत व त्यामुळे खटल्यांचा निकाल लवकरात लवकर लागेल.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ..

सभापती महोदय,विधी व न्याय विभागाबद्दल काय बोलावे असा माझ्यासमोर प्रश्न आहे. त्यांना न्यायाचे कितपत ज्ञान आहे ? आम्हाला जेवढे ज्ञान आहे तेवढेच ज्ञान त्यांनाही आहे.आम्ही काही लॉ फॅकल्टीमधील नाही. आमचे जेवढे अज्ञान आहे तेवढेच अज्ञान ते काम करीत असतांना दाखवत असतात ही दुर्देवाची गोष्ट आहे. काम होवो अथवा न होवो, निर्णय लागो अथवा न लागो परंतु त्यांना शासनाचा पगार नक्की मिळणार आहे त्यामुळे ते काम करीत असतांना अज्ञान दाखवतात.

सभापती महोदय, टाटा इन्स्टिटयूट वा अन्य तज्ज्ञ इन्स्टिटयूटकडून एक सर्व्हे करण्यात आला पाहिजे. गेल्या दहा वर्षातील या प्रक्रियेमध्ये निर्माण झालेली परिस्थिती, सामाजिक मानसिकता, इन्टेन्सिटी आणि व्हेलॉसिटी, खटल्यांची संख्या इत्यादी बाबींचा अभ्यास करण्यात आला पाहिजे. योग्य शब्द वापरावे लागतात म्हणून मी मुद्दाम या दोन इंग्रजी शब्दांचा येथे उल्लेख केलेला आहे. अशा प्रकारचा अभ्यास केल्यानंतर किती न्यायालये निर्माण करण्यांची आवश्यकता आहे हे फार महत्वाचे आहे. आपण फार पूर्वी पासून कथा वाचत असतो.त्यातील काही पुराण कथा असतात वा काही राजांच्या कथा असतात.जहांगीर नावाच्या एका राजाने लोकांवर अन्याय होऊ नये म्हणून राजवाडयाच्या बाहेर एक घंटा बांधली होती आणि माझ्या राज्यातील गरीब,श्रीमंत,भिकारी अशा कोणत्याही व्यक्तीला न्याय मागावयाचा असेल व त्याने ती घंटा वाजवली तर त्या व्यक्तीला न्याय देण्यासाठी स्वत: हजर होईन असे त्या राजाने सांगितले होते. अशा प्रकारची कथा आपण अनेक वर्षा पासून वाचत आलेलो आहोत. कोणत्याही राज्याची न्यायव्यवस्था कशी आहे यावर त्या राज्याचे सामाजिक व आर्थिक अस्तित्व अवलंबून असते. त्यामुळे न्याय व्यवस्था अतिशय पक्की असली पाहिजे परंतु आपल्याकडील न्याय व्यवस्था पक्की आहे काय ? प्रत्येक अधिवेशनामध्ये प्रत्येक आठवडयाला फास्ट ट्रॅक कोर्ट कधी स्थापन करण्यात येणार आहे असा प्रश्न सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांना विचारावा लागतो.सन्माननीय मंत्री श्री भास्कर जाधव यांचे मी मघाशी मनापासून कौतुक केले होते. त्याचे कारण असे आहे की काही तरी करावयाचे आहे अशी ऊर्मी आणि ऊर्जा त्यांच्यामध्ये आहे. ते आमच्या पक्षात असतांनापासून मी हे पहात आलेलो आहे.त्यामुळे त्यांच्याकडून माझ्या काही अपेक्षा आहेत. तुम्ही जरी राज्यमंत्री असलात आणि तुम्हाला मर्यादित अधिकार असले तरी तुमच्यामध्ये एक क्षमता आहे. त्यामुळे तुम्ही

2..

श्री.दिवाकर रावते ..

माननीय मंत्री महोदयांकडे जाऊन वेळ पडली तर अर्थ खात्याच्या मंत्र्याकडे जाऊन, संबंधिताकडे जाऊन आपले म्हणणे मांडून एखादा प्रश्न मार्गी लावण्याची क्षमता तुमच्याकडे आहे त्यामुळे मी बोलण्यासाठी उभा राहिलो आहे. न्याय व्यवस्थेच्या संदर्भात एक विशेष सर्व्हे घेतला पाहिजे. अर्थात हे काम दोन चार दिवसात होणार नाही कदाचित पाच वर्षामध्ये सुध्दा काही होणार नाही परंतु या संदर्भातील एक दूरगामी स्वरुपाचा आराखडा तुम्ही तुमच्या कारकीर्दित तयार करु शकला तर मला त्याचा अभिमान वाटेल. लॉ ग्रॅज्युएट नसलेल्या एका मंत्र्यांकडे कायदा खाते आल्यानंतर कायद्याचे व्यवस्थापन कसे असावे,ज्युडिशिअरी सिस्टीम कशी असावी या संदर्भात पाच दहा वर्षाची आखणी केली पाहिजे.

सभापती महोदय, अनुशेषग्रस्त भागाकरिता 371 (2) कलमाखाली वैधानिक विकास महामंडळाची कायम स्वरुपी कायदेशीर तरतूद करण्यात आली आहे.तशा प्रकारे ही न्याय व्यवस्था निर्माण करण्याकरिता पुढील दहा वर्षात अमुक एवढया निधीची व्यवस्था अर्थसंकल्पामध्ये कायम स्वरुपी राहील अशा प्रकारची तरतूद करण्यात आली पाहिजे. त्यानंतरच्या दहा वर्षामध्ये ही तरतूद वाढविण्यात आली पाहिजे परंतु सुरुवातीच्या दहा वर्षाचा वेध घेऊन पैशाचे नियोजन करण्यात आले पाहिजे व त्या पैशातून तेवढया न्यायालयाच्या इमारती बांधण्यात आल्या पाहिजेत त्याचबरोबर तेवढी न्यायाधीशांची पदे देखील निर्माण करण्यात आली पाहिजेत.

नंतर श्री.सरफरे

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

परंतु न्यायाधीश निर्माण करणारे एखादे विद्यापीठ आपल्याला निर्माण करता येईल काय? हा वेगळा विषय आहे. शेवटी कुणाला तरी आपल्याला न्यायाधीश करावा लागतो. मी त्यांच्यावर टीका करणार नाही, त्यांची योग्यता आहे की नाही याबाबत मी काही म्हणणार नाही. ज्या दिवशी मी न्यायाधीशांवर बोलेन त्या दिवशी मी अत्यंत कडक आणि कडवट बोलेन. त्यावेळी या व्यक्तिला न्यायाधीश कां केले असा मी प्रश्न विचारीन.

सभापती महोदय, प्रत्येक सर्वसामान्य माणसाकरिता आपल्याला न्याय व्यवस्था निर्माण करावयाची आहे या अपेक्षेने मी बोलत आहे. मला अपेक्षा आहे की, आपण ती व्यवस्था निर्माण करु शकाल आणि ती करावी अशी माझी अपेक्षा आहे. आपण एक गोष्ट लक्षात घ्यावी की, या महाराष्ट्रामध्ये येत्या दहा वर्षामध्ये संपूर्ण खटल्यांचा व्याप वाढणार आहे त्या प्रमाणात न्याय मंदिरे वाढणार असतील तर त्या प्रमाणात वकील सुध्दा आपल्याला वाढवावे लागतील. एका वकिलाकडे 500 ते 600 खटले आहेत. तो इकडे बघतो, तिकडे बघतो . सभापती महोदय, विधानसभेतील माननीय सदस्य श्री. सुभाष देसाई त्यांच्या एका केसबद्दल सर्वोच्च न्यायालयाचा किस्सा मला सांगत होते. त्यांचा न्यायाधीश हा दुसऱ्या एका कोर्टामध्ये उपस्थित होता, परंतु तो त्या ठिकाणी येऊ शकला नाही. त्या ठिकाणी एक ते दीड मिनिटांची केस चालते. त्या ठिकाणी सरळ सरळ केस फेकून देतात. त्या सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांनी पुढील तारीख पुकारली तरी त्यावेळी मी हजर असो किंवा नसो माझी 1 लाख रुपये फी दिली पाहिजे. अशाप्रकारे 111 कोटी रुपयांची संपत्ती जमा करणारे सर्वोच्च न्यायालयाचे वकील शांतीभूषण असल्याचे ऐकल्यानंतर मी वकील कां झालो नाही याबद्दल मला उगाचच यातना होत आहेत. माननीय सदस्या ॲड. दराडेताई वकील असतांना त्यांना माननीय श्री. शरद पवार साहेबांनी या सभागृहात न बसविता दिल्लीला कां पाठविले नाही असे मला सारखे वाटत असते. हा गंमतीचा विषय जरी बाजूला ठेवला तरी या न्याय व्यवस्थेचा पसारा वाढवीत असतांना, प्रपंच वाढवीत असतांना भविष्यात आपल्याला किती वकील निर्माण करावे लागणार आहेत.

आपण नेहमी म्हणत असतो की, जशी लोकसंख्या वाढत आहे त्याप्रमाणे शाळा वाढत आहेत. शाळा वाढत आहेत त्याप्रमाणे शिक्षक वाढवावे लागतील. त्यानुसार नियोजन करुन बी.एड. आणि डी.एड. चे कॉलेजेस वाढवावे लागतील. त्याप्रमाणे याचे देखील नियोजन होईल. त्यामुळे बेकार तरुणांची फौज कमी करण्याकरिता फार मोठा आधार मिळेल. सुशिक्षित बेकार तरुण या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. दिवाकर रावते ....

वकिली व्यवसायाकडे जाण्याकरिता ते या माध्यमातून शिकले तर त्यांना स्वत:चा, हक्काचा रोजगार निर्माण करता येईल. मी जरी या क्षेत्रातील नसलो तरी आज वेगवेगळया कार्यालयामध्ये,वेगवेगळया बँकामध्ये कन्सल्टंट म्हणून वकील नेमले जातात, त्यांचे कज्जे कसे जातात वगैरेच्या मी खोलात जाऊ इच्छित नाही. हे विधेयक अधिवेशनाच्या पहिल्या आठवडयात आले असते तर मला त्याचा फार आनंद झाला असता. या विधेयकाच्या बाबतीत माझे अर्धवट ज्ञान असले तरी मला त्यावर एक ते दीड तास बोलता आले असते. त्याचे परिपूर्ण ज्ञान अधिकाऱ्यांनी आपल्याला पाठविलेल्या चिठ्ठयामधून आणि आपल्या मार्गदर्शनातून आम्हाला मिळाले असते आणि महाराष्ट्रातील न्याय व्यवस्थेबाबतची एक चांगली चर्चा आपण निर्माण करु शकलो असतो.

सभापती महोदय, या विधिमंडळामध्ये विधी व न्याय विभागाच्या संदर्भात कधीच चर्चा होत नसते. मी परवा अल्पकालीन चर्चेच्यावेळी हा विषय उपस्थित केला असताना त्यावेळी मला मिळालेल्या माहितीनुसार आपले सरकारी वकील ज्या काही केसेस लढतात त्यापैकी 90 टक्के केसेसमध्ये ते अपयशी ठरतात आणि 10 टक्के केसेस जिंकतात. मी त्याचे विश्लेषण करतांना पोलिसांना आपण कोणत्या प्रकारचे ट्रेनिंग दिले पाहिजे असे विचारले होते. त्यामध्ये हे सर्व विषय गुंतले असल्यामुळे मी तो विषय उपस्थित केला होता. अशाप्रकारे प्रथमच फक्त दहा मिनिटे विधी व न्याय विभागाच्या संदर्भातील चर्चा केली. त्यावेळी तुम्ही उत्तर देण्याच्या तयारीने आला होता, परंतु माननीय सभापती म्हणाले की, मी आता पुढे गेलो आहे. त्यावेळी राहिलेले उत्तर तुम्ही आता द्याल अशी माझी अपेक्षा आहे.शेवटी माननीय सभापतींचा आदेश अंतिम असतो. मी त्या दिवशी जे काही मुद्दे उपस्थित केले होते त्याबाबत आपण माझे समाधान करावे. आपली "अ" शाखा आहे, त्या शाखेमधून नागरी जमीन महसूलाच्या संदर्भात जे काही दिवाणी दावे लावले जातात, तडजोडी, तोडबाजा केले जातात. त्यामधून निर्माण होणाऱ्या परिस्थितीवर आपण प्रकाश टाकावा हे मी जाहीररित्या बोलत आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . .

त्याच्या तडजोडी, यातून निर्माण होणारी परिस्थिती हे मी अगदी जाहीररित्या बोलत आहे. या गोष्टींबाबत माननीय मंत्री महोदयांनी प्रकाश टाकावा. मी मागच्या वेळी याबाबत उल्लेख केलेला आहे.

सभापती महोदय, याठिकाणी पुनर्याचिका दाखल करण्याच्या संबंधात सांगावयाचे तर तुम्ही यासाठी वकीलाची नेमणूक करता.त्यावेळी विभागामध्ये ठिकठिकाणी ज्याला आपण ए.जी.बी.पी. म्हणतो म्हणजे सरकारी वकील, त्यांना कोटा असतो, त्यांना पगार मिळत नसतो. मग त्या कोट्या-तून जास्तीतजास्त फी पदरामध्ये पाडण्यासाठी त्यांचे प्रयत्न सुरु असतात. ज्याप्रमाणे आपण डॉक्टरांकडे गेल्यानंतर ते ब्लड टेस्ट करा, युरीन टेस्ट करा, एक्स-रे काढा,अमुक टेस्ट करा, तमुक टेस्ट करा वगैरे असे सांगतात, त्यासाठी त्यांचे असणारे पर्सेंटेज. तसे यांचे पर्सेंटेज देखील वरपर्यंत लागलेले असते. मी हे अधिकृतरित्या बोलत आहे. आपण या विषयामध्ये बारकाईने शिरुन माहिती घेणे आवश्यक आहे. पुढच्या वेळेस मी यासंबंधात विस्तृतपणे चर्चा करणार आहे, अगदी नावानिशी सांगणार आहे. सचिवालयामध्ये विधी व न्याय विभागांतर्गत "ब" शाखा आहे. त्याठिकाणी सह सचिव श्री.ह.बा.पाटील यांच्याशी मी बोललो होतो. त्याबाबत संपूर्ण सचिवालयात चांगल्या प्रकारे चर्चा झ ाली. त्यावेळी आय.ए.एस.अधिकारी असे म्हणाले की, एकाच माणसासाठी स्पेशल टॉयलेट का? आम्ही देखील आय.ए.एस.अधिकारी आहोत. मग अशा प्रकारची सोय आमच्यासाठी करण्यात आलेली नाही. परंतु एकाच व्यक्तीसाठी स्पेशल टॉयलेट का बनविण्यात आले ? यामध्येच सर्वकाही आले, मी त्यात जात नाही. पण त्याठिकाणी संसदीय कामकाजाच्या बाबतीत मार्गदर्शन करणारी "ब" शाखा आहे. मी त्यांच्या बाबतीत आव्हानात्मकच बोलत आहे. मला जे काही अल्प ज्ञान आहे, त्याप्रमाणे येथे आदरणीय डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेतले जाते. त्यांनी तयार केलेली घटना याबाबत बोलले जाते. जरा काही झाले की या घटनेच्या बाबतीत आपल्या देशामध्ये नाही पण आपल्याला महाराष्ट्र राज्यामध्ये नक्की संवेदनशीलता आहे. मग या विधिमंडळात सदरहू विधेयक आणावयाचे ठरविल्यानंतर ते घटनेच्या अधीन राहून आणता येईल की नाही, ते घटनेमध्ये बसते की नाही याचा सल्ला ते देतात.

सभापती महोदय, मी अधिकृतपणे जाहीररित्या सदनामध्ये सांगतो की, काल याठिकाणी सिंचनाच्या संदर्भातील एक विधेयक चर्चेसाठी मांडण्यात आले होते. मी त्याबद्दल त्यांचे कौतुक करतो. तुम्हाला सिंचनाच्या संदर्भातील विधेयक विधीमंडळामध्ये मांडता येणार नाही अशा प्रकारची



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . .

अधिकृत नोंद त्यांनी केलेली आहे आणि ती त्या नस्तीमध्ये आहे,हे मी माननीय मंत्री श्री. भास्करराव जाधव यांना सांगू इच्छितो. परंतु आमच्या माननीय मंत्री महोदयांना असे वाटते की, काहीही झाले तरी मी जे केले आहे ते पचले पाहिजे. गेल्या पाच वर्षामध्ये पाण्याचे जे वाटप झालेले आहे त्यामुळे शेतकऱ्यांचे वाटोळे झाले. अशा वेळी जर सदरहू विधेयक सदनासमोर आले नाही तर पंचाईत होईल. परंतु काल विधेयक संमत झाल्यानंतर मागील पाच वर्षामध्ये जे काही केले ते नियमित झाले आहे. ठीक आहे, काल त्या विषयावर चर्चा झाली. आम्ही जास्त खोलात शिरलो नाही. आम्हाला शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने भविष्यामध्ये काय होणार आहे यासंबंधी बोलावयाचे होते. अशा वेळी मागच्या उखाळ्या-पाखाळ्या काढून,एकमेकांवर चिखलफेक करण्याचे काम विधिमंडळामध्ये करावयाचे नव्हते. ते राजकारणामध्ये सुरु असते. पण काल आमचा बोलण्या-मागचा उद्देश आम्हाला शेतकऱ्याला भविष्यामध्ये काय देता येईल या दृष्टीने चर्चा करण्याचा होता म्हणून आम्ही मागच्या उखाळया-पाखाळयांमध्ये शिरलो नाही. माझ्याकडे तर कोणाला किती पाणी वाटण्यात आले आहे याची यादीच होती आणि ते कसे देता येणार नाही याची माहिती होती. मी काल फक्त अमरावतीतील सोफियाबाबत उदाहरण दिले.

सभापती महोदय, वीज नियामक मंडळाने सल्ला दिल्यानंतर त्यांना विचारण्यात आले की, असे कसे ? आम्हाला याप्रमाणे करताच आले पाहिजे. मग ते बिचारे साळसूदपणे म्हणाले की, आमचे असे-असे मत आहे. पण याच्यापेक्षा तुम्ही आमच्यावर एक चांगले घटनात्मक व्यक्तिमत्व आणून ठेवलेले आहे, ज्याला आपण महाअधिवक्ता आणि इंग्रजीमध्ये ॲडव्होकेट जनरल म्हणतो. सभापती महोदय, आपल्या आदेशावरुन ते सदनामध्ये दोन वेळा आले होते आणि आता ते केंद्र शासनामध्ये कार्यरत आहेत. त्याठिकाणी ते चांगल्या प्रकारे काम करीत आहेत. त्यांच्या हातामध्ये आपल्या सीमा प्रश्नाच्या संबंधातील विषय आहे.

सभापती महोदय, तसेच दुसरे आमचे आदरणीय ॲडव्होकेट जनरल श्री.रवी कदम साहेब. श्री.रवी कदमसाहेब यांच्या ज्ञानाबद्दल दुमत नाही. त्यांची करण्यात आलेली नियुक्ती अयोग्य आहे काय ? तर त्यांची नियुक्ती 100 टक्के योग्य आहे. पण माणूस कितीही हुशार असला, कितीही मोठा असला तरी तो ज्यावेळेस ढळतो, त्यावेळेला त्याची सगळी हुशारी बाजूला रहाते.

यानंतर कु.थोरात . . . .

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

त्याच्या प्रवृत्तीवर आघात करावा लागतो. विधी व न्याय विभागाला सांगण्यात आले की, जरी तुमचा असा सल्ला असला तरी महाधिवक्ताचे (Advocate General) मत घेण्यात यावे. माझ्याकडे या संबंधीचे सर्व नोटिंग आहे. माहितीच्या अधिकाराखाली मला ते मिळालेले आहे. मग महाधिवक्ताचे मत काय येणार आहे? त्यांचे मत 'होय' असेच येणार आहे. "कुंपण शेत खाते" त्याप्रमाणे महाधिवक्ता न्यायालयात शासनाच्या विरोधात उभे राहणार असतील आणि माननीय राज्यपालांना अधिकार आहेत की नाही, याबाबतीत ते माननीय राज्यपालांच्या विरोधात भाष्य करणार असतील, सोफिया कंपनीच्या बाजूने निकाल कसा येईल, यासाठी मदत करणार असतील, तर त्याबाबतची कारणे आम्हांला शोधावी लागली, ती शोधली तेव्हा विधानसभेत आम्हाला त्या संबंधीची कारणे सापडली. विधानसभेच्या सार्वभौमत्वावर मी बोलणार नाही. कारण काल सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी मला मार्गदर्शन केले आहे. अन्यथा मला या ठिकाणी कोणी तरी उठून सांगेल की, विधानसभेबद्दल या ठिकाणी बोलता येणार नाही, म्हणून मी पहिल्यांदाच त्यांचा आशीर्वाद घेऊन बोलतो.

सभापती महोदय, विधानसभेत विदर्भातील एका सन्माननीय सदस्याने असे वक्तव्य केले आहे की,"श्री. कदम यांचे चिरंजीव या सोफिया कंपनीत डायरेक्टर बोर्डावर असल्या कारणाने आपल्या चिरंजीवांची रोजी-रोटी वाचावी आणि सोफिया कंपनी रहावी यासाठी त्यांनी शासनाला गहाण ठेवले आणि त्यांची बुध्दी तिकडे वापरली." म्हणून आम्ही माननीय राज्यपालांकडे जाऊन त्यांना ताबडतोब काढून टाकण्या बाबत मागणी केली होती. वेळ पडल्यानंतर ते सरकारच्या बाजूने कर्तव्याला उभे राहिले नाहीत तर सरकारचा पगार घेऊन मुलाच्या बाजूने कर्तव्य निभावले आहे हे अत्यंत अयोग्य आहे. सभापती महोदय. विधी व न्याय विभागातील 'ब' शाखेने सांगितले तरच विधेयक सभागृहात येऊ शकते, नाही तर ते येऊ शकत नाही.

सभापती महोदय, आमच्यावर कसे बंधन आहे ते बघा. आजच्या कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आलेले अशासकीय कामकाज पुढच्या अधिवेशनात ढकलण्यात आलेले आहे. विरोधी पक्षामार्फत ज्यावेळी अशासकीय विधेयक मांडण्यात येते, त्यावेळी, त्याचा अर्थ असा असतो की, संसदीय लोकशाहीमध्ये एखादा कायदा असावा असे वाटत असेल आणि सरकार जर तो कायदा

..2...

श्री. दिवाकर रावते......

करत नसेल तर विरोधी पक्षाच्या माध्यमातून या सभागृहात तो कायदा आणवा, अशा प्रकारची तरतूद म्हणजे अशासकीय विधेयके. अशा प्रकारे विरोधी पक्षाने मांडलेली अनेक चांगली विधेयके विरोधी पक्षाला ती मागे घेण्याची विनंती करुन, ती विधेयके नंतर स्वत: शासनाने आणली आहेत.

सभापती महोदय, खास करुन मला आठवते की, जुन्या इमारतींच्या भाडेकरुंच्या संदर्भातील अशासकीय विधेयक मी या सभागृहात मांडले होते. विधानसभेत सन्माननीय सदस्या श्रीमती विशाखा राऊत यांनी मांडले होते. ही दोन्ही विधेयके मंत्री महोदयांनी उत्तर देताना तत्वत: स्वीकारली. त्यामुळे आम्ही ती विधेयके मागे घेतली. त्यानंतर शासनाने त्या विधेयकाचे कायद्यात रुपांतर केले. विरोधी पक्षाने सुचविलेला कायदा शासनाने स्वीकारावा ही पध्दत आहे. ज्यावेळी विरोधी पक्षाकडून एखादे विधेयक आणले जाते त्यावेळी त्याचे कायद्यात रुपांतर होत नसते, त्यातून या महाराष्ट्रातील जनतेकरता कोणता कायदा असावा, हे सांगण्याचा विरोधी पक्ष प्रयत्न करीत असते. रिजनेबल रिस्ट्रिक्शनचा अधिकार शासनाने मला दिलेला आहे. संपूर्ण देशाला तो दिलेला आहे. मुंबईमध्ये प्रचंड प्रमाणात लोंढे येत आहेत. घटनेप्रमाणे या देशामध्ये कोणालाही, कोणत्याही राज्यामध्ये जाण्याचा अधिकार आहे, हे तुम्हा-आम्हाला सर्वांना मान्य आहे. ते सगळे या देशाचे नागरिक आहेत. ते सगळे भारतीय आहेत. ते आपले बांधव आहेत. पण माझ्या 10x10 च्या घरामध्ये 15 लोक रहात असतील आणि त्या घरामध्ये आणखी 25 लोक घुसणार असतील आणि त्या लोकांमुळे माझ्या घरातील 15 लोकांचे जीवन असहय होणार नसेल तर काही काळ माझी 10x10 ची खोली 25 फुटाची होईपर्यंत मला त्यांना थांबवावे लागेल. हा माझा अधिकार आहे. कारण घटनेने मला जगण्याचा अधिकार दिलेला आहे. म्हणून घटनेमध्ये रिजनेबल रिस्ट्रिक्शन असे लिहिलेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. बरवड....

श्री. दिवाकर रावते ....

त्या करिता मी एक अशासकीय विधेयक आणले. पण जसे काही महाराष्ट्र सरकारच तो कायदा करावयास निघाले आहे अशा पध्दतीने ते विधेयक असंसदीय आहे, घटनाबाह्य आहे अशा प्रकारचे मत त्या 'ब' शाखेने दिले. ते माझ्याकडे आले. तीन वर्षे झाली तरी विधेयक का येत नाही हे मी बघत होतो. विधिमंडळाचे प्रधान सचिव डॉ. अनंत कळसे हे पीएच.डी. करीत होते. ते अभ्यासात गुंतलेले होते म्हणून माझ्याकडे बघायला वेळ मिळाला नसेल. त्या विधेयकाबाबत काय झाले असे मी विचारले. त्यांनी विधी खात्याच्या सल्ल्यासह मला उत्तर दिले की, हे विधेयक मांडता येत नाही. यामध्ये रिजनेबल रिस्ट्रीक्शन म्हणजे काही काळापुरती परप्रांतीयांना या शहरामध्ये येण्यास बंधन घालावे अशा प्रकारचे विधेयक होते. या शहरामध्ये जे परप्रांतीय आहेत त्यांना हाकला असे ते विधेयक नव्हते. या शहरामध्ये फार गर्दी झाल्यामुळे काही काळापुरते त्यांना थांबवावे अशा प्रकारचे ते विधेयक होते. त्या मतावर मी स्वत: ज्येष्ठ तज्ज्ञाचे आणखी एक मत घेतले. त्यांनी प्रत्येक मुद्दा कसा चुकीचा आहे आणि हे विधेयक आणणे कसे योग्य आहे या बाबत मत दिले. त्या मतासह परत मी ते विधेयक दिले आहे. त्या गोष्टीला आता दीड वर्ष झाले आहे. पण अजून मला त्या बाबत काहीही उत्तर आलेले नाही. ते विधेयक जर या सभागृहामध्ये मांडले तर महाराष्ट्रात चांगला संदेश जाईल. पण ते विधेयक मांडू द्यावयाचे नाही अशा प्रकारे या 'ब' शाखेचे काम आहे. या 'ब' शाखेच्या संदर्भात बोलत असताना दुर्दैवाने या महाराष्ट्राच्या अर्थ खात्याची जी प्रचंड लूट होते त्यावर नियंत्रण कसे आणावयाचे यासाठी मी हे सांगत आहे.

मी त्या खात्याच्या प्रमुखांना विनंती करतो की, महाराष्ट्राच्या हिताकरिता हे करावे लागेल. आपल्या पुरवणी मागण्यांमध्ये नेहमी न्यायालयाच्या निर्णयानुसार पाच कोटी रुपये, 10 कोटी रुपये, 15 कोटी रुपये, 150 कोटी रुपये देण्यासाठी पुरवणी मागणी करण्यात येते. 1 लाख रुपयांचे 1 कोटी रुपये कसे काय होतात ? काही तडजोडीने होत असतील, तो प्रश्न नाही. मी माननीय मंत्री महोदयांना सांगितले की, आपण सगळ्या नस्त्या मागवून बघा. एखाद्या शेतकऱ्याला जर न्यायालयाने 10 हजार रुपये मंजूर केले असतील तर आणि तो क्लेम मंजूर नसेल तर न्यायालय म्हणते की 12 हजार रुपये देऊन टाका. तेवढे घेण्यास शेतकरी तयार असतो. पण हे अधिकारी फायलींची थप्पी तशीच ठेवतात आणि आपण अपील करु असे सांगतात. त्या अपिलाकरिता 25

RDB/

श्री. दिवाकर रावते .....

हजार रुपये खर्च करतात. शेतकरी जर 12 हजार रुपये घेऊन गेला असता तर तो मोकळा झाला असता पण शासनाने अपील केल्यामुळे ते 12 हजार रुपये मिळविण्याकरिता त्या शेतकऱ्याला वकील करावा लागतो. त्याचा खर्च त्याच्यावर येतो. खऱ्या अर्थाने कोट्यवधी रुपयांची नासाडी या विधी खात्याकडून केली जाते. त्यावर कोण नियंत्रण आणणार हा मूलभूत प्रश्न आहे. आतापर्यंत या प्रश्नाला आपण वाचा फोडू शकलो नाही. नेहमी पुरवणी मागण्यांमध्ये अशा बाबी बघून मी बेचैन होत होतो. पैसे कसे वाढतात ? त्या ठिकाणी 'म' शाखेचे जे काम आहे त्या बाबत आपल्याला पहावेच लागेल. मी आधी जे बोललो होतो त्याचे उत्तर माननीय मंत्री महोदय देतीलच.

सभापती महोदय, मी धर्मादाय आयुक्ताबाबत बोललो होतो. Buy one, get one free याप्रमाणे Buy twelve, get one free अशा पध्दतीने 72 गाड्यांची ऑर्डर, 5 गाड्या फुकट, अशा प्रकारची नस्ती आहे. फक्त मंत्री बदलले पण ती तशीच पडून राहिली. ती फाईल मागवून घ्यावी. उद्या जर नाही म्हटले तर मी माहितीच्या अधिकाराखाली मागवू शकतो. माझा उद्देश टीका करण्याचा नाही. विधी खात्याला असे वाटते की, आपल्याला विचारणारे कोणी नाही. ते खरे आहे. विधी खात्याला कोणी जाब विचारत नाही. मला विधी खात्याकडून एक निश्चित उत्तर पाहिजे. आपण ज्यावेळेला निर्देश देता तेव्हा मंत्री सांगतात की, ही बाब न्यायप्रविष्ट आहे. त्यांनी मंत्र्यांना असा ठोस सल्ला दिला पाहिजे की, ही बाब न्यायप्रविष्ट आहे पण यावर स्थगिती नाही त्यामुळे चर्चा करु शकता. स्थगिती असेल तर थांबावेच लागेल. प्रकरण न्यायालयात गेलेले आहे आणि न्यायालयाने त्यावर काहीही मतप्रदर्शन केलेले नाही तरी सुध्दा न्यायप्रविष्ट आहे असे सांगितले जाते. आठ वर्षे, दहा वर्षे सभागृहामध्ये मुस्कटदाबी कोणाच्या आणि कशाच्या आधारावर करतात ? या संदर्भात सुध्दा विधी व न्याय खात्याने सन्माननीय सरकारला मत देताना त्या विषयावर चर्चा करता येते की नाही, उत्तर देता येते की नाही या बाबत सरकाला मत देताना स्पष्ट शब्दात दिले पाहिजे. कारण प्रश्न सोडविण्याकरिता विधिमंडळाचे अधिवेशन भरते. शासन सांगते की, ही बाब न्यायप्रविष्ट आहे मग पीठासीन अधिकारी म्हणून मी काय आदेश देऊ अशा प्रकारचा मानसिक दबाव आपल्यावर येतो. त्यामुळे या बाबतीत सुध्दा मार्गदर्शन व्हावयास पाहिजे.

यानंतर मी शेवटचा महत्वाचा मुद्दा मांडतो.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

आम्ही या सभागृहात तो मांडून मांडून थकलो आहोत. रेकॉर्ड वाजवून वाजवून गुळगुळीत झ ाल्यावर ती फेकून देतो. त्या प्रमाणे हा विषय झालेला आहे. न्यायालयात मराठी भाषेतून कामकाज कधी होणार असे शासनाला आम्ही वारंवार विचारत असतो. सभापती महोदय, मी मुद्दाम आपल्या निदर्शनास आणत आहे. दिनांक 17.9. 1997 साली शासनाने एक शासन निर्णय काढला आहे. त्याचा क्रमांक एलएनजी/1091/503 असा आहे. 1997 साली आम्ही या विधानमंडळाच्या आजूबाजूला सुध्दा फिरकलो नव्हतो. या निर्णयात एका वर्षात जिल्हा व तालुका पातळीवरील न्यायालयात 100 टक्के मराठीची हमी देतो. ग्रामीण भागातील सर्व गरीब व सामान्य शेतकऱ्यांसाठी हे विधेयक मांडलेले आहे. कोर्टात इंग्रजीतून संभाषण होत असते ते त्यांना कळत नाही, काय चालले आहे ते समजत नाही. त्यांना हे सर्व कळण्यासाठी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. या निर्णयाची अंमलबजावणी कोणी करावयाची ?

या संदर्भात न्या.चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने एक समिती नेमली होती. आदरणीय न्या.चंद्रशेखर धर्माधिकारी हे अत्यंत विद्वान आहेत. त्यांचे व्याख्यान आयोजित केले जाते त्यावेळी मला वेळ असेल तर मी ते ऐकण्यासाठी आवर्जून जातो. एवढी विद्वत्तापूर्ण त्यांची व्याख्याने असतात. पण या समितीचे ते प्रमुख असताना व न्यायालयात मराठीतून कामकाज सुरु करण्याच्या कामी ते असमर्थ ठरले आहेत. ते का असमर्थ ठरले त्याची कारणे ते देतील. न्या.चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्यासारखे ज्येष्ठ व त्या क्षेत्रातील एक उत्तुंग व्यक्तिमत्व या समितीचे प्रमुख असतील व 1997 सालापासून न्यायालयात मराठीतून कामकाज होत नसेल तर ही वस्तुस्थिती तुम्हाला, आम्हाला लपविता येत नाही. केवळ शासनाने हे केले ते केले असे सांगून शासनाला वेळ मारुन नेता येणार नाही. शासनाला आपल्या कृतीतून गरिबांना व सामान्य लोकांना न्याय द्यावयाचा आहे. त्यांना दिलेला न्याय समजणा-या भाषेत दिला पाहिजे. या सभागृहात 2005 साली चर्चा झाली होती, त्यावेळी यासंबंधी कार्यवाही होईल असे सांगण्यात आले होते, त्यानंतर 2007 साली चर्चा झाली होती, त्यावेळी सुध्दा तेच सांगितले होते. काही दिवसांपूर्वी चर्चा झाली त्यावेळी तसेच उत्तर देण्यात आले होते. मराठी भाषेच्या संदर्भात अल्पकालीन चर्चा मी उपस्थित

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.दिवाकर रावते....

करणार आहे, त्यामध्ये हाच विषय आहे. परंतु या विधेयकाच्या निमित्ताने हा विषय येथे मांडण्याचा योग आल्यामुळे हा विषय त्या चर्चेच्या वेळी मी मांडणार नाही. न्यायालयात 100 टक्के मराठीतून कामकाज होईल असे ज्या निर्धाराने सरकारने 1997 साली सांगितले होते त्याची 2011 मध्ये सुध्दा अंमलबजावणी होत नसेल तर माझ्यासारख्या सदस्यांस त्या बाबत विचारणा करावी लागत असेल तर ही बाब तुम्हाला, आम्हाला, सरकाला किंवा कोणालाही भूषणावह नाही. राजभाषेचा न्यायालयीन पातळीवर एवढा मोठा अवमान होणार असेल तर ती फार दुर्दैवी बाब आहे.

न्यायालयात मराठीतून काम व्हावे याकरिता राज्यातील सर्व वकील मंडळी आझाद मैदानात उपोषणाला बसली होती. कोणत्याही संस्थेचे पदाधिकारी, कार्यकर्ते किंवा आपण तेथे बसलो नव्हतो. त्यांचा आक्रोश शासनाच्या कानी पडला आहे की नाही ते माहीत नाही. या संदर्भात मंत्री महोदयांनी आम्हाला मार्गदर्शन केले तर बरे होईल. मी माझ्या परीने, मला जमते तेवढ्या सूचना केलेल्या आहेत. त्यातील योग्य सूचना असतील त्याचे शासनाने जरुर पालन करावे अशी आपल्या माध्यमातून सरकारला विनंती करतो आणि येथेच थांबतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

ॲड.उषा दराडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, वि.स.वि.क्रमांक 22 या विधेयकावर सभागृहात चर्चा सुरु आहे. या चर्चेत भाग घेण्यासाठी मी या ठिकाणी उभी आहे.

सभापती महोदय, शासनाने सभागृहात एक चांगले विधेयक आणल्याबद्दल मी सरकारचे प्रथम अभिनंदन करते. या विधेयकाद्वारे या पूर्वीच्या कायद्याला दुरुस्ती सुचविण्यात आली आहे. दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, जिल्हा न्यायालये यांची कार्यकक्षा वाढविण्यात येत आहे. लिटिगेशनची प्रकरणे प्रलंबित असतात, त्यासाठी हायकोर्टापर्यंत लोकांना जावे लागते. ही अडचण दूर करण्यासाठी व न्याय लवकर मिळण्याच्या दृष्टीने शासनाने पाऊल उचलले असल्यामुळे या विधेयकाला मी पाठिंबा देत आहे. ज्युडिशिअरीमध्ये अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत ही वस्तुस्थिती आहे. महिलांसाठी न्यायालये असतात. तसेच शासनाने कौटुंबिक न्यायालये स्थापन करण्याचा निर्णय घेतला होता. परंतु बोटावर मोजण्या इतकी राज्यात कौटुंबिक न्यायालये आहेत.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 17:10

ॲड. उषा दराडे...

ॲट्रासिटीज अगेन्स्ट वुमेन्स किंवा महिलांचे नव-याच्या विरोधातील खटले निकाली काढण्याच्या दृष्टीने प्रत्येक जिल्ह्यामध्ये कौटुंबिक न्यायालय नसल्यामुळे फार अडचण निर्माण होते. प्रत्येक जिल्ह्यामध्ये हे कौटुंबिक न्यायालय असावे हे शासनाने तत्वत: मान्य केलेले आहे, शासनाचे तसे मतही आहे. तरी सुध्दा हे होत नाही. अशा प्रध्दतीने या राज्यातील सर्व जिल्ह्यामध्ये कौटुंबिक न्यायालय निर्माण केली तर निश्चितपणे फायदा होऊ शकेल. ज्युडिशिअरी सिस्टिमबाबत आपण असे म्हटलेले आहे की, दिवाणी न्यायालय, कनिष्ठस्तर यांना ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेट म्हणून देखील काम करायचे असते. फौजदारी प्रकरणे देखील चालवायची असतात. एकाच न्यायाधीशाकडे ही सर्व प्रकारची कामे असतात. ॲक्सीडेण्ट क्लेमचे ट्रिब्युनल आहे. जिल्हा न्यायाधीश किंवा अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश तेथे काम करतात. त्या ट्रिब्युनलला देखील केवळ ॲक्सिडेण्ट क्लेमचे काम रहात नाही तर अन्यही कामे असतात. यामुळे पेन्डन्सी फार मोठ्या प्रमाणावर वाढते. म्हणून विशिष्ट न्यायालय स्थापन करुन त्या न्यायालयाला तेवढेच काम दिले गेले पाहिजे. जसे फास्ट ट्रॅक कोर्ट आहे, त्या पध्दतीने महिलांच्या प्रश्नासाठी वेगळी न्यायालये, फौजदारी खटल्यासाठी वेगळी न्यायालये अशा पध्दतीने जोपर्यन्त आपण न्यायालयांची संख्या वाढवत नाही तोपर्यन्त ही पेन्डन्सी संपणार नाही.

सभापती महोदय, न्यायालयाच्या ठिकाणी वातावरण देखील चांगले असायला पाहिजे. पूर्वीच्या निजामकाळात बांधलेल्या इमारती पाहिल्या तर त्या ठिकाणी पटांगणामध्ये कवठीची, चिंचेची, बोरीची झाडे दिसतात. पक्षकारांना इमारतीमध्ये बसण्यासाठी जागा नसली तर निदान झाडाखाली तरी येऊन बसतात. न्यायालया मधील कॅण्टीन्स चांगल्या प्रकारची नसतात. तेथे अतिशय अशुद्ध अशा प्रकारचे पाणी असते. बसण्यासाठी जागा नसते. आपण तालुक्याच्या किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी जी नवीन न्यायालये स्थापन केलेली आहेत ती भाड्याच्या इमारतीमध्ये आहेत. न्यायालयासाठी आपण फार कमी प्रमाणात इमारती बांधतो. जेथे जेथे न्यायालयासाठी इमारती भाड्याने घेतलेल्या आहेत तेथे शासनाने स्वत:च्या प्रशस्त इमारती बांधल्या पाहिजेत. भाड्याच्या इमारतीमध्ये जशी व्यवस्था असेल त्याप्रमाणे भागवून घ्यावे लागते. बीड जिल्ह्यातील शिरुर तालुक्यामध्ये न्यायालयाला स्वत:ची इमारत नाही. दारुर येथील न्यायालयाला स्वत:ची इमारत नाही. अंबेजोगाईच्या न्यायालयातील न्यायाधीशांना क्वॉटर्स नाहीत. परळीच्या न्यायालयाची इमारत

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे

केव्हा पडेल याची शाश्वती नाही. न्यायालयासाठी इरिगेशनचे रेस्ट हाऊस भाड्याने देण्याचा निर्णय झालेला आहे. दुरुस्तीसाठी 25 रुपये लाख दिलेले आहेत. परळीच्या न्यायालयाच्या इमारतीसाठी कमीत कमी रु.50 लाखाची गरज आहे. माजलगावच्या न्यायालयाची इमारत अत्यंत जुनी आहे. त्या ठिकाणी क्वार्टर्स नाहीत. ही जी परिस्थिती आहे त्यावर कुठे तरी बंधन आणण्याची गरज आहे. या सर्व सुविधा करण्यासाठी आणि काम सोपे करण्यासाठी अधिकाधिक तरतूद करण्याची गरज आहे.

अजूनही काही गोष्टी पेन्डन्सीला कारणीभूत आहेत. डिस्ट्रिक्ट गव्हर्नमेंट प्लिडर आणि ॲडिशनल गव्हर्नमेंट प्लिडरच्या जागा रिक्त राहातात. नवीन न्यायालय निर्माण झाले की त्याच दिवशी या जागा भरल्या गेल्या पाहिजेत. माजलगाव येथे नवीन न्यायालय निर्माण होऊन अनेक वर्षे झाली. बीडचे सरकारी वकील माजलगावला अप-डाऊन करुन काम करतात. त्यांना रोज 60 कि.मी. सकाळी आणि संध्याकाळी प्रवास करावा लागतो. त्या ठिकाणचे अर्ज मागविले. बीडचे जिल्हाधिकारी अहवाल देण्यासाठी दोन वर्षे लावत असतील तर कसे होणार ? या व्यवस्थेवर कुठे तरी कंट्रोल असला पाहिजे. मध्ये एक प्रकरण घडले. गृह खात्याने लिगल ॲडव्हायझर्स नेमण्याचा निर्णय घेतला. प्रत्येक जिल्ह्याला 11 महिन्याच्या करार पध्दतीने लिगल ॲडव्हाझर्स नेमले. त्यांना डिव्हिजन ऑफिसला बसवून प्रत्येक प्रकरणी त्यांच्या कडून ओपिनिअन घेतले जात असे. तीन वर्षे अशा पध्दतीने करार केला. त्यानंतर त्यांचे रेग्युलर लिटिगेशन संपून गेले. लोकांशी त्यांची नाळ तुटली आणि त्यानंतर त्यांना डिस्कंटिन्यू केले. पुन्हा चौथ्या वर्षी त्यांना घेण्यात आले. ही माणसे न्यायालयात गेली. न्यायालयाने त्यांना ताबडतोबीने परमनण्ट ऑर्डर देण्याचे, वेतनश्रेणी ठरविण्याचे आदेश दिले. पण आपले शासन त्याबाबतीत काही करीत नाही. न्यायालयाचे निर्णय अशा पध्दतीने डावलले जाणे योग्य नाही. कायदा खूप चांगला आहे. पण हा कायदा आपल्या कामाचा नसेल तर खूप अडचण निर्माण होऊ शकतात.

पेंडन्सी ऑफ लिटिगेशनच्या संदर्भात विशेष भूसंपादनाचा जो कायदा आहे त्या बाबतीत काही गोष्टी मला आपल्या लक्षात आणून द्यावयाच्या आहेत. आमच्या जिल्ह्यामध्ये खूप पाझर तलाव आहेत. त्या पाझर तलावासाठी शेतक-यांच्या जमिनी घेतलेल्या आहेत. ह्या जमिनींचा ताबा शेतक-यांची संमती न घेता सेक्शन 4(1)चे नोटिफिकेशन काढण्या आधी घेतलेला आहे. या

..3..



MSS/ पूर्वी श्री. खंदारे 17:10

ॲड. उषा दराडे

शेतक-यांनी वाढीव रकमेसाठी केलेले अर्ज पाझर तलावामध्ये पाणी साठल्यानंतर देखील अनेक वर्षापासून निकाली काढले जात नाहीत. केज तालुक्यातील सावळेश्वर पैठणचा पाझर तलाव कमीत कमी 20 वर्षापूर्वी झालेला आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे....

त्या लोकांनी भूसंपादनाच्या रकमेच्या विरुध्द दावे दिले. या संदर्भात न्यायालयाने निवडा दिला की,शेतकऱ्यांना भूसंपादनाचा वाढीव मावेजा देण्यात यावा. उच्च न्यायालयामध्ये शासनाने अपील केले. उच्च न्यायालयाने ॲडमिशनच्या वेळेला सूचना दिल्या की, या बाबतीत पैसे भरा. दोन वर्षापूर्वी ही ऑर्डर झालेली आहे. अद्यापपर्यंत शासनाकडे पैसे मागण्याचे काम बीड जिल्हयातील भूसंपादन अधिकाऱ्यानी केलेले नाही. शासनाच्या अधिकाऱ्यांकडून अशा प्रकारचा हलगर्जीपणा चालतो, त्यास कोठे तरी आळा घातला गेला पाहिजे. भूसंपादन कायद्यामध्ये मावेजा देण्यासंदर्भात कालावधी देण्यात आलेला आहे. परंतु ठरलेल्या कालावधीत शेतकऱ्याला भूसंपादनाचा वेळेवर मावेजा दिला जात नाही.

सभापती महोदय, कलम 28(अ) चे दावे सापडत नाहीत. भूसंपादनाचे दोन दावे होते, त्यावेळी मी ज्युनिअर वकील होते.

**सभापती** : सभागृहाची वेळ दोन तास वाढवून देण्यात येत आहे. आपल्या पुढे अजून बरेच कामकाज आहे. नियम 97 चे तीन प्रस्ताव चर्चेसाठी आहेत, शिवाय दोन विधेयके चर्चेला घ्यावयाची आहेत, त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात बोलावे अशी माझी विनंती आहे.

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, सेक्शन 28 (अ) चे दावे कार्यालयात सापडत नाहीत. ते दावे दहा दहा वर्षे निकाली काढले जात नाहीत. या गोष्टीस देखील प्राधान्य देणे गरजेचे आहे. शासनाने या बाबतीत विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. मारुती विरुध्द स्टेट आणि विठ्ठल विरुध्द स्टेट असे दोन भूसंपादनाचे दावे होते. त्यांनी मला सांगितले की, मी दहा वर्षापूर्वी दावा दाखल केला होता, परंतु त्याची कागदपत्रे कार्यालयात सापडत नाही. त्या कार्यालयात गाठोडे आणि पोत्यांमध्ये कागदपत्रे ठेवली होती, त्यात आम्ही सदरहू दाव्यांची कागदपत्रे तपासली. त्यात त्या दाव्यांची कागदपत्रे सापडली. त्यानंतर त्या केसेस कोर्टात रेफर केल्या गेल्या. त्यानंतर कोर्टाने निकाल दिला. अशी महसूल विभागाची परिस्थिती आहे. व्याज देण्याच्या संदर्भात ज्या काही अडचणी आहेत, त्या देखील दूर करण्याचा प्रयत्न शासनाने केला पाहिजे. काही न्यायालये सेक्शन 34 प्रमाणे व्याज देण्यात यावे असा निर्णय देतात. काही न्यायालये सेक्शन 34 प्रमाणे व्याजासंबंधी निर्णय देत नाही. काही न्यायालये सेक्शन 18 चे दावे क्लब करुन चालवितात. काही न्यायालये

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे...

मंगतराम विरुध्द स्टेट पेज क्रमांक 1080, वर्ष 1991 च्या निर्णयाप्रमाणे प्रमाणे तंतोतंत व्याज देण्यासंबंधी निर्णय देतात. काही न्यायालये तंतोतंत व्याज देण्यासंबंधी निर्णय देत नाहीत. या सर्व गोष्टींकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, मी शेवटची मागणी अगदी मनापासून करीत आहे की, महिलासांठी 376, 354, 306,304(बी), 363, 366 असे कायद्यातील कलमे आहेत. या कायद्यामध्ये गुन्हेगारांना शिक्षेची तरतूद अतिशय कमी आहे, ती वाढविणे गरजेचे आहे. या कायद्यांमध्ये सुधारणा करुन जास्तीत जास्त शिक्षेची तरतूद करावी अशा प्रकारची मी शासनास विनंती करते आणि या ठिकाणी जे विधेयक मांडण्यात आले आहे, त्यास पाठिंबा देऊन मी माझे मनोगत पूर्ण करते.

-------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, या विधेयकाच्या अनुषंगाने मी मघाशी सांगितले की, सन 1999 मध्ये दिवाणी न्यायालय अधिनियम 1869 मधील कलम 16,24,26 आणि 28 यात सुधारणा करण्यापूरते हे विधेयक या सभागृहात मांडण्यात आलेले आहे. संपूर्ण राज्यात वेगवेगळया स्तरावर कोणकोणत्या प्रकारची प्रलंबित प्रकरणे आहेत, त्याची विस्ताराने माहिती दिली असल्यामुळे त्याची पुनरावृत्ती मी करणार नाही. त्यांनी सांगितले की, आपण एकंदरीत मागील दहा वर्षामध्ये किती प्रकारचे खटले दाखल होतात, किती प्रकारचे खटले निकाली निघतात यासंबंधी एक सर्व्हे रिपोर्ट तयार करावा. त्यासाठी एखादी कन्सल्टन्सी एजन्सी नेमा अशा प्रकारची सन्माननीय सदस्य श्री. दिवाकरजी रावते यांनी अतिशय मूलभूत अशा प्रकारची सूचना केली आहे. या बाबतीत मी सांगू इच्छितो की, 1996 साली केंद्र सरकारने मा.शेट्टी आयोग नेमला होता. त्यात 10 लाख लोकसंख्येच्या मागे साधारणपणे 50 न्यायालये स्थापन करावीत अशा प्रकारची एक सूचना केली होती. परंतु त्यांनी केलेली सूचना आपणास आमलात आणता आली नाही. लोकसंख्येच्या प्रमाणामध्ये अंदाजे न्यायाधीशांची संख्या 5500 एवढी असावयास पाहिजे, परंतु आपल्याकडे न्यायाधीशांची संख्या 2000 एवढी आहे ही वस्तुस्थिती खरी आहे. आयोगाचा अहवाल शासनास प्राप्त झालेला आहे. मागच्या दहा वर्षामध्ये किती खटले दाखल झाले, किती खटले निकाली निघाले, या सर्व पार्श्वभूमीवर किती न्यायाधीशांच्या नेमणूका केल्या पाहिजे, त्यासाठी किती न्यायालये तयार केली पाहिजेत...

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव.......

या संदर्भात माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सूचना केली आहे, त्या संदर्भात मी माहिती सांगितली.

दुसरा मुद्दा हा चांगले न्यायाधीश निर्माण करण्यासाठी एखादे व्यासपीठ निर्माण करता येईल काय अशा प्रकारचा होता. निश्चितपणे चांगला न्याय, झटपट न्याय, ज्याचा असेल त्याला न्याय मिळावा अशा प्रकारची अपेक्षा असणे चुकीचे नाही. त्यांनी सूचना केली आहे. माझ्या माहितीप्रमाणे सगळ्याच क्षेत्रामध्ये शिबीरे घेतली जातात, चर्चासत्रे भरविली जातात, मार्गदर्शन घेतले जाते, नवनवीन कायदे निर्माण झाले त्या कायद्यांचा अभ्यास केला जातो, वेगवेगळया खटल्यांमध्ये सुप्रीम कोर्ट किंवा हायकोर्टाने दिलेल्या निर्णयांची माहिती सुध्दा त्या त्या काळात दिली जाते अशा प्रकारची शासनाकडे माहिती आहे. माननीय सदस्यांनी अशी सूचना केली की, तडजोडीने खटले मिटविले पाहिजेत. सभापती महोदय, अर्थसंकल्पात किंवा पुरवणी मागण्यांमध्ये आपल्याला दिसून येते की, साधारणपणे ज्यांचे दावे असतील ते दावे निकाली काढण्यासाठी त्यांना द्यावी लागणारी भरपाईची रक्कम मोठया प्रमाणात असते. याचा अभ्यास केल्यानंतर असे दिसून आले की, 500 रुपये भरपाई द्यायची असली तरी वकिलाला 2000 रुपये फी द्यावी लागते. अशा प्रकारच्या घटनांमधून राज्याच्या तिजोरीवर फार मोठा परिणाम पडतो. तो परिणाम टाळण्याकरिता म्हणून जाणीवपूर्वक काही गोष्टी वेळीच चर्चेने सोडवू शकलो तर मोठया प्रमाणात पडणारा आर्थिक बोजा टाळता येईल, यासाठी माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी तळमळ व्यक्त केली आहे. निव्वळ कायद्याचा आधार घेऊन असे प्रकार केले जातात का हे पहावे लागेल. त्या संदर्भात बारकाईने लक्ष ठेवून याचा एकदा आढावा घेणे आवश्यक आहे. हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. म्हणून त्या संदर्भात निश्चितपणे विचार होईल.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे शासकीय कामकाजात मराठी भाषेच्या वापराबद्दल नेहमीच तळमळीने बोलत असतात. ही वस्तुस्थिती आहे की, महाराष्ट्र शासनाने 19 सप्टेंबर, 1997 मध्ये निर्णय घेतला होता. परंतु त्या निर्णयाची अंमलबजावणी होत नाही याबद्दल त्यांनी मत प्रदर्शित केले. राज्यात जिल्हा व तालुका पातळीवर जी दुय्यम न्यायालये आहेत तेथील बहुतांश कामकाज मराठी भाषेतून, किमान ऑर्ग्युमेंट मराठी भाषेतून केले जाते ही वस्तुस्थिती आहे. त्यासाठी मराठी सॉफ्टवेअर्स देखील त्या त्या न्यायालयात निर्माण करुन देण्यात आली आहेत आणि ती सॉफ्टवेअर्स बऱ्यापैकी रिझल्ट देत आहेत अशी सुध्दा माहिती आहे. ..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव.......

शासनाची आकडेवारी 40 ते 50 टक्क्याची असली तरी पुढील काळात मराठी भाषेतून चालणाऱ्या कामकाजाची टक्केवारी वाढविण्याची आवश्यकता आहे याची मला स्वत:ला जाणीव आहे. त्या दृष्टीने सर्वांनी मिळून प्रयत्न करु या अशा प्रकारची ग्वाही देतो.

सभापती महोदय, माननीय सदस्यांनी शाखा ब, शाखा क आणि शाखा म बद्दल उल्लेख केला. विधेयक तयार करणारी ही शाखा आहे. कायदे तयार करीत असताना अत्यंत चिकित्सक असणे आवश्यक आहे. परंतु किचकट असण्यापेक्षा चिकित्सक असणे ही त्यांची भूमिका असते आणि ती भूमिका पार पाडण्याचा ते प्रयत्न करीत असतात. परंतु प्रत्येक गोष्टीमध्ये नकारात्मक भूमिका घेतली पाहिजे अशी जी मानसिकता कळत नकळत काम करीत असताना निर्माण होते किंवा अंगवळणी पडते ती सुध्दा दूर करण्याची गरज आहे असे माननीय सदस्यांनी सांगितले आहे. असे प्रकार होता कामा नयेत म्हणून सुध्दा प्रयत्न करणे आवश्यक आहे. माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मागील वेळी सुध्दा अत्यंत महत्वाचा विषय मांडला होता. Buy twelve get one free हा तो विषय होता. त्या काळात 72 वाहने घेण्याचा निर्णय झाला होता. तो प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे असे त्यांनी सांगितले, ही गोष्ट खरी आहे.

नंतर 4जी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव .......

तसा कोणताही निर्णय अद्याप झालेला नाही. न्यायाधीशांना गाड्या देण्यासंबंधीचा प्रस्ताव आमच्या विभागाकडे प्रलंबित आहे. तसेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितले की, 12 गाड्यांवर एक गाडी मोफत अशा प्रकारची योजना आहे. त्यानुसार आपण गाड्या घेतल्या तर जवळपास 5-6 गाड्या मोफत मिळतील असे त्यांचे म्हणणे आहे. पण विनोदाचा भाग सोडला तर न्यायाधीशांना गाड्या घेतल्या पाहिजेत, ही गोष्ट खरी आहे.

श्री. दिवाकर रावते : महोदय, न्यायाधीशांना पुरेशा प्रमाणात गाड्या नाहीत त्यामुळे विभागाकडून भाड्याच्या गाड्या दिल्या जातात व त्यावर भरपूर भाडे दिले जाते हे टाळण्यासाठी त्यांना गाड्या दिल्याच पाहिजे, अशी माझी सूचना आहे.

श्री. भास्कर जाधव : महोदय, सन्माननीय सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे न्यायाधीशांना गाड्या घेणे जरुरीचे आहे व त्या दृष्टीने लवकरच विचार करावा लागेल. तसेच सन्माननीय सदस्यांनी मागील वेळेस देखील अनेक महत्वाच्या मुद्यांचा उल्लेख केला होता त्यांची माहिती विस्ताराने दिलेली असल्याने पुनरावृत्ती करण्याची गरज नाही. तसेच आज पेंडन्सीबाबतची माहिती दिलेली आहे. गेल्या दोन वर्षात या विभागाकडून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करुन देण्याचे काम केलेले आहे. राज्यातील सगळ्याच न्यायालयांच्या इमारती सुसज्ज व्हाव्यात, त्यांच्या मागणीनुसार व्हाव्यात त्यादृष्टीने अधिक चांगल्या इमारती तयार करण्याचे काम संपूर्ण राज्यात सुरु आहे. त्यासाठी अधिकची रक्कम सुध्दा शासनाने दिलेली आहे.

सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांनी गुन्ह्यांप्रमाणे स्वतंत्र कोर्ट निर्माण करण्याची मागणी केली आहे. ज्याप्रमाणे वेगवेगळ्या आजाराचे स्पेशालिस्ट असतात तशाच पध्दतीचे थोडेसे स्पेशलायझेशन करावे अशी त्यांनी सूचना केली आहे. ही सूचना व्यवहार्य आहे की कसे याची तपासणी करण्यात येईल. त्याचबरोबर मुंबई, पुणे, औरंगाबाद, नागपूर, नाशिक, अमरावती अशा प्रकारे संपूर्ण राज्यात 22 कौटुंबिक न्यायालये स्थापन केली आहेत. आता सोलापूर आणि कोल्हापूर येथे सुध्दा अशी कौटुंबिक न्यायालये स्थापन करण्यासाठी नुकतीच मंत्रिमंडळाने मान्यता दिलेली आहे. तसेच पुढील पाच वर्षात राज्यात फास्ट ट्रॅक कोर्ट योजनेच्या माध्यमातून 100 कोर्ट सुरु करण्याच्या प्रस्तावाला सुध्दा मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. अशा प्रकारे न्यायदान झटपट

...2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ........

व्हावे, खटल्यांचा निपटारा लवकर व्हावा यादृष्टीने शासनाचे प्रयत्न चालू आहेत व त्यातलाच हा एक भाग म्हणता येईल. यामध्ये आपण कनिष्ठ आणि जिल्हा न्यायालयांना त्यांच्याकडे दावे दाखल करण्याच्या मर्यादेत वाढ करुन दिलेली असल्याने आता तेवढ्या किंमतीच्या दाव्यासाठी उच्च न्यायालयात जाण्याची गरज नाही. या माध्यमातून जिल्ह्याच्या ठिकाणच्या खटल्यांचा निपटारा वेळेत व्हावा हाच उद्देश आहे व याला अनेक सन्माननीय सदस्यांनी समर्थन केलेले आहे.

श्री. दिवाकर रावते : महोदय, राज्यात उच्च न्यायालयांची खंडपीठासह तीन एवढी संख्या आहे. कोल्हापूरला देखील असे एक खंडपीठ व्हावे अशी अनेक दिवसांपासूनची मागणी आहे. त्याचबरोबर धुळे, नंदुरबार आणि जळगांव भागातील लोकांना सुध्दा उच्च न्यायालयात केस दाखल करण्यासाठी मुंबई किंवा संभाजीनगरला जावे लागते. त्यासंबंधीचे शासनाचे काही नियोजन आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : महोदय, हा विषय सुध्दा मंत्रिमंडळासमोर एकदा आला होता पण त्यासंदर्भात अधिकची माहिती घेण्याचे काम सुरु असून त्याला अजून अंतिम स्वरुप आलेले नाही. अशा प्रकारे हा विषय सुध्दा चर्चेमध्ये आहेच. या विधेयकावर अनेक सन्माननीय सदस्यांना आपली मते मांडावयाची होती पण ते न मांडता पाठिंबा दिलेला आहे, कोणीच विरोध केलेला नाही. त्याबद्दल सर्व सभासदांचे आभार मानतो आणि त्यांनी या विधेयकाला एकमताने पाठिंबा द्यावा अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 6 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.स.वि. क्रमांक 22 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : सन 2001 चे वि.स.वि. क्रमांक 22 संमत झाले आहे.

----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही सकाळी 10 वाजेपासून सभागृहाच्या कामकाजात भाग घेत आहोत त्यामुळे 15 मिनिटाची विश्रांती द्यावी अशी विनंती आहे.

**सभापती** : ठीक आहे. सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी स्थगित करण्यात येत आहे.

(5.32 ते 5.50 पर्यंत बैठक स्थगित झाली.)

-----

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगिती नंतर )**

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)**

**पृ.शी**. : मुंबई होमिओपॅथिक वैद्यक व्यवसायी (सुधारणा) विधेयक

**मु.शी**. :

L.A. BILL NO. XIII OF 2011

( A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY HOMOEOPATHIC PRACTITIONERS' ACT, 1959.)

डॉ.विजयकुमार गावित (वैद्यकीय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 13 मुंबई होमिओपॅथिक वैद्यक व्यवसायी अधिनियम, 1959 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : विधेयक मांडण्यात आले आहे.

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 13 मुंबई होमिओपॅथिक वैद्यक व्यवसायी अधिनियम, 1959 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे,असा प्रस्ताव मांडतो

सभापती महोदय, या ठिकाणी जे विधेयक मांडण्यात आलेले आहे त्यामध्ये तीन दुरुस्त्या सुचविण्यात आलेल्या आहेत. सुरुवातीला 300 रुपये नोंदणी फी घेण्यात येत होती .1988 साली 300 रुपये नोंदणी फी निश्चित करण्यात आली होती. परंतु त्यामध्ये वाढ करण्यात आली नव्हती यामध्ये वाढ न करण्याचे कारण असे होते की पूर्वी होमिओपॅथीकचे कौन्सिल होते. परीक्षा घेण्याचे , रजिस्ट्रेशन करण्याचे त्याचबरोबर वेगवेगळया संस्थांना मान्यता देण्याचे काम देखील कौन्सिलकडून केले जात होते. 1988 साला नंतर हे काम विद्यापीठाकडे गेल्यामुळे कौन्सिलकडे होमिओपॅथीच्या डॉक्टरांचे रजिस्ट्रेशन करण्याचेच काम राहिले. 300 रुपये त्यांच्याकडून रजिस्ट्रेशन फी घेण्यात येत असल्याने कौन्सिलला दरवर्षी दहा ते पंधरा लाख रुपयांचा तोटा सहन करावा लागत होता. पूर्वी त्यांच्याकडे ज्या काही एफ.डी. जमा होत्या त्यातून हा तोटा भरुन काढण्यात येत होता. कौन्सिलमध्ये काम करणा-या कर्मचा-याचे पगार आणि इतर खर्च

2..

डॉ.विजयकुमार गावित...

भागविण्याकरता शासन सांगेल त्याप्रमाणे या रजिस्ट्रेशनच्या फीमध्ये वाढ करण्यात येईल असा बदल करण्यात आला आहे.

सभापती महोदय, यानंतर दुसरा बदल या विधेयकामध्ये करण्यात येत आहे. एम.बी.बी.एस. झालेल्या विद्यार्थ्यांना सक्तीने इंटरर्नशीप करावी लागते तसेच बी.एच.एम.एस.च्या विद्यार्थ्यांनाही सक्तीने इंटरर्नशीप करावी लागत होती. परंतु एम.बी.बी.एस.चा विद्यार्थी उत्तीर्ण झाल्यानंतर इंटरर्नशीप करीत असतांना एक वर्षाचे प्रोव्हिजनल रजिस्ट्रेशनची तरतूद होती परंतु बी.एच.एम.एस.च्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत ती तरतूद नव्हती त्यामुळे आता या विद्यार्थ्यांनाही प्रोव्हिजनल रजिस्ट्रेशनची तरतूद करण्यात येत आहे. प्रोव्हिजनल रजिस्ट्रेशन दिल्याशिवाय इंटरर्नशीपची प्रॅक्टीस करता येत नाही. त्यांच्याकडे सर्टिफिकेट नसल्यामुळे त्यांच्या हातून जर काही चूक घडली तर त्यांना शिक्षा होऊ शकते. त्याकरता प्रोव्हिजनल सर्टिफिकेट देण्याची तरतूद करण्यात येत आहे.

सभापती महोदय, यानंतर या विधेयकामध्ये तिसरी सुधारणा करण्यात येत आहे. पूर्वी नूतनीकरणासाठी दर पाच वर्षानी नोटिफिकेशन काढले जावयाचे. त्यामुळे आज जर एखादा विद्यार्थी उत्तीर्ण झाला तर पाच वर्षे पूर्ण होण्याच्या अगोदरच त्याला नूतनीकरण करावे लागत होते.नुतनीकरण करण्याची पध्दत अशी होती की पाच वर्षे संपण्यापूर्वी दोन महिने अगोदर नोटिफिकेशन काढले जावयाचे व त्यासंबंधीची जाहिरात प्रसिध्द केली जावयाची. त्याचबरोबर संबंधित व्यक्तीला पोस्टाने देखील कळविले जावयाचे.दोन महिन्यामध्ये जर सबंधित व्यक्ती आली नाही तर पुन्हा 45 दिवसानंतर पत्र पाठविले जावयाचे. ही पध्दत अत्यंत खर्चिक व वेळकाढूपणाची होती. आता या पध्दतीमध्ये सुधारणा करण्यात येत असून ज्याची मुदत संपत आहे त्याने दोन महिन्याच्या आत नूतनीकरणासाठी अर्ज करावयाचा आहे जर त्याने दोन महिन्याच्या आत नूतनीकरणासाठी अर्ज केला नाही तर आपोआपच त्याचे रजिस्ट्रेशन रद्द करण्यात येणार आहे.त्याचबरोबर संबंधित व्यक्तीला रजिस्ट्रेशनच्या वेळी ओळखपत्र सुध्दा देण्यात येणार आहे.त्या ओळखपत्राची मुदत फक्त पाच वर्षासाठीच राहणार आहे. अशा प्रकारची तरतूद करण्यात येत असून वेळेमध्ये जर त्याने रजिस्ट्रेशनचे नूतनीकरण केले नाही तर ते रद्द करण्यात येणार आहे. जेव्हा तो पुन्हा रजिस्ट्रेशन करण्यासाठी येईल तेव्हा त्याच्याकडून दंड वसूल करण्यात येईल अशा

2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावित...

प्रकारच्या सुधारणा या विधेयकात सुचविण्यात आलेल्या आहेत एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

प्रश्न प्रस्तुत झाला

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी स्वत: आयुर्वेदिक डॉक्टर आहे. या ठिकाणी होमिओपॅथिक वैद्यक व्यवसायींच्या अर्हता व नोंदणी यांचे विनियमन करणे, त्याचे नूतनीकरण करणे, त्याबाबत लोकांना माहिती देणे या संदर्भातील अनेक मुद्दयांबाबत तरतूद करण्याकरिता हे विधेयक आणले आहे. आज महाराष्ट्रामध्ये किती होमिओपॅथिकचे कोर्सेस चालू आहेत यांचे संहितीकरण झालेले नाही. ज्याप्रमाणे अनेक संस्था आम्ही लोकांना एमबीएची डिग्री किंवा पदव्या देतो असे सांगतात त्याप्रमाणे होमिओपॅथिकची कॉलेजेस चालविण्याची परवानगी किती संस्थांना मिळाली आहे, त्याचप्रमाणे होमिओपॅथीचे उपचार करुन घेण्यासाठी किती रुग्ण त्या हॉस्पिटलला जोडले गेले आहेत? याबाबत कडक तपासणी करणे किंवा त्यामध्ये काही अडचणी येत असतील तर त्या सोडवून त्यांचा समन्वय करुन देणे यासारख्या गोष्टींची जबाबदारी राज्य सरकारवर आहे.

तिसरी गोष्ट अशी की, कोणत्या डॉक्टरकडे कोणती उपचार पध्दती उपलब्ध आहे याबाबत अनेक रुग्णांना माहिती नसते. आज सर्व पॅथीचे डॉक्टर सर्व औषधांचा रुग्णांवर वापर करीत असल्याचे आपल्याला दिसून येते. त्याचा परिणाम असा झाला आहे की, विक्रम आणि वेताळ या गोष्टींसारखा जाहिरातीच्या क्षेत्रातील वेताळ संपूर्ण आरोग्य व्यवसायाच्या मानगुटीवर बसलेला आपल्याला दिसून येत असल्यामुळे आज सर्व वर्तमानपत्रांमध्ये आपल्याला त्यांच्या जाहिराती दिसतात. उदा. केस गळणे थांबविण्यासाठी होमिओपॅथी गोळया उपलब्ध आहेत, अंगावरील स्पॉट, चामखीळ घालवायची असेल तर होमिओपॅथी गोळया घ्याव्यात. त्या गोळयांमध्ये होमिओपॅथीच्या औषधांचा अंश आहे की, ॲलोपॅथीच्या औषधांचे मिश्रण केले आहे की, आयुर्वेदिक औषधांचे मिश्रण केले आहे हे तपासणारी यंत्रणा अत्यंत दुर्बल आहे. त्यामुळे आपण कितीही संहितीकरण केले तरी लोक अशा डॉक्टरची फी 300 रुपये आहे की 500 रुपये आहे याचा विचार न करता त्याच्याकडे विश्वासाने जात असतात. म्हणून माझी अशी मागणी आहे की, या क्षेत्रातील विविध वैद्यक व्यावसायिक अनेक वर्षापासून आपल्या तक्रारी शासन दरबारी मांडीत आहेत. होमिओपॅथिकचे अनेक विद्यार्थी आंदोलने करुन वयोवृध्द झाले आहेत, थकले आहेत. तशीच परिस्थिती आयुर्वेदिक डॉक्टर्सची आणि निवासी मार्ड डॉक्टर्सची आहे. विशेषत: इंटर्नशीपमध्ये काम करीत असतांना त्यांना येणाऱ्या अडचणी, प्रॅक्टिस करीत असतांना त्यांना येणाऱ्या अडचणी या संदर्भात त्यांच्या असलेल्या त्रिस्तरीय मागण्या विचारात घेऊन आपण त्यांना कोणत्या सूचना देतो हा प्रश्न आहे?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ...

सभापती महोदय, शेवटचा मुद्दा असा आहे की, ज्याप्रमाणे शासकीय रुग्णाल्यामध्ये ॲलोपॅथिक सेवा रुग्णांना दिली जाते त्याप्रमाणे आयुर्वेदिक आणि होमिओपॅथिकची सेवा रुग्णांना पाहिजे असल्यास ती उपलब्ध करुन दिली पाहिजे. परंतु त्याबाबत शासन व्यवस्थेमध्ये संपूर्णपणे अंध:कार दिसून येत आहे. याबाबत माझी अशी सूचना आहे की, अशाप्रकारे वैद्यक व्यवसायाचे संहितीकरण करीत असतांना ज्या प्रमाणे ॲलॉपॅथी औषधांच्या संदर्भात वेबसाईट आहे, त्या प्रमाणे या क्षेत्रामध्ये प्रशिक्षण देणाऱ्या विना अनुदानित किंवा अनुदानित संस्थांची आयुर्वेदिक महाविद्यालये किंवा होमिओपॅथिक महाविद्यालये यांचेमार्फत कुठे प्रशिक्षण मिळू शकते यासंबंधी एकत्रितपणे इंटरनेटवर माहिती उपलब्ध झाली पाहिजे. त्याचप्रमाणे स्थानिक पातळीवर सोप्या मराठी भाषेमध्ये लोकांना सहज माहिती उपलब्ध झाली पाहिजे. जेणेकरुन त्यामधून जर काही प्रतिकूल गोष्टी होत असतील तर त्या रोखण्यासाठी आपल्याला पावले उचलावी लागतील. सभापती महोदय, मला या संदर्भात कुणाच्याही भावना दुखवावयाच्या नाहीत. ज्यावेळी आपण कडक अंमलबजावणी करतो त्यावेळी दिव्याखाली अंधार असलेल्या घटना घडत असतात. सन्माननीय मंत्री महोदयांचा एक पी.ए. नुकताच एका घटनेमध्ये सापडला असून त्याविरुध्द कोर्टात केस सुरु आहे. तेव्हा कायद्याची अंमलबजावणी करीत असतांना आपला स्टाफ व्यवस्थितपणे कायद्याची अंमलबजावणी करीत आहे की नाही हे आपण पाहिले पाहिजे. नाही तर शेवटी लंका दहन होण्याची वेळ येईल याची जाणीव कायदे तयार करीत असतांना आपण ठेवली पाहिजे. एवढे सांगून मी माझे भाषण संपविते. धन्यवाद.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एस.क्यू. जमा (महाराष्ट्र विधानसभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, मुंबई होमिओपॅथिक वैद्यक व्यवसायी (सुधारणा) विधेयक का मैं स्वागत करता हूँ. यह विधेयक बहुत क्रान्तिकारी है. मेडीकल एज्यूकेशन के मंत्री महोदय यहां पर बैठे हुए हैं. मैं उनके सामने भेदभाव का एक विषय पेश करना चाहता हूँ. जिस तरह से आयुर्वेद की डिग्री होती है, उसी तरह से यूनानी की भी डिग्री होती है और इन दोनों का कोर्स, सिलेबस, पढ़ाई सब एक है.

. . . भाषण जारी, नंतर देवदत्त

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ DD/ ( श्री शर्मा के बाद ) 18:00

श्री जमा.....

अब सार्वजनिक स्वास्थ्य विभाग ने 2800 वेकेंसीज नोटिफाइड की हैं. उसके अुनसार आयुर्वेद डाक्टर्स को लिया जा रहा है और यूनानी डाक्टर्स को नहीं लिया जा रहा है. इस संबंध में बहुत सारे निवेदन आये हैं तथा लोगों ने बहुत से प्रश्न उपस्थित किए हैं. हमारा कहना है कि यूनानी डाक्टर्स पर अन्याय नहीं होना चाहिए. इस संबंध में जब हमने संबंधित विभाग से पूछताछ की तो पता लगा कि इस संबंध में सभी कार्यवाही हो गयी है. सिर्फ मंत्री महोदय द्वारा निर्णय लेना ही बाकी है. मेरा कहना है कि इस बारे में जल्द से जल्द निर्णय लिया जाये, क्योंकि आयुर्वेदिक मेडिकल आफिसर्स की भर्ती तो हो रही है लेकिन यूनानी मेडिकल आफिसर्स की भर्ती नहीं हो रही है. जबकि दोनों की डिग्रियों का स्तर एक समान है. इसी ओर मैं माननीय मंत्री महोदय का घ्यान आकर्षित करना चाहता हूं. इस बिल का समर्थन करते हुए मैं अपनी बात यहीं पर समाप्त करता हूं. धन्यवाद.

-0-

. . . .4 के-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मला यासंदर्भात एवढेच सांगावयाचे आहे की, जे होमिओपॅथिक डॉक्टर तयार होतात, त्यांना तसे पाहिले तर नोकरीची संधी कुठेही उपलब्ध होत नाही. परंतु अनेक पी.एच.सी. मध्ये डॉक्टर उपलब्ध नाहीत आणि एम.बी.बी.एस.तसेच एम.डी.झालेले डॉक्टर ग्रामीण भागामध्ये येण्यास तयार होत नाहीत. मात्र त्यासंबंधात आपण केवळ चर्चा करीत असतो. अशा वेळी ग्रामीण भागामध्ये जी प्राथमिक आरोग्य केंद्र आहेत. तेथे जर होमिओपॅथीचा डॉक्टर असेल तर तेथील लोकांना प्राथमिक स्वरुपामध्ये उपचार मिळाले तरी ते सोयीचे होईल. त्यामुळे ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये होमिओपॅथी डॉक्टरांची नेमणूक करण्यास शासनाने परवानगी द्यावी. मला असे वाटते की, शासनाने तशी परवानगी दिलेली आहे. परंतु ती संख्या कशी वाढेल या दृष्टीने प्रयत्न केले पाहिजेत. जर प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये एम.बी.बी.एस.झालेला डॉक्टर असेल तर त्याच्या बरोबरीने एका होमिओपथिक डॉक्टरची नेमणूक केली पाहिजे जेणेकरुन तेथे ते कायम स्वरुपामध्ये रहातील. इकडे-तिकडे कुठे जाणार नाहीत, बदलीची मागणी करणार नाहीत या दृष्टीने शासनाने याबाबत विचार करावा अशी मी सदरहू विधेयकावरील चर्चेच्या निमित्ताने विनंती करीत आहे.

----

. . . .4 के-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



APR/ DD/ 18:00

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, होमिओपॅथिक डॉक्टरांच्या वैद्यकीय व्यवसायाच्या संदर्भातील जे नोंदणी प्रमाणपत्र आहे, त्यासंबंधात या विधेयकाच्या माध्यमातून सुधारणा करण्यात येत आहे. परंतु यामध्ये पाच वर्षाची मूुदत घालण्यात आलेली आहे. मात्र मला असे वाटते की, एकदा डॉक्टरची परीक्षा पास करुन डिग्री घेतल्यानंतर त्यांना व्यवसाय करण्यासाठी जी मुदत घातलेली आहे, ती घालण्यामागील प्रयोजन काय आहे ? ते याठिकाणी स्पष्ट होत नाही. माननीय मंत्री महोदयांनी ही बाब स्पष्ट करावी अशी माझी विनंती आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील साहेबांनी सांगितल्याप्रमाणे आपण एकीकडे मोठ्या प्रमाणात मेडिकल कॉलेज सुरु करीत आहोत. त्याठिकाणी हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, पदवी घेत आहेत आणि एक निष्णात डॉक्टर म्हणून समाजातील लोकांची सेवा करीत आहेत. परंतु ज्या पध्दतीने याला राजाश्रय मिळाला पाहिजे, तो मिळत नाही. जोपर्यंत याला राजाश्रय मिळत नाही, तोपर्यंत ही महाविद्यालये चालणार नाहीत. त्यामुळे तेथे ज्या विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतलेले आहे, त्यांनाही याचा फायदा होणार नाही. एकीकडे सातत्याने सदनामध्ये चर्चा केली जाते की, ग्रामीण भागामध्ये डॉक्टर्स् नाहीत. प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये डॉक्टर्स् नाहीत. जर आपल्याला ही चर्चा थांबवावयाची असेल आणि याबाबतीत काही उपाययोजना करावयाची असेल तर त्याबाबत विचार करावयास पाहिजे. माननीय मंत्री महोदयांकडून राज्यातील जनतेच्या खूप अपेक्षा आहेत. आपण अत्यंत चांगल्या पध्दतीने काम करीत असून आपण प्रत्येक मेडिकल कॉलेजमध्ये जाऊन "जनसंवाद" कार्यक्रम आयोजित केले आहेत त्याबद्दलही माननीय मंत्री महोदयांचे अभिनंदन केले पाहिजे. म्हणून ज्याठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्रे आहेत, त्याठिकाणी होमिओपॅथिक डॉक्टरांसाठी एखादे पद निर्माण करणार आहात काय ? तसेच या विधेयकामध्ये होमिओपॅथी डॉक्टरांच्या बाबतीत पाच वर्षाची मुदत घालण्यात आलेली आहे, ती कायम स्वरुपी करण्याबाबत आपला काही विचार आहे काय ? असे दोन प्रश्न मी यानिमित्ताने उपस्थित करीत आहे.

---

. . . .4 के-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, होमिओपॅथी ही एकदम वेगळी थेरेपी असून, ती आपल्याकडे जर्मनीमधून आलेली आहे. आयुर्वेद, युनानी ही थेरेपी आपल्या येथेच निर्माण झालेली आहे.ज्याप्रमाणे त्याच्यावर मोठ्या प्रमाणात रिसर्च होतो, त्याप्रमाणे होमिओपॅथीच्या संदर्भात याठिकाणी फारसा रिसर्च होत नाही. परंतु त्यातील काही औषधे फार चांगली असतात हे मी मान्यच करीन. परंतु मी सदनासमोर एक गोष्ट मुद्दाम मांडत आहे की, होमिओपॅथीचा डॉक्टर नेमके कोणते औषध देत आहे ते सांगत नाही, ते त्याचे सीक्रेट असते. पण रोग्याला कोणते औषध दिले जात आहे हे त्याला समजले पाहिजे आणि तो त्याचा अधिकार आहे. तुम्ही त्याला अर्निका देत आहात की रुटा देत आहात आणि त्याचे परिणाम काय होणार आहेत हे रोग्याला कळले पाहिजे. ॲलोपॅथी किंवा युनानी किंवा आयुर्वेद औषध दिले जाते, परंतु त्याचे काय परिणाम होणार आहेत हे स्पष्टपणे लिहिलेले असते. परंतु होमिओपॅथी डॉक्टर हे तुम्ही त्या-त्या वेळेला आजाराबाबत सांगितल्यानंतर पुस्तक बघतात आणि औषध देतात. त्यामुळे यासंबंधात थोडे सजग रहाणे अतिशय आवश्यक आहे. याचे कारण असे की, मी यासंबंधात काही खास . . . .

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : या औषधांचे झिरो साईड इफेक्ट आहेत.

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, तसे नाही. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे म्हणणे आहे की, या औषधांचे झिरो साईड इफेक्ट आहेत. पण ते खरे नाही.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई....

उदाहरणार्थ सर्दीवर औषध देतात ते औषध आपण पुन: पुन: घेतले तर आपल्याला नंतर वास येतच नाही. गॅस असला तरी वास येत नाही, अशी अवस्था होते. बऱ्याच वेळेला होमिओपॅथिक डॉक्टर बुस्टर डोस देतात. या बाबत वर्तमानपत्रात छापून आलेले आहे. हा बुस्टर डोस देताना काही डॉक्टर स्टिरॉईड वापरतात, ते अतिशय वाईट असते. अशा प्रकारे स्टिरॉईड देताना चांगले नावाजलेले डॉक्टर पुण्यामध्ये पकडले गेले आहेत. या संबंधात नेमकी काय उपाययोजना करावयास पाहिजे, याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, या ठिकाणी काही सन्माननीय सदस्यांनी विनंती केल्या प्रमाणे युनानी हे अतिशय प्रगत असे शास्त्र आहे. या शास्त्रामध्ये रिसर्च सुध्दा होते. युनानीची औषधे अतिशय चांगली असतात. किंबहुना आयुर्वेदिक औषधापेक्षाही चांगली औषधे असतात. पण या युनानी डॉक्टर्सना शासकीय नोकरी न देता त्यांना गावकुसाबाहेर ठेवलेले आहे. तेव्हा त्यांच्या बाबतीत थोडी सहानुभूती दाखविण्यात यावी आणि त्यांचा विचार करण्यात यावा, अशी माझी विनंती आहे.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावित (वैद्यकीय शिक्षण मंत्री : सभापती महोदय, या विधेयकावर सन्मानीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे,सर्वश्री एस.क्यु. जम़ा, जयंत पाटील, विक्रम काळे आणि हुसेन दलवाई यांनी या ठिकाणी आपली मते मांडलेली आहेत, त्याबद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो. डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितले की, होमिओपॅथिकची कॉलेजेस सुरु आहेत. सभापती महोदय, होमिओपॅथिक कॉलेजमधील बेड्सची स्ट्रेंथ 1627 आहे. जवळ जवळ 3335 विद्यार्थी दर वर्षी होमिओपॅथिक कॉलेजमध्ये ॲडमिशन घेतात. होमिओपॅथिकचे 45 कॉलेजेस आहेत. 12 कॉलेजेसमध्ये पोस्ट ग्रॅज्युएशनचे कोर्स सुरु आहेत. मला या ठिकाणी एक गोष्ट सभागृहाच्या माहितीसाठी सांगितली पाहिजे की, कायद्याने ज्या पॅथीची डिग्री घेतलेली असते त्याच पॅथीची प्रॅक्टीस करता येते. दुसऱ्या पॅथीची प्रॅक्टीस करता येत नाही. त्यामुळे जे डॉक्टर्स होमिओपॅथिकची औषधे देतात त्यांना ॲलोपॅथिक आणि युनानीची औषधे देता येत नाहीत. या संदर्भात कोणी तक्रार केली किंवा तक्रार नसताना सुध्दा अधून-मधून ड्रग्सच्या तपासण्या होत असतात. त्यामुळे त्या औषधांमध्ये कोणते कन्टेन्स आहेत हे माहीत होते.

सन्माननीय सदस्य सर्वश्री एस.क्यु.जम़ा, हुसेन दलवाई, डॉ. नीलम गोऱ्हे यांनी युनानी, होमिओपॅथिक, आयुर्वेदिक आणि इन जनरल एक प्रश्न उपस्थित केला. सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी सांगितले की, होमिओपॅथिकच्या डॉक्टर्सना राजाश्रय मिळाला पाहिजे. परंतु जोपर्यंत लोकाश्रय मिळत नाही, तोपर्यंत त्या गोष्टीला राजाश्रय मिळत नाही, हे तत्वच आहे. एनआरएचएमच्या माध्यमातून होमिओपॅथिकच्या डॉक्टर्सना काही ठिकाणी नियुक्त्या दिलेल्या आहेत. काही ठिकाणी युनानी डॉक्टर्सना देखील नियुक्त्या दिलेल्या आहेत. या बाबतीत जर असे आढळून आले की, लोक मोठया प्रमाणात होमिओपॅथिकची औषधे वापरत आहेत, युनानीची औषधे वापरत आहेत तर मी सांगितल्याप्रमाणे लोकांची मागणी मोठया प्रमाणात असल्यामुळे या दिशेने निश्चितपणे प्रयत्न करता येतील आणि पुढच्या काळात तशी रुग्णालये उघडता येतील. डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितल्याप्रमाणे इंटरनेटवर सर्व माहिती उपलब्ध करुन दिली जाईल, हे सुध्दा या निमित्ताने सांगतो.

श्री. दिवाकर रावते (बसून) : ग्रामीण भागात या डॉक्टर्सचा उपयोग करण्यात यावा.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, शासनाने तशी सुरुवात केलेली आहे. एनआरएचएमच्या माध्यमातून ज्या ठिकाणी होमिओपॅथिक डॉक्टरांची मागणी आहे किंवा मागणी नसली तरी बऱ्याचशा ठिकाणी ग्रामीण रुग्णालये आणि सिव्हिल हॉस्पिटलमध्ये होमिओपॅथिक डॉक्टर्सच्या नेमणुका केलेल्या आहेत. तशी मागणी आल्यानंतर एनआरएचएमच्या माध्यमातून निश्चितपणे त्या ठिकाणी देखील होमिओपॅथिक डॉक्टरांची नेमणूक केली जाईल, एवढी ग्वाही मी या ठिकाणी देतो.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावित.....

काही लोक रजिस्ट्रेशन करत नाहीत. मधल्या काळात प्रॅक्टीस करीत नाहीत. मग पुन्हा प्रॅक्टीस सुरु करतात. त्यामुळे बरेच प्रश्न निर्माण होतात. काही लोक दुसऱ्यांची डिग्री लावून प्रॅक्टीस करतात. म्हणून त्यांचेही अधूनमधून चेकींग होणे, रजिस्ट्रेशन असणे, आयडेंटीकार्ड देणे अत्यंत गरजेचे आहे. त्या दृष्टीने हे विधेयक आणले आहे. सर्व सन्माननीय सदस्यांनी कमी वेळेत योग्य मार्गदर्शन केले त्याबद्दल सर्व सन्माननीय सदस्यांना मी मनापासून धन्यवाद देतो. सभागृहाने हे बिल मंजूर करावे अशी मी विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** ( श्री. मोहन जोशी ) : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 5 (दोन्ही सम्मिलित), विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.स.वि. क्रमांक 13 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2011 चे वि. स. वि. क्रमांक 13 संमत झाले आहे.

----

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : झोपडपट्टी (सुधारणा,निर्मूलन व पुनर्विकास)(सुधारणा) विधेयक

**L.A. BILL NO. XVI OF 2011**

**( A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA SLUM AREAS (IMPROVEMENT, CLEARANCE AND REDEVELOPMENT) ACT, 1971.)**

श्री. सचिन अहिर ( गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि. स. वि. क्रमांक 16- महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, 1971 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. सचिन अहिर : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि. स. वि. क्रमांक 16- महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, 1971 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, एसआरएच्या अंतर्गत येणाऱ्या मुंबई शहरातील अनेक झोपडपट्ट्यांच्या माध्यमातून पुढच्या काळामध्ये कामाला आणखी गती देण्यासाठी किंबहुना काही गोष्टींच्या बाबतीत अंकुश ठेवण्यासाठी हे विधेयक विधिमंडळामध्ये आणलेले आहे. विधानसभेने हे बिल मंजूर केल्यानंतर आता या सभागृहामध्ये मांडलेले आहे. स्पेसिफिक चार-पाच मुद्यांच्या संदर्भात हे विधेयक आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. आपणा सर्वांना माहीत आहे की, झोपडपट्टीचे निर्मूलन करण्याच्या दृष्टीकोनातून याच्या अगोदर एसआरडी नावाची योजना होती. त्या योजनेचे एसआरएमध्ये परिवर्तन करण्याचे काम आपण केले. परंतु झोपडपट्ट्यांची वाढणारी संख्या कोठेही कमी होत असताना दिसत नाही. ज्यावेळी हा कायदा आणला त्यावेळी मुंबई शहरामध्ये 40 लाख झोपड्या होत्या. त्यांची संख्या आता अंदाजे 60 लाखापर्यंत गेलेली आहे. म्हणून या कामाला

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. सचिन अहिर ....

कोठे तरी गती आणण्याच्या दृष्टीकोनातून आपल्याला काही पावले उचलावी लागतील या भूमिकेतून हे विधेयक आणण्याचा प्रयत्न केलेला आहे.

आपण एसआरएच्या अनेक योजनेमध्ये ज्यावेळी कामे केली त्यावेळी काही विकासकांनी निश्चितपणे चांगले काम केल्याचे आपल्याला दिसून आहे पण काही लोकांनी अनेक वेळा या योजना हाती घेण्याचे काम केले, 70 टक्के पेक्षा अधिक लोकांना एकत्रित केले परंतु अनेक योजनांना वर्षानुवर्षे गती मिळालेली नाही. त्याला काही वेगळी कारणे सुध्दा असू शकतात. मग त्यामध्ये न्यायालयीन बाबी असतील किंवा संघटनेतील इतर वाद असतील. परंतु हे करीत असताना अनेक ठिकाणी विकासाचे काम थांबलेले आहे. अनेक विकासकांनी याचा गैरफायदा घेऊन ट्रेडिंग करण्याची सुध्दा भूमिका घेतली. एवढेच नव्हे तर आपल्याला अनेक वेळा असेही पहावयास मिळाले की, बांधकामाचा एकंदरीत जो दर्जा असावयास पाहिजे होता तसा दर्जा आज आपल्याला काही प्रकरणांमध्ये दिसत नाही.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर....

या विकासकावर कारवाई करण्यासाठी शासनावर बंधने होती. 70 टक्क्यापेक्षा जास्त लोकांची संख्या असताना सोसायटीच्या सभासदांनी किंवा सोसायटीचे चीफ प्रमोटर असतील यांनी निर्णय घेतल्यामुळे शासनावर मोठ्या प्रमाणावर बंधने येत होती. म्हणून या विधेयकाच्या माध्यमातून शासनाने अशी भूमिका घेतली आहे की, या पुढील काळामध्ये जे कोणी विकासक असतील त्यांना एसआरएकडे रजिस्ट्रेशन करावे लागेल. रजिस्ट्रेशनसाठी कोणते निकष असावेत, त्यांचा ताळेबंद आहे की नाही, 70 टक्के लोकांना सहमती दिली असेल तर अशा वेळी काय करावे याचे स्वरुप निश्चित करु शकतो. या विधेयकाच्या माध्यमातून विकासकांची नोंदणी करीत असताना शासनाने अशी भूमिका घेतली आहे की, जे विकासक पुढे येत नाहीत किंवा शासनाला प्रतिसाद देत नाहीत, योजना करतात परंतु त्या 5-5 वर्षे, 10-10 वर्षे रखडवून ठेवतात आणि अनेक वेळा याच योजना ट्रेडिंगच्या नावाखाली दुसऱ्याला विकत असतात अशा लोकांवर नियंत्रण आणता येईल काय हा सुध्दा दृष्टीकोन आहे. त्यांचे काम काही कारणास्तव अडले असेल तर त्यांना सहकार्य करण्याची शासनाची निश्चित भूमिका असेल. परंतु कोणतेही कारण नसताना काम थांबत असेल तर नोंदणीकृत विकासकाची नोंदणी रद्द करण्याचा अधिकार शासनाला प्राप्त होणार आहे. एवढेच नाही तर एखाद्या विकासकाने शासनाला प्रतिसाद दिला नाही तर त्याला काळ्या यादीमध्ये टाकण्याची कारवाई सुध्दा शासनाला करता येईल.

सभापती महोदय, काही महिन्यांपूर्वी डीम कन्व्हेयन्सचा कायदा पास केलेला आहे. त्याची संकल्पना अशी होती की, संपूर्ण जमीन पुनर्रचित झाल्यानंतर जमिनीचे मालक हे मालकच राहतात. त्यामुळे त्या जमिनीवर असलेल्या सोसायटीच्या सभासदांचा किंवा भाडेकरुंचा मालकी हक्क रहात नाही. ही मालकी त्या लोकांना मिळावी यासाठी शासन प्रयत्न करीत आहे. ज्या काही जमिनी आहेत मग म्हाडाची जमीन असेल, सार्वजनिक बांधकाम विभागाची असेल, महानगरपालिकेची असेल किंवा कोणाचीही असेल या योजना एकत्रित करण्यासाठी किंवा कार्यान्वित करण्यासाठी या संस्थांची एनओसी तर लागणारच आहे. पण एकदा पुनर्वसनाची इमारत झाल्यानंतर त्या संपूर्ण प्लॉटला स्लम डिक्लरेशनमधून डिनोटिफाय केलेले नाही. मला वाटते की, मुंबई शहरात रिहॅबच्या इमारती झ ााल्यानंतर एकाही इमारतीच्या प्लॉटला स्लम डिक्लरेशनमधून

2...

NTK/

श्री.सचिन अहिर....

डिनोटिफाय करण्यात आलेले नाही. मुंबईत जेवढ्या योजना झालेल्या आहेत, त्यावर जेवढ्या इमारती झाल्या आहेत त्यांच्या खालची जमीन आजही स्लम आहे. ते स्लम डिनोटिफाय केलेले नाही. या विधेयकाच्या माध्यमातून या इमारती डिनोटिफाय करण्याचे काम पुढील काळामध्ये करणार आहोत. त्याच्या एक पाऊल पुढे जाऊन एसआरएच्या संबंधित विभागाशी विचारविनिमय करुन संपूर्ण जमीन हस्तांतरित करण्याचे अधिकार शासनाकडे घेतल्यानंतर पुढील काळामध्ये सरकारच्या जमिनीवर रिहॅबच्या ज्यांच्या सोसायट्या होतील त्या सोसायट्यांना त्यांच्या संपूर्ण जमिनीचे लीज 30 वर्षासाठी देण्याचे प्रयत्न करीत आहोत. खाजगी जमिनीमध्ये सुध्दा मोठ्या प्रमाणात स्लम डिक्लरेशन केले जाते. जागा संपादित केली जाते. एकदा जागा शासनाच्या ताब्यात आल्यानंतर ती जागा शासनाच्याच ताब्यात असते. ती जागा सोसायटीला देत नाही. मग भविष्यात त्या सोसायटीला लोन घ्यावयाचे असेल, किंबहुना, त्या सोसायटीला एकत्रितपणे काही गोष्टी करावयाच्या असतील तर त्यासाठी त्यांना अधिकार प्राप्त होत नाही. ते अधिकार त्यांना मिळवून देण्याचा प्रयत्न या विधेयकाद्वारे करीत आहोत.

सभापती महोदय, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी जे पात्र झोपडीधारक आहेत त्यांना सदनिका देण्याची भूमिका शासनाने घेतलेली आहे. झोपडपट्टीतील लोकांसाठी शासनाने योजना आणली आहे. त्याचा फायदा लोकांना व्हावा, विकासकांना फायदा व्हावा जेणे करुन त्याचा मोबदला दिल्यानंतर लोकांना चांगली घरे देता येतील. पण अनेक वेळा असे दिसून येते की, लोकांना सवलतीच्या दरात घरे दिल्यानंतर किंवा मोफत दिल्यानंतर सदनिका धारकांनी ते गाळे विकलेले आहेत. काही ठिकाणी असेही दिसून आले आहे की, गाळे विकल्यानंतर दुसरीकडे झोपड्या बांधण्याचा प्रयत्न केला जातो. अशा प्रकारे पुन्हा झोपड्या बांधून योजनेचा फायदा घेतला जातो अशी वस्तुस्थिती आहे. मी हा उल्लेख करीत असताना मला याही गोष्टीचा उल्लेख करावा लागेल की, मार्केट फोर्सेसच्या विरुध्द शासन जाऊ शकत नाही. खरेदी व विक्री व्यवहाराच्या नियमात शासनाने बदल केला तरी व्यवहार होत असतात. परंतु शासन म्हणून कोठे तरी सतर्क राहिले पाहिजे. डीसीआरमध्ये शासनाला अधिकार आहेतच, परंतु या विधेयकाद्वारे काही उपाययोजना त्यासंदर्भात आखत आहोत.

यानंतर श्री.शिगम....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 18:20

श्री. सचिन अहिर.....

परंतु शासन म्हणून या बाबतीत कुठे तरी सतर्क राहिले पाहिजे. म्हणून एकदा गाळा मिळाल्यानंतर त्याला तो 10 वर्षे विकता येणार नाही किंबहुना त्याला तो भाड्याने देखील देता येणार नाही अशा प्रकारची तरतूद केलेली आहे. काही बैठ्या चाळी असतात, उपकर प्राप्त इमारती असतात. अशा बैठ्या चाळी आणि इमारतीना एसआरएमध्ये घेऊन त्यांना झोपडपट्टी म्हणून दाखवून एफएसआयचा फायदा घेतला जात असल्याची काही प्रकरणे समोर आलेली आहेत. म्हणून हे स्पष्ट केलेले आहे की, उपकरप्राप्त इमारत असतील, ग्राऊंड + वन अशा बैठ्या इमारती असतील तर त्याबाबतीत "इमारती" हा शब्द काढून झोपडपट्टी, राहाण्यासाठी योग्य नाही, असे स्पष्ट करुन योजनेला गती देण्याचा प्रयत्न करु.

एखादा झोपडपट्टीधारक पात्र किंवा अपात्र झाला, त्याला 33, 39ची नोटीस दिली गेली तर त्याने अपील कुठे करायचे असा प्रश्न त्याच्या समोर असतो. त्याला दाद मागण्यासाठी विभागीय आयुक्ताकडे, म्हणजे कोकण भवनला जावे लागते. मुंबई शहरापासून हे कोकण विभागीय आयुक्तांचे कार्यालय लांब आहे. या विभागीय आयुक्तांकडे त्याने एकदा अर्ज केला की, त्याचा "स्थगिती दिली" असा अर्थ होतो. अशा प्रकरणे सात-आठ महिने प्रलंबित असतात. या पुढच्या काळामध्ये आपण "जिल्हाधिकारी" हा शब्द काढून हे सर्व अधिकार सक्षम प्राधिकार असलेल्या व्यक्तीला म्हणजे अतिरिक्त जिल्हाधिकारी दर्जाच्या अधिका-याला देण्याचा प्रयत्न आपण करीत आहोत. आपण हाही प्रयत्न करीत आहोत की, एखाद्या झोपडपट्टीधारकास महानगरपालिकेने अपात्र ठरविले असेल, त्याच्याकडे 1995च्या आधीचे कायदेशीर पुरावे असूनही त्याला न्याय मिळत नसेल तर त्याला एसआरएकडे दाद मागण्यासाठी जावे लागते. तेथे त्याची दाद ऐकली जात नाही. एसआरएकडे असलेली एकूणच कामाची व्याप्ती पाहता त्याला न्याय मिळत नाही. म्हणून या पुढच्या काळामध्ये सक्षम प्राधिकारी किंवा अपील अधिकारी नेमून, अपिलाची सुनावणी घेऊन त्याला न्याय देण्याचा प्रयत्न होणार आहे.

सभापती महोदय, पुनर्विकासासाठी अनेक वेळा 70 टक्के लोक पुढे येतात तर 30 टक्के लोक असहकार्य करतात. पुढे पुढे ही 30 टक्के लोकांची संख्या 5-10 टक्क्यावर येते. हे 5-10 टक्के लोक या योजनेमध्ये सहकार्य करण्याची भूमिका घेत नाहीत. अशा घर मिळण्यास पात्र असलेल्या लोकांना मिळणारा गाळा या पुढच्या काळामध्ये आयडेण्टिफाय केला जाणार आहे. गाळा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर ....

आयडेण्टिफाय केल्यानंतर एसआरअेद्वारा लॉटरी काढून त्याला कोणता गाळा मिळालेला आहे हेही लेखी स्वरुपात कळविले जाणार आहे. तसेच त्याला 120 चौ.फूटाचा संक्रमण गाळा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्याने संक्रमण शिबिरामध्ये गेले पाहिजे असे त्याला सूचित केले जाईल. एवढे केल्यानंतर देखील तो सहकार्य करीत नसेल तर नियमानुसार कारवाई करुन त्याला तेथून निष्कासित करण्याची भूमिका घेतली जाईल. इमारतीच्या बांधकामाची परवानगी देत असताना त्याने या योजनेमध्ये समाविष्ट होण्याची भूमिका घेतली नाही तर त्याचे अधिकार एसआरअेकडे शाबूत ठेवून जेव्हा तो या योजनेमध्ये सहभागी होऊ इच्छित असेल त्यावेळी त्याला घर देण्याचे काम या पुढच्या काळात केले जाईल, अशा प्रकारची तरतूद या विधेयकाच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

सभापती महोदय, हे विधेयक आणण्याची आवश्यकता का पडली असाही प्रश्न विचारला जाऊ शकतो...(अडथळा)... खाजगी जमिनीचा प्रश्न येत नाही. खाजगी जमीन मालकाला स्वत:हून एसआरअे योजना करायची असेल तर त्याबाबतीत त्याला मुभा आहे. त्याला आपणास थांबविता येणार नाही. पण जर खाजगी जमीन मालकाला एसआरअे योजना करायची नसेल तर तेथील लोकांनी सोसायटी केल्यानंतर तसेच ती प्रॉपर्टी स्लम म्हणून डिक्लेअर केल्यानंतर ती जागा जेव्हा शासनाच्या ताब्यात येईल त्यावेळी या सर्व गोष्टी करण्यात येतील.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर...

सभापती महोदय, हे का करावे लागले?

तुळशीवाडी गृहनिर्माण सहकारी संस्था विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर यांची एक रिट पिटीशन कोर्टात दाखल झाले. 2009 मध्ये जनहित विरुध्द महाराष्ट्र राज्य व इतर अशी दुसरी पी.आय.एल.फाईल झाली. या दोन्ही याचिकेच्या संदर्भात दोन ऑब्झरवेशन्स् घेण्याचा न्यायालयाने प्रयत्न केला. एक तर निवारा समिती असणे गरजेचे आहे. कोणत्याही प्रकारची दाद मागावयाची असेल तर कोणाकडे जावयाचे आणि म्हणून एक निवारा समिती प्राधिकृत करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. या नागरी समितीमध्ये सचिव हे अध्यक्ष असतील. महानगरपालिका, एमएमएआरडीए त्याचे अधिकारी या समितीमध्ये सभासद म्हणून असतील. या समितीला सिव्हील कोर्टाचे अधिकार देण्यात आलेले आहेत. एखादी सुनावणी घेतल्यानंतर संबंधितांना लागलीच न्याय मिळेल म्हणून त्या समितीला अधिकार दिले आहेत. संबंधिताला न्याय दिल्यानंतरही त्यास वाटले की, सदर समितीने आमचे म्हणणे पूर्णपणे ऐकून घेतले नाही, आम्हाला न्याय मिळाला नाही, तर त्यांना हायकोर्टात अपील करण्याची तरतूद करण्यात आली आहे. आपण पूर्वी एचपीसी केली होती, त्यास निवारण समितीचा दर्जा देण्याचा प्रयत्न आपण केलेला आहे. म्हणून हे विधेयक खऱ्या अर्थाने झोपडपट्टीच्या लोकांसाठी किंबहुना त्यांच्या विकासासाठी अनुकूल असणार आहे. म्हणून हे विधेयक मंजूर करावे अशी मी सभागृहाला विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी )** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 12 (दोन्ही सम्मिलित ) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 16 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 16 संमत झाले आहे.

-----

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अल्पकालीन चर्चेसंबंधी**

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेब यांना सांगू इच्छितो की, माननीय मुख्यमंत्री महोदय थोडयाच वेळेत सभागृहात येणार आहेत. तोपर्यंत आपण पुढील अल्पकालीन सूचना चर्चेला घेऊ. श्री. हुसेन दलवाई यांनी आपली चर्चा सुरु करावी.

श्री. नागो गाणार : माझी लक्षवेधी सूचना चर्चेला घेतली गेली नाही.

**तालिका सभापती** : लक्षवेधी क्र.10 च्या संदर्भात माननीय शिक्षण मंत्र्यांना निरोप दिलेला आहे. ते सभागृहात आल्यानंतर आपली लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येईल.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: अल्पसंख्याक समाजाच्या विकासाच्या दृष्टीने शासकीय योजनांच्या अंमलबजावणीत होणारी दिरंगाई

**मु.शी.**: अल्पसंख्याक समाजाच्या विकासाच्या दृष्टीने शासकीय योजनांच्या अंमलबजावणीत होणारी दिरंगाई या विषयावर सर्वश्री हुसेन दलवाई, भाई जगताप, हेमंत टकले, एस.क्यू.ज़मा, रमेश शेंडगे, माणिकराव ठाकरे, सुभाष चव्हाण, राजन तेली, मनिष जैन यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

**तालिका सभापती** (श्री.मोहन जोशी) : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी 30 मिनिटांचा वेळ दिलेला आहे. सूचना देणारे माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री.हुसेन दलवाई (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :-

"अल्पसंख्यांक समाजातील मुस्लिम, ख्रिश्चन, पारसी, शीख, जैन, बौद्ध यांच्या विकासाच्या दृष्टीने शासनाच्या विविध योजना असूनही त्याच्या अंमलबजावणीत होत असलेली दिरंगाई, समाजाच्या संख्येच्या प्रमाणात शाळा देण्यात न येणे, अल्पसंख्यांकांच्या वस्तीतून मूलभूत सुविधांचाही असलेला अभाव, मदरसामधून केवळ धार्मिक शिक्षण दिले जात असल्यामुळे अशा मुलांनी आधुनिक शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून मदरशांच्या शाळांपैकी ज्या शाळेमध्ये अरबी शिक्षणासहित सामाजिक शिक्षणाची सोय असेल अशा शाळांमध्ये रुपांतर करणे, अल्पसंख्यांक विभागाअंतर्गत विविध योजनासाठी मंजूर झालेला निधी व्यपगत होणे, भिवंडी दंगलीचे वेळी अन्याय झालेल्या बाधित अल्पसंख्यांकांना आश्वासन देऊनही अद्यापी घरे न मिळणे, वक्फ बोर्डाच्या मिळकतीच्या सर्वेक्षणाची अधिसूचना ऑक्टोबर, २०१० मध्ये निघूनही अंमलबजावणी शून्य असणे, अशाप्रकारे सर्वच स्तरावरुन अल्पसंख्यांकांच्या विकासास बसलेली खीळ, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना"

सभापती महोदय, महाराष्ट्रातील वातावरण इतके वाईट नाही. अनुकूल व्हायला लागले आहे. तरीही मुस्लीम समाजामध्ये काही प्रमाणात असुरक्षितता वाढीस लागली आहे. हे वातावरण निवळण्याच्या दृष्टीने प्रयत्न होणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील शालेय पुस्तके अधिक सेक्युलर



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई......

होतील या बाबीकडे लक्ष दिले पाहिजे. या सभागृहात मी पोलीस अधिकारी श्री.अरुण बोरुडे यांनी एका अल्पवयीन मुलीवर केलेल्या बलात्काराचा प्रश्न उपस्थित केला होता. दुर्दैवाने पोलिसांना बोरुडे यांचा मृत्यू कसा झाला याचा अद्याप थांगपत्ता लागलेला नाही. त्यांनी आत्महत्या केली असे सांगितले जाते. या प्रकरणातील चौथा आरोपी अद्याप पोलिसांना सापडलेला नाही.

सभापती महोदय, इसरत जहाँ ही मुलगी अतिशय प्रामाणिक होती. ती कोणाबरोबर चुकून गेली असेल. परंतु तिला ठार मारण्यात आले. या प्रकरणाची चौकशी झाली पाहिजे. हे प्रकरण आता बाहेर आले आहे. ती मुलगी निरपराध होती हे सिध्द झाले आहे. परतूर येथील घटनेबाबत माजी आमदार सांगतात हे सगळे खोटे आहे. हे जे काही चालले आहे ते बरोबर नाही. या वातावरणामध्ये सुधारणा झाली पाहिजे. स्वामी असिमानंद यांनी जबाब दिल्यानंतर फेरचौकशी करु असे सांगूनही या प्रकरणाची फेरचौकशी झालेली नाही. कोणी काय प्रकार केले हे सर्व बाहेर आले आहे. मालेगाव येथील 9 लोक अद्याप पोलीस कोठडीत खितपत पडले आहेत.

सभापती महोदय, राज्य शासन नव्याने 600 पोलीस कर्मचाऱ्यांची भरती करणार आहे. एखादा पोलीस मुस्लीम समाजाचा असेल तर त्याला साईड पोस्टींग दिली जाते. मग तो उच्च दर्जाचा पोलीस अधिकारी असला तरी त्याच्या बाबतीत शासन हीच भूमिका स्वीकारते. अहमद जावेद हे भारतीय पोलीस सेवेतील प्रामाणिक अधिकारी आहेत. त्यांना नवी मुंबईमध्ये पोस्टींग देण्यात आली आणि ज्यांच्याबद्दल असंख्य तक्रारी आहेत अशा अधिकाऱ्याला ठाण्याच्या पोलीस आयुक्तपदी नेमण्यात आले. यापुढे असे होता कामा नये. श्री.हसन गफूर या भारतीय पोलीस सेवेतील अधिकाऱ्यावर झालेल्या अन्यायाबाबत मी अनेकदा व्यथा मांडली आहे. त्यामुळे आता पुन्हा या ठिकाणी तोच विषय मांडू इच्छित नाही.

सभापती महोदय, शिक्षणाच्या संदर्भात बोलावयाचे झाले तर मुस्लीम समाजामध्ये शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प आहे. त्या मानाने दलित आणि आदिवासी समाजामध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे. मुस्लीम समाजामध्ये दारिद्र्याचे प्रमाण इतर समाजाच्या तुलनेत अधिक आहे. विशेषत: मुस्लीम समाज शहरात मोठया प्रमाणात राहतो. त्यांच्यामध्ये दारिद्र्याचे प्रमाण 37 टक्क्यापेक्षा जास्त आहे. हे सच्चर समितीने सुध्दा सांगितले आहे. त्यांच्यातील दारिद्र्य दूर करण्यासाठी अधिक प्रयत्न केले पाहिजेत. मुस्लीम समाजातील तरुणांना तंत्रशिक्षणाची सोय उपलब्ध करुन

..3..



SGB/ 18:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई......

दिली पाहिजे. आज झोपडपट्टीमध्ये राहणारे तरुण त्यांच्या हातातील कौशल्याचा चांगल्याप्रकारे उपयोग करु शकतील. ए.सी.दुरुस्त करावयाचा असेल अब्दुल्ला येतो, वॉशिंग मशिन दुरुस्ती करावयाची असेल तर करीमुल्ला येतो. टी.व्ही.आणि कॉम्प्युटर दुरुस्त करायला देखील हमीद येतो. त्यांच्या हातामध्ये कौशल्य आहे, कुशलता आहे.

नंतर 5सी.1...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई ......

मेहनत करण्याची तयारी आहे पण भांडवल आणि शिक्षण नसल्याने ते पुढे जाऊ शकत नाहीत. एक 9 वर्षाचा मुलगा मोटर मेकॅनिक म्हणून कामाला लागतो, मोटारीच्या सर्व पार्ट्सची त्याला माहिती असते. मालक त्याला सांगतो की, अमुक नंबरचा पान्हा आण, तो बरोबर आणतो. सर्व नट-बोल्ट्सची माहिती त्याला असते पण त्याला तांत्रिक शिक्षण मिळत नाही. म्हणून शासनाने अशा तांत्रिक शिक्षणाच्या शॉर्ट कोर्सेसची सुविधा निर्माण करावी अशी विनंती करतो. त्यासाठी विभाग थोडेफार प्रयत्न करीत आहे पण सच्चर कमिशनने सुचविल्याप्रमाणे प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी तंत्रशिक्षण देण्याची व्यवस्था केली पाहिजे.

शासनाने आदिवासी मुलांसाठी ज्याप्रमाणे आश्रमशाळांची सुविधा निर्माण केली तशी व्यवस्था अल्पसंख्यांक असलेल्या मुस्लीम समाजासाठी निर्माण करण्याची गरज आहे. आमच्या कोकणात तशी फार वाईट परिस्थिती नाही. कारण आम्ही ब्राम्हणांबरोबर स्पर्धा करीत आहोत, ही वस्तुस्थिती आहे. मी मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रात सुध्दा जाऊन आलो, या भागात मुस्लीम समाजाची शिक्षण व इतर बाबतीत वाईट अवस्था आहे, तेवढी कोकणात मात्र नाही. कोकणात या समाजातील मुले मोठ्या प्रमाणावर डॉक्टर्स झालेले आहेत व इतर शिक्षणही त्यांनी घेतले आहे आणि शिकत आहेत. पण मुंबई, पुणे, ठाणे तसेच औरंगाबाद सारख्या शहरातील मुस्लीम बांधवांची परिस्थिती वाईट आहे, ते कोणत्या अवस्थेत राहत आहेत हे पाहिले तर दु:ख वाटते, शिक्षण मिळत नाही म्हणून या मुलांसाठी शासनाने आदिवासींप्रमाणे आश्रमशाळा शक्य नसेल तर किमान निवासी शाळांची सोय तरी करावी, त्याशिवाय त्यांच्यामध्ये बदल होणार नाही. या निमित्ताने मी एक बाब अधिक स्पष्ट करु इच्छितो की, मी आताच सांगितलेल्या गोष्टीचा बाहेर वेगळाच अर्थ लावून नंतर मदरसे वगैरे बंद करण्याची मागणी होईल. पण त्याला माझा ठाम विरोध आहे. ज्यांना मदरसे चालवावयाचे असतील त्यांनी ते चालवावेत. वांद्रे येथे अशाच एका मदरशाच्या ठिकाणी आम्ही चार संगणक घेऊन दिलेले आहेत. यासाठी सरकारी अनुदान घेता येत नाही म्हणून डोनेशनच्या माध्यमातून हे मदरसे उभे केलेले असतात. असा प्रयत्न मी सर्व भागात करणार आहे व त्याला चांगल्या प्रकारे रिस्पॉन्स मिळतो, ही चांगली गोष्ट आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई ........

महोदय, त्याचप्रमाणे माझी सतत एक मागणी आहे व त्याबाबत गैरसमज करुन घेऊ नये. ते म्हणजे पूर्वीच्या काळात इंग्रजांनी उर्दू शिक्षणाची सोय मराठी शाळांमध्ये सुरुच ठेवली होती. त्यात आमचे बंधू देखील शिकले होते म्हणून त्यांना उर्दू भाषा येते. पण आता मात्र आपल्या राज्यात मराठी शाळांमध्ये उर्दू विषय शिकविणे बंद केले आहे. त्याउलट उर्दू शाळांमध्ये मराठी विषय सक्तीचा केला आहे, त्याबद्दल आमचे काहीच म्हणणे नाही. पण मराठी शाळांमध्ये उर्दू आणि उर्दू शाळांमध्ये मराठी असा ऑप्शनल विषय ठेवल्यास ज्या भागात फक्त मराठीच शिकविली जाते तेथील मुलांना उर्दू शिकण्याची व्यवस्था होऊ शकते. मुस्लीम समाजात ओबीसी, भटक्या विमुक्त जाती, एस.सी. व एस.टी. असे वेगवेगळे प्रवर्ग आहेत, त्यांच्या बाबतीत अजूनही निर्णय होत नाही. इस्लाम धर्मात हे सर्व सांगितलेले नाही व यासंदर्भात माननीय श्री. गोपीनाथ मुंडे यांच्याबरोबर आमचा वादविवाद सुध्दा झाला होता, नंतर त्यांनी मान्य केले. खरे तर इस्लाम धर्म हा खालच्या थरातील लोकांचे उदात्तीकरण करण्यासाठी असलेला धर्म आहे. अर्थात सर्व समाजात समानता आहे असे मी मानणार नाही पण व्यवस्थेत मात्र असमानता जरुर आहे. कारण एकाच ठिकाणी जरी सर्व बांधव नमाज पठण करीत असले तरी बाहेर पडल्यावर मात्र निजाम हा निजाम असतो आणि हजाम मात्र फक्त हजामच असतो. यात सुधारणा करावी लागेल. म्हणून मुस्लीम समाजातील लोकांना त्यांच्या जात वर्गानुसार प्रमाणपत्रे देताना जो नवाब आहे त्याला नवाब म्हणूनच सर्टिफिकेट दिले पाहिजे. तसेच इतर प्रवर्गाचा असल्यास त्यानुसार प्रमाणपत्र दिले पाहिजे, ते देत असताना कोणतीही कटकट करता कामा नये.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई...

जोपर्यंत मुस्लीम समाजाला सत्तेमध्ये सहभाग मिळत नाही तोपर्यंत मुस्लीम समाजाचा विकास होणार नाही. मी केवळ मुस्लीम समाजाबद्दलच बोलतो असे नाही तर धनगर, वंजारी, चर्मकार, दलित, मातंग या समाजांना समाजामध्ये ज्या पध्दतीने सामावून घेतले पाहिजे त्या पध्दतीने सामावून घेतले जात नाही ही वस्तुस्थिती आहे. गवळी समाज आता कोठे तरी समाजकारणात दिसावयास लागला आहे. गवळी समाजाला सुध्दा सत्तेमध्ये योग्य त्या प्रमाणात सहभाग मिळाला पाहिजे. महाराष्ट्रात एकही मुस्लीम खासदार निवडून आलेला नाही ही चांगली बाब नाही. गुजरात, कर्नाटक राज्यामध्ये मुस्लीम खासदार नाही याबाबत मी काही बोलणार नाही. महाराष्ट्रामध्ये मुस्लीम समाजासाठी केवळ दोनच मंत्रीपदे कायमची रिझर्व्ह करुन ठेवण्यात आलेली आहेत. कामगार मंत्री हा मुस्लीमच असला पाहिजे असे काही नाही. परंतु कामगार मंत्री हा मुस्लीमच असतो. दुसरे मंत्रीपद अल्पसंख्याक विभागासाठी देण्यात आलेले आहे. अल्पसंख्यांक विभागाला संचालनालय सुध्दा नाही. या मंत्र्याना पोस्टमनगिरी शिवाय दुसरे कोणतेही काम नाही. या शासनाने काही चांगल्या गोष्टी केलेल्या आहेत त्या सुध्दा मी सांगणार आहे. या शासनाने पहिल्यांदाच मुस्लीम समाजाकडे लक्ष दिलेले आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई जे बोलत आहेत त्यावरच माझी हरकत आहे. आतापर्यंत मुस्लीम समाज काँग्रेसला मतदान करुन निवडून देत आलेला आहे. काँग्रेस जर मुस्लीम समाजाला तिकीट देत नसेल व तुम्हाला निवडून आणत नसेल तर पहिल्यांदा आताच्या आता या बाजूला येऊन भाषण करा व थोडा तरी निषेध दाखवा. आपण काही तरी पीळ दाखवावयास पाहिजे. भाषणे करुन, कौतुक करुन काही होणार नाही. तुम्हाला मंत्रीपद दिले गेले नाही ते सांगा. मंत्री पद देतो म्हणून सांगावयाचे व प्रत्यक्षात मंत्री पदे द्यायचे नाही यामध्ये माणसाचा खूप अपमान होत असतो. आमचे सन्माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई यांच्यावर आमचे खूप प्रेम आहे. सन्माननीय सदस्यांना मंत्रीपद द्यावयाचे निश्चित झाले, शपथविधी फायनल झाला, फॅमिलीला सुध्दा शपथविधीच्या कार्यक्रमासाठी बोलावले गेले व 12 वाजता अचानक फोन आला आणि सांगितले गेले,"तुमचे मंत्री पद गेले". सभापती महोदय, त्यावेळेस सन्माननीय सदस्यांना काय वाटले असेल याचा विचार करुन बघा.

...2...

श्री. मोहम्मद आरीफ (नसीम) खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचे वाक्य रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात यावे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, गंभीर विषयाच्या संदर्भातील वस्तुस्थिती सन्माननीय सदस्य मांडत आहेत. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी वस्तुस्थितीचे भान ठेवावे.

श्री. हुसेन दलवाई : सभापती महोदय, विरोधी पक्ष मुस्लीम समाजातील व्यक्तीला निवडून आणत नाहीत. निवडणुकीच्या वेळेस त्यांचे तेवर वेगळेच असते.

सभापती महोदय, ग्रामपंचायती पासून लोकसभेपर्यंत मुस्लीम समाजाला 15 टक्के प्रतिनिधित्व असावे असे माननीय पंतप्रधान सांगतात. त्यामुळे 15 टक्क्याचा कार्यक्रम सर्व स्तरावर कशा प्रकारे इम्प्लीमेंट होईल हे आपण बघावे. या वर्षीचा अर्थसंकल्प मांडला तेव्हा त्यामध्ये आमच्या समाजासाठी बरेच काही मिळेल असे वाटले होते. अल्पसंख्याक विभागाला या बजेटमध्ये 0.9 टक्क्याची तरतूद केलेली आहे. 0.9 टक्क्यामध्ये अल्पसंख्याक विभाग अल्पसंख्याकांसाठी काय करु शकणार आहे ? त्यामुळे अल्पसंख्याक विभागाला भरघोस मदत केली तरच हा विभाग चांगल्या प्रकारे काम करु शकेल. गेल्यावर्षी अल्पसंख्याक विभागासाठी 220.3 कोटी रुपये दिले व 2010-11 साली 217.96 कोटी रुपये दिलेले आहेत.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई .....

2011-2012 च्या अर्थसंकल्पात 243 कोटी रुपये देण्यात आलेले आहेत. प्रत्यक्षात संबंधित विभागाने सुध्दा 275 कोटी रुपयांची मागणी केली होती परंतु ती मागणी करीत असतांनासुध्दा काटकसर करण्यात आली आहे आणि 32 कोटी रुपये कमी देण्यात आले आहेत. ही गोष्ट बरोबर नाही असे माझे म्हणणे आहे.

सभापती महोदय, मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळासाठी जास्तीची आर्थिक तरतूद करण्यात यावी यासाठी 1990 सालापासून मी सतत आग्रह धरत आहे. इतर समाजासाठी ज्याप्रमाणे महामंडळे स्थापन करण्यात आलेली आहेत आणि त्यांना ज्याप्रमाणे निधी देण्यात येतो त्याप्रमाणे मुस्लिम समाजाच्या विकासासाठी एक महामंडळ स्थापन करण्यात यावे आणि त्या महामंडळाला अधिक निधी देण्यात यावा अशी मी सातत्याने मागणी करीत आलो आहे.व्ही.पी.सिंग पंतप्रधान असतांना मी फार आग्रह धरला होता. दुर्देवाने त्यावेळी जे मुस्लिम मंत्री होते त्यांनीच विरोध केला होता. कै. राजीव गांधी यांनी अतिशय चांगली भूमिका घेतली होती आणि महाराष्ट्रात कॉंग्रेसचे सरकार आल्यानंतर मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात आले ही चांगली बाब आहे तसेच महाराष्ट्रामध्ये अल्पसंख्याक आयोगाची देखील स्थापना करण्यात आली ही सुध्दा चांागली बाब आहे.

सभापती महोदय, 2008 साली या महामंडळाला 50 कोटी रुपये देण्यात आले , 2009 साली 70 कोटी रुपये देण्यात आले , 2010 साली 17 कोटी रुपये देण्यात आले होते.2011 साली फक्त 10 कोटी रुपयांचीच तरतूद करण्यात आली आहे.अशा प्रकारे या महामंडळासाठी अत्यंत कमी तरतूद करण्यात आली असल्यामुळे तेथे 56 हजार कर्जाची प्रकरणे प्रलंबित आहेत. मला दररोज 100-125 फोन येत असतात त्यातील मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाकडून कर्ज मंजूर करावे अशा प्रकाराचे दहा ते बारा फोन असतात .संबंधित व्यक्तीची कर्जाची प्रकरणे तयार आहेत परंतु निधीची तरतूद नसल्यामुळे त्यांना कर्ज देता येत नाही. या महामंडळासाठी जास्तीत जास्त तरतूद करण्यात यावी यासाठी माननीय मंत्र्यांनी सातत्याने आग्रह धरावा असे मी त्यांना सांगू इच्छितो.

सभापती महोदय, वक्फ बोर्डासाठी सी.ई.ओ.ची नेमणूक करण्यात आलेली नाही. त्या ठिकाणी ॲडिशनल कलेक्टरच्या लेव्हलच्या सी.ई.ओ.ची नेमणूक करावयास पाहिजे.परंतु सध्या





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई .....

एका उप जिल्हाधिका-याकडे अतिरिक्त कार्यभार दिलेला आहे त्यामुळे ते काम करु शकत नाहीत. त्याचबरोबर महाराष्ट्रातील वक्फच्या ज्या जमिनी आहेत त्याची एकदा पहाणी करण्यात यावी यासाठी मी अनेक वर्षापासून मागणी करीत आहे. माननीय मुख्यमंत्री साहेब आता सभागृहात आलेले आहेत त्यामुळे मला खूप बरे वाटले आहे. माननीय मुख्यमंत्री वक्फच्या जमिनीचा सर्व्हे करतील अशी मला अपेक्षा आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांचा वेळ संपत आला असल्यामुळे त्यांनी आपले भाषण संपवावे.

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, मी माझे भाषण पाच मिनिटात संपवितो. त्याचबरोबर वक्फ बोर्डाच्या कामासाठी प्रत्येकाला औरंगाबादला जावे लागते त्यासाठी वक्फ बोर्डाचे विभागीय कार्यालये सुरु करण्यात आले तर लोकांचा त्रास कमी होईल. राज्यामध्ये जवळजवळ साडे तेवीस हजारापेक्षा जास्त वक्फ आहेत त्याकरता कर्मचारी कमी आहेत. तेव्हा राज्यातील सहा विभागामध्ये कार्यालये सुरु करण्यात यावी व त्यांना पुरेसे कर्मचारी देण्यात यावेत. अशी माझी विनती आहे.

सभापती महोदय, श्री.अंबानी यांना 350 कोटी रुपयांची जमीन देण्यात आली आहे. वास्तविक ही जमीन वक्फ बोर्डाने दिलेली नसून चॅरिटी कमिशनरने दिलेली आहे. जणू काही ही जमीन त्यांचीच आहे असे समजून त्यांनी ही जमीन श्री अंबानी यांना दिली होती. त्या जागेवर श्री अंबानी यांची इमारत उभी राहिली असून मी ज्या ज्या वेळी तेथून जातो त्या त्या वेळी मला खूप वाईट वाटते. ही जमीन यतीम मुलांसाठी म्हणजेच अनाथ मुलांसाठी असून त्यांच्या छाताडावर ही इमारत उभी करण्यात आली आहे. ही गोष्ट भयंकर आहे. अनाथ मुलांची जमीन त्यांना कशी देण्यात आली होती ? ही बाब रेक्टीफाय करण्याचे व अधिकृत मान्यता देण्याचे काम त्यावेळी वक्फ बोर्डाने केले होते.या संबंधीचे प्रकरण सध्या हायकोर्टात सुरु आहे. मी माननीय मुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, काही लोकांना हाताशी धरुन ही जमीन खोजा समाजाची आहे व ते मुसलमान नसल्यामुळे ही जमीन देता येते अशा प्रकारचे आर्ग्युमेन्ट केले जात आहे. ते खोडून काढले पाहिजे व सरकारने ही केस लढवली पाहिजे.

**( सभापती स्थानी माननीय सभापती )**

3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई .....

अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी सरकारने काहीही केले नाही असे मी म्हणणार नाही. सरकार प्रयत्न करीत आहे.परंतु या विभागाला सबळ केले पाहिजे, त्यांना पुरेसा निधी दिला पाहिजे, त्या विभागाच्या वतीने काही चांगली कामे कशी होतील हेही पाहिले पाहिजे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई....

उदा. मुस्लिम समाजातील लोकांना ॲफिडेव्हिट करावे लागते. त्यांना आपण एकदा प्रमाणपत्र दिल्यास पुन्हा ॲफिडेव्हिट करण्याचा प्रश्न निर्माण होणार नाही आणि त्या संदर्भात चौकशी करण्याची गरज निर्माण होणार नाही, असे प्रश्न मी याठिकाणी मांडले आहेत. मुस्लिम समाजामध्ये शिक्षणाच्या संदर्भात प्रचंड अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे. त्या सर्वांना शाळा देण्याचे काम आपण करावे. त्यांच्याकरिता आश्रमशाळेच्या धर्तीवर निवासी शाळा निर्माण कराव्यात. त्यामध्ये अरबी शिकविण्याची व्यवस्था झाली तर अधिक बरे होईल. जेणेकरुन या समाजाला संपूर्ण प्रवाहामध्ये आपल्याला आणता येईल अशी माझी आपणास विनंती आहे. सभापती महोदय, मला बोलण्याकरिता आपण अधिक वेळ दिल्याबद्दल आणि सभागृहातील सर्व माननीय सदस्यांनी शांतपणे माझे भाषण ऐकल्याबद्दल मी आपणा सर्वांचे आभार मानून माझे भाषण संपवितो.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, या प्रस्तावासाठी मी मंत्री महोदयांच्या उत्तरासह 30 मिनिटांचा वेळ निश्चित केला आहे. त्यापैकी 19 मिनिटे झाली आहेत. त्यामुळे आपल्याला आता वेळ वाढविता येणार नाही असे मला वाटते...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, विरोधी पक्षाकडून जर कुणाला बोलावयास मिळाले तर या प्रस्तावाला महत्व येईल. परंतु सत्ताधारी पक्षाकडूनच बोलावयास दिले गेले तर या प्रस्तावाला महत्व राहणार नाही.

सभापती : ठीक आहे, परंतु मर्यादित वेळ असल्यामुळे आपण फक्त 5 मिनिटामध्ये आपले भाषण पूर्ण करावे.

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई यांना मनापासून धन्यवाद देतो. अल्पसंख्याक समाज म्हणजे मुस्लिम समाज असे आम्ही म्हणालो तर ते म्हणतात तसे नाही. हा प्रस्ताव मांडीत असतांना त्यांनी जाणीवपूर्वक अल्पसंख्याकाच्या बाबतीत घटनेमध्ये जे सांगितले आहे ते ऐकल्यानंतर मला बरे वाटले. या देशामध्ये घटनेने दिलेल्या अल्पसंख्याकाच्या व्याख्येसंदर्भात आमचे मित्र माननीय श्री. हुसेनभाई काहीतरी बोलतील असे वाटले होते. परंतु दुर्दैवाने त्यांचे संपूर्ण वक्तव्य सोफियांबद्दलच झाले. तुम्ही इतरांबद्दल एकही शब्द बोलला नाहीत. मी नेहमी अभिमानाने आमच्या कार्यकर्त्यांना सांगतो की, मी आत्महत्याग्रस्त कुटुंबामध्ये फिरत असतांना मला मुस्लिमांमध्ये कुणी आत्महत्या केल्याचे आढळले नाही. त्यावेळी मला पत्रकार विचारत की, साहेब असे कां होते? त्यावेळी मी त्यांना माझ्याबरोबर नेऊन दाखवीत होतो की, मुस्लिम माणूस आपल्या कुटुंबाला पोसण्याकरिता धंदा करतांना कोणतीही लाज बाळगत नाही. पोट भरण्याकरिता असलेला कोणताही धंदा अभिमानाने आणि स्वाभिमानाने करतो आणि आपली रोजी रोटी कमावून संध्याकाळी घरी जातो. आज आपल्याला हातगाडीवर उभे राहण्याकरिता लाज वाटते असा दोन्ही मधील फरक आहे.

सभापती महोदय, मुस्लिम समाज शिकला पाहिजे हे सांगत असतांना शासनाने या समाजाकरिता एक चांगला निर्णय घेतला आहे. तो यासाठी की, या समाजासाठी सहिष्णुता दाखवून त्यांच्या मदरशा शाळांना मान्यता दिली. त्यावेळी तुम्ही या मदरसामध्ये आता आम्ही धार्मिक शिक्षण देणार नाही असे म्हणाला नाहीत. ते शिक्षण देणे तर चालूच आहे. आम्ही त्याबाबत काही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/

श्री. दिवाकर रावते .....

म्हटले तर त्याला दुसरा वास येतो. त्यावर या सदनामध्ये आम्ही कधी चर्चा केली नाही. मुस्लिम समाज शिकला पाहिजे. मदरसांना मान्यता मिळाल्यानंतर त्यांना अनुदान मिळेल. त्यांच्या तपासणीकरिता जी अडचण निर्माण होते त्याच्या खोलात मी जाणार नाही. सभापती महोदय, या सभागृहात वारंवार सांगितले गेले आहे. आदरणीय मंत्री महोदय प्रा. फौजिया खान यांनी देखील या बाबत तीन वेळा उत्तर दिले आहे.

माननीय श्री. शरद पवार साहेबांनी पहिल्या निवडणुकीच्या वेळी जाहीर केल्यानंतर तुम्ही मौलाना आजाद महामंडळ स्थापन केले. आज या महामंडळाकडे 35 हजार तरुणांचे अर्ज पडून असतांना कायम स्वरुपी अर्थ खाते राष्ट्रवादी कॉंग्रेसकडे असल्यामुळे या मंडळाला निधी दिला जात नाही . त्यामुळे मुस्लिम समाजातील तरुणांना अर्थसहाय्य मिळत नसल्यामुळे ते व्यवसायापासून वंचित झाले आहेत. याबाबत राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अर्थमंत्री महामंडळाला निधी देत नाहीत असे आपल्याला सुचवावयाचे आहे काय? जे सत्य आहे ते मी सांगत आहे, दोघांमध्ये भांडण लावण्यासाठी मी बोलत नाही. आपण आपल्या नेतृत्वाचा आदर करण्याची सवय बाळगा.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . . .

जर माननीय श्री.शरद पवार साहेबांनी जाहीर केल्यानुसार मौलाना आझाद मंडळ स्थापन केले असेल व आपल्या आदरणीय नेतृत्वाने जर महाराष्ट्रातील मुस्लीम समाजातील तरुणांसाठी हे मंडळ स्थापन केले असेल तर माझ्याकडे अर्थ खाते आहे. त्यामुळे मी त्या लोकांसाठी निधीची व्यवस्था करुन काही केले पाहिजे अशा प्रकारची जाणीव त्या पदावर बसलेल्या प्रत्येकाला आपल्या नेत्याचा आदर म्हणून असावयास पाहिजे. मी या ठिकाणी टीका करण्यासाठी सांगत नाही तर तुमचा या बाबतीत पहाण्याचा जो दृष्टीकोन आहे त्याबाबत सांगत आहे.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री सदनामध्ये उपस्थित आहेत. सन्माननीय सदस्य हे समाजाच्या उन्नतीबाबत बोलले आणि त्यांचे तेच बोलणे योग्य होते. पण तुम्ही तुमच्या राजकीय पुनर्वसनाच्या संदर्भात कशासाठी बोलत आहात, तुमचा खासदार निवडून आला नाही याचा दोष तुम्ही कोणाला देणार आहात, तुम्ही असे कशासाठी करीत आहात, तुमची मंडळी निवडणुकीला उभी रहात नाहीत काय, ती पराभूत होतात काय, पक्ष तिकीट देत नाही काय ? अशा अनेक गोष्टी आहेत. मी सन्माननीय सदस्य श्री.हुसेनभाई दलवाई यांना सांगू इच्छितो की, मी मघाशी जे सांगितले ते तुम्हाला हिणवण्यासाठी नाही. आम्ही तुम्हाला आमचे मानतो. तुमच्या-आमच्यात झ ालेल्या गोष्टी तुम्ही बोलू शकत नाही. पण मी तुमची व्यथा मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. कारण ते आम्हाला बरे वाटले नाही. शेवटी कोणीही असले तरी अगदी मी असलो तरी किंवा इतर कोणीही असले तरी त्यांना दु:ख होईल. सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई शपथविधी समारोहामध्ये कुटुंबासहित उपस्थित होते. जाऊ दे, मी परत तो विषय मांडत नाही. फक्त अन्याय करण्याची प्रवृत्ती कशी आहे ते सांगितले.

सभापती महोदय, म्हणून मी सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाईभाई यांना एवढेच सांगेन की, तुम्ही काय किंवा मी काय, घटनेने अल्पसंख्याकांच्या संदर्भात जे दिलेले आहे, त्याबाबतीत ज्या-ज्या वेळेला आपण भाष्य करतो,तेव्हा फक्त एकच विशिष्ट समाज म्हणजे अल्पसंख्याक समाज असे तुम्ही आम्हाला सांगता आणि इतर समाजाला बाजूला ठेवता. मग आम्ही जेव्हा तसे बोलतो तेव्हा आम्हाला कधी कारण नसताना दुखवू नका. कारण आमचाही तो उद्देश नसतो. सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई यांनी येथे त्यांची विवंचना मांडली. मला एवढेच सांगावयाचे आहे की, आम्ही नाही, तुम्ही आहात. तुम्ही त्यांच्याकडून मते घेता आणि ते तुम्हाला सत्तेवर बसवितात. त्या समाजासाठी त्यांनी काही करावे. मग ही सत्ता ज्यांच्याकडे आहे, त्यांनी का केले नाही? याचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . . .

संबंधितांनी शोध घ्यावा यासाठी येथे चर्चा उपस्थित केलेली आहे असा माझा समज आहे. शेवटी मी सन्माननीय सदस्यांना एवढेच विचारु इच्छितो की, तुम्ही मुख्य प्रवाहामध्ये कधी येणार, तुम्ही आमच्या देशाचे कायदे स्वीकारणार की नाही ? ज्यावेळेला कायदा स्विकारण्याची वेळ येते, तेव्हा तुमचा धर्मग्रंथ उभा केला जातो, ते तरी थांबवावे. आमच्या प्रवाहामध्ये या. तुम्ही ज्या प्रांतामध्ये रहात आहात, तो माझा प्रांत आहे असे समजा. आज कोकणी माणूस हा स्वत:ला मुसलमान समजत नाही तर कोकणी समजतो. तो मराठी आहे की मुसलमान आहे की हिंदू आहे का ? तर तसे नाही. त्या सगळयांची भाषा एक, वागणे एक आणि मुख्य प्रवाहामध्ये मिसळण्याच्या दृष्टीने हा एक आदर्श आहे.त्या भागातील कोणीही मागणी केली नाही की, माझा मुलगा अमुक शाळेमध्ये जातो, तेथे त्याला उर्दू शिकवावे. मी उर्दू भाषेपर्यंत समजू शकतो. कारण निजामाच्या छायेखाली असलेल्या संपूर्ण मराठवाड्यामध्ये हिंदू आणि इतर सगळेजण उर्दू शिकत होते. आजही ते उर्दू बोलतात. शिक्षकही उर्दू आहेत. परंतु मला आपल्या निदर्शनास एक गोष्ट आणावयाची आहे की, मी उर्दू भाषेच्या संबंधातील मागणी समजूच शकतो. कारण येथे शेकडो, हजारो वर्षे मुस्लिम राजवटीने राज्य केलेले असल्यामुळे परंपरेने ती भाषा पुढे आलेली आहे. पण आता तर तुम्ही आम्हाला अरब देशातील भाषा शिकवाल काय अशी मागणी केली ? अशा प्रकारे मागणीचा अतिरेक होत आहे.

सभापती महोदय, घटनेच्या शेड्युलमध्ये भाषेची जी व्याख्या केलेली आहे, त्यातील प्रत्येक भाषेच्या बाबतीत आपल्याला अधिकाराने त्याची मागणी करण्याचा हक्क आहे, अधिकाराने त्याबाबत बोलण्याचा आणि त्यासंदर्भात शासनाकडे हट्ट धरण्याचा अधिकार आहे.पण जी आपल्या देशाची भाषा नाही, ती आम्हाला शिकवावी असे जे शेवटी सन्माननीय सदस्य बोलले, ते अयोग्य होते. म्हणून मुस्लिम समाजाच्या उन्नतीसाठी सरकारमार्फत जे प्रयत्न होत असतील, त्याला आजपर्यंत आम्ही कधी विरोध केला नाही आणि भविष्यातही करणार नाही. कारण ते आमच्यातीलच आहेत. आमचा विरोध हा आतंकवादी लोकांना आहे. आमचा विरोध हा पाकधार्जिण्या लोकांना आहे. या देशामध्ये जे राष्ट्रगीत म्हणणार, वंदे मातरम् म्हणून ही माझी भूमी मानणार, ते आमचेच आहेत. त्यांच्या धर्माचा विषय नाही ही माननीय शिवसेना प्रमुखांची रोखठोक आणि स्वच्छ भूमिका आहे असे मी पुन्हा एकदा सांगतो. त्यामुळे कधीही आमच्याकडे पहाताना आम्ही तुमचे विरोधक आहोत या संशयाने पाहू नका, हे मी या चर्चेच्या निमित्ताने सांगण्यासाठी उभा होतो. धन्यवाद.

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, अल्पकालीन चर्चेच्या माध्यमातून सभागृहासमोर चर्चेला आलेला विषय मोठा आहे. या विषयाच्या संदर्भात सर्वांनाच चिंता आहे परंतु या बाबतीत खऱ्या अर्थाने चिंतनाची गरज आहे. अल्पकालीन चर्चेच्या माध्यमातून या विषयाला आपण किती न्याय देऊ शकू हे मला माहीत नाही. परंतु या बाबतीतील काही सूचना मी या ठिकाणी करणार आहे.

सभापती महोदय, मंत्री महोदयांनी 15 कलमी कार्यक्रम आयोजित केला आहे परंतु त्याच्या अंमलबजावणीच्या किती बैठका झाल्या, याची मला माहिती नाही. त्या बैठका खरे तर कलेक्टर लेव्हलवर व्हायला पाहिजे, जेणेकरुन त्या संपूर्ण जिल्हयाचा आढावा घेता येईल त्याप्रमाणे पुढची कार्यवाही करता येईल, या बाबतीत मंत्री महोदयांकडून मला उत्तर अपेक्षित आहे.

सभापती महोदय, जिल्हा पातळीवर अल्पसंख्याक कल्याण मंत्रालयाचे कार्यालय सध्या नाही, ते असणे गरजेचे आहे. अल्पसंख्याक म्हणजे त्यामध्ये अनेक जाती आल्या. म्हणून मी विशिष्ट जातीचा या ठिकाणी उल्लेख करत नाही.पारशी समाज बऱ्यापैकी सुशिक्षित समाज आहे. शिख समाजामध्ये सुध्दा बऱ्यापैकी सुशिक्षित समाज आहे. पण त्यांच्यामध्ये देखील बरेच लोक अशिक्षित सुध्दा आहेत. अल्पसंख्याकामध्ये बौध्द समाज आणि मुस्लिम समाज हे खऱ्या अर्थाने मागासलेल्या जातीमध्ये मोडतात म्हणून त्यांचा उल्लेख वारंवार आला तर त्याचा कोणी गैर अर्थ लावू नये. मला या ठिकाणी मुद्दाम एक गोष्ट सांगावयाची आहे. सच्चर समितीने सूचविल्या प्रमाणे समानसंधी आयोग, मूल्यमापण व मार्गदर्शन आयोग, माहिती संकलन संस्था इत्यादीची स्थापना या राज्यामध्ये व्हायला हवी.सच्चर समितीने अशा प्रकारचे निर्देश दिलेले आहेत. या सगळया माध्यमातून आपण जे काही करीत आहोत त्याला या गोष्टींची स्थापना झाल्यावर चालना मिळेल.

सभापती महोदय, मौलाना आझाद महामंडळा बद्दल या ठिकाणी सांगण्यात आले. या महामंडळाने दिलेल्या कर्जाच्या माध्यमातून हजारो मुस्लिम तरुणांनी स्वत:चे धंदे सुरु केले असतील, व्यावसाय सुरु केले असतील आणि आपली उपजीविका त्यातून ते साध्य करीत असतील. मला या ठिकाणी अशी सूचना करावयाची आहे की, इतर महामंडळाची कर्जमाफी करण्यात आली आहे, तशी या महामंडळाची कर्जमाफी करणे गरजेचे आहे. तसेच मौलाना आझाद महामंडळाची अनुदानाची मर्यादा वाढवायला पाहिजे. माझ्या माहिती प्रमाणे आता सध्या त्यांना 43 कोटी रुपये

...2...

श्री. भाई जगताप.....

मिळतात. माझी मागणी अशी आहे की, मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाला कमीत कमी 200 कोटी रुपयाची प्रोव्हिजन करण्याची आवश्यकता आहे. या देशामध्ये 18 कोटी मुसलमान आहेत. राज्यामध्ये त्याच प्रमाणात मुस्लिम आहेत. म्हणून मौलाना आझाद महामंडळाला पैशाची व्यवस्था करावी, त्याच बरोबर या महामंडळाला जे कर्ज देण्यात आले आहे, ते माफ करण्यात यावे.

सभापती महोदय, आपल्या राज्यात सगळीकडे अंगणवाडया आहेत पण उर्दू माध्यमाच्या अंगणवाडया नाहीत. माझी शासनाला विनंती आहे की, ज्या ज्या ठिकाणी मुस्लिम वस्त्या आहेत, मोहल्ले आहेत, त्या ठिकाणी शासन उर्दू माध्यमाच्या अंगणवाडया काढू शकते. त्या प्रकारचे शासनाचे धोरण आहे. सभापती महोदय, मी मदरसा या वादामध्ये जाणार नाही. परंतु काही जिल्हयामध्ये अजूनही उर्दू माध्यमाच्या अंगणवाडया नाहीत, त्या तशा काढण्यात याव्यात, अशा प्रकारची मी सूचना करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो. जय हिंद. जय महाराष्ट्र.

-----

यानंतर श्री. बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आमचे ज्येष्ठ सहकारी सन्माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई यांनी अल्पसंख्याक समाजाबद्दल एक अतिशय चांगली चर्चा आज या सभागृहात उपस्थित केलेली आहे. यासाठी होणारे सर्व प्रयत्न आणि त्या प्रयत्नातून त्या समाजाला ज्या आवश्यक गोष्टी मिळावयास पाहिजेत त्या अजूनही त्यांच्यापर्यंत पोहोचत नाहीत, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. आजही आपण बघतो की, अतिशय चांगले निर्णय जरी घेतलेले दिसले तरी आपल्याला त्याची अंमलबजावणी होताना दिसत नाही. थोडे पाठीमागे जाऊन आपण विचार केला तर एकूणच सामाजिक व्यवस्थेमध्ये ज्या प्रकारची एकात्मता निर्माण होण्याची आवश्यकता असते ती निर्माण होण्यामध्ये समाजामध्ये कोठे तरी, काही तरी कमतरता आहे काय, असा एक मोठा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतो.

एक अगदी साधी गोष्ट अशी आहे की, एखाद्या गावातील एका चांगल्या बँकेमध्ये जर कर्जासाठी अर्ज केला तर आजही अशी परिस्थिती आहे की, तो अर्ज जर मुस्लीम समाजाचा असला तर कित्येक बँकांमध्ये तो अर्ज स्वीकारला जात नाही. त्याचप्रमाणे आता जशी शहरे वाढत आहेत तसेच त्या ठिकाणी ज्या नवीन सोसायट्या निर्माण होतात त्या सोसायटीवर सदस्य घ्यावयाचा झाला आणि तो जर अल्पसंख्याक मुस्लीम समाजाचा असला तर त्याला सदस्यत्व देण्यामध्ये बऱ्याच वेळा कुचराई होत असल्याचे आपल्याला दिसून येते. एकूणच अशी सामाजिक अवस्था आपल्या देशामध्ये असताना आपल्या देशातील जे अल्पसंख्याक आपल्या हिकमतीवर मोठे होऊन परदेशी जातात, आंतरराष्ट्रीय स्तरावर जातात तेव्हा आपल्या लक्षात येते की, त्या ठिकाणी भारतातून आलेले सगळ्या समाजाचे लोक अतिशय चांगल्या पध्दतीने एकत्रितपणे राहात असतात. हे तिकडे घडू शकते पण आपल्याकडे घडू शकत नाही. आपण म्हणतो की त्यांना शिक्षणाची चांगली सुविधा उपलब्ध करुन दिली पाहिजे. पण समाज जसा पुढे जातो तसा आज या अल्पसंख्याक समाजामधल्या तरुणांपुढे प्रश्न आहे की, त्यांनी शिक्षण घेतले तरी त्यांना नोकरीची संधी ज्या प्रमाणात उपलब्ध व्हावयास पाहिजे ती दुर्दैवाने दिली जात नाही. त्यांना स्वत:चा रोजीरोटीचा छोटासा उद्योग करावयाचा असेल तर त्यासाठी जी साधने त्यांना उपलब्ध व्हावयास पाहिजे ती त्याप्रमाणात त्यांना मिळत नाहीत.

असे सांगण्यात येते की, 100 वर्षापूर्वी, 50 वर्षापूर्वी आपल्या समाजामधील एकरुपता खूप चांगली होती. मला आठवते की, कोल्हापूर सारख्या

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/

श्री. हेमंत टकले .....

शहरामध्ये सुध्दा असे सांगितले जायचे की, त्या ठिकाणी गणपती उत्सवामध्ये छोट्या छोट्या वस्त्यांमध्ये जी नाटके केली जात ती बऱ्याच वेळा पौराणिक असत आणि त्यामध्ये हनुमानाची भूमिका करायला सुध्दा मुस्लीम तरुणाला संधी दिली जात असे. पूर्वी कोकणात जे होत होते, पश्चिम महाराष्ट्रात जे होत होते, मराठवाड्यात जे होत होते तशा प्रकारे आताही जर केले तर या समाजामध्ये सुध्दा आपण या समाजाचे घटक आहोत ही भावना निर्माण होइल. त्यांच्यामध्ये जर असुरक्षिततेची भावना निर्माण झाली किंवा समजा त्यांना शिक्षण मिळाले, शिक्षणाचा एक स्तर पार करुन ते पुढे गेले आणि त्यांना जर नोकरीची किंवा व्यवसायाची संधी मिळाली नाही तर ते निश्चितपणे दुसऱ्या मार्गाला जाण्याची शक्यता अधिक असते. मध्यंतरीच्या काळामध्ये ज्या काही केसेस समोर आल्या त्यामध्ये असे निश्चित दिसून येईल. या अल्पसंख्याक समाजातील तरुण मुले ज्यावेळेला बेरोजगार असतात त्यावेळेला त्यांना दुसरे काहीही काम न मिळाल्यामुळे ते चुकीच्या मार्गाला जाण्याची शक्यता असते आणि त्यामुळे सगळा समाजच चुकीच्या मार्गाने जाऊ शकतो. या बाबत अतिशय गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे. तो विचार जर चांगल्या पध्दतीने केला तर भविष्य काळात हे समाज परिवर्तन नक्की घडेल असा मला विश्वास वाटतो. या चर्चेचे स्वरुप अतिशय गांभीर्याने घेतले पाहिजे आणि या अल्पसंख्याक समाजासाठी आपण जे करीत आहोत त्यात अधिकचे काही तरी करण्याची आवश्यकता आहे, एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एस.क्यू जमा (महाराष्ट्र विधानसभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, महाराष्ट्र विधान परिषद के नियम क्रमांक 97 के अन्तर्गत माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई ने अल्पसंख्यक समाज के बारे में जो चर्चा उपस्थित की है, उसके लिए मैं उनको धन्यवाद देना चाहता हूँ. मुझसे पहले बोलने वाले माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई, श्री. भाई जगताप और श्री. हेमंत टकले ने जो विचार प्रकट किए हैं, मैं उनको रिपीट नहीं करना चाहता. मैं केवल 2-4 बातें कहना चाहता हूँ.

सभापति महोदय, अल्पसंख्यकों की परिभाषा अल्पसंख्यक कानून में लिखी हुई है कि इसमें कौन कौन आते हैं और इस बात का जिक्र माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते ने भी किया है. जब हम अल्पसंख्यकों की बात करते हैं तो उसमें ज्यादातर चाहे वह मुसलिम समाज हो, चाहे सिख समाज हो, चाहे पारसी समाज हो, चाहे ईसाई समाज हो, चाहे जैन समाज हो, इनमें से जो आर्थिक रुप से कमजोर हैं, जो झोंपड़पट्टी में रहते हैं, जो गरीब हैं, जिनकी आमदनी कम है, जिनका शिक्षण कम है, जो सामाजिक रुप से कमजोर हैं, हम केवल उनके बारे में बात करते हैं. जो मुसलिम बड़े बड़े ओहदों पर बैठे हुए हैं, जो उद्योगपति हैं अथवा जो बड़े बड़े कारखानों के मालिक हैं, हम ऐसे मुसलिमों की बात नहीं करते हैं. इसमें जाति का कोई सवाल नहीं है. भारत सरकार ने सन् 2006 के पहले सच्चर कमीशन बनाया, इसकी रिपोर्ट आ गई. केन्द्र सरकार ने जनवरी 2006 में अल्पसंख्यक विकास विभाग बनाया. उसके बाद महाराष्ट्र सरकार ने भी अल्पसंख्यकों के बारे में एक प्रगतिशील निर्णय लिया और अल्पसंख्यक विकास विभाग बनाया.

सभापति महोदय, हमारे माननीय प्रधानमंत्री ने अल्पसंख्यकों के लिए 15 सूत्री कार्यक्रम तैयार किया, जिसके मुख्य रुप से 3-4 मुद्दे हैं. इसमें सब से पहला मुद्दा यह है कि अल्पसंख्यकों में या मुसलमानों में जो शैक्षणिक रुप से पिछड़े हुए हैं, उनका स्तर ऊपर किया जाए. हमारे देश में जो विकास होता है, हमारा जो जी.डी.पी. होता है तो उसका समान रुप से अल्पसंख्यको को फायदा मिलना चाहिए, उनका जीवन स्तर ऊँचा होना चाहिए. ये माननीय प्रधानमंत्री द्वारा घोषित 15 सूत्री कार्यक्रम के महत्वपूर्ण मुद्दे हैं.

सभापति महोदय, मैं पिछले 3-4 साल से एक ही बात कह रहा हूँ. बजट पर जब भी सभागृह में चर्चा हुई है, तब मैंने कहा है कि महाराष्ट्र सरकार ने दिनांक 10.10.2006 को एक जी.आर. निकाला है, उसके अनुसार सभी विभागों के बजट का 15 प्रतिशत प्रावधान अल्पसंख्यकों

. . . 4Y 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . श्री. एस.क्यू. जमा

के लिए होना चाहिए. हमारे माननीय वित्त मंत्री ने इस तरफ ध्यान नहीं दिया है. मैं व्यवहारिक आदमी हूँ, मैं इस बात को समझ सकता हूँ कि कुल बजट में से हमें कितना मिल सकता है, लेकिन अल्पसंख्यकों के लिए हर बजट में प्रावधान बढ़ाना चाहिए. अन्यथा यह केवल नाम का विभाग रहेगा और इसके द्वारा कोई काम नहीं होगा.

सभापति महोदय, मैं 2-3 बातें कहना चाहता हूँ. केन्द्र सरकार के अल्पसंख्यक विकास ने अल्पसंख्यकों के विकास के लिए कई योजनाएं शुरु की हैं और उनके बजट की शुरुआत 130 करोड़ रुपए से हुई थी, आज उनका बजट 2600 करोड़ रुपए का है. महाराष्ट्र के अल्पसंख्यक विकास विभाग का बजट केवल 234 करोड़ रुपए का है, इस बजट प्रावधान को बढ़ाना बहुत जरुरी है. केन्द्र सरकार ने मोनीटरिंग करने के लिए जिलावार एजेन्सी अपाइंट की है. महाराष्ट्र सरकार को भी ऐसा करना चाहिए. केन्द्र सरकार ने एम.एस.डी.पी. योजना के अन्तर्गत 90 जिलों को जहां पर अल्पसंख्यकों की संख्या अधिक है, उनके मल्टी सेक्टर डिवलपमेंट के लिए फंड भी दिया है. केन्द्र सरकार ने महाराष्ट्र में जो जिले आयडेन्टिफाय किए है, वह भी हमें मालूम नहीं है.

सभापति महोदय, हमारे हैंडलूम और पावरलूम सेक्टर के बारे में आपने टेक्सटाइल पॉलिसी बनाई है. लेकिन हातमाग महामंडल बंद होने के बाद बुनकरों की बुरी हालत है, उनके लिए कुछ व्यवस्था की जाए. मेरा सरकार से अनुरोध है कि बुनकरों का कर्जा माफ होना चाहिए.

सभापति महोदय, अलीगढ़ मुसलिम विश्वविद्यालय ने मुंबई में डिवीजनल विश्वविद्यालय या कॉलेज खोलने के लिए महाराष्ट्र सरकार से जमीन की मांग की है. मेरा सरकार से अनुरोध है कि अलीगढ़ मुसलिम विश्वविद्यालय को मुंबई में जमीन दी जाए.

सभापति महोदय, महाराष्ट्र शासन ने 3 साल के लिए 10 हजार करोड़ रुपए का पॅकेज विदर्भ के लिए घोषित किया है. हमने इसमें बहुत खोजने की कोशिश की, लेकिन इस 10 हजार करोड़ रुपए में से अल्पसंख्यकों के लिए, उनके विकास के लिए, अलग-अलग विभागों में अल्पसंख्यकों के विकास के लिए एक नए पैसे का भी प्रावधान नहीं है. विदर्भ के लिए घोषित 10 हजार करोड़ रुपए में से अल्पसंख्यकों के लिए प्रावधान किया जाए, इतना कहते हुए मैं अपना भाषण पूर्ण करता हूँ.

************

भाषण पूर्ण, नंतर 4 Y3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई यांनी उपस्थित केलेल्या अल्पकालीन चर्चेत भाग घेण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, आघाडी शासनाने जाहीरनाम्यामध्ये आश्वासन दिल्याप्रमाणे अल्पसंख्याक समाजासाठी मौलाना आझाद महामंडळ स्थापन करण्याची घोषणा मंत्रिमंडळाच्या पहिल्या बैठकीत करण्यात आली होती. माननीय श्रीमती सोनिया गांधी, माननीय श्री.शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली या समाजाला ओलावा मिळालेला आहे. निवड मंडळावर प्रतिनिधित्व द्यावे, मुलाखत मंडळावर प्रतिनिधित्व द्यावे अशा किरकोळ स्वरुपाच्या या समाजाच्या मागण्या आहेत. या समाजातील विद्यार्थ्याला बँक ऑफ महाराष्ट्र या बँकेतून लोन घ्यावयाचे असेल तर त्याचे खाते उघडले जात नाही. या सगळया गोष्टींची कारणमीमांसा समजावून घेण्यासाठी शासनाने एका अभ्यास गटाची नियुक्ती करावी अशी मी या निमित्ताने सूचना करतो, एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

------

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 19:15

श्री. जैनुद्दीन जव्हेरी (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल सर्वप्रथम मी आपले आभार मानतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई यांनी माडलेल्या अल्पकालीन सूचनेवर बोलत असताना काही सन्माननीय सदस्यांनी असा उल्लेख केला की, मुस्लिम समाज हा भारताचे कायदे मानत नाही. खरे म्हणजे हे विधान साफ चुकीचे असून ते मुस्लिम समाजाला बदनाम करणारे आहे. आपल्या देशामध्ये प्रत्येक समाजासाठी त्यांच्या रीतिरिवाजानुसार कायदे केलेले आहेत. मुस्लिम समाज हा धर्म आहे, जात नाही. अन्य धर्मामध्ये ज्या प्रमाणे विविध जाती आहेत तशा त्या मुस्लिम समाजामध्ये देखील आहेत. मुस्लिम समाजामध्ये तेली आहेत. हिंदू समाजातील तेली लोक ओबीसीमध्ये येतात. मुस्लिम समाजामध्ये खाटीक आहेत. तसे ते हिंदू समाजामध्येही आहेत. परंतु हिंदू समाजातील खाटीक हे अनुसूचित जातीमध्ये येतात. ज्या प्रमाणे हिंदू व अन्य समाजातील विशिष्ट जाती-जमातींना सवलती दिल्या जातात त्याप्रमाणे मुस्लिम अल्संख्याकाना कोणत्याही प्रकारच्या सवलती दिल्या जात नाहीत. तेव्हा इतर समाजातील जाती,जमातीना दिल्या जाणा-या सवलती अल्पसंख्याकाना देखील दिल्या जाव्यात अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

----

**सभापती** : सभागृहापुढील कामकाज संपेपर्यन्त सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नसीम खान (अल्पसंख्याक विकास मंत्री) : सभापती महोदय, महाराष्ट्र विधानपरिषद नियम 97 अन्वये अल्पसंख्याकांच्या विकासाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई यांनी उपस्थित केलेल्या अल्पकालीन चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री. दिवाकर रावते,भाई जगताप, एस.क्यू.जमा. आणि जैनुद्दीन जव्हेरी यांनी भाग घेऊन उपयुक्त सूचना केलेल्या आहेत.

सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, आपला देश स्वतंत्र झाल्यानंतर आपल्या देशातील अल्पसंख्याकांच्या विकासासाठी, त्यांच्या उत्थानासाठी अनेक क्षेत्रातून मागणी होत होती. अल्पसंख्याकांच्या विविध प्रश्नांचा अभ्यास करुन सरकारला शिफारशी करण्यासाठी संयुक्त पुरोगामी आघाडीच्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी आणि आपल्या देशाचे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी निवृत्त न्यायमूर्ती सच्चर यांचा एक सदस्यीय आयोग नेमला. न्यायमूर्ती सच्चर यांनी संपूर्ण देशाचा दौरा केला. ते प्रत्येक गावामध्ये गेले. राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रातील लोकांशी चर्चा केली. अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी त्यांच्या उत्थानासाठी कोणते कार्यक्रम राबविले पाहिजे, त्यांना कोणकोणत्या सवलती दिल्या पाहिजेत इत्यादी गोष्टींचा अभ्यास करुन त्यांनी केन्द्र शासनाला अहवाल दिला. हा अहवाल देशाच्या पंतप्रधानांनी मान्य केला.

...नंतर श्री. गिते...

s

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नसीम खान...

आणि माननीय पंतप्रधानानी नवीन 15 कलमी कार्यक्रमाची घोषणा केली. अनेक सन्माननीय सदस्यांनी या 15 कलमी कार्यक्रमाची चर्चा सभागृहात केली. आपल्या माननीय पंतप्रधान यांनी दिलेल्या सूचनेनुसार या राज्यात 15 कलमी कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेतला. 15 कलमी कार्यक्रमासोबतच अल्पसंख्याक समाजाच्या उत्थानासाठी 2008 साली या राज्यात स्वतंत्र असा अल्पसंख्याक विभाग उघडण्यात आला. अल्पसंख्याक समाजातील अनेक वर्ग आहेत, अनेक घटक आहेत यांच्या सामाजिक, आर्थिक विकासाची कामे या विभागातून होत आहेत. या राज्यात किंबहुना या देशात अल्पसंख्याक म्हणजे फक्त मुसलमान समाज आहे असा अनेकांचा समज झालेला आहे.मी या ठिकाणी नम्रपणे सांगू इच्छितो की, अल्पसंख्याक म्हणजे मुसलमान समाजच नाही. अल्पसंख्याकांमध्ये मुस्लीम, शीख, नवबौध्द, खिश्चन, जैन, पारशी अशा सहा जातींचा समावेश करण्यात आलेला आहे. या सहा जाती अल्पसंख्याक समाजामध्ये मोडतात अशी अधिकृत घोषणा सामान्य प्रशासन विभागाने केलेली आहे. या सहा अल्पसंख्याक समाजाचा विकास करण्याचे काम या लोकशाही आघाडीत अल्पसंख्याक विभागाकडून होत आहे. 2008 मध्ये अल्पसंख्याक विभागाची स्थापना झाली. नवीन विभाग निर्माण करावयाचा झाला तर त्यासाठी नवीन योजना तयार कराव्या लागतात, त्यास वित्त विभाग तसेच नियोजन विभागाची मान्यता घ्यावी लागते. हा एक प्रोसीजरचा भाग आहे.

सन्माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई यांनी अनेक मुद्दे या ठिकाणी उपस्थित केले. अल्पसंख्यांक विभाग निर्माण करणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे. त्या विभागामार्फत अनेक विविध कार्यक्रमांची अंमलबजावणी अनेक क्षेत्रात करण्यात येत आहे. अल्पसंख्यांक समाजाला शिक्षण देणाऱ्या संस्था आहेत. त्या संस्थांना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी दरवर्षी 2 लाख रुपयांचा निधी देण्याची योजना सुरु करण्यात आली आहे. या वर्षी जवळपास 1700 प्राथमिक पासून ते अनेक कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयांना सदरहू योजनेचा लाभ दिलेला आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : अल्पसंख्याकांसाठी काढण्यात आलेल्या प्रत्येक शिक्षण संस्थेला पायाभूत सुविधा देण्यासाठी 2 लाख रुपये देण्यात आले आहेत असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. या अनुषंगाने बुलढाणा जिल्हयाची माहिती माननीय मंत्री महोदय आपण मागवावी.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

बुलढाणा जिल्हयामध्ये अजूनही 40 अल्पसंख्याक समाजाच्या शैक्षणिक संस्थांना या योजनेचा पैसा दिला गेलेला नाही. 120 अर्ज होते, त्यापैकी 80 अर्जांना या योजनेचा लाभ दिला गेला. 40 संस्थांना लाभ दिला गेलेला नाही. आपण या ठिकाणी जाहीर करता की, प्रत्येक संस्थेला 2 लाख रुपये देण्यात आले आहेत. जर अल्पसंख्यांक समाजाच्या सर्व शैक्षणिक संस्थांना लाभ देण्याची योजना आहे तर या 40 संस्थांना या योजनेचा लाभ का दिला गेला नाही ?

श्री. नसीम खान : अल्पसंख्याक समाजातील दर्जा प्राप्त शैक्षणिक संस्था असतील, त्यांना काही नियम व अटीच्या अधीन राहून 2 लाख रुपयांची तरतूद देण्याची योजना आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते, आपण ज्या शैक्षणिक संस्थांचा उल्लेख करीत आहात, त्यानी अटी व शर्ती पूर्ण केल्या असतील तर ती प्रकरणे माझ्याकडे पाठवावीत. त्या अनुषंगाने निश्चितपणे कार्यवाही करण्यात येईल.

सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी बेरोजगारांचा प्रश्न या ठिकाणी उपस्थित केला. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये अल्पसंख्याक समाजातील जे बेरोजगार तरुण आहेत, त्या बेरोजगार तरुणांना चांगल्या प्रकारचे इंडस्ट्रीयल ट्रेनिंग मिळावे, पर्यायाने त्यांना नोकऱ्या उपलब्ध होऊ शकतील म्हणून मुंबईसह संपूर्ण राज्यात 43 आय.टी.आय.सुरु करण्यात आल्या आहेत. फीटर, टर्नर, फॅशन डिझायनर, असे अनेक टेक्निकल कोर्सेस या 43 आय.टी.आय.च्या माध्यमातून सुरु करण्यात आले आहेत....

यानंतर श्री. भोगले....

,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नसीम खान.....

येणाऱ्या काळात याचा लाभ संपूर्ण राज्यातील अल्पसंख्याक समाजातील बेरोजगार युवकांना होणार आहे. उच्च शिक्षणाची संधी तरुणांना मिळावी, मेडिकल व इंजिनिअरिंगच्या कोर्सेससाठी प्रवेश मिळावा, गोरगरीब तरुणांना आर्थिक मदत व्हावी म्हणून 25 हजार रुपये शिष्यवृत्ती देण्याची योजना सुरु केली आहे. अल्पसंख्याक समाजातील तरुणांना मेडिकल व इंजिनिअरिंगमध्ये प्रवेश मिळाल्यास दरवर्षी 25 हजार रुपये शिष्यवृत्ती दिली जाणार आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी 15 कलमी कार्यक्रमाची बैठक झालेली नाही असा मुद्दा मांडला होता. मला सांगण्यास आनंद वाटतो की, माननीय मुख्यमंत्र्यांनी दोन महिन्यांपूर्वी 15 कलमी कार्यक्रमाचा आढावा घेतला होता. चार तास बैठक घेऊन प्रत्येक विभागाच्या सचिवांना बोलावून एकूण योजनांचा आढावा घेतला आणि संबंधित विभागाना पंतप्रधानांच्या 15 कलमी कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. मुस्लीम भागामध्ये अंगणवाडी असावी यासाठी शासनाने महिला व बालकल्याण विभागाला 11.1.2011 रोजी सूचना दिलेली आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी राज्यातील आर्थिक विकास महामंडळांना 2009-10 मध्ये कर्जाच्या थकबाकीची रक्कम दिलेली नाही असा मुद्दा मांडला होता. महाराष्ट्र शासनाने 2009 मध्ये राज्यातील सर्व आर्थिक विकास महामंडळांची कर्ज थकबाकीची रक्कम माफ करण्याचा निर्णय घेतला होता, त्याची अंमलबजावणी झालेली असून मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाला रक्कम उपलब्ध करुन दिलेली आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते नेहमीच अल्पसंख्याक समाजाच्या उन्नतीसाठी तळमळीने बोलत असतात. मागील तीन वर्षात शासनाने या राज्यातील अल्पसंख्याक समाजातील तरुण, युवक, महिला, वरिष्ठ नागरीक यांच्यासाठी अनेक प्रकारच्या योजना सुरु केलेल्या आहेत. त्याचा लाभ या राज्यातील हजारो लोकांना होत आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य सर्वश्री हुसेन दलवाई आणि एस.क्यू.ज़मा यांनी अल्पसंख्याक विभागाला कमी बजेट मंजूर केले जाते असे सांगितले आहे. अल्पसंख्याक विभागाची 2008 मध्ये स्थापना करण्यात आली. या विभागाला पायाभूत सुविधा मिळाल्या पाहिजेत. हा विभाग बळकट करण्यासाठी अनेक प्रकारच्या योजना राबविण्यात येत आहेत. 2008 मध्ये





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 19:25

श्री.नसीम खान.....

विभागाची स्थापना झाल्यानंतर 174 कोटी रुपयांचे बजेट मंजूर केले होते, त्यातील 99 टक्के रक्कम म्हणजे 173 कोटी रुपये खर्च झालेले आहेत. या ठिकाणी असा उल्लेख केला की, बजेटमधील तरतूद खर्च होत नाही.

नंतर 5सी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नसीम खान ........

सन 2009-10 मध्ये 210 कोटीची तरतूद केली होती, त्यापैकी 206 कोटी खर्च करण्यात आले. सन 2010-11 मध्ये 220 कोटीची तरतूद या विभागासाठी केली होती, त्यात 10 टक्के कट लावण्यात आला होता तरी देखील 200.64 कोटी एवढा खर्च केला. यावर्षीची तरतूद 275 कोटी इतकी तरतूद माननीय मुख्यमंत्र्यांनी केली व त्यातून मुस्लीम समाजातील वक्फ बोर्ड, वक्फ बोर्डाची प्रॉपर्टी अशा सर्व विभागाला बळकट करण्यासाठी वेगळी 15 कोटीची तरतूद खास बाब म्हणून करण्यात आली. त्यातून आम्हाला आशा आहे की, येणाऱ्याकाळात राज्यातील अल्पसंख्यांक समाजाचा चेहरामोहरा बदलण्यात शासनाला नक्कीच यश येईल. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद. जय हिंद.

**सभापती** : अल्पकालीन चर्चा संपलेली आहे.

-------

## लक्षवेधी सूचना क्र. 10 संबंधी

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नागो गाणार यांनी दिलेली लक्षवेधी सूचना मघाशी माननीय शालेय शिक्षण मंत्री सभागृहात उपस्थित असताना घ्यावी अशी विनंती केली असता मला खालच्या सभागृहात जायचे आहे असे कारण सांगून ते दोन वेळा निघून गेले. आमची विनंती आहे की, माननीय मंत्री महोदयांना ताबडतोब सभागृहात बोलावून घ्यावे.

**सभापती** : ठीक आहे, तोपर्यंत सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांची नियम 97 अन्वयेची चर्चा आपण घेऊ.

....2.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई येथील मरीन ड्राईव्हजवळ अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारणे

**मु.शी.**: मुंबई येथील मरीन ड्राईव्हजवळ अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारणे या विषयावर श्री. विनायक मेटे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

**सभापती** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी मी 30 मिनिटांचा वेळ दिलेला आहे. सूचना देणारे सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील. त्यानंतर एखाद-दुसरे सन्माननीय सदस्य भाषण करतील व त्यानंतर मंत्र्यांचे उत्तर होईल.

श्री. विनायक मेटे (विधानसभेने निवडलेले) : मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :--

"मुंबई येथील मरिन ड्राईव्हजवळ अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक उभारण्याचा निर्णय शासनाने सुमारे दोन वर्षांपूर्वी घेणे, या स्मारकाच्या कामास अद्यापही सुरुवात न करणे, या स्मारकाच्या उभारणीसाठी टीम वन आर्किटेक, मुंबई व मे.बेन्सले डिझाईन स्टुडिओज, थायलंड यांनी सादर केलेल्या संकल्पनेची निवड करण्यात येणे, परंतु अद्यापही याबाबत पुढील कोणतीही कारवाई न होणे, या स्मारकाच्या उभारणीच्या संदर्भात मा.मुख्यमंत्री व मा.महसूल मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या समितीचे आता पुनर्गठन करण्याबाबत होत असलेली मागणी, राज्यातील जनतेच्या जिव्हाळ्याच्या व अस्मितेच्या असलेल्या या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्मारकाची उभारणी करण्यास होत असलेल्या विलंबाबाबत राज्यातील नागरिकांत पसरलेला तीव्र असंतोष, या स्मारकाचे काम त्वरीत सुरु करुन वेळेत पूर्ण करण्याबाबत शासनाने करावयाची तातडीची कारवाई व शासनाची प्रतिक्रीया."

महोदय, अरबी समुद्रात शिवाजी महाराजांचे स्मारक उभे करण्यासंबंधी नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा घेण्याची अनुमती दिल्याबद्दल प्रथम मी आपले आभार व्यक्त करतो.

महोदय, मी मध्यंतरी व्हिएतनाम येथे गेलो असता प्रत्येक महाराष्ट्रीय माणसाला अभिमान वाटेल असे स्मारक त्या सरकारने बनविलेले आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे ...

अनेक लोक सुध्दा त्या ठिकाणी जाऊन आलेले आहेत. आंध्र प्रदेशामध्ये श्री शैलम येथे छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर बांधलेले आहे. हे मंदिर बांधण्यासाठी तेथील जनतेने व शासनाने मदत केलेली आहे. आंनदाची गोष्ट अशी आहे की, स्वर्गीय वसंतदादा पाटील यांनी तसेच केंद्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार यांनी या ठिकाणच्या शिवछत्रपतींच्या मंदिरासाठी मदत केलेली आहे. या मंदिराला माननीय श्री. मनोहर जोशी साहेब सुध्दा पैसे देण्यासाठी जाणार होते परंतु त्यावेळच्या शासनाने विरप्पनच्या प्रश्नामुळे आता येऊ नका असे सांगितल्यामुळे माननीय श्री. मनोहर जोशी या मंदिरासाठी मदत करु शकले नाही. अमेरिका किंवा अन्य देशामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे स्टॅच्यू व पुतळे उभारले गेले आहेत. कर्नाटक राज्यामध्ये छत्रपती शहाजी राजांची समाधी आहे. बंगलोर येथून 40 कि.मी. अंतरावर शहाजी राजांची समाधी आहे. या ठिकाणी मोठया प्रमाणात उत्सव देखील भरत असतो. या ठिकाणी सुशोभिकरणाचे काम शासनाने हातामध्ये घेतलेले आहे. आग्रा येथे सुध्दा छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविण्यात आलेला आहे. दिल्ली येथे सुध्दा पुतळा उभारण्यात आलेला आहे. अनेक ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळे उभारले गेले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाच्या बाबतीत महाराष्ट्रात काय चालले आहे असे विचारले तर उत्तर शून्य येते. आपले शासन शाहू, फुले, आंबेडकरांचे नाव उठता बसता घेते व छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव तर हे शासन क्षणा क्षणाला घेत असते. असे असतांनाही छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक महाराष्ट्रात उभारले जात नाही यासारखी लाजिरवाणी गोष्ट या शासनालाच नाही तर येथील जनतेला देखील नाही हे मी या ठिकाणी स्पष्टपणे सांगू इच्छितो. छत्रपती शिवाजी महाराजांचे महाराष्ट्रात आंतरराष्ट्रीय ख्यातीचे स्मारक व्हावे अशा प्रकारची अनेक वर्षापासूनची मागणी आहे. केवळ छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा व्हावा अशी भूमिका नाही तर त्यांचे जन्मापासून ते मृत्यू पर्यंतचे सर्व जीवन चरित्र असले पाहिजे. ज्यांना वाचता येत नाही, ज्यांना मराठी भाषा येत नाही अशांना सुध्दा छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र समजले गेले पाहिजे अशा प्रकारची निर्मिती केली गेली पाहिजे हा या पाठीमागील उद्देश आहे. आपण उद्याच्या

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे ...

पिढीसाठी कोणता आदर्श ठेवणार आहोत. याचा आपण कधी विचार करणार आहोत की, नाही ? व्हिएतनाम येथे छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक काही उगीच बनवलेले गेले नाही. व्हिएतनामचे राष्ट्रपिता श्री. होचीमिन जेव्हा भारतात आले होते तेव्हा त्यांना विचारण्यात आले होते की, तुम्ही बलाढय अमेरिकेबरोबर 18 वर्षे लढा कसा काय दिला ? त्यावेळेस होचीमिन म्हणाले की, "छत्रपती शिवाजी महाराजांचे गनिमी काव्याचे तंत्र आम्ही अमेरिकेबरोबर वापरल्यामुळेच आम्ही यशस्वी झालो होतो". व्हिएतनामने छत्रपतींचा जो आदर्श घेतलेला आहे तसा आपण त्यांच्याकडून काय आदर्श घेणार आहोत ?

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाची मागणी 1990 मध्ये करण्यात आली होती. 1995 मध्ये श्री. सुधीर जोशी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त करण्यात आली होती. यासंदर्भात पुष्कळ बैठका झाल्या, जागेची पाहणी झाली परंतु प्रत्यक्षात काहीही झाले नाही. 1999 मध्ये राज्य सरकार बदलले गेले त्यावेळेस देखील यासंदर्भात समिती नियुक्त करण्यात आली होती. परंतु काहीही झाले नाही. सन 2005 मध्ये कमिटी नियुक्त केली गेली.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे....

या स्मारकासाठी समुद्रातील तसेच आरे कॉलनी पासून फिल्म सिटीपर्यतच्या अनेक ठिकाणच्या जागा पाहण्यात आल्या होत्या त्यानंतर 2008 साली अरबी समुद्रातील मरिन लाईन्सच्या समोर एक जागा निश्चित करण्यात आली होती . 2008 सालापासून आतापर्यत या कामासाठी आर्किटेक्ट नेमून या स्मारकाचे संकल्पचित्र निर्माण करण्याकरिता एक टेंडर काढण्यात आले होते. टेंडर काढल्यानंतर संबंधिता बरोबर करार करण्यासाठी शासनाला वेळ मिळालेला नाही. जे संकल्प चित्र तयार करण्यात आले होते ते देखील अजून फायनल करण्यात आलेले नाही. या संकल्प चित्राची एक कॉपी माझ्याकडे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे संकल्प चित्र आपण तयार करीत आहोत या गोष्टीचे भान शासनाला असावयास पाहिजे. परंतु शासनाला ते भान नाही. या स्मारकाच्या संकल्प चित्रामध्ये एक पर्यटन स्थळ निर्माण करण्यात येणार आहे. त्या ठिकाणी वॉटर स्पोर्टस, फिरते रेस्टॉरंट तयार करण्यात येणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांना जे अभिप्रेत आहे ते त्या ठिकाणी तयार केले जात नाही. त्या ठिकाणी शिवकालीन ऐतिहासिक वातावरण तयार करावयास पाहिजे परंतु त्याचा लवलेशसुध्दा या संकल्प चित्रामध्ये नाही. हे संकल्प चित्र तयार करण्याकरिता आर्किटेक्टकडून काही टेंडर मागविण्यात आले होते त्यातील एक टेंडर बेन्सले डिझाईन स्टुडिओ, थांयलंड या कंपनीचे असून टीम वर्क आर्किटेक्चर, मुंबई कंपनीचे दुसरे टेंडर होते. या दोन कंपन्या या कामासाठी फायनल करण्यात आल्या होत्या. बेन्सले डिझाईन स्टुडिओ ही थांयलंडची कंपनी आहे ती फक्त लॅन्डस्केप करणारी कंपनी आहे. स्मारकाचे संकल्पचित्र तयार करणारी ही कंपनी नाही.तरीही या कंपनीला काम देण्यात आले होते त्याचबरोबर टीम वर्क आर्किटेक्चर ही मुंबईतील कंपनी असून हॉटेल उभे करणे, स्पा उभे करणे, मनोरंजनासाठी विविध भाग उभे करणे, इमारती बांधणे इत्यादी कामे ही कंपनी करीत आहे. इतिहास कालीन स्मारक उभे करण्यासाठी जी योग्यता एखाद्या कंपनीकडे असणे आवश्यक आहे ती योग्यता या दोन्हीही कंपनीकडे नाही. त्याचबरोबर पात्रतेच्या अटीचा विचार केला असता एकही कंपनी या अटीमध्ये बसू शकत नाही. दोन्ही कंपन्यानी मिळून मॉर्डन डिझाईन तयार केले होते. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास सांगणारे स्मारक त्या ठिकाणी तयार केले जाणार आहे की, वॉटर स्पोर्टस,समुद्राचे दर्शन चांगल्या प्रकारे होण्यासाठी मनोरे उभारणे इत्यादी कामे त्या ठिकाणी केली जाणार आहेत ? राज्यातील जनतेच्या समोर नेमके काय मांडण्यात येणार आहे याचे भान शासनाने ठेवले पाहिजे होते.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे....

सभापती महोदय, सभागृहामध्ये माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय पर्यटन मंत्री, माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री उपस्थित आहेत. बेन्सले डिझाईन स्टुडिओ कंपनीने आणि टीम वर्क आर्किटेक्चर कंपनीने या स्मारकाचे डिझाईन तयार केलेले आहे ते रद्द करुन छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील वातावरण जे निर्माण करु शकतील , जे एतिहासिक वातावरण निर्माण करु शकतील , ज्याचा आपल्याला अभिमान वाटेल, पुढच्या पिढी ज्याचा आदर्श घेईन अशा प्रकारचे डिझाईन तयार करण्यासाठी पुन्हा प्रस्ताव मागविण्यात यावे अशी मला सर्वाना विनती करावयाची आहे.

सभापती महोदय, डिझाईन बनविण्यासाठी या दोन कंपन्या फायनल करण्यात आल्या होत्या 2008 सालापासून 2011 सालापर्यत गेल्या तीन वर्षात संबंधिताबरोबर करार करण्यासाठी शासनला वेळ मिळालेला नाही. ॲग्रिमेन्टची कॉपी तयार असतांना शासनाला ॲग्रिमेन्ट करण्यास वेळ का मिळत नाही ? हे स्मारक सार्वजनिक बांधकाम विभागाने करावयाचे की , पर्यटन विभागाने करावयाचे की सामान्य प्रशासन विभागाने करावयाचे यासंबंधी खो खो चा खेळ सुरु आहे.

नंतर श्री.सरफरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे....

कुणाचाच कुणाला पत्ता नाही. एका सेक्रेटरीकडे गेल्यानंतर तो दुसऱ्या सेक्रेटरीकडे जायला सांगतो, दुसरा सेक्रेटरी तिसऱ्या सेक्रेटरीकडे जायला सांगतो अशाप्रकारचा खो-खो चा खेळ सुरु असल्यामुळे या स्मारकाला विलंब होत आहे. माननीय मुख्यमंत्र्यांना माझी पहिली विनंती अशी आहे की, या स्मारकाचे डिझाईन आपल्याला पसंत पडते की नाही हे आपण पहावे. पसंत पडले नाही तर आपण पुन्हा दुसरे डिझाईन मागवावे. दुसरी मागणी अशी आहे की, या स्मारकाचा प्रश्न मार्गी लागण्यासाठी एक विभाग निश्चित करुन त्या विभागाकडे काम सोपवावे. यामध्ये पर्यटन विभाग असो, सार्वजनिक बांधकाम विभाग असो किंवा सामान्य प्रशासन विभाग असो यापैकी कोणत्याही विभागाकडे हे काम सोपवावे. त्या विभागाच्या एक-दोन अधिकाऱ्यांची या कामाकरिता नियुक्ती करुन त्यांच्याकडे आपण ही जबाबदारी सोपवावी. तसेच, त्याकरिता अधिकाऱ्यांची किंवा मंत्री गटाची एखादी समिती गठीत करण्यात यावी. त्या समितीकडे केंद्र शासनाच्या, राज्य शासनाच्या परवानग्या मिळविणे, इत्यादी कामांमध्ये सुसूत्रता आणण्याचे काम सोपविण्यात यावे.

सभापती महोदय, मी या अधिवेशनामध्ये दिनांक 16 मार्च रोजी एक प्रश्न विचारला होता. त्यावेळी उत्तर देतांना माननीय मुख्यमंत्र्यांनी "आम्ही हे स्मारक करणार आहोत" असे म्हटले होते. परंतु या स्मारकाकरिता या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्यात येणार आहे काय? असा प्रश्न विचारल्यानंतर "सन 2011-12 च्या अर्थसंकल्पामध्ये तरतूद प्रस्तावित असल्याचे म्हटले आहे" परंतु अर्थसंकल्पाची सर्व प्रकाशने चाळली असता त्यामध्ये कुठेही तरतूद केली असल्याचे आढळले नाही. त्यामुळे या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये स्मारकाच्या बांधकामाकरिता तरतूद करण्यात आली आहे की नाही या बाबत शासनाने खुलासा केला पाहिजे. सभापती महोदय, शासनाने सन 2009 मध्ये या स्मारकाला मान्यता दिली त्यावेळी 50 कोटींची तरतूद करण्यात आली होती. परंतु ते पैसे कुठे गेले आपल्याला माहीत नाही. शासन जर छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाबद्दल गंभीर असेल तर या बाबत आपण तातडीने पावले उचलणे आवश्यक आहे. या करिता राज्य शासनाची व केंद्र शासनाची परवानगी घेऊन हा प्रकल्प किती दिवसात मार्गी लावण्यात येणार आहे या बाबत शासनाने एकदा स्पष्ट भूमिका ठरविली पाहिजे. आज छत्रपती शिवाजी महाराजांची प्रेरणा घेऊन देशामध्ये अनेक लोक विक्रम आणि पराक्रम करीत आहेत अशावेळी महाराष्ट्र राज्य काय करणार आहे, पुढे जाणार आहे की मागे जाणार आहे, पुढील तरुण पिढीसमोर कोणता आदर्श ठेवणार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/

श्री. विनायक मेटे....

आहे? या बाबत शासनाने सकारात्मक दृष्टीकोन स्वीकारुन ज्याचा आपल्याला अभिमान वाटेल अशा प्रकारचे स्मारक उभे करण्यासंबधी लवकरात लवकर भूमिका स्वीकारावी अशी विनंती करुन आणि आपणा सर्वांचे आभार मानून मी माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद, जय महाराष्ट्र.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी एक अत्यंत महत्वाचा प्रस्ताव या सभागृहामध्ये मांडला आहे. या प्रसंगी माननीय अर्थमंत्री श्री. अजित पवार साहेब सभागृहात उपस्थित आहेत याचा मला आनंद होत आहे. हा प्रस्ताव या सभागृहामध्ये मांडण्याची आठवण माननीय मंत्री प्रा. फौजिया खान यांनी करुन दिली आहे.

**सभापती** : माननीय मंत्री प्रा. फौजिया खान यांनी मला विनंती केली होती.

श्री. दिवाकर रावते : बरोबर आहे, सभापती महोदय, त्यांनी आपणास विनंती केली होती. माननीय सदस्य श्री. विनायक मेटे या प्रस्तावावर भाषण करतांना छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक झाले पाहिजे असे सांगत होते. त्यावेळी त्यांनी कळत न कळत माननीय अर्थमंत्र्यांच्या संदर्भातील काही गोष्टी निदर्शनास आणून दिल्या. त्यांनी या ठिकाणी शासनाने दिलेले उत्तर वाचून दाखवितांना "सन 2011-12 च्या अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्यात येईल असे शासनाने जाहीर केले. परंतु संपूर्ण अर्थसंकल्प चाळला असता तरतूद कुठेही सापडली नाही" असे म्हटले. तेव्हा अशाप्रकारे आपण छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या संदर्भात माननीय अर्थमंत्र्यांबाबत गैरविश्वास दाखविणे योग्य आहे काय? असा मला प्रश्न पडला म्हणून मी या ठिकाणी उभा राहिलो.

सभापती महोदय, आपण अनेक स्मारके पाहिली आहेत. याठिकाणी आदरणीय श्री. मनोहर जोशी सरांचा आपण उल्लेख केला, तेव्हापासून या स्मारकाची संकल्पना सुरु झाली ती अजूनपर्यंत सुरु आहे. महाराजांच्या स्मारकाला समुद्रामध्ये केव्हा जागा मिळणार आहे हे मला माहीत नाही असे आपण म्हणालात. परंतु आदरणीय श्री. मनोहर जोशी हे लोकसभेचे सभापती झाले त्यावेळी इतक्या वर्षानंतर कां होईना, परंतु छत्रपती शिवाजी महाराज या राष्ट्रपुरुषाचा पुतळा बसविण्याचे काम या राजधानीमध्ये तुम्ही कराल या अपेक्षेने वाट पहात शेवटी त्यांनी लोकसभेच्या प्रांगणामध्ये पुतळा उभा केला.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

उद्घाटनाच्या वेळेला भगवे फेटे घालण्यासाठी कोणी नकार दिला ? मी येथे आता ते नाव घेत नाही. त्यावेळी त्या कार्यक्रमामध्ये महाराष्ट्राचा भगवा फेटा घालणार नाही असे सांगण्यात आले. पण मला एका गोष्टीचे कौतुक वाटते, त्याबद्दल मी माननीय मुख्यमंत्र्यांना, माननीय वित्त मंत्री श्री.अजितदादा पवार यांना धन्यवाद देणार आहे की, शासनाने तारखेप्रमाणे शिवजयंती मान्य केली आणि तिथीप्रमाणे जी शिवजयंती असते त्यादिवशी सुध्दा विधान भवनाच्या प्रांगणामध्ये असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांना आपण सर्वांनी आदरांजली वाहिली. दुर्दैवाने त्यावेळेला एका मंत्र्यांच्या पायामध्ये कोणीतरी शिपाई बूट घालतानाचे दृश्य मीडियाने दाखविले. परंतु ती एक गोष्ट सोडली तर तिथीप्रमाणे देखील आपण छत्रपती शिवाजी महाराजांना आदरांजली वाहिली. पण लोकसभेमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांना आदरांजली वाहण्यासाठी शिवसेनेचे सर्व खासदार निघाले, तेव्हा तेथील अध्यक्षांनी त्यासाठी मान्यता दिली नाही. मात्र त्यावेळी आपल्या महाराष्ट्रातील इतर पक्षाच्या एकाही खासदारांनी आमच्या शिवसेनेच्या खासदारांना छत्रपतींचा सन्मान करण्यासाठी साथ देखील दिली नाही. तेव्हा ज्यावेळी आदर व्यक्त करण्यासंबंधी विषय निर्माण होतो, त्यावेळेला अशा काही गोष्टी होतात की ज्या दुर्दैवाने बोचत रहातात आणि मग काही वेळेला त्याची आठवण करुन द्यावीशी वाटते म्हणून मी उभा राहिलो होतो.

सभापती महोदय, माननीय वित्त मंत्री श्री.अजितदादा पवार यांना सांगू इच्छितो की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याबाबत सांगावयाचे तर आपण ज्यापध्दतीने माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये त्याचा उल्लेख केला आणि जे काही ठरविलेले आहे, त्याच्या काही पध्दती असतात, काही प्रोसेस असते आणि त्यासंबंधीची तरतूद अर्थसंकल्पामध्ये नसली तरी ती पुढच्या वेळेस पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून करता येऊ शकते.आपण याबाबतीत विनंती करावयास हवी होती. पण काहीच दिलेले नाही असे सांगितले, ते योग्य नाही. आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर केल्याशिवाय रहाणार नाही. त्यामुळे मी या प्रस्तावाच्या निमित्ताने आपल्या बरोबर आहे आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक अरबी समुद्रामध्ये लवकरात लवकर व्हावे अशी इच्छा आहे. धन्यवाद.

-----

. . . .5 जी-2

श्री.अजित पवार (वित्त मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे आणि सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांनी युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांचे अरबी समुद्रमध्ये स्मारक कधी उभे करण्यात येणार आहे याबद्दल चर्चा उपस्थित केलेली आहे. मी राज्याचा अर्थमंत्री या नात्याने एवढेच सांगू इच्छितो की, यंदाच्या बजेटमध्ये यासाठी तरतूद दाखविण्यात आलेली नसली तरी छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे काम सुरु करण्यासाठी मी तर पूर्वीच्या माननीय मुख्यमंत्र्यांना एक जागा सुचविली होती आणि विद्यमान माननीय मुख्यमंत्र्यांना देखील जागा सुचविलेली आहे.

सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक लवकरात लवकर व्हावे या मताचे आम्ही मंत्रिमंडळातील अनेक सहकारी आहोत. परंतु सन्माननीय सदस्य श्री.विनायकराव मेटे यांनी सांगितले की, यासंदर्भात यावर्षीच्या अंदाजपत्रकामध्ये काहीही तरतूद नाही. पण मी या राज्याचा अर्थमंत्री म्हणून सांगू इच्छितो की, जर यासंबंधातील काम सुरु करावयाचे म्हटले तर तातडीने किती पैसे लागतील तेवढे सी.एफ.मधून ॲडव्हान्स् काढला जाईल आणि नंतर येणाऱ्या पुरवणी मागण्यांमध्ये देखील यंदाच्या वर्षी जेवढा निधी खर्च होईल, तेवढा निधी देण्याची तयारी ही निश्चितपणे शासनाची आहे. तरी देखील बजेटमध्ये साधारणपणे 5 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. पण जरी ती तुटपुंजी असली तरी तातडीने काम सुरु करण्याकरता जी तरतूद केलेली आहे, ती कमी नाही. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी तशा प्रकारे मनामध्ये कोणत्याही प्रकारची भावना आणू नये. महाराष्ट्रातील जनतेच्या मनामध्ये शिवाजी महाराजांबद्दल एक वेगळ्या प्रकारचा आपलेपणा आहे हे सगळ्या देशाला माहिती आहे,जगाला माहिती आहे. त्यामुळे असा कुठे मॅसेज जाऊ नये की, अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी चर्चा होत असताना छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाला लोकशाही आघाडीच्या सरकारने निधी दिला नाही अशा प्रकारची चुकीची बातमी बाहेर जाऊ नये यासाठी मी हा स्पष्टपणे खुलासा केलेला आहे.

----

. . . . 5जी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मी माननीय वित्तमंत्री श्री.अजितदादा पवार साहेब यांचे मन:पूर्वक आभार मानतो. त्याचप्रमाणे माननीय सभापतींचे आणि सभागृहाचे देखील आभार मानतो. माननीय वित्त मंत्री श्री.अजितदादा पवार यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही असे आश्वासन दिलेले आहे. सदरहू कामाच्या बाबत आणि त्याबाबत नेमण्यात येणाऱ्या समिती बाबत माननीय मुख्यमंत्री काय सांगतात याची मी वाट पहात आहे. तसेच मी दुसरी एक माहिती सांगू इच्छितो की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाची पहिली सुरुवात 1995 मध्ये माननीय श्री.मनोहर जोशी साहेब या राज्याचे मुख्यमंत्री होते, त्यावेळी केलेली आहे. तसेच सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेब यांना तो वचननामा माहिती नसेल. पण त्यावेळच्या वचननाम्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारण्याच्या बाबतीत वचन दिले होते. पण ते त्यांनी पूर्ण केले नाही. म्हणून हे सरकार ते पूर्ण करीत आहे हे आपण लक्षात ठेवावे.

सभापती : सदर अल्पकालीन चर्चा संपलेली आहे.

-----

. . . .5 जी-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



<u>सभागृहापुढील कामकाजाबाबत</u>

**सभापती** : आता सभागृहासमोर नियम 97 अन्वये एक चर्चा आहे. पण ती छोटी आहे. त्यानंतर दोन विधेयके चर्चेसाठी आहेत. त्यातील एक शासकीय विधेयक आहे आणि एक अशासकीय विधेयक आहे. तसेच एक लक्षवेधी सूचना आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील (खाली बसून) : शासकीय विधेयक प्रथम चर्चेला घ्यावे .

**सभापती** : अशासकीय विधेयकावरील चर्चा देखील दोन मिनिटामध्ये संपेल.

यानंतर कु.थोरात . . .

.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .....

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांची नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा आहे. सन्माननीय सदस्यांना मी विचारु इच्छितो की, ही चर्चा आज घ्यावयाची काय?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी ती थोडक्यात मांडतो.

श्री. पृथ्वीराज चव्हाण (बसून) : पुढील अधिवेशनात घेण्यात यावी.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, ठीक आहे. मी ही अल्पकालीन चर्चा पुढील अधिवेशनात उपस्थित करतो.

**सभापती** : ठीक आहे.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तीवेतन (सुधारणा) विधेयक.

L.A. BILL NO. XXIII OF 2011

( A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LEGISLATURE MEMBERS' PENSION ACT, 1976.)

श्री. राजेंद्र मुळक ( संसदीय कार्य राज्य मंत्री ) : सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्या प्रमाणे सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 23 महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्तीवेतन अधिनियम, 1976 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधानपरिषदे समोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

सभापती महोदय, जीवनाश्यक वस्तुंचे विद्यमानभाव आणि वाढती महागाई विचारात घेऊन तसेच महाराष्ट्र राज्य निर्मितीच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून शासनाने असा निर्णय घेतला आहे की, माजी सन्माननीय सदस्यांना दर महा 15 हजार रुपये इतके निवृत्ती वेतन मिळत असून ते दिनांक 1 मे, 2011 या महाराष्ट्र दिनापासून दर महा 25 हजार रुपये इतके वाढविण्यात यावे.तसेच त्यांच्या विधवा, विधुर अथवा त्यांचे जे आपत्य, मुले आहेत ते पूर्ण 18 वर्षाचे होईपर्यंत त्यांना वाढ देण्यात यावी, त्यामुळे शासनाला दर वर्षी अंदाजे 12 कोटी रुपये इतका अतिरिक्त आर्थिक भार अपेक्षित आहे. सभापती महोदय, माजी सन्माननीय सदस्य पुन: विधानपरिषद सदस्य झाले आहेत अथवा सदस्य शासकीय मंडळ अथवा महामंडळ यावर कार्यरत आहेत, त्यांनाही मिळत असलेले निवृत्ती वेतन आणि वेतन यामधील फरकाची रक्कम यापूर्वी त्यांना अनुज्ञेय होती पण ती सन 2008 मध्ये वगळण्यात आली होती, ती सुध्दा पूर्ववत करण्यात आली आहे. सभापती महोदय, मी अपल्या माध्यमातून सभागृहाला विनंती करतो की, सभागृहाने हे विधेयक मंजूर करावे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

..3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मला या ठिकाणी फक्त दोन सूचना शासनाला करावयाच्या आहेत. सन्माननीय माजी आमदारांच्या प्रोटोकॉल बद्दल मी अनेक वेळा या सभागृहात मुद्दा उपस्थित केला आहे. माजी सन्माननीय आमदारांना जो सन्मान दिला पाहिजे, तो त्यांना मिळत नाही. सन्माननीय माजी आमदार म्हणून जिल्हाधिकाऱ्याकडे आणि तहसीलदाराकडे गेल्या नंतर त्यांना योग्य तो प्रोटोकॉल मिळाला पाहिजे. तसेच सन्माननीय माजी आमदारांना टोल माफ झाला पाहिजे, याबाबतीत या ठिकाणी आश्वासन देण्यात यावे, अशी मी विनती करतो.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, माजी आमदारांच्या टोलच्या संदर्भात शासनाने निर्णय घेतलेला आहे, तो माफ करण्यात येईल.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

यानंतर श्री. बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात

( खंड 2 ते 4, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**सभापती** : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) विधेयक

**मु. शी.** : सन 2011 चे वि. स. वि. क्रमांक 1- महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) विधेयक या विधानसभेने संमत केलेल्या विधेयकात विधान परिषदेने केलेल्या सुधारणांना विधानसभेने सहमती दिल्याबद्दलचा संदेश

**सभापती** : विधेयकासंबंधी विधानसभेकडून एक संदेश आलेला आहे. प्रधान सचिव तो संदेश वाचून दाखवतील.

प्रधान सचिव : महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम 144 (1) अन्वये कळविण्यात येते की, विधानसभेने दिनांक 14 एप्रिल, 2011 रोजी संमत केलेल्या सन 2011 चे वि. स. वि. क्रमांक 1- महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, 2005 यात सुधारणा करण्याकरिता विधेयक यात विधान परिषदेने दिनांक 20 एप्रिल, 2011 रोजीच्या बैठकीत संमत केलेल्या सुधारणेस विधानसभेने आपल्या दिनांक 21 एप्रिल, 2011 रोजीच्या बैठकीत संमती दिलेली आहे.

**सुधारणा**

खंड 5, पृष्ठ क्रमांक 4, ओळ क्रमांक 5 नंतर पुढील मजकूर दाखल करण्यात यावा.

"परंतु आणखी असे की, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अधिनियम 2011, राजपत्रात प्रसिध्द झाल्याचे दिनांकानंतर राज्य मंत्रिमंडळ क्षेत्रीय वाटप निर्धारित करील"

----



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**अशासकीय कामकाजासंबंधी**

**सभापती** : आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेत दाखविण्यात आलेले अशासकीय कामकाज पुढे ढकलण्यात येत असून सदरहू अशासकीय कामकाज पुढील अधिवेशनात घेण्यात येईल.

----

**अल्पकालीन चर्चेसंबंधी**

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये दिलेली मराठी भाषेच्या संदर्भातील अल्पकालीन चर्चा पुढच्या अधिवेशनात उपस्थित करीन. ही चर्चा आज करता आली असती पण एक बरे झाले की मला आणखी सवलत मिळाली. मी मराठी भाषेच्या संदर्भात आग्रह का धरतो तर आम्ही विधिमंडळात मागच्या प्रवेशव्दाराने पायऱ्या चढून आत आलो तर एका बाजूला कोणत्या मजल्यावर काय आहे हे दाखविणारा फलक इंग्रजीमध्ये लावलेला आहे. आम्ही रोज या ठिकाणी मराठीच्या बाबतीत आग्रह धरत असतो पण या ठिकाणी अजूनही इंग्रजीमध्ये फलक लिहिलेला आहे. तो फलक सुध्दा अजून मराठीमध्ये लिहिला जात नाही. म्हणून हे सर्व करावे लागते. मी ही थोडीशी झलक सांगितली, बाकीचे नंतर सांगेन.

**सभापती** : ठीक आहे.

---

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/

**पृ. शी.** : राजीव गांधी जीवनदायी विमा योजना राज्यात अंमलात आणण्याचा घेतलेला निर्णय

**मु. शी.** : राजीव गांधी जीवनदायी विमा योजना राज्यात अंमलात आणण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत माननीय मुख्यमंत्र्यांचे निवेदन

श्री. पृथ्वीराज चव्हाण (मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करीत आहे.

सभापती महोदय, विधानसभा सभागृहामध्ये एक घोषणा केली ती या सभागृहात करावयाची राहिलेली आहे. त्या बाबत मी एकाच ओळीत सांगतो की, आजच मंत्रिमंडळाने सर्व राज्यभर राजीव गांधी जीवनदायी विमा योजना अंमलात आणण्याचे ठरविलेले आहे. या योजनेमध्ये एकंदरीत 946 व्याधींवर उपचार आणि शस्त्रक्रिया मोफत करुन दिल्या जाणार आहेत. दारिद्र्य रेषेखालील आणि दारिद्र्य रेषेवरच्या म्हणजे 1 लाख रुपये उत्पन्न असलेल्या प्रत्येक कुटुंबाला ही विमा योजना लागू होईल आणि काहीही खर्च न लागता या सर्व व्याधींवर उपचार होईल. एकूण दीड लाख रुपयांपर्यंत खर्च झाला तरी तो उपचार मोफत करण्यात येईल. या योजनेची घोषणा मागच्या अंदाजपत्रकीय भाषणात केली गेली होती. गेले वर्षभर याचा अभ्यास केला गेला आणि आता ही योजना टप्प्या टप्प्याने संपूर्ण राज्यभर कार्यान्वित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

---

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सत्रकाळातील कामकाजाचा आढावा

**सभापती** : अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा आजचा शेवटचा दिवस आहे आणि आजचे दिवसाचे कामकाज सुध्दा आता संपले आहे. मी या सत्रकाळातील कामकाजाचा आढावा आता सदनासमोर ठेवतो.

| | |
|---|---|
| एकूण बैठकींची संख्या - 24 | एकूण काम - 163 तास |
| मंत्री उपस्थित नसल्यामुळे वाया गेलेला वेळ | 1 तास 5 मिनिटे |
| अन्य कारणांमुळे वाया गेलेला वेळ | 55 मिनिटे |
| प्रत्यक्षात झालेले कामकाज | 161 तास |
| रोजचे सरासरी कामकाज | 6 तास 40 मिनिटे |

( विधान परिषद नियमानुसार बैठकीची वेळ 5 तास आहे. म्हणजेच आपण एकूण 32 दिवसांचे ( जवळ जवळ 6 आठवड्यापेक्षा अधिक ) काम केले आहे. )

<u>तारांकित प्रश्न</u>

एकूण आलेले तारांकित प्रश्न - 5026 , कार्यवाहीसाठी घेतलेले तारांकित प्रश्न - 4473

स्वीकृत प्रश्न 2025 , सभागृहात तोंडी उत्तरित झालेले तारांकित प्रश्न 137

उत्तरित झालेले अल्पसूचना प्रश्न - 6

<u>नियम 93 सूचना -</u>

एकूण प्राप्त झालेल्या सूचना - 287, स्वीकृत सूचनांची संख्या 132, चर्चा झालेला सूचना 15

<u>लक्षवेधी सूचना --</u>

प्राप्त झालेल्या सूचना -1340, मान्य झालेल्या सूचना 286, चर्चा झालेल्या सूचना - 82

विशेष उल्लेखाच्या 91 सूचना मांडण्यात आल्या.

नियम 46 अन्वये मंत्र्यांनी केले निवेदने - 4

<u>नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा</u> -प्राप्त झाल्या 07 , मान्य झाली 7 , चर्चा झाली 6

शासकीय विधेयके संमत - 21

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .......

नियम 260 अन्वये 6 प्रस्तावावर चर्चा झाली.

अशासकीय ठरावावर चर्चा झाली - 7

अशासकीय विधेयक चर्चा झाली - 2

अंतिम आठवडा प्रस्ताव चर्चा झाली - 1

अर्धा तास चर्चा - प्राप्त झाल्या 148, मान्य झाल्या 104, चर्चा झाली 18

-----

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: पुढील अधिवेशनासंबंधी घोषणा.

**सभापती** : मी खालील घोषणा करतो :-

राज्यपालांना अशी शिफारस करण्याचे ठरले आहे की, " महाराष्ट्र विधानपरिषदेचे पुढील अधिवेशन सोमवार, दिनांक 25 जुलै, 2011 रोजी विधान भवन, मुंबई येथे घेण्यात यावे."

---------

**पृ.शी./मु.शी.**: सत्र-समाप्तीसंबंधी घोषणा.

**सभापती** : सभागृहाचे कामकाज आता संपले आहे. राज्यपालांकडून पुढीलप्रमाणे संदेश आला आहे :-

" मी, श्री. के. शंकरनारायणन् , महाराष्ट्राचे राज्यपाल, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 174, खंड (2), उपखंड (क) व्दारे मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, याद्वारे गुरुवार, दिनांक 21 एप्रिल, 2011 रोजी होणाऱ्या बैठकीच्या समाप्तीबरोबरच महाराष्ट्र विधानपरिषदेचे अधिवेशन संस्थगित करीत आहे."

आता राष्ट्रगीत गाईले जाईल व त्यानंतर सत्र संस्थगित होईल, असे मी घोषित करतो.

( यानंतर राष्ट्रगीत झाले )

( संध्याकाळी 8 वाजून 7 मिनिटांनी सत्र संस्थगित झाले. )

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही